गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय

क्षत्रिय कुलावतंस

# छत्रपती शिवाजी महाराज

यांचे संक्षिप्त चरित्र

## कृष्णराव अर्जुन केळूसकर



संपादक

**राजन गवस**

क्षत्रियकुलावतंस

# श्रीछत्रपती शिवाजी महाराज

यांचें संक्षिप्त चरित्र


## श्रीयुत कृष्णराव अर्जुन केळूसकर

संपादक - राजन गवस

प्रस्तावना - अवनीश पाटील



**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

वाय ६५२-१

▸▸ **पुस्तकाचे नाव :** गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय
क्षत्रिय कुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे संक्षिप्त चरित्र

▸▸ **लेखक :** कृष्णराव अर्जुन केळूसकर

▸▸ **संपादक :** डॉ. राजन गवस

▸▸ **पुनर्मुद्रण :** २०१९

▸▸ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

▸▸ © **प्रकाशकाधीन :**

▸▸ **मुखपृष्ठ :** सरदार जाधव

▸▸ **मुद्रक :**


व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

▸▸ **किंमत : १४५/-**

---

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

महाराष्ट्राचे वाङ्मयमहर्षी




गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर

# अध्यक्षांचे मनोगत

## महाराष्ट्राचे वाङ्मयमहर्षी गुरुवर्य केळूसकर

आज जगभर सगळ्या क्षेत्रातलं वर्तमानपर्यावरण झाकोळलेलं असताना जनकल्याणासोबत उत्तम प्रशासनासाठी आयुष्यभर ध्यास घेतलेल्या छत्रपती शिवरायांची प्रकर्षाने आठवण येत आहे. छत्रपती शिवराय जाऊन तीनशे वर्षे उलटली; तरीही जगभरातील इतिहासतज्ज्ञ, अभ्यासक त्यांच्या सर्व क्षेत्रांतील कामांचे, उत्तम प्रशासनाचे मुक्तकंठाने प्रशंसा करत आले आहेत. मानवीइतिहास हा सरकारी दप्तरखान्यात, लोकसंस्कृतीच्या कथा-गीतांत आणि हजारो लोकांच्या जिभांतून मौखिक परंपरेच्या रूपाने उलगडत जातो. याकरिता इतिहासलेखकास या सर्व लेखनसाधनांचा शोध घेत विषयांच्या मुळापर्यंत जावे लागते. दुर्दैवाने आपल्याकडे तटस्थपणे इतिहास लिहून ठेवण्याची परंपरा कमी असल्याने बरेचदा लिहिणारा त्याच्या सोयीप्रमाणे लिहून घेणाऱ्याचे हितसंबंध राखत लिहीत जातो. यामुळेच छत्रपती शिवरायांचे सर्वांगपूर्ण चरित्र येण्यास खूप काळ जावा लागला.

छत्रपती शिवराय या युगपुरुषांचे मराठीतील पहिले चरित्र लिहिले गुरुवर्य कृष्णराव अर्जुनराव केळूसकर या बहुजन समाजाच्या प्रज्ञावंत लेखकाने. मराठीतील आजचे विख्यात चरित्रकार डॉ. धनंजय कीर लिहितात, ''केळूसकरकृत शिवचरित्राएवढे समग्र व सविस्तर चरित्र आजपर्यंत कोणीही लिहिले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिले मोठे चरित्र जसे गुरुवर्यांनी लिहिले; तसेच गौतमबुद्ध आणि संत तुकाराम यांचे पहिले चरित्रकारही केळूसकरच आहेत.'' मराठीतील मोठे विचारवंत, विख्यात चरित्रकार, इतिहासकार, विवेकवादी वक्ते, सामाजिक नेते आणि कामगारांचे ते कैवारी होते. राजकीय ऋषी मामा परमानंद, न्यायमूर्ती माधवराव रानडे या विचारवंतांनी त्यांच्या लेखणीची व विचारांची प्रशंसा केली. त्यांनी लहानमोठी पस्तीस चरित्रं लिहिली. ते गीता आणि बौद्ध धर्माचे भाष्यकार होते. धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान या

विषयांवर अनेक ग्रंथ लिहिणारे प्रकांड पंडित होते. गेल्या शतकातील ख्यातनाम लेखक प्रा. माधवराव दामोदर आळतेकर म्हणाले, ''रा. रा. केळूसकर हे जुन्या पिढीतील म्हणजे आगरकर-टिळकांच्या पिढीतले महत्त्वाचे लेखक होऊन गेले; पण बहुजन समाजाच्या वाट्याला येणारी फरफट केळूसकरांच्या वाट्याला आली आहे.''

२.

या प्रज्ञावंत लेखकाची पारख राजकीय ऋषी मामा परमानंदांनी केली. गुरुवर्य केळूसकर विल्सन हायस्कूलला शिक्षक म्हणून काम करू लागले. लेखक व्हायचे या जिद्दीने त्यांनी लेखन-वाचनाची साधना सुरू केली. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीत ते ओढले जाऊन ठिकठिकाणी भाषणे करू लागले. त्याचे वृत्तांत 'दीनबंधूत' येऊ लागले. सुबोधपत्रिकेतील एक निनावी लेख मामा परमानंद यांना आवडला. मामांनी केळूसकरांचा शोध घेतला. त्यांच्यातील लेखनगुण ओळखले. त्यांची भेट घेतली. या लेखकात लेखनकौशल्य आहेत. त्याला पुस्तक प्रकाशनाची संधी मिळाली पाहिजे, या विचारांनी ते म्हणाले, ''बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज हे साहित्यकलेचे चाहते आणि जाणकार आहेत. महात्मा फुले यांचे कार्यकर्ते रामचंद्र धामणसकर महाराजांचे दिवाण आहेत. त्यांचेकडे मी तुमची शिफारस करतो''.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा मुंबईत मुक्काम असताना मामांनी केळूसकरांबद्दल विनंती केली. महाराजांनी केळूसकरांना भेटीस बोलावले. केळूसकरास प्रश्न विचारून खडसून परीक्षा घेतली. केळूसकरांचे चांगले वाचन बघून महाराजांचे समाधान होऊन ते म्हणाले, ''दि स्टोरी ऑफ नेशन्स सिरीजमध्ये जगभरातील बारा ग्रंथांचा मराठीत भाषांतर करण्याचा आमचा बेत आहे. यातील फ्रान्सचा जुना इतिहासाचे भाषांतर तुम्ही करा.''

महाराजांनी एका पुस्तकाचे भाषांतर करण्याचे काम बहुजनाच्या शूद्र माणसाला दिले, ही गोष्ट बडोद्यातील विद्वानांना आवडली नाही. या संदर्भात कुजबुज अन् केळूसकरांच्या लेखनदर्जाबद्दल संशयाची चर्चा महाराजांच्या कानावर आली; पण ते आपल्या निर्णयावर खंबीर राहिले. ते बारा ग्रंथ १८८३ ला

छापून झाले आणि त्यावेळच्या दक्षिणाप्राइज कमेटीचे पहिले बक्षीस ‘फ्रान्सचा जुना इतिहास’ या केळूसकरांच्या ५६८ पृष्ठांच्या भाषांतरास मिळाले. यानंतर लागलीच महाराजांनी ‘सेनका व एपिक्टेट्स’ ६५० पृष्ठांच्या ग्रंथाच्या भाषांतराचे काम केळूसकरांना दिले आणि गुरुवर्य केळूसकरांच्या साहित्यसेवेची सुरुवात गायकवाड सरकारच्या मदतीने सुरू झाली.

३.

फ्रान्सचा जुना इतिहास (१८८३), तुकारामबावांचे चरित्र (१८९६), सेनेका व एपिक्टेट्सची बोधवचने (१८९७), गौतमबुद्धाचे चरित्र (१८९८), सात उपनिषदांचे भाषांतर (१८९८) आणि श्रीमद्भगवतगीता हा ११०० पृष्ठांचा ग्रंथ (१९०२) यासारखे चौफेर लेखन केलेल्या केळूसकरांचे बडोद्यात येणे-जाणे वाढले होते. बडोद्याचे दिवाण रामचंद्र विठोबा धामणसकर हे त्यांचे चांगले स्नेही झाले होते. शिक्षकाची नोकरी, वेगवेगळ्या मासिकांचे संपादन, कौटुंबिक आर्थिक ओढाताण – त्यासाठी शिकवण्या घेणे आणि राहिलेल्या वेळात झंझावातासारखे लेखन करत होते. मध्येच प्रकृती ढासाळली. अशात ते बडोद्यात धामणसकरांना भेटायला आले. त्यावेळी खासेराव जाधव हे कलेक्टर हुद्द्यावरील अधिकारी तेथे बसलेले होते. धामणसकर खासेरावांना म्हणाले, ‘‘हे गुरुवर्य रा. रा. कृष्णराव केळूसकर. आपल्या समाजातील विद्वान इतिहासतज्ज्ञ आहेत. त्यांनी आतापर्यंत काही मराठी ग्रंथ लिहिले आहेत. आता छत्रपती शिवाजी महाराजांवर चरित्र लिहिण्याचा त्यांचा मानस आहे. त्याकरिता चर्चा करण्यासाठी मुद्दाम आले आहेत.’’

तरुण खासेराव म्हणाले, ‘‘ग्रंथ चांगला लिहा हं गुरुजी; कारण आपल्या मराठ्यात ग्रंथ लिहिणारे तुम्हीच पहिले आहात.’’ खासेरावांच्या प्रतिक्रियेस गुरुवर्य केळूसकरांनी हसून प्रतिसाद दिला आणि केळूसकर-खासेरावांची पुढे ओळख वाढत गेली. नुकतेच आजारातून उठलेल्या गुरुवर्य केळूसकरांना दाजीसाहेब व रामचंद्र दळवी हे दोघे बंधूही शिवचरित्र लेखनाचा आग्रह करत होते. मराठा प्राव्हिडंट फंडातर्फे ते प्रकाशित व्हावे, अशी त्यांची इच्छा होती. १९०३ साली गुरुवर्यांनी श्री शिवाजी महाराजांसंबंधाचा अभ्यास सुरू केला. उपलब्ध सामग्री वाचून टिपणे काढली. होईल तेवढे चांगले आणि निर्दोष शिवचरित्र लेखन सुरू केले. मधल्या काळात पत्नीचे आजारपण, दोन मुलींचा विवाह आणि अतिश्रमाने

पुन्हा आजारी पडले. वासुदेव लिंगोजी बिर्जे हे विद्वान सत्यशोधकी माणूस मदतीला धावून आले. हे श्री. बिर्जे सयाजीराव महाराजांकडे काही काळ ग्रंथपाल होते. यांच्या मदतीने छत्रपती शिवरायांचे चरित्रलेखन पूर्ण होऊन डिसेंबर १९०६ ला ग्रंथ निर्णयसागर छापखान्यात गेला. १९०७ साली प्रकाशित झाला. गुरुवर्य केळूसकरांनी छत्रपती शाहू महाराजांना हा ग्रंथ अर्पण केला. छत्रपतींनी एक हजार रुपये देऊन आणखी पाचशे प्रती घेतल्या. महाराजा सयाजीराव आणि बापूसाहेब कागलकरांनी प्रत्येकी दोनशे प्रती घेऊन मदत केली.

४.

''क्षत्रियकुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र'' हा ५९८ पृष्ठांचा पहिला चरित्रग्रंथ लिहिताना इतिहासकाराने सत्याचे प्रकाशन व समर्थन करावे, अशी गुरुवर्य केळूसकरांची विवेकवादी भूमिका होती. सत्य बिनधोक सांगितले पाहिजे. मग त्यामुळे कोणाला आनंद होईल किंवा वाईट वाटेल याचा चरित्रलेखकाने मनात किंतु ठेवू नये, असे ते म्हणत. यामुळेच गुरुवर्य केळूसकर यांनी पहिले समग्र आणि सविस्तर शिवचरित्र लिहिले, असे डॉ. धनंजय कीर यांनी गौरवाने लिहिले आहे.

शिवचरित्रातील ऐतिहासिक सत्याबद्दल लिहिताना आपल्या आत्मकथेत गुरुवर्यांनी लिहिले आहे, ''कित्येक लोकांना न आवडणाऱ्या गोष्टी मी या चरित्रात आधारभूत लिहिल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापण्याच्या कामी मसलत व उपदेश दादोजी कोंडदेव, शहाजी महाराजांचे कित्येक हस्तक आणि रामदास स्वामी होते, असे म्हणणे मी साफ खोडून काढले आहे. दादोजीने शहाजी महाराजांकडे अनेक पत्रं लिहून कागाळी केली की, शिवबा आपले ऐकत नाही.''

रामदास स्वामींच्या उपदेशाने व सल्ल्याने शिवरायांनी स्वराज्यांचे तोरण बांधले, यालाही बिलकूल आधार नाही. शिवाजी महाराज आणि रामदास यांची पहिली भेट १६७३ ला झाल्याचा सबळ लेखी पुरावाही त्यांनी दिला आहे. त्यामुळे यापूर्वीची १६४९ ची स्वामी व शिवरायांची भेट झाली, यास आधार नाही. दासबोधाच्या शेवटी राजकीय बाबींचा उल्लेख आहे; परंतु तो रामदास

स्वामींच्या हातचा नसून केवळ प्रक्षिप्त आहे. स्वामी १६८२ ला निधन पावल्यानंतर लिहिला आहे, असे केळूसकर गुरुजी लिहितात.

न्यायमूर्ती माधवराव रानडे यांनी मराठ्यांचा इतिहास लिहिला. यात ते म्हणतात, शिवरायांचा महाराष्ट्रापुरते स्वराज्य स्थापण्याचा उद्देश व प्रयत्न होता. न्या. रानडे यांचे हे म्हणणे अप्रमाण असून अखिल हिंदुस्थानवर स्वराज्य स्थापण्याचे शिवरायांचे स्वप्न होते, हे गुरुवर्य केळूसकरांनी या चरित्रात लिहिले आहे. शिवाजी महाराज आणखी दहा वर्षं जगले असते, तर त्यांनी या सगळ्या गोष्टी जगाला करून दाखवल्या असत्या.

दादोजी कोंडदेव व रामदास हे शिवाजींचे गुरू नाहीत हे स्पष्ट सांगणे अनेक मंडळींना आवडले नाही. काही मंडळींनी त्यांच्यावर जातिद्वेषाचाही आरोप केला. समकालीन वृत्तपत्रांनी हात राखून या शिवचरित्राबद्दल लिहिले. मात्र प्रा. ना. के. बेहरेसारखे विद्वान मनमोकळेपणाने म्हणाले, ''केळूसकरकृत श्री छत्रपतींचे चरित्र हा सुंदर ग्रंथ अनेक वर्षांपासून माझ्या नित्यपाठाचा झाला आहे.'' शिवचरित्र प्रकाशित झाले त्याच वर्षी १९०७ साली अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची पहिली परिषद धारवाड येथे भरविण्यात आली. कोल्हापूरचे ना. भास्करराव जाधव या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. सयाजीराव महाराजांचे उजवे हात असलेले खासेराव जाधव अध्यक्ष होते. हे खासेराव महाराजांचे जवळचे नातेवाईक आणि कलेक्टरच नव्हते, तर क्रांतिकारकांना मदत करणारे, सत्यशोधक चळवळीचे सक्रिय कार्यकर्ते आणि बडोद्यातील अनेक कल्याणकारी योजनांचे प्रवर्तकही होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात गुरुवर्यांच्या शिवचरित्राबद्दल गौरवाने बोलताना खासेराव म्हणाले, ''आमच्या महाराष्ट्रातील काँग्रेसभक्त मंडळी श्री शिवाजी महाराजांचा उत्सव करिते. हा उत्सव खरोखर भक्तिपुरस्सर आहे असे आम्ही समजतो काय? त्यांची जर श्री शिवाजी महाराजांच्या ठायी खरी पूज्य बुद्धी असती तर त्यांच्याच वंशजांस ते शूद्र म्हणण्यास का तयार झाले असते? आमचे मित्र रा. रा. केळूसकर यांनी नुकतेच श्री शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले आहे. ते फार सरळ आणि मनोवेधक भाषेत परिश्रमाने लिहिले असून ऐतिहासिक माहितीने भरलेले आहे. पुष्कळ गोष्टी आजपर्यंत लोकांच्या नजरेआड होत्या त्या या पुस्तकामुळे पुढे आल्या आहेत आणि त्या योगाने आपल्या लोकांच्या संबंधाने जे अज्ञानाचे समज

होते ते दूर झाले आहेत. असे हे एक चांगले पुस्तक एका मराठ्याने लिहिले असल्याने आमच्या ब्राह्मण बंधूस आनंद व्हावयास पाहिजे होता; परंतु निराळाच प्रकार माझ्या कानी आला आहे. ब्राह्मण लोकांनी हे पुस्तक वाचण्याकरिता विकत घेतले नाही एवढेच नाही, तर या पुस्तकाची जाहिरातसुद्धा त्यांनी आपल्या वर्तमानपत्रात पैसे घेऊन प्रसिद्ध करण्याचे नाकारले, हा किती शूद्र विचार! यावर आपल्या मंडळींनी बेदिल न होता त्यांच्यासारखे लायक आहोत असेच दाखविणे हा उत्तम मार्ग आहे. विनाकारण हेवा, द्वेष करण्यात अर्थ नाही. यावर एकच उपाय आहे – शिकले पाहिजे. आपण एका देशात राहतो; आपले फार काळापासून चांगले संबंध आहेत. ते संबंध वाढले पाहिजे. त्यात दोघांचाही फायदा आहे. शिक्षण हाच उत्कर्ष आणि परिवर्तनाचा एकमेव मार्ग आहे.''

गुरुवर्य केळूसकरांनी त्यांच्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्राचे इंग्रजी भाषांतर प्रा. नीळकंठराव ताकाखाव यांनी केले. ते भाषांतर खासेराव जाधवांनी वाचले. हा उत्तम ग्रंथ जगभरातील इंग्रजी वाचकांसमोर गेल्याने छत्रपती शिवरायांचे अलौकिक काम जगापुढे येईल, असे त्यांना वाटू लागले. खासेराव गुरुवर्य केळूसकरांना म्हणाले, हा तुमचा ग्रंथ छापावयाला लागणारे द्रव्य मी अवश्य मिळवून देतो. या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी सयाजीराव महाराजांकडे प्रथम शब्द टाकावा, असा खासेरावांचा विचार होता; पण त्या काळात बडोद्यातील कौटुंबिक–राजकीय अडचणींची कल्पना खासेरावांना होती. त्यामुळे त्यांनी स्वत: ग्वाल्हेरच्या श्री. खासेराव पवार आणि श्रीसंत सरदार शितोळे यांच्याकडे गोष्ट काढली. सरदार शितोळे यांनी कर्जाऊ साडेपाच हजार रुपये दिले आणि इंग्रजी शिवचरित्र १९२१ साली छापून आले. ग्रंथाच्या पाच हजार प्रती छापल्या. छत्रपती राजाराम यांनी दोनशे प्रती घेऊन मदत केली. इतर राजेरजवाड्यांकडून अन् धनवान मराठा मंडळींकडून या ग्रंथांबद्दल कमालीची उदासीनता अनुभवायला मिळाली. साडेचार हजार प्रती गुरुवर्य केळूसकरांच्या अंगावर पडून राहिल्या. तुमचे कर्ज फेडण्यासाठी मी महाराष्ट्रभर फिरून भीक मागेन असा शब्द खासेराव जाधवांनी दिला. छत्रपती शाहूंनी मदतीचा शब्द दिला; पण थोड्या अंतराने हे दोन्ही पुरुष अकाली गेले. शेवटी इंदूरचे महाराज तुकोजीराव होळकरांनी मदत केल्याने गुरुजींच्या डोक्यावरचे कर्जाचे ओझे दूर झाले. तीन हजार प्रती जगभरातील इंग्रजी

वाचनालयांना स्वखर्चाने भेट पाठविल्या. पाचशे प्रती होळकर सरकारांना दिल्या. पुढे दुर्दैवाने या स्वाभिमानी राजाला संस्थान सोडून जावे लागले. याचे दु:ख गुरुवर्य केळूसकरांना झाले. होळकरांच्या या मदतीमुळे केळूसकरांचे सगळे देणे फिटले. पाच हजार रुपये त्यांच्याकडे शिल्लक राहिले. शिवचरित्राचे भाषांतरकार प्रा. ताकाखाव यांना कृतज्ञता म्हणून पाच हजार रुपयाचे शंभर तोळे सोने घेऊन सन्मानाने मानधन म्हणून दिले. हा त्या काळातला लेखकाचा सर्वांत मोठा सन्मान होता.

५.

महाराजा सयाजीरावांनी तत्कालीन विद्वानांचा विरोध झुगारून गुरुवर्य केळूसकरांना ग्रंथलेखनास प्रोत्साहन दिले, ते ग्रंथ बडोदा संस्थानने प्रकाशित केले आणि बहुजन प्रज्ञावंतास लेखक म्हणून उभे राहण्यास मोठी संधी दिली. हे गुरुवर्यांनी कृतज्ञतापूर्वक आपल्या आत्मकथेत नमूद केले आहे.

म. फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या कर्त्या युगपुरुषांना सर्वार्थाने साहाय्य करणारे, पाठबळ देणारे महाराजा सयाजीराव होते, हे आता पुरोगामी महाराष्ट्र समजून घेत आहे; लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य ग्रंथ लिहिण्यापूर्वी तेरा वर्षं अगोदर म्हणजेच १९०२ साली ११०० पृष्ठांचा श्रीमद्भगवद्गीता ग्रंथ १९०२ साली लिहिला; पण बावीस वर्षं प्रकाशक न मिळाल्याने तो धूळ खात पडून राहिला, अशी खंत त्यांनी आपल्या आत्मकथेत लिहिली. पुढे तो सावळाराम यंदे यांनी प्रकाशित केला. सावळाराम यंदे यांना पुस्तक प्रकाशनास सयाजीरावांनी मदत केली. गुरुवर्य केळूसकर हे गौतमबुद्ध, संत तुकाराम आणि छत्रपती शिवाजी या युगपुरुषांचे मराठी भाषेतील पहिले महत्त्वाचे चरित्रलेखक आहेत. मामा परमानंद, न्या. रानडे, डॉ. धनंजय कीर, क्रांतिकारक खासेराव जाधव या विचारवंतांनी केळूसकरांच्या लेखणीची व विचारांची प्रशंसा केली.

महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ, मराठा ऐक्येच्छू सभा, कामगार चळवळ आणि अनेक सामाजिक संस्थांत त्यांनी आयुष्यभर काम केले. त्यांच्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे नेते समाजास मिळाले. नाईक मराठा मंडळाची स्थापना गुरुवर्य केळूसकरांनी ब्याऐंशी वर्षांपूर्वी केली. खेड्यातील गरीब आणि शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना आजही या मंडळातर्फे शिष्यवृत्ती देण्यात येते.

जनात जनार्दन पाहणारे गुरुवर्य केळूसकरांनी आयुष्यभरात सात हजार पृष्ठांहून अधिक चौफेर लेखन केले. पुरोगामी महाराष्ट्रातील वाचकांनी व अभ्यासकांनी केळूसकरांच्या एकूण लेखनाची म्हणावी तशी दखल घेतलीच नाही. त्यांनी उभ्या आयुष्यात चाळीसेक मोठे ग्रंथ लिहिले; पण गौतम बुद्धांचे चरित्र आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र वगळता उभ्या महाराष्ट्राने या बहुजन समाजाच्या महर्षीकडे पूर्णत: पाठ फिरवली. त्यांचे संत तुकारामबावांचे चरित्र हा मराठीतील पहिला गद्य स्वरूपातील विवेकवादी चरित्रग्रंथ १८९६ साली प्रकाशित झाला. गेल्या एकशे अठरा वर्षांत या ग्रंथांची दुसरी आवृत्ती प्रकाशित करावी असे महाराष्ट्रातील संत साहित्याच्या प्रकाशकास, अभ्यासकास आणि संत तुकारामाच्या अभ्यासकांस शोध घ्यावा वाटला नाही, हाही इतिहास आहे. अशा या वाङ्मयमहर्षीची ओळख महाराष्ट्राने आज पुन्हा करून घेण्याची गरज असल्याने मी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा अध्यक्ष होताच कार्यकारी मंडळाच्या पहिल्या बैठकीत समग्र कृ. अ. केळूसकरचे प्रकाशन शासनाने करावे असा निर्णय घेतला. या वाङ्मयीन जबाबदारीचे काम आमचे मित्र श्री. राजन गवस यांच्याकडे सोपविले. त्यांनी ही महत्त्वाची जबाबदारी पार पाडून या वाङ्मयीन महर्षीची ओळख महाराष्ट्राला नव्याने करून दिली आहे, याचा मला खूप आनंद आहे.

दि. २८-५-२०१८

बाबा भांड
**अध्यक्ष**
म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

# संपादकीय

गुरुवर्य केळूसकरांनी लिहिलेले 'छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र'हे मराठीतील पहिले चरित्र आहे. हे चरित्र विश्वसनीय मानले जाते. केळूसकर गुरुजींनी महात्मा फुलेंच्या सभा लहानपणीच ऐकल्या होत्या. त्यांच्या विचाराचा आणि कार्याचा प्रभाव स्वाभाविकपणे गुरुवर्य केळूसकरांवर पडला. यामुळेच ते गौतम बुद्ध, संत तुकाराम व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्रलेखनात रममाण झाले. फुलेंच्या सत्यशोधकीय विचारसरणीचा प्रभाव त्यांच्या सर्वच लेखनावर असल्याचे दिसून येते. मुळात केळूसकरांची नाळ ही कृषिसंस्कृतीशी जोडलेली होती. तत्कालीन शेतकऱ्याच्या घरात शिक्षणाकडे फारशा गांभीर्याने बघितले जात नव्हते. शिकणे हे शेतकऱ्याचे काम नसून ती फक्त ब्राह्मणांचीच मक्तेदारी, असे समाजमानसात खोलवर रुजलेले होते. अशा काळात गुरुवर्य केळूसकरांचे वडील मात्र शिक्षणाकडे डोळसपणे पाहणारे गृहस्थ होते. आपल्या मुलांनी शिकले पाहिजे असा त्यांचा अट्टाहास होता. अर्जुनराव केळूसकरांनी बेळगाव, मुंबई, सावंतवाडी अशी पोटापाण्यासाठी भ्रमंती केली. पण ओढाताणीच्या संसारात मुलांनी शिकले पाहिजे याकडे त्यांनी कटाक्षाने लक्ष दिले. त्यामुळे कृष्णराव केळूसकर यांचे बालपण अत्यंत कष्टात गेले असले तरी शिक्षणाची ओढ कायम राहिली. घरच्या दारिद्र्यामुळे मोफत शिक्षणासाठी प्रचंड खटपट करावी लागली. गुरुवर्य केळूसकरांची असामान्य बुद्धिमत्ता पाहून जगन्नाथ शंकरशेठ यांच्या मुलाने त्यांची मोफत शिक्षणासाठी शिफारस केली. तत्कालीन मोठे व्याकरणकार कृष्णशास्त्री गोडबोले त्यांना मुख्याध्यापक म्हणून लाभले. त्यांच्या सहवासात व्याकरण, गणित, कविता यांची चांगली तयारी होत गेली. कृष्णशास्त्री गोडबोले हे

बुद्धीप्रामाण्यवादी, निरीश्वरवादी, समता, नैतिकता मानणारे गृहस्थ असल्यामुळे हे संस्कार आपोआपच गुरुवर्य केळूसकरांवर होत गेले.

१८८१ साली गुरुवर्य केळूसकर विल्सन हायस्कूलमधून मॅट्रिक झाले. उच्चशिक्षण घेण्याची अतीव इच्छा असूनही घरच्या गरीबीमुळे त्यांना ते घेता आले नाही. व त्यांना शिक्षकाची नोकरी पत्करावी लागली. १८८१ ते १८८५ पर्यंत त्यांनी इस्राइली शाळेमध्ये नोकरी केली. गुरुवर्य केळूसकरांची ज्ञानलालसा आणि प्रामाणिकपणा पाहून शाळेच्या व्यवस्थापनाने त्यांच्याकडे 'इस्रायल'या साप्ताहिकाच्या संपादनाची जबाबदारी सोपवली. इस्रायल साप्ताहिकाचे संपादन करत असताना त्यांना लेखनाबाबतचा आत्मविश्वास प्राप्त झाला. शिक्षक म्हणून ते विद्यार्थीप्रिय होतेच; पण लेखनामुळे ते समाजात लोकप्रिय झाले. १८८६ साली विल्सन हायस्कूलमध्ये त्यांनी नोकरीस सुरुवात केली. अखंड विद्याव्यासंग, विद्यार्थ्यांवर निरतिशय प्रेम, सामान्य विद्यार्थ्यांबद्दल संवेदनशील दृष्टिकोण यामुळे ते सर्वत्र गुरुवर्य म्हणून ओळखले जाऊ लागले. गरीब मुलांच्याबद्दल कणव आणि तळमळ, त्यांना सर्वप्रकारची मदत करणारे असे ते शिक्षक असल्यामुळे समाजात त्यांच्याबद्दल आपोआपच श्रद्धाभाव वाढीस लागला.

आपल्याला उच्चशिक्षण घेता आले नाही ही सल त्यांना सततच अस्वस्थ करीत होती. त्यामुळे स्वत: प्रयत्न करून आपण उच्च ज्ञान मिळवण्याची धडपड त्यांनी सुरू केली. स्वत:च्या कष्टावर व ध्यासावर त्यांनी आपला व्यासंग सततच अद्ययावत ठेवला. घरची परिस्थिती ओढग्रस्ततेची असल्यामुळे शाळेत नोकरी करून त्यांना खाजगी शिकवण्या घ्याव्या लागत. उरलेला प्रत्येक क्षण त्यांनी आयुष्यभर वाचन, लेखन व्यासंगात घालवला. वृद्धापकाळामुळे दृष्टी मंद झाल्यानंतर आपल्याला वाचता येत नाही ही सल त्यांना पोखरत गेली. तत्कालीन आढ्यताखोर ब्राह्मणांनी मराठा चांगले मराठी लिहूच शकत नाही, अशी शेरेबाजी केल्यामुळे गुरुवर्य केळूसकरांनी चिकाटीने आपली भाषा, शब्दसंग्रह आणि शैली व्यासंगाच्या जोरावर अद्ययावत केली आणि शेरेबाजी करणाऱ्या जात्याभिमान्यांचा भ्रम घालवून टाकला. तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्र आदी शाखांच्या सखोल अभ्यासासाठी जुन्या प्राचीन ग्रंथांचे चिकाटीने वाचन केले. याबरोबरच जॉन स्टुअर्ट मिल, स्पेन्सर, ऑगस्त कॉम्त, डार्विन, इंगरसॉल इत्यादी पाश्चात्त्य विचारवंतांचा अभ्यास करून आपणही काही कमी नाही हे त्यांनी दाखवून दिले. यातूनच त्यांची व्यासंगी लेखनशैली विकसित झाली.

आपल्या आयुष्यात आलेल्या चढउतारामुळे त्यांना पुस्तकांइतकेच जगण्यानेही समंजस व समृद्ध केले. फक्त शाळेत शिकवणे एवढे आपले काम नसून आपल्या भोवतालचा समाज आपल्याला बदलवायचा आहे ही धारणा मनाशी पक्की करून त्यांनी सामाजिक कार्यास स्वत:ला जोडून घेतले. ते महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे निष्ठावान कार्यकर्ते बनले. 'मराठा ऐक्येच्छू सभेच्या' संस्थापकांपैकी ते एक होते. मराठा प्रॉव्हिडंट फंड, रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे दुःखनिवारण करणारी सभा, नारायण मेघाजी लोखंडे यांनी स्थापन केलेल्या 'बॉम्बे मिल हॅन्ड्स असोसिएशन' इत्यादी संस्थांशी ते संबंधित होते. गुरुवर्य केळूसकर उत्तम संघटक आणि मार्गदर्शक असल्यामुळे तत्कालीन सामाजिक चळवळीत त्यांचा वावर अधिकच वाढत गेला. गोमंतक मराठा समाज, धर्माजी रोकडे मोफत वाचनालय, न्यायिक मराठा मंडळ. नीतिप्रसारक मंडळ, सोशल सर्व्हिस लीग, सेवासदन सोसायटी, बुद्ध सोसायटी, मराठी ग्रंथ संग्रहालय इत्यादी संस्थांशी त्यांचा कृतिशील संबंध होता. गुरुवर्य केळूसकरांनी सहकारी संस्था व पतपेढ्यांच्या स्थापनेतही महत्त्वाचा सहभाग घेतला. लोकांमध्ये अंधश्रद्धा, जादूटोणा, चमत्कार, धार्मिक कर्मकांडे यांचे माजलेले स्तोम कमी करण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने देऊन प्रबोधनाचे काम केले.

गुरुवर्य केळूसकरांनी आयुष्यभर व्रतस्थपणे लेखन करून प्रचंड ग्रंथसंपदा निर्माण करून ठेवली. यामध्ये गौतम बुद्धाचे चरित्र, छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र, संत तुकारामांचे चरित्र अशा अनेक चरित्रांचे लेखन केले आहे. याबरोबरच उपनिषदांचे भाषांतर, फ्रान्सचा जुना इतिहास, सार्थ सटीक श्रीमद्‌भगवद्‌गीता, नीतिबोधमाला खंड १ ते ४ ही त्यांची महत्त्वाची ग्रंथसंपदा आहे.

केळूसकरांच्या सर्वच लेखनात एक स्वतंत्र वैचारिक दृष्टी असल्याचे प्रत्ययास येते. विषयनिवडीपासून ते ग्रंथनिर्मितीपर्यंत त्यांनी आपल्या भूमिकेशी कधीही तडजोड केल्याचे दिसत नाही. आपल्याला आपला समाज आधुनिक करावयाचा आहे याचे भान त्यांच्यातील लेखकाला सतत असल्याचे जाणवते. या गंभीर वैचारिक दृष्टिकोणातूनच त्यांनी शिवचरित्राचे लेखन केले असल्याचे दिसून येते.

१८९५ साली गोविंदराव कृष्णराव दळवी यांनी 'मराठा प्रॉव्हिडंट फंड' ही संस्था सुरू केली. गुरुवर्य केळूसकर या संस्थेचे मार्गदर्शक व सल्लागार होते. गरीब

स्थितीतील गरजू लोकांना अर्थसहाय्य करण्यासाठी दरमहा काहीतरी शिल्लक टाकण्याची सवय लोकांना लागावी हा या फंड स्थापनेपाठीमागचा हेतू होता. मराठा प्रॉव्हिडंट फंड या संस्थेने गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करून अनेकांचे संसार उभे केले. या संस्थेत सर्व जातीधर्माच्या लोकांना मुक्त प्रवेश होता. या फंडाचे चालक गोविंदराव कृष्णराव दळवी यांना शिवचरित्र लिहिले जावे असे वाटत होते. परंतु, त्यांना अल्पायुष्य लाभल्यामुळे हा संकल्प सिद्धीस जाऊ शकला नाही. मात्र फंडाच्या सर्व लोकांना फंडामार्फत शिवचरित्र प्रसिद्ध करण्याची तीव्र इच्छा होती. हे चरित्र गुरुवर्य केळूसकरांशिवाय कोणीही लिहू शकणार नाही, असेही त्यांना वाटत होते. १९०३ साली दाजीसाहेब दळवी आणि रामचंद्र उर्फ आबासाहेब दळवी यांनी गुरुवर्य केळूसकरांना शिवचरित्र लिहिण्याचा आग्रह धरला. गुरुवर्य केळूसकर त्या काळी सांसारिक अडचणींमुळे आर्थिक अडचणीतून जात होते. त्यांचा बराच वेळ नोकरीशिवाय खाजगी शिकवण्यांमध्ये जात होता. त्यामुळे हे चरित्र सिद्ध करण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ व स्वस्थता मिळणे दुरापास्त होते. मराठा प्रॉव्हिडंट फंडाच्या संचालकांनी यातून मार्ग काढण्यासाठी गुरुवर्य केळूसकरांना दरमहा २० रुपयाची रक्कम कर्जाऊ देण्याचे ठरले. यापाठीमागचा त्यांचा हेतू गुरुवर्य केळूसकरांनी खाजगी शिकवण्या बंद करून तो सर्व वेळ शिवचरित्र लेखनाच्या कामास द्यावा असा होता. केळूसकरांनी त्याप्रमाणे खाजगी शिकवण्या बंद करून चरित्रलेखनाचे काम सुरू केले. घरच्या अनंत अडचणी असूनसुद्धा गुरुवर्य केळूसकरांनी चरित्रलेखनाचे काम सलग तीन वर्षे सर्व उपलब्ध साधनांचा अभ्यास करून पूर्ण केले आणि 'क्षत्रिय कुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र' हा ग्रंथ सिद्ध झाला. मराठा प्रॉव्हिडंट फंडाच्या चालकांनी आपल्या फंडातील श्री शिवाजी व विद्याप्रसारक या खात्यांच्या तर्फे मुंबईच्या निर्णयसागर छापखान्यातून हे शिवचरित्र १९०७ साली प्रकाशित केले. ५९७ पृष्ठाच्या या पुस्तकाची किंमत फक्त दीड रुपया ठेवण्यात आली होती. गुरुवर्य केळूसकरांनी हा ग्रंथ कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांना अर्पण केलेला आहे. छ. शाहू महाराजांनी गुरुवर्य केळूसकरांनी केलेल्या या ऐतिहासिक कामाबद्दल प्रशंसा करून रु. १०००/- चे बक्षीस दिले व पुस्तकाच्या ५०० प्रती विकत घेतल्या. याबरोबरच श्रीमंत बापूसाहेब कागलकर व महाराजा सयाजीराजे गायकवाड यांनी २०० प्रती विकत घेऊन या ग्रंथावरचे आपले प्रेम व्यक्त केले. या ग्रंथाची किंमत अत्यल्प असल्यामुळे समाजातील सर्व स्तरामध्ये हा ग्रंथ

सहज पोहोचावा अशी सर्वांचीच अपेक्षा होती. गुरुवर्य केळूसकरांनी या ग्रंथाची रचना करून केलेले कार्य महत्त्वपूर्ण आणि त्यांच्या व्यासंगाचे दर्शन घडवणारे आहे.

गुरुवर्य केळूसकरांपूर्वी शिवाजी महाराजांचे चरित्र का लिहिले गेले नाही याबाबत विविध तर्क संभवतात. गुरुवर्य केळूसकरांनी आपल्या प्रस्तावनेतही हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. 'ज्या प्रौढ प्रताप वीरमणीने स्वदेशास स्वातंत्र्य मिळवून देण्याचे सुयश संपादिले त्यांचे सविस्तर चरित्र लिहिण्याची स्फूर्ती कोणालाही होऊ नये यास काय म्हणावे?' हा केळूसकरांचा प्रश्न अधिक गंभीर व विचार करावयास लावणारा आहे. गुरुवर्य केळूसकरांनी फक्त प्रश्न उपस्थित केला नाही तर प्रत्यक्ष शिवचरित्र लेखनाचे कार्य हाती घेऊन महाराष्ट्रातील इतिहासकारांच्या व संशोधनाच्या क्षेत्रात स्वत:चा ठसा निर्माण केला. या चरित्र लेखनाचा उद्देश त्यांनी प्रस्तावनेत स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, 'महाराष्ट्रातील एकदोन विद्वान गृहस्थ शिवाजी महाराजांचे चरित्र लिहित आहेत असे कळल्यावरून व केसरी पत्रकाराकडे शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी सन १८९५ पासून जमा होत असलेल्या हजारो रुपयांपैकी थोड्याशा रकमेचा विनियोग महाराजांचे एखादे चरित्र लिहवून छापण्याकडे घेऊन ते सर्व लोकांस ख्रिस्ती धर्मपुस्तकाप्रमाणे अगदी अल्प किंमतीस विकत मिळण्याचा योग येईल असे वाटल्यावरुन (केळूसकरांनी) हे काम हाती घेतले नाही. परंतु पुढे ६-७ वर्षांपर्यंत ह्या विद्वानांकडून एखादे चरित्र प्रसिद्ध होईना व केसरीकाराकडे जमलेली रक्कम तशीच पडून राहिली असे पाहून आपण तरी आपल्या शक्तीप्रमाणे सांप्रत अनुकूल असलेल्या माहितीचा आधार घेऊन शिवरायांचे चरित्र लिहिण्याचा प्रयत्न करावा व परमप्रिय मित्राचा सदुद्देश सिद्धीस न्यावा.' या त्यांच्या प्रस्तावनेतील विवेचनावरून ते चरित्राकडे कसे वळले याची माहिती तर मिळतेच पण त्याबरोबरच केळूसकरांची माहितीचा आधार घेऊन शिवचरित्र लिहिण्याची भूमिकाही आपल्यासमोर येते. दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत ते लिहितात, ' शिवाजी महाराजांसंबंधीचा अभिमान चोहोकडे जागृत होऊन त्यांच्या नावाचा सर्वत्र जयजयकार होऊ लागला, तेव्हा आपणही स्वसामर्थ्यानुरूप या जयजयकारात अल्पस्वल्प भर घालावी' अशा उद्देशाने प्रस्तुत लेखकाने हा चरित्रलेखनाचा खटाटोप केला होता. शिवरायांना लघुत्व व वैगुण्य आणणारे असे जे कित्येक निराधार व निरर्थक प्रवाद पुष्कळ दिवसांपासून प्रचलित होते त्यांची असत्यता योग्य पुराव्यानिशी स्थापित करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. या निवेदनातून

गुरुवर्य केळूसकर आपण करीत असलेला खटाटोप अभ्यासपूर्णरीत्या व पुराव्यानिशी करत आहोत याची खात्री देतात. याबरोबरच आपला लेखन उद्देश सविस्तर सांगताना चरित्राच्या शेवटी ते लिहितात, 'शिवाजी महाराजांविषयी महाराष्ट्रात किंबहुना अखिल भरतखंडात जो अभिमान सांप्रतकाळी जागृत झाला आहे तो लोकांच्या मनात कायम राहून त्याजविषयीची यथार्थ बुद्धी सर्व लोकांच्या मनात वसावी. महाराजांचे साद्यंत चरित्र अवलोकन केल्यावाचून ही बुद्धी कायम राहणे शक्य नाही. त्यांचे देहावसन होऊन आज २२५ वर्षे लोटली आहेत इतक्या अवकाशात त्यांचा चरित्रमहिमा अनेक गद्यपद्यात्मक ग्रंथात ग्रंथिला आहे. अनेक यवनी व युरोपीय ग्रंथकारांनी त्यांच्याविषयी यथाबुद्धि उल्लेख केले आहेत; त्याप्रमाणे ते आज कीर्तीरूपाने अमर होऊन राहिले आहेत; परंतु त्यांचे ते कीर्तीतेज एका केंद्रात आणून त्यांचा वास्तविक प्रभाव किती आहे व ते कलंकमिश्रित किती आहे, असे जे कित्येकांचे म्हणणे आहे, त्यात कितीसे तथ्य आहे हे त्यांचे समग्र चरित्र कथन करून आजपर्यंत कोणीही दाखवण्याचा प्रयत्न केला नव्हता तो प्रकृत लेखकाने यथामती व यथाशक्ती केला आहे.' गुरुवर्य केळूसकर यांच्या या निवेदनातून चरित्र लेखनाचे कार्य त्यांनी का हाती घेतले याचे बळकट स्पष्टीकरण आपल्यासमोर येते.

गुरुवर्य केळूसकरांनी लिहिलेले हे शिवचरित्र ३२ प्रकरणांमध्ये विभागलेले आहे. या प्रकरणांची विषयानुरूप मांडणी खालीलप्रमाणे करता येईल.

१)शिवरायांची जडणघडण

२)महाराजांची राजकीय कारकीर्द

३)मुलकी व लष्करी प्रशासन व्यवस्था

४)शिवरायांची राजनीती व गुणविशेष

या सर्व चरित्रग्रंथात गुरुवर्य केळूसकर उपलब्ध माहितीचा यथासांग अभ्यास करून सत्याच्या जवळ पोहोचण्याचा आपल्या परीने प्रयत्न करतात. ज्या ग्रंथकाराने शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा अन्वयार्थ लावताना जे एकांगी दिशाभूल करणारे आकलन मांडले होते, त्याबाबत पुराव्यांसह सत्य वाचकांसमोर ठेवणे हा हेतू गुरुवर्य केळूसकरांनी मनात बाळगलेला होता. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचे वस्तुनिष्ठ यथायोग्य मूल्यमापन व्हावे ही त्यांची मनस्वी इच्छा होती. त्यांची भूमिका स्वतंत्र व

शास्त्रीय होती हे त्यांच्याच निवेदनावरून दिसते. ते म्हणतात, ‘इतिहास लिहिताना सत्याचाच अवलंब करावयाचा असतो मग तो कोणाला विशाद करणारा असो किंवा आनंद करणारा असो, त्याची क्षिती सत्यप्रिय इतिहासकाराने कदापिही बाळगता कामा नये, त्याने सत्याचे प्रकाशन व समर्थन बिनधोकपणे केले पाहिजे.’ या त्यांच्या भूमिकेला ते सतत प्रामाणिक राहिलेले आहेत. त्यांनी इतिहासकार किंकेड यांचे मत उद्‌धृत करून शिवाजी महाराजांच्या संबंधाने इतिहासकाराने किती अन्याय केला आहे हे दर्शविलेले आहे. शिवाजी महाराजांच्या संदर्भात उपलब्ध असणाऱ्या विविध साधनांचा, मतमतांतरांचा यथातथ्य विचार करून तटस्थ, निःपक्ष सत्य निर्णय करणारा चरित्रकार शिवाजी महाराजास लाभला नाही याबद्दल गुरुवर्य केळूसकर खंत व्यक्त करतात. आपण हाती घेतलेली कामगिरी यथास्थित होणे शक्य नाही याचे कारण आपण महाराष्ट्रीयवासी असून शिवाजी महाराजांचे पूर्ण अभिमानी असल्याने हे होणार नाही अशी कबुलीही ते देतात.

केळूसकरांनी शिवाजी महाराजांचे हे चरित्र लिहित असताना सर्व साधनांची सूक्ष्म चिकित्सा करून त्यांची विश्वसनीयता, ग्राह्यग्राह्यता ठरवण्याचा प्रयत्न यथामती यथाशक्ती केलेला आहे. शिवाजी महाराजांवर व मराठ्यांच्या इतिहासावर देशीविदेशी इतिहासकार, संशोधक, लेखक, कवी आदींनी लिहिलेल्या सर्व ऐतिहासिक साधनांची त्यांनी सखोल पारख केल्याचे त्यांच्या ग्रंथातील तळटीपांवरून आपल्या प्रत्ययास येते. *शिवदिग्विजय, मराठी साम्राज्याची बखर, चित्रगुप्ताची बखर, शहाजीराजांची कैफियत, यवनी बखर , सभासदाची बखर, चिटणिसांची बखर, मल्हाररावकृत बखर, जेधे शकावरी, शेडगावकरांची बखर, हनुमंतस्वामीकृत बखर, प्रो. जदुनाथ सरकारांचे औरंगजेब चरित्र, शिवचरित्र, ग्रँट डफचा मराठीचा इतिहास, मोडक यांचा अदिलशाहीचा इतिहास, मि. किंकेडकृत मराठ्यांचा इतिहास, वि. का. राजवाडे लिखित मराठ्यांच्या इतिहासाची साधने, टॉडचा राजस्थानचा इतिहास, एम विल्कीजकृत म्हैसूरचा इतिहास, डॉ. फ्रिअर बर्निअर, ऑर्नी यांचे लेखन, इंग्रजी व्यापाऱ्यांचा पत्रव्यवहार, अन्य परदेशी प्रवाशांचे कागदपत्र, आलमगीर नामा, मासिर–ई–आलमगीर , तारीख–ई–शिवाजी, बसातीन–ई–सलातीन* आदी ग्रंथ आणि काफीखान, रा.ब.पारसनीस, गो.का.चांदोरकर, गो.चि.भाटे, रियासतकार देसाई इत्यादी साधनांचा सखोल अभ्यास गुरुवर्य केळूसकरांनी करून त्याचा वापर या शिवचरित्र लेखनात केलेला आहे.

गुरुवर्य केळूसकरांनी उपलब्ध लेखनाची चिकित्सा करीत असताना सत्याशिवाय अन्य कशासही झुकते माप दिलेले नाही. त्यांनी सर जदुनाथ सरकार, इतिहासकार वि. का. राजवाडे इत्यादींच्या लेखनाची निर्भीड चिकित्सा करून न पटणारी मते व लेखन निकालात काढले आहे. रामदासांचे चरित्रकथन करणाऱ्या *हनुमानस्वामीच्या बखरी*ला चिकित्सेच्या ऐरणीवर ठेवून सप्रमाण निकालात काढले आहे. हे करत असताना यथायोग्य तळटीपा दिल्या असून त्यामध्ये तपशील, मत, पुरावे नोंदवून त्यातील योग्य अयोग्य ठरवताना इतिहासलेखनाच्या शास्त्रीय पद्धतीचा गांभीर्याने उपयोग केला आहे. दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत सर जदुनाथ सरकार लिखित शिवचरित्राचा आपणांस खूप उपयोग झाला असे सांगून ते लिहितात, ‘या सर्वांमध्ये बंगालचे सुप्रसिद्ध इतिहासकार प्रो. जदुनाथ सरकार यांचे ऋण फारच मोठे आहे. शिवरायांच्या चरित्रासंबंधीची जी माहिती आजपर्यंत अनुपलब्ध होती. ती या विद्वान इतिहासकाराच्या स्तुत्य पराक्रमामुळे इंग्रजी वाचकांस त्यांनी लिहिलेल्या शिवचरित्राच्या आधारे उपलब्ध झाली आहे.’ प्रो. जदुनाथ सरकार यांचे ऋण व्यक्त करून त्यांच्या मर्यादा नोंदवण्यासही ते विसरत नाहीत. ते लिहितात, ‘यवनी बखरकारांच्या आधारावरच मुख्यत: भिस्त ठेवल्यामुळे आमच्या देशी इतिहास लेखकांच्याही मनाची कशी अवस्था होते हे अलीकडे प्रो. जदुनाथ सरकार यांनी जे शिवाजी महाराजांचे चरित्र इंग्लिश भाषेत लिहिले आहे ते वाचल्यावर ध्यानात येईल. ते हिंदी गृहस्थ असून पारशी भाषेत पारंगत आहेत. त्यांनी जुन्या पारशी ग्रंथांचे अवलोकन करून मोंगलांच्या इतिहासाची व विशेषत: औरंगजेबाच्या सगळ्या कारकीर्दीची बरीच माहिती मिळवली आहे. व ती औरंगजेबाच्या चरित्राचे चार भाग इंग्रजीत लिहून प्रसिद्ध केली आहे. शिवाजी महाराजांचे चरित्र त्याने लिहिले आहे ते केवळ मोंगली बादशहांच्या दक्षिणेतील चळवळीचे एक उपकथानक म्हणून लिहिले गेले आहे. ते वाचताना त्या काळच्या कोणी यवन ग्रंथकाराने ते लिहिले आहे काय असा भास होतो. प्रो. सरकारांनी ह्या चरित्रलेखात जागोजाग यवनी ग्रंथकारांचा अनुवाद करून महाराजांच्या संबंधाने अनुदारतेचे व असत्यमय उल्लेख केले आहे.’ केळूसकरांनी अशा प्रकारे शिवाजी महाराजांच्या चरित्राविषयी उपलब्ध असलेल्या सर्व लेखनाचा यथायोग्य अभ्यास करून सत्य असणाऱ्या तपशीलाचाच आपल्या चरित्रलेखनास उपयोग केलेला आहे. विपर्यास्तव अनैतिहासिक माहितीचा समाचारही घेण्यास ते विसरलेले नाहीत. दादोजी कोंडदेव यांनी शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य स्थापनेच्या

प्रयत्नास सतत विरोध केला आणि शिवाजी महाराज आपले ऐकत नाहीत अशी तक्रार शहाजीमहाराजांकडे अनेकवेळा केली होती. हेही केळूसकर नोंदवून ठेवतात. संत रामदासांच्या गुरुपदाबद्दल जी मांडामांड अनेक लेखकांनी केली त्याबाबतही गुरुवर्य केळूसकरांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडलेली दिसते. याबरोबरच 'महाराष्ट्र धर्म' या संकल्पनेबाबतही केळूसकरांनी आपली मते स्पष्टपणे मांडलेली आहेत. 'महाराष्ट्र धर्म' या सामासिक पदाचा अर्थ महाराष्ट्रातील लोकांचा धर्म असा असावा असे केळूसकरांना वाटते. अशा सर्वच पुराव्यांबाबत गुरुवर्य केळूसकर दक्षतेने सत्याजवळ पोहोचण्याची सर्व खबरदारी आपल्या ग्रंथात घेतात. परकीय इतिहासकार, स्वकीय इतिहासकार यांच्या लेखनाची यथार्थ चिकित्सा करून नि:पक्षपातीपणे शिवाजी महाराजांचे चरित्र सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात.

शिवाजी महाराजांचे चरित्र लिहित असताना केळूसकरांनी उपलब्ध माहितीची सखोल चिकित्सा तर केली आहेच. त्याबरोबरच यथायोग्य शास्त्रीय इतिहासलेखनपद्धतीचा अंगीकार केलेला आहे. गुरुवर्य केळूसकरांनी हे चरित्र ज्या कालखंडात लिहिले त्या कालखंडात उपलब्ध असणाऱ्या कागदपत्रांच्या आधारे त्यांनी हाती घेतलेले शिवचरित्र सिद्ध करणे क्रमप्राप्त होते. नवनवे पुरावे शोधण्याइतपतचा अवधी त्यांच्याजवळ उपलब्ध होताच असे नाही. तरीही यथाशक्ती त्यांनी हे शिवचरित्र निर्दोष व्हावे म्हणून प्रयत्न केलेले आहेत. हे चरित्र सिद्ध करणे एक आव्हान होते, तरीही या व्रतस्थ संशोधकाने हे आव्हान समर्थपणे पेललेले आहे. महाराजांचे चरित्र लिहीत असताना एकांगी चित्रणाला त्यांनी फाटा दिलेला आहे. महाराजांचा त्यांनी व्यक्ती म्हणून शोध घेतला असून त्यामध्ये अतिशयोक्ती, व्यक्तिमहात्म्य, दैवतीकरण येणार नाही याची जाणीवपूर्वक खबरदारी घेतली आहे. युक्तीवाद करताना आपली तार्किकता पणास लावली आहे. अत्यंत साध्या सोप्या भाषेत लिहिलेले हे चरित्र मराठी चरित्रलेखनाच्या इतिहासात मानदंड ठरले आहे. असे असले तरी गुरुवर्य केळूसकर यांच्या चरित्राची यथायोग्य दखल घेतली गेली असे म्हणता येत नाही. आजवर त्यांच्या सर्वच लेखनाची उपेक्षाच झाली. त्यांच्या या उपेक्षेचे समाजशास्त्र शोधणे ही सुद्धा आजच्या काळाची गरज आहे. एक माध्यमिक शिक्षक आपल्या आयुष्यातील एक हिस्सा फक्त चरित्रलेखनास देतो आणि परिश्रमपूर्वक शिवचरित्र सिद्ध करतो ही केवळ अलौकिक गोष्ट आहे. इतिहासात त्यांची उपेक्षा झाली असली तरी उद्याच्या इतिहासकारांना गुरुवर्य केळूसकर यांना वाट पुसतच पुढे जावे लागणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र महाराष्ट्रातील सामान्य जनतेसह इतिहासकार व साहित्यिकांना नेहमीच आस्थेचे व कुतूहलाचे वाटत आले आहे. यातूनच अनेक भारतीय इतिहासकार व साहित्यिकांच्या लेखणीतून छत्रपती शिवाजी महाराजांविषयी भारतीय भाषांमध्ये लेखन होत आलेले आहे. याचवेळी पाश्चात्त्य इतिहास संशोधकांना व मध्ययुगीन समाज अभ्यासकांनाही छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य, काळ व कर्तृत्व याविषयी ओढ निर्माण झालेली आहे. भारतातील इस्लामी राजवटीच्या शिरकावापासून इंग्रजी सत्तेच्या स्थिरीकरणापर्यंतचा मध्ययुगीन भारताचा इतिहास हा मोठ्या संघर्षाचा आणि पराक्रमाचा आहे. मराठ्यांच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन आणि चरित्र हे केवळ पराक्रमाचेच नव्हे तर त्यांच्या जीवनातील योगायोग, त्यांचा अतुल पराक्रम, त्यांच्या जीवनातील दैवी चमत्कार, आणि शत्रूलाही अचंबित करणारा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव यांनी भरलेले आहे असे असले तरी; छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिगत जीवनाकडे पाहताना त्यांच्या ठायी असणारी अन्यायास प्रतिकार करण्याची वृत्ती, त्यांची नैतिकता व न्यायबुद्धी, प्रजा, मित्र आणि सहकाऱ्यांविषयी त्यांच्या मनातील आत्मीयता, आई जिजाऊ व त्यांच्या मनात असणारी स्त्रियांविषयीची आदरबुद्धी, त्यांच्यातील मानवीय गुणांमुळे साहजिकच कोणीही त्यांच्याकडे आकर्षित होतो. मित्र, प्रजा व स्वधर्मीय लोकांबरोबरच त्यांनी तत्कालीन परधर्मीय व मुस्लीम लोकांविषयी बाळगलेली सहिष्णुता या व अशा अनेक कारणांनी छत्रपतींचे जीवन आजही लोकांच्या व जनसामान्यांच्या आदरास पात्र आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाकडे प्रेरित होऊन मराठीमध्ये शिवाजी महाराजांची अनेक चरित्रे लिहिली गेली आहेत. यामध्ये प्रामुख्याने इतिहासकारांनी लिहिलेली चरित्रे व साहित्यिकांनी लिहिलेली चरित्रे असे दोन भाग करता येतील. या दोनही चरित्र लेखनाच्या प्रकारामध्ये सत्य आणि कल्पित अशा दोन भूमिका पहावयास मिळतात. यातील पहिल्या प्रकारामध्ये ऐतिहासिक सत्य, इतिहासाची साधने, कालिक पुरावे यांची वस्तुनिष्ठता महत्त्वाची असते व त्याप्रमाणे या चरित्राचे लेखन वाचन अपेक्षित असते. चरित्र लेखनाच्या दुसऱ्या प्रकारामध्ये ऐतिहासिक वास्तवाच्या आधारे कल्पित-वास्तव म्हणून चरित्रे लिहिली गेली आहेत. अशा चरित्रांची मराठी साहित्यात मोठी संख्या आढळते. यात काव्यात्मक चरित्रे, कादंबरीमय चरित्रे, नाट्यमय चरित्रे व

रंजक व लोकप्रिय होण्यासाठी लिहिलेली चरित्रे मराठी साहित्यात प्रचंड आहेत. अशा चरित्रांचा समाजासाठी व प्रत्यक्ष इतिहासासाठी धोका होण्याची शक्यता असते. अशा चरित्रांमुळे निर्माण झालेले वाद व शिवाजी महाराजांच्या व्यक्तिगत जीवनाविषयी वादळे निर्माण होण्याचे प्रकार अलीकडे, महाराष्ट्रात झाल्याची उदाहरणे आपणास ज्ञात आहेत. मराठी साहित्यात अशा शिवचरित्रांचे लेखन करून प्रसिद्धी व स्टंट करण्याचे उद्योग अनेक लेखकांनी करून स्वत:स शिवशाहीर, शिवसंशोधक, इतिहासतज्ज्ञ वगैरे पदव्यांनी गौरविले आहे. परिणामत: अशा शिवचरित्रांच्या लेखनामुळे खरे शिवाजी महाराज व त्यांचा शिवकाल वस्तुस्थितीपासून कोसो दूर गेल्यामुळे येणाऱ्या पिढीपुढे शिवचरित्राविषयीच्या संभ्रमात वाढ होण्याची शक्यता दिसते आहे. अशा शिवचरित्रांचा आणखी एक धोका म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांना विशिष्ट जातीधर्माचे बनवणे, विशिष्ट जातीधर्मासाठीच त्यांनी आपले जीवन समर्पित केले असे प्रचारकी लेखन करणे हा उद्योग साहित्यिक शिवचरित्रकारांनी केल्याचे जाणवते. अशा साहित्यिक शिवचरित्राच्या तुलनेने ऐतिहासिक सत्यावर आधारलेली शिवचरित्रे अत्यल्प असल्याने व सत्याधारित शिवचरित्रांचा विशेष बोलबाला न झाल्याने रंजक साहित्य लिहिणाऱ्या शिवचरित्रांनी समाजात संभ्रम निर्माण होण्याला खतपाणी घातले आहे.

या सर्वाच्या पार्श्वभूमीवर श्री. कृष्णराव अर्जुन केळूसकरांनी लिहिलेले हे संक्षिप्त शिवचरित्र का महत्त्वाचे ठरते याविषयी काही मते मांडता येतील. आजच्या आपल्या एकूणच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात शिवाजी महाराज यांचे कार्य कालबाह्य झालेले नाही; तर त्या विचारांची यथार्थता अधिकच प्रकर्षाने जाणवते आहे. सामाजिक मूल्यांची खुलेआम होत असलेली पायमल्ली, सत्तेचा आणि पदाचा अतिरेकी हव्यास, एक देश म्हणून, एक राष्ट्र म्हणून समग्रतेच्या विचाराचे दुर्भिक्ष्य, परराष्ट्रनीतीचा सावळागोंधळ, सारा समाज खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या नावाखाली भयग्रस्त करणे, बोलण्यात आणि कृतीत महद्‌तर असणे, सत्तेच्या हव्यासापोटी जाती धर्मांमधील तेढ वाढविणे, जाणीवपूर्वक समाजाला हिंसेच्या खाईत लोटून देणे, स्त्रियांना केवळ एक उपभोगाची वस्तू मानणे, त्यांच्या शीलाची आणि पावित्र्याची विटंबना करणे, कोणत्याही प्रकारचा विधिनिषेध न बाळगता स्वत:च्या बेजबाबदार कृत्याचे वृथा समर्थन करणे, विचाराची लढाई शस्त्राने संपविण्याचा प्रयत्न करणे, प्रसंगी विचारवंतालाच संपविणे, जनतेला दिलेली आश्वासने सोयीस्करपणे

विसरणे, खऱ्या इतिहासाचे दमन करून खोटा इतिहास समाजात दृढ करण्याचा प्रयत्न करणे ही अशी संवेदनशील माणसाला अस्वस्थ करणारी यादी आजच्या वर्तमान वास्तवात वाढतेच आहे. याचा परिणाम आपल्या समाजव्यवस्थेवर अर्थातच अतिशय घातक होऊ लागल्याचे चित्र प्रकर्षाने दिसू लागले आहे. माणसामाणसांमध्ये आलेली संवेदनशून्यता, संवादहीनता, भयग्रस्तता, एकटेपणा, पोरकेपणा, चिंताग्रस्तता इत्यादींमुळे ओढवलेली समाजविन्मुखता असे दिशाहीन वास्तवाचे दर्शन केवळ देशपातळीवरच नव्हे; तर जगभर दिसू लागले आहे. माणसाच्या व्यक्तीमत्त्वाला पर्यायाने साऱ्या समाजालाच योग्य ती दिशा देऊ शकेल असा महापुरुष आपणास केवळ इतिहासाच्या पानांमध्येच शोधावा लागणार हे वास्तव आहे. त्यामुळे अशा चरित्रग्रंथाची उजळणी सातत्याने करीत राहणे; हेच आपल्या आजच्या समाजाचे भागधेय आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

मानवी नातेसंबंध आपल्या इतिहासात कधी नव्हते इतके वर्तमान वास्तवात उध्द्वस्त होऊ घातलेले आहेत. या अनुषंगाने शिवाजीराजांचे त्यांच्या कुटुंबातील माणसांशी तसेच त्यांनी आपल्या सैन्याशी, शूरवीर मावळ्यांशी निर्माण केलेले नातेसंबंध पाहिले; तर थक्क व्हायला होते. प्रेम, माया, ममता, जिव्हाळा, करुणा, परस्परांवरील गाढ विश्वास, वृत्तीचा दिलदारपणा हे सारे काही शिवाजी महाराजांनी जिवापाड जपलेले होते. याचा प्रत्यय या चरित्रग्रंथातून आपणास वारंवार येत राहतो. आजचे राजकारणी अथवा समाजकारणी यांनी शिवाजी महाराजांनी लाखमोलाची माणसे कशी शोधली होती, त्यांचा कसा सांभाळ केला होता; हे आवर्जून वाचावे आणि त्यानुसार वर्तावे असेच हे चरित्र सांगताना दिसते. महाराजांनी आपल्या राष्ट्रबांधणीच्या कामी जे मावळे संघटित केलेले होते. त्या मावळ्यांच्या हिताचा विचार तर त्यांनी केला होताच, पण देशकार्यासाठी प्राणाची आहुती दिलेल्या मावळ्यांच्या उर्वरित कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचीही सोय लावून दिलेली होती. त्यांच्या गरीब आणि शोषितांकडे पाहण्याच्या उदार आणि करुणात्मकवृत्तीचे अत्यंत समर्पक शब्दांकन केळूसकर यांनी या ग्रंथात केले आहे. प्रजेचे पालनपोषण कसे करावे, निसर्गाचे आपल्या पर्यावरणाचे रक्षण कसे करावे याचा वस्तूपाठच शिवाजीराजांनी आपल्या कृतीउक्तीच्याद्वारे सामाजिक जीवनात घालून दिलेला होता. माणसांची आणि आपल्या पर्यावरणाची अक्षम्य हेळसांड करणाऱ्या समाजकंटकांनी महाराजांच्या या आचारविचारांपासून खचितच

बोध घेण्यासारखा आहे. यादृष्टीनेही या ग्रंथाचे मोल आजच्या आपल्या परिप्रेक्ष्यात खचितच उल्लेखनीय आहे, असे हा चरित्रग्रंथ वाचताना वाटत राहते.

केळूसकरांचा हा चरित्रग्रंथ वाचताना आणखी एक बाब सातत्याने विचाराच्या केंद्रस्थानी येत राहते आणि ती म्हणजे आजच्या आपल्या समाजाला तीव्रतेने भेडसावणारे धार्मिक वास्तव. विज्ञान तंत्रज्ञानाचा प्रसार जसजसा जगभर होऊ लागलेला आहे, आणि या साऱ्या वास्तवाने एकप्रकारचा खुलेपणा, मोकळेपणा, स्वातंत्र्य, माणसाला लाभेल; अशी अपेक्षा झपाट्याने फोल ठरते आहे. म. फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या आणि अशा अनेक समाजसुधारकांनी खिळखिळ्या केलेल्या जातीधर्माच्या भिंत्ती पुन्हा एकदा नको तितक्या संकुचित होत आहेत. केवळ संकुचितच नव्हे; तर माझाच धर्म श्रेष्ठ कसा इतरांचा टाकाऊ कसा हे समाजमनावर सतत बिंबवत राहून इतर धर्मविचारांचा ते कमालीचा तिरस्कार करीत आहेत. यासाठी शेकडो निरपराध लोकांचे अत्यंत क्रूरपणे बळी घेतले जात आहेत. या पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांची धर्मनीती निःसंशय अनुकरणीय अशीच होती. कारण महाराजांचे व्यक्तिमत्त्व दांभिक नव्हते. शुद्ध मन, सद्वासना आणि सदाचरणाचे संस्कार बालपणापासूनच त्यांच्यावर झालेले होते. जिजाबाई यांनी हेतूत: हे संस्कार महाराजांवर केलेले होते. या संस्कारांचे पडसाद त्यांच्या समग्र जीवनावर पडल्याचे दिसून येतात. शिवाजी महाराजांनी आयुष्यभर यवनीसत्तेविरुद्ध लढा दिला होता. त्यांचे भांडण दुष्ट व जुलमी सत्तेच्या विरोधात होते. इस्लाम धर्माशी नव्हते, हे आपण जाणीवपूर्वक ध्यानात घेतले पाहिजे. यवनांच्या पूज्यस्थानांसंबंधीही शिवाजी महाराजांच्या मनात तिरस्कार अथवा द्वेष नव्हता. युद्धात सापडलेली कुराणाची प्रत योग्य तो आदर राखत मुस्लीम सैनिकाकडे देणे, मुस्लीमांच्या प्रार्थनास्थळांना इजा न पोहचविणे, सैन्यात मारल्या गेलेल्या शत्रूंच्या स्त्रियांचा योग्य तो मान राखणे, शत्रूंच्या मृतदेहाची विटंबना न करणे, यथासांग त्यांचा दफनविधी घडवून आणणे इतर धर्मियांविषयीच्या शिवाजी महाराजांच्या या कृती आजच्या आपल्या तथाकथित समाजमार्तंडांनी धार्मिक उच्छाद मांडलेल्या कालखंडात केवळ विचारप्रवृत्तच नव्हे; तर त्यानुसार कृती करायला भाग पाडणाऱ्या आहेत. देवस्थाने व तीर्थस्थानांचीही उत्तम व्यवस्था त्यांनी लावून दिलेली होती. शिवाजी महाराजांची धर्मसंबंधाने उदारबुद्धी होती. धर्मवेड त्यांच्या ठायी बिलकुल नव्हते. हा बोधही या ग्रंथाच्या अनुषंगाने आपणास निश्चितच घेता येतो.

या चरित्रग्रंथात शिवाजी महाराजांच्या राजव्यवस्थेविषयीचे केळूसकरांनी लिहिलेले प्रकरण आजच्या स्वमग्न राज्यकर्त्यांनी आवर्जून वाचावे असेच आहे. आत्मविश्वास गमावलेल्या, स्वत:ची अस्मिता विसरलेल्या समाजास ताठ मानेने उभे करण्याचे बळ देण्याचे लोकोत्तरकार्य शिवाजी महाराज यांनी केलेले होते. आपली राजव्यवस्थेची किती रेखीव घडी बसविण्याचा प्रयत्न शिवाजी महाराजांनी केलेला होता आणि त्यात ते कसे यशस्वी झालेले होते हे पाहिले की थक्क व्हायला होते. समाजहिताचा यत्किंचितही विचार न करणाऱ्या आजच्या तथाकथित पुढाऱ्यांच्या डोळ्यात हे सारे झणझणीत अंजन घालणारे आहे. अष्टप्रधान मंडळाच्या कामांचे स्वरूप, दौलतीची नेटकी व्यवस्था, लष्कराची व्यवस्था, किल्ल्यांचा सुयोग्य बंदोबस्त, तोफखान्याची व्यवस्था, आरमाराची व्यवस्था, दरबार भरवण्यासंबंधीची व्यवस्था, जमीनमहसुलाची व्यवस्था, गाईगुरांच्या आणि सैन्यातील हत्ती, घोडे, उंट इत्यादींच्या दाणावैरणीची त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था, नोकरांचे पगार, वेतने व तैनातीची व्यवस्था, यासोबतच पाटील, कुळकर्णी, खोत, देशमुख, देसाई, देशपांडे, जमीनदार, मोकासदार, मिरासदार, जहागीरदार वगैरे लोकांच्या तावडीतून रयतेला मुक्त करणे, कोणताही सरकारी हुद्दा वंशपरंपरेने कोणाच्याही कुळात चालू न ठेवणे, चोरांचे भय नष्ट करणे, ब्राह्मणांनी आणि पुजाऱ्यांनी देवस्थानांच्या खर्चाचा हिशेब नीट ठेवण्याची खबरदारी घेणे अशी शिवाजी महाराजांनी केलेली ही सारी व्यवस्था पाहिली की एक कर्तव्यदक्ष राजा कसा असावा याचा प्रत्यंतर आल्यावाचून राहत नाही. इतकेच नव्हे तर गायक, वादक, नर्तक यांचा योग्य तो सन्मान कसा करावा, त्यांना योग्य ती बिदागी कशी द्यावी, गुणीजनांचा योग्य तो परामर्श कसा घ्यावा याचाही प्रत्यय वाचकांना हे चरित्र वाचताना येत राहतो. केळूसकरांनी लिहिलेल्या 'राज्यव्यवस्था' या प्रकरणात यासंदर्भातील तपशील विस्ताराने आले आहेत.

शेती आणि त्यावर गुजराण करणाऱ्या शेतकऱ्यांचे मोल शिवाजी महाराज चांगलेच ओळखून होते. तेव्हा यासंदर्भात त्यांनी केलेल्या सुधारणा आणि कार्यपद्धती आजच्या आपल्या शेतीविषयक धोरणांच्या संदर्भात विशेष उल्लेख करण्याजोगी आहे. 'लागवडीस न आलेल्या जमिनी नव्या रयतेस द्यावयाच्या झाल्या म्हणजे तिच्यापाशी गुरेंढोरें नसल्यास ती तिला सरकारांतून द्यावी, तिला बीजास दाणा द्यावा, व पीक होईपर्यंत निर्वाहासाठी धान्य व पैका द्यावा. दोनचार वर्षांनी हा ऐवज

उगवून घ्यावा. ह्याप्रमाणें रयतेस कौल करून देऊन जमिनी इस्ताव्याने दिल्या व बहुतेक जमीन लागवडींस आणली. उत्पन्नाचा अजमास बरोबर पाहून रयतेवर कर बसवावा, जुलूम असा कोणावर करूं नये, अशी अधिकाऱ्यांस सक्त ताकीद असे.' इतका व्यापक आणि सर्वसमावेशक विचार आपली तथाकथित राजकीय व्यवस्था करते का? या प्रश्नाचे उत्तर दुर्दैवाने नकारार्थी असेच मिळते आहे. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, त्यासंदर्भात शासन राबवित असलेले वेगवेगळे मार्ग, त्या मार्गांमधील सत्यानिष्ठता, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बाजारभावाचा अद्यापि न सुटलेला गुंता आणि या साऱ्यांवर दशांगुळे उरणारी संवेदनहीनता. आजच्या या साऱ्या पार्श्वभूमीवर शिवाजी महाराज यांनी केलेला शेतीनिष्ठ वा भूमिनिष्ठांच्या हिताचा विचार आजही विचार करावयास भाग पाडणारा आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांविषयी मराठी समाज, महाराष्ट्र प्रांत व जगभरातील इतिहास अभ्यासकांना आस्था आहे, हे आजकालचे वर्तमान सत्य आहे. ही आस्था महाराष्ट्रात १०० वर्षांपूर्वीही होती. हे प्रस्तुत चरित्राची प्रस्तावना वाचताना लक्षात येते. केळूसकरांनी लिहिलेले दीर्घ शिवचरित्र व महाराष्ट्रातील सामान्य जनता आणि तरुणांना प्रेरणादायी ठरावे यासाठी लिहिलेले संक्षिप्त चरित्र याच आस्थेने मराठा ऐक्येच्छू सभेच्या विद्यमाने छापले गेले आहे. यापैकी पहिले दीर्घचरित्र १९०७ साली मराठा प्रॉव्हिडंट फंडाकडून श्री. रामचंद्रराव दळवी यांनी छापले व दुसरे १९२७ मध्ये हे संक्षिप्त चरित्र 'त्रिशतसांवत्सरिक शिवजयंती उत्सव'च्या निमित्ताने शिवाजी महाराजांचा एक स्मारक ग्रंथ म्हणून छापले गेले. ही मराठा ऐक्येच्छू सभा १८८७ पासून शिवजयंती साजरी करत होती. आजचा गणेशोत्सव व शिवजयंतीचा इतिहास सांगणाऱ्यांना ही गोष्ट नमूद करावी लागेल. शिवजयंती उत्सवाच्या निमित्ताने स्मारक ग्रंथांचा स्तुत्य उपक्रम करणे हे त्याकाळातील मराठा तरुणांच्या कामगिरीचे स्मरण आजही समाजासाठी व आजच्या शिवजयंती उत्सवासाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.

या चरित्राची वाङ्मयीन उपयोगिताही महत्त्वाची आहे. आज भारतीय समाजातील थोर नेते, इतिहासातील कर्तबगार व्यक्ती यांच्या कर्तृत्वाची विभागणी जातनिहाय, वंशनिहाय होत आहे. परंतु इतिहासातील असो अथवा वर्तमानातील असो कोणतीही कर्तबगार व्यक्ती सर्वसमावेशक, सहिष्णु, निधर्मी, मुत्सद्दी, पराक्रमी, सदाचारी व न्यायनीतीवान असल्याखेरीज ती समाजात आदर्श व आदरास प्राप्त होणार नाही.

छत्रपतींच्या अंगी हे सर्व गुण होते. त्यांनी स्वराज्यस्थापनेबरोबरच इथल्या गरीब रयतेसह सर्व धर्मीय व स्त्रीबालक तसेच शत्रूच्या सैन्यातील शरण आलेल्यांना माणुसकीची वागणूक दिली. सहकारी सरदारांच्या बरोबर व स्वराज्याच्या विस्तारास हातभार लावणाऱ्या प्रत्येक घटकाचा आदरसत्कार व त्यांचे उत्तरदायित्व स्वीकारण्यासह एक आदर्श परिपाठ घालून दिला. याचे प्रत्यंतर आपणास हे चरित्र वाचताना वारंवार येते. आज समाजाचे नेतृत्व करणाऱ्या प्रत्येक पुढारी/म्होरक्यासमोर हे चरित्र ठेवले पाहिजे असे आहे. दुसरे असे की शिवाजी महाराजांच्या काळात निजामशाही, अदिलशाही, कुतूबशाही आणि परकीय इंग्रज यांच्याबरोबर सतत संघर्ष करताना या शत्रू राज्यातील राजवटींचा उन्मत्तपणा, धार्मिक असहिष्णुता, रयतेवरचे व गोरगरीब जनतेवरचे अत्याचार, धार्मिक स्थळांची मोडतोड अशा अनेक गोष्टी वारंवार पाहायला मिळतात. याउलट छत्रपतींनी आपले शत्रू असलेल्या इस्लामी राजवटींसह सर्वांना सामावून घेऊन त्यांना दिलेली वागणूक, स्त्री बालकांसह अनेक स्त्रियांच्या राजवटींना दिलेले अभय हे छत्रपतींचे गुण त्या काळातीलच नव्हे तर आजही सामाजिकदृष्ट्या आदर्शवत आहेत. म्हणून हे चरित्र समकाळातही उपयुक्त आहे.

क्षत्रियकुलावतंस श्री छत्रपती शिवाजीमहाराज यांचे संक्षिप्त चरित्र केळूसकरांनी अभ्यासपूर्ण लिहिले आहे. याकरिता त्यांनी पूर्वसूरींची चरित्रे, भारतीय इतिहासकारांची चरित्रे अवलोकिली आहेत. शिवचरित्र व मराठ्यांच्या इतिहासासंबंधीच्या अनेक आक्षेपांचे केळूसकरांनी या चरित्रात खंडण केले आहे. अनेक ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे छत्रपतींच्या जीवनातील घटना तारखेसह सांगितल्या आहेत. अनेक कागदपत्रांतील मजकूर स्वभाषेत योग्य ठिकाणी घातला आहे. विशेषत: औरंगजेबाची पत्रे, तहाची पत्रे, इंग्रजी राज्यकर्त्यांची पत्रे, वकिलांकडून पाठवलेली पत्रे व स्वत: महाराजांनी लिहिलेली पत्रे अशा पत्रांमुळे ऐतिहासिक सत्यतेच्या जवळ हे चरित्र जाते. याचवेळी काही ठिकाणी बखरीतल्या मजकूरावरून शिवाजी महाराजांच्या जीवनातील अलौकिक घटनांना या चरित्रात स्थान दिले आहे. अशा काही घटनांमुळे हे चरित्र ऐतिहासिक सत्यापासून दूर जाण्याचा दोष यात येऊ शकतो. परंतु छत्रपती शिवाजी महाराज आपल्या जीवनात ज्या ज्या वेळी अशा काही घटनाप्रसंगांच्या पेचात अडकतात तेव्हा त्यातून त्यांची झालेली सुटका ही केवळ मानवी पातळीवर अशक्य होती. साहजिकच अशा पेच प्रसंगातून मार्ग काढण्यासाठी गुरुवर्य केळूसकरांनाही

दैवी आणि अलौकिक पर्यायांचे सहाय्य घ्यावे लागले आहे. असे असले तरी या चरित्राच्या ऐतिहासिक सत्याला फारशी बाधा येऊ न देता, हे चरित्र ऐतिहासिक सत्याजवळ जाणारे चरित्र ठरते. छत्रपतींच्या जीवनातील एकूण चार घटनांच्या प्रसंगी भवानी माता त्यांच्याशी संवाद साधते. या चारही ठिकाणी छत्रपतींनी सुरू केलेले स्वराज्याचे कार्य थांबते की काय अशी अचंबित करणारी परिस्थिती निर्माण होताना दिसते. यापैकी अफजलखानाचा वध ही घटना तर केवळ दैवी साक्षात्कारच म्हणावा लागेल. याचप्रमाणे दिल्लीची भेट व सुटका आणि छत्रपतींची श्रीशैलमल्लिकार्जुनच्या ठिकाणी निर्माण झालेली वैराग्यभावना, तुकारामभेटीचा प्रसंग व त्या ठिकाणी निर्माण झालेली विरक्ती यातून परत छत्रपतींना स्वराज्य कार्यासाठी प्रेरित करणे व या प्रसंगी महाराजांच्या निराश मानसिकतेतून बाहेर काढणे यासाठी चरित्रकाराने हे प्रसंग वर्णिले असावेत. याचबरोबर चरित्रकारावर मराठीतील बखरींचा प्रभाव असणेही शक्य आहे. मराठीतील बखर साहित्य हे ऐतिहासिक सत्याला धरून नाही. या विषयी अनेक इतिहासकारांनी बखरींना इतिहासाचे दुय्यम साधन मानले आहे. असे असले तरी बखरी या साहित्यिकदृष्ट्या सरस असल्याने त्या इतिहास वाचनापेक्षा साहित्यिक वाचनासाठी सरस ठरतात. गुरुवर्य केळूसकर यांच्या प्रस्तुत चरित्रावर ऐतिहासिक वास्तवाची जशी पकड आहे त्याचवेळी हे चरित्र वाङ्मयीन गुणांनीही समृद्ध आहे. या चरित्रावर बखरलेखनाची छाप असल्यासारखे भासते. ते यातील अलौकिक व दैवी घटनांच्या लिखाणामुळे होय. त्यामुळे हे चरित्र वास्तव व ऐतिहासिक सत्याधारित आहे, त्याचवेळी साहित्यिक गुणवत्तेसाठी कल्पित वास्तवाच्या पातळीवरही आहे. चरित्रलेखनामध्ये लालित्य येण्यासाठी ज्या कल्पित वास्तवाची आवश्यकता असते ते कल्पित वास्तव गुरुवर्य केळूसकरांनी यात पकडले आहे.

हे चरित्र वाङ्मयीन गुणांनी समृद्ध आहे. हे या चरित्रातील घटना, प्रसंगवर्णने, निवेदनशैली, व्यक्तिवर्णने आणि स्थलवर्णने यातून प्रत्ययास येते. बखरीची गतिमान आणि स्पृहणीय व स्फूर्तीदायक भाषा हाही या चरित्राचा विशेषच म्हणावा लागेल.

चरित्रातील घटना मालिकेच्या रूपाने केळूसकरांनी ओघवत्या शैलीत मांडल्या आहेत. छत्रपतींच्या जीवनातील अनेक घटना या क्रमबद्ध वाटाव्यात अशा आहेत. स्वराज्याच्या सिद्धतेपासून महाराजांच्या अंतकाळापर्यंतच्या घटना केळूसकरांनी

शृंखलाबद्ध पद्धतीने मांडल्या आहेत. एका संकटातून सुखरूप सुटावे व तात्काळ दुसरा प्रसंग उभा राहावा अशा एखाद्या परिकथेतल्या राजकुमारासारखी कथा व्हावी व संकट-सुटका परत संकट-सुटका अशा घटनांनी छत्रपतींचे जीवन भारलेले आहे. अशा घटनांची मालिका केळूसकरांनी या चरित्रात हुबेहूब मांडली आहे.

घटनांबरोबर छत्रपतींच्या जीवनात आलेले अनेक बाके प्रसंगही चरित्रकारांनी मांडले आहेत. त्याचवेळी छत्रपतींनी आपले कौशल्य पणाला लावून जिंकलेले प्रसंगही उभे केले आहेत. शहाजीराजांना नजरकैदेत ठेवून भिंतीत गाडण्याच्या प्रसंगापासून, अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावर केलेला हल्ला, मोगलांशी व अदिलशहाशी वेळोवेळी झालेल्या चकमकीचे प्रसंग, प्रतापराव गुजराचा पराक्रम, बाजीप्रभू देशपांडेंची शूरता, सुरतेची लूट, अनेक स्त्रियांना दिलेले अभय, तानाजी मालुसरेंचा प्रसंग असे कितीतरी प्रसंग हुबेहूब उभे राहावेत अशी प्रसंगवर्णने यात आली आहेत. केळूसकरांनी ती अत्यंत चित्रदर्शी रूपाने या चरित्रात उभी केली आहेत.

घटना प्रसंगानंतर या चरित्रातील व्यक्तिवर्णने व स्थलवर्णनेही वाचनीय झाली आहेत. अफजलखानाचे आणि महाराजाचे वर्णन करताना चरित्रकार एकाच वाक्यात म्हणतो, ‘ त्याचे धूड मोठे विशाल होते आणि महाराजांचा बांधा अमळ ठेंगणा व सडपातळ होता.’ छत्रपतींच्या व्यक्तिमत्त्वाचे इंग्रज अधिकाऱ्याने केलेले वर्णन केळूसकर असे करतात. ‘शिवाजीचा देह वायुरूप असून त्याला पंख असावे असे ज्याला त्याला वाटू लागले आहे. कारण तो कोणत्यावेळी कोठे प्रगट होईल याचा काहीच नेम नाही, तो आज एके ठिकाणी आहे तर उद्या कोठे प्रगट होईल याचा नेम नाही.’ अशा छोट्या छोट्या वाक्यांमध्ये अनेक व्यक्तीची वर्णने यात आली आहेत. ‘औरंगजेब अतिबलाढ्य आहे’ हे विधान वारंवार येते. यातून औरंगजेबाचे व्यक्तिमत्त्व लक्षात येते. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी चरित्रकारास अत्यंत आदर आहे. त्यांचा उल्लेख करताना त्यांच्याविषयी अनेक विशेषणे चरित्रकार वापरतो. ‘त्यात त्यांच्या अंगचे शौर्य, वीर्य, औदार्य, राजकार्यनिपुणत्व, प्रजापालनपटुत्व, युक्तिमत्ता, बुद्धिमत्ता, मातृपितृभक्ती अशा उज्ज्वल गुणांचे दिग्दर्शन अनेक प्रसंगी झाले आहे.’ तुकाराम बावांचे वर्णन एकाच वाक्यात त्यांचे संतत्व दिग्दर्शित करते. तुकारामबावा त्या काळच्या कीर्तनकारांत अग्रगण्य असून पराकाष्ठेचे भाविक व प्रेमळ भगवद्भक्त असल्याकारणाने त्यांची बोधवाणी अत्यंत प्रासादिक व मनोवेधक असे. या आणि अशा अल्प शब्दांतून केळूसकरांनी संक्षिप्त व्यक्तिवर्णने केली आहेत.

चरित्रातील ठिकाणांची वर्णने आणि भौगोलिक प्रदेशांची माहिती हाही एक या चरित्रग्रंथाचा विशेष म्हणावा लागेल. चितोडच्या प्रदेशापासून ते महाराष्ट्रातील गडकोट किल्ल्यांच्या ठिकाणापर्यंत अनेक प्रदेशांची माहिती या ग्रंथात मिळते. सिंगणापूरच्या पाटीलकीपासून सुरू झालेली भोसले घराण्याची राजवट महाराष्ट्र, कर्नाटक, कोकणापासून तंजावरपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांनी विस्तारली. या विस्तीर्ण प्रदेशाचा साद्यंत इतिहास व भौगोलिक माहिती यादृष्टीनेही या ग्रंथाचे ऐतिहासिक महत्त्व आहे. पुढे लिहू पाहणाऱ्या संशोधकांना हा ग्रंथ व यातील भौगोलिक संदर्भ महत्त्वाचे ठरतील. छत्रपतींनी पादाक्रांत केलेला प्रदेश, विविध ठिकाणी झालेल्या लढाया, प्रादेशिक वैशिष्ट्यांमुळे मराठ्यांना आलेले यश, यासह छत्रपतींच्या जीवनप्रवासाबरोबरच त्यांनी केलेला प्रादेशिक प्रवास तत्कालीन महाराष्ट्राच्या व मराठी साम्राज्याच्या विस्तीर्ण सीमारेषा या ग्रंथाच्या पानोपानात अधोरेखित होतात. साहजिकच ग्रंथ वाचताना प्रदेशाविषयीची उत्सुकता वाढीस लागते.

कोणत्याही ग्रंथांचे वाचनीय यश हे त्या ग्रंथाच्या निवेदनशैलीवर व भाषेवर अवलंबून असते. कृष्णराव अर्जुन केळूसकरलिखित या शिवचरित्राची निवेदनशैली व भाषा वेधक आहे. या चरित्राचा विषय शिवाजी महाराजांचे जीवन व कार्य असा मध्यवर्ती आहे. शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्याचा ओघवता इतिहास या चरित्रात आला आहे. हा चरित्र ग्रंथ ऐतिहासिक सत्यावर आधारलेला वास्तविक ग्रंथ असला तरी 'चरित्र' या वाङ्मयप्रकाराला साजेशी निवेदनाची भाषा या ग्रंथात आलेली दिसते. हे ऐतिहासिक चरित्र असले तरी याची रचना इतिहासाची साधने, सनावळ्या, पुरावे, दाखले यासह न होता छत्रपतींच्या जीवनाचा अखंड इतिहास लालित्यपूर्ण भाषेत लिहिले गेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे संपूर्ण जीवन हे प्रचंड गतिमान, अस्थिर, धामधूमीचे आणि घोडदौडीचे होते. ही गतिमान धामधूम आणि घोडदौड या चरित्रातील निवेदनातही प्रत्ययास येते. शिवाजी महाराजांच्या जीवनाची घोडदौड त्यांच्या बालपणापूर्वीच सुरू झालेली आहे. शहाजीराजे शत्रूच्या प्रबळ सैन्याच्या पाठलागास्तव दौड करीत असता जिजाबाई बरोबर होत्या. त्या गरोदर असल्यामुळे तिला घोड्यावरून नेता येईना. म्हणून त्यांनी जिजाबाईंना शिवनेरी किल्ल्यांत ठेविले. तेथे ती शके १५४९ प्रभव नाम संवत्सर, वैशाख शुद्ध पंचमी सोमवार यादिवशी प्रसूत झाल्या. ह्याप्रमाणे मराठी साम्राज्याच्या संस्थापकाचा जन्म ह्या अशा

धामधुमीच्या वेळी शिवनेरी किल्ल्यात झाला. जन्मापूर्वी सुरू झालेली दौड व धामधूम शेवटी त्या सरशी त्यांनी निवडक घोडेस्वारांनिशी निघून ती रक्कम घेऊन येणाऱ्या लोकांवर अचानक हल्ला केला. ते सगळे द्रव्य हस्तगत करून शत्रूकडील हरकत येण्यापूर्वी ते रायगडावर अतिवेगाने येऊन पोचले. त्या दौडीमुळे त्यांना अतिशयित थकवा आला. त्यांच्या छातीत दुखू लागले. येथपर्यंत त्यांच्या मृत्यूसमयापर्यंत त्यांची घोडदौड व त्यांच्या जीवनातील धामधूम कायम होती. ही गतिमान घोडदौडीची निवेदनशैलीही या चरित्रात आपणास जाणवते. त्यामुळे चरित्र वाचताना ही गती वाचकाला वाचनाची पकड घेण्यास उद्युक्त करते. ती पकड चरित्र वाचनात कायम राहाते. यात चरित्रकाराच्या निवेदनकौशल्याचे रहस्य जाणवते.

घटना, प्रसंग, व्यक्तिवर्णने, स्थलवर्णने, युद्धाची वर्णने, यातील गतिमानताही महत्त्वाची आहे. या वर्णनातील चित्रमयता व हुबेहूबपणा आपणासमोर एक शिवाजी महाराजांच्या जीवनाचा चलत् चित्रपट उभा करतो. चरित्राचे निवेदन तृतीयपुरुषी आहे. चरित्रकार गुरुवर्य केळूसकर यांनी तटस्थपणे हे चरित्र लिहिले आहे. हा त्यांचा तटस्थपणा या निवेदनात सतत जाणवतो. जणू काही छत्रपतींच्या जीवनाचे साक्षी असल्यासारखे या चरित्राचे निवेदन झाल्यामुळे वाचकांच्या समोरही हा तटस्थपणा उभा राहतो. निवेदनात जीवनकथा सांगितली आहे. हे सांगताना त्यांना अवगत असलेली माहिती सतत आपल्यासमोर येत असते. पण त्याचवेळी स्वत: चरित्रकारास माहिती नसणाऱ्या ऐकीव गोष्टी सांगताना चरित्रकार शिवाजी महाराजांना असा बोध केला की, असे सांगतात की, ‘ह्या अफजुलखानाविषयीची एक दंतकथा अशी आहे की,’ अशा वाक्याने आपली सोडवणूक करून घेतो. चरित्रकाराला शिवाजीमहाराजांचे चरित्र सांगण्यापेक्षा दाखवून देण्यात व समोर ठेवण्यात रस वाटतो. त्यामुळे अनेक उताऱ्यांची सुरुवात ‘हे असे, हे आरमार ह्याप्रमाणे, ह्या मोहिमेत, याशी, यावेळी, या रणात, या लढाईत, इकडे’ अशा दर्शक सर्वनामांनी, शब्दांनी अनेक उताऱ्यांची सुरुवात होताना दिसते.

चरित्रातील अद्‌भुत प्रसंगांचे वर्णन व पावित्र्याचे वर्णन अशाच शब्दांनी केले आहे. वारंवार यांच्या जीवनातील कठीण प्रसंगी त्यांच्या अंगी भवानीचा संचार होत असतो. त्यांनी स्नान करून श्री भवानीची सोत्कंठ होऊन प्रार्थना केली. तेव्हा भवानी त्यांच्या अंगात संचारून पुढीलप्रमाणे बोलली, अशा स्थितीत त्यांच्या अंगात देवी

संचारून येणेप्रमाणे बोलली अशा वाक्यांनी अद्‌भुत प्रसंगाचे वर्णन त्यांनी बखरीतील भाषेचा प्रत्यय या चरित्रात दिला आहे.

चरित्राची भाषा १९ व्या शतकातील मराठी गद्याच्या वळणाची झाली आहे. हे चरित्र तत्कालीन तरुणांसाठी व सामान्य लोकांसाठी लिहावयाचे असल्याने अत्यंत ओघवत्या व सोप्या भाषेत चरित्राची प्रचिती येते. एखाद्या रोमांचकारी कादंबरीमय भाषेसारखी लालित्यपूर्ण व त्याचवेळी आवेशपूर्ण भाषाही प्रत्ययास येते. शिवाजी महाराजांचे जीवनकथन असल्याने या चरित्राची भाषा कल्पित वास्तवाचा भास निर्माण करते. त्यामुळे वाचकांना अखंडपणे गुंतवून ठेवण्याचे सामर्थ्य असणाऱ्या या चरित्राची भाषा नितांत रमणीय होते. ती उत्स्फूर्त, स्पृहणीय होते. त्याचवेळी छत्रपतींच्या जीवनातील संकट व दुःखद समयी ती करुणामयी होताना दिसते.

वाङ्‌मयमहर्षी गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकरांचे वाङ्‌मयातील व सामाजिक कार्यातील असामान्य कर्तृत्व जाणून घेऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मा. बाबा भांड व मंडळातील त्यांचे सहकारी, मंडळाच्या सचिव मिनाक्षी पाटील यांनी ह्या महत्त्वकांक्षी प्रकल्पाची जबाबदारी महाराष्ट्र शासनाच्या वतीने माझ्यावर सोपवून माझ्यावर जो विश्वास दाखवला त्याबद्दल त्यांच्या ऋणातच असणे मी पसंत करतो. महाराष्ट्र शासनाच्या उदार व वाङ्‌मयप्रेमी दृष्टिकोणाचा मी कृतज्ञपूर्वक उल्लेख करतो.

हा प्रकल्प पूर्ण करताना अनेकांचे सहकार्य लाभले. सतीश बडवे, प्रकाश पवार, अवनीश पाटील, प्रवीण बांदेकर, नीतीन रिंढे, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, अरुण शिंदे, नीला जोशी यांनी गरुवर्य केळूसकरांच्या ग्रंथांना अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहून दिल्या. त्यासाठी त्यांनी बरेच परिश्रम घेतले. तसेच रफिक सूरज, शोभा नाईक, सुजय पाटील, अनिल गवळी, रमेश साळुंखे, गोमटेश्वर पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचे आभार मानणे त्यांना आवडणार नाही. कारण हे सर्व अभ्यासक व्रतस्थ वाङ्‌मयसेवक आहेत. या ग्रंथाचे संकलन करण्यात साकेत बाबा भांड यांनी केलेली मदत मोलाची आहे. याबरोबर हे प्रकल्प काम पूर्ण करण्यास आप्पासाहेब बुडके, तेजस चव्हाण, राजेश पाटील, नवनाथ गोरे, संदीप मुंगारे, प्रदीप पाटील, निहाल शिपुरकर यांची मदत झाली. त्यांचे मनःपूर्वक आभार. त्या बरोबरच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयचे ग्रंथपाल, सा.वा.ना. नाशिक, श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडी,

करवीर नगर वाचन मंदिर कोल्हापूर, बॅ. खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर या बरोबरच महाराष्ट्रातील अनेक ग्रंथालयाच्या ग्रंथपालांनी विशेष मदत केली. त्यांचे मनःपूर्वक आभार. या शिवाय या प्रकल्पास मदत करणाऱ्या सर्व ज्ञात अज्ञातांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो. ह्या प्रकल्पाचे वाचक मनापासून स्वागत करतील अशी खात्री आहे. या प्रकल्पात काही त्रुटी राहिली असल्यास त्याची जबाबदारी माझी असेल मात्र चांगल्याचे सर्व श्रेय बाबा भांड आणि त्यांचे सहकारी यांचे आहे. धन्यवाद!

**– राजन गवस**

# प्रस्तावना

मराठ्यांच्या इतिहास लेखनाच्या दृष्टीने, शिवाजी महाराजांचे जीवन व कार्य हे नेहमीच एक मध्यवर्ती सूत्र राहिलेले दिसते. मराठ्यांचा पहिला इतिहास ग्रँट डफ याने इ. स. १८२६ मध्ये इंग्रजी भाषेतून लिहिला असला तरी शिवाजी महाराजांकडे जनमानसांचे लक्ष वेधण्याची कामगिरी महात्मा जोतिराव फुले यांनी केलेली दिसते. इ.स. १८६९ मध्ये त्यांनी शिवाजी महाराजांच्यावर सुमारे एक हजार ओळी असलेला प्रदीर्घ असा एक पोवाडा लिहिला होता. त्याच वर्षी म.मो. कुंटे यांचे *राजा शिवाजी* हे महाकाव्य प्रसिद्ध झाले. इ.स. १८८९ मध्ये राजाराम शास्त्री भागवत यांनी शिवाजी महाराजांचे छोटेखानी चरित्र लिहिले होते. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी इ.स. १८९२ ते १९०० या काळात आपला प्रसिद्ध *मराठा सत्तेचा उत्कर्ष* हा ग्रंथ लिहिला. शिवाजी महाराजांच्या बद्दल या काळात अनेकांनी लेखन केले असले तरी, शिवाजी महाराजांचे समग्र चरित्र १९व्या शतकाच्या अंतापर्यंत प्रसिद्ध झालेले नव्हते.[१]

मराठ्यांच्या इतिहास लेखनातील ही उणीव गुरूवर्य कृष्णराव केळूसकर यांनी इ.स. १९०६ मध्ये भरून काढली. *क्षत्रियकुलावतंस छत्रपति शिवाजी महाराज यांचे चरित्र* ह्या केळूसकरांच्या शिवचरित्राची दुसरी आवृत्ती इ.स. १९२० मध्ये व संक्षिप्त आवृत्ती इ. स. १९२७ मध्ये प्रकाशित झाली. २० व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात इतर काही अभ्यासकांनी शिवचरित्र लिहिण्याचे उपक्रम पूर्ण केले. ह्या मध्ये सर जदुनाथ सरकार, ह्युग रॉलिन्सन, चि. वि. वैद्य (१९३१) आणि डॉ. बाळकृष्ण (१९३२) हे मुख्य होते.[२]

२०व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील शिवचरित्र लेखक एका बाबतीत वेगळे होते. त्यांच्या मध्ये 'वैज्ञानिक दृष्टिकोनातून इतिहास लिहिण्याची इच्छा निर्माण झालेली होती. ह्या नवीन पद्धतीमध्ये जास्तीत जास्त मूळ कागदपत्रे (original documents) वापरून भूतकाळाचा वेध घेणे अपेक्षित होते.'[३] जर्मन इतिहासकार लिओपोल्ड रँके व इतर आधुनिक विज्ञानवादी विचारवंतांनी आपल्या इतिहासलेखन पद्धतीमध्ये 'शासकीय कागदपत्रे' व अभिलेखागारातील लिखित साधनांना खूप महत्त्व दिले होते. त्यांची 'विश्वसनीय साधनांची' (reliable sources) एक विशिष्ट संकल्पना होती, ज्यामुळे त्यांच्या वैज्ञानिक इतिहास लेखनाच्या दृष्टिकोनात अभिलेखागारातील लिखित साधनांना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले होते. लिखित साधनांशिवाय इतिहास लिहिता येत नाही (no documents, no history) हा रँकेवादी इतिहासकारांच्या विश्वासाचा अविभाज्य भाग बनला.

इ. स. १९३० च्या दशकापर्यंत शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्यावर मोठ्या प्रमाणात लेखन झाले होते. इतिहासकार डॉ. बाळकृष्ण यांनी म्हटल्याप्रमाणे शिवाजी महाराज हयात असतांना त्यांना काही प्रमाणात देवत्व प्राप्त झाले होते. त्यांच्या कार्य कर्तृत्वामुळे भारतीय लोकांमध्ये स्वदेशाभिमान व राष्ट्रीयत्व जागृत झाले व ते भारतीय स्वराज्याचे दिशादर्शक 'ध्रुव तारा' बनले. साहजिकच ह्या महामानवाभोवती अनेक मिथके व दंतकथा निर्माण झाल्या. याबद्दल डॉ. बाळकृष्ण लिहितात:

In truth, there is scarcely an event in his brilliant career, the veracity of whose details recorded in the Marathi chronicles cannot be challenged.

थोडक्यात, मराठी बखरींमध्ये शिवाजी महाराजांच्या संबंधित एकही घटना नाही ज्या घटनेच्या सत्यतेला आव्हान दिले जाऊ शकत नाही. डॉ. बाळकृष्ण यांनी आपल्या 'शिवाजी द ग्रेट' या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत शिवाजी महाराजांच्या जीवनातील चार चित्तथरारक घटनांचे उदाहरण देऊन हे दाखवले आहे की, कशा प्रकारे वेगवेगळी वादग्रस्त माहिती वेगवेगळ्या ऐतिहासिक साधनांतून उपलब्ध होते. बाळकृष्ण यांनी अफजलखानाची हत्या, शाहिस्तेखानावरील हल्ला, औरंगजेब-शिवाजी महाराज भेट व आग्र्याहून सुटका ह्या चार घटनांमध्ये वेगवेगळ्या ऐतिहासिक साधनांनी दिलेल्या परस्परविरोधी माहितीचे तुलनात्मक विश्लेषण केले आहे. डॉ. बाळकृष्ण यांनी ह्याच ग्रंथाच्या एका परिशिष्टांमध्ये इतिहास लेखनाचे साधन म्हणून 'बखरींचे वैगुण्य' दाखवून दिले आहे.[४]

१७ व्या शतकात मराठ्यांच्या सत्तेचा पाया बळकट झाल्यानंतर मराठ्यांच्या इतिहासावर अनेक बखरी लिहिल्या गेल्या. या काळात सर्व राजकीय घडामोडी मध्ये शिवाजी महाराज हेच केंद्रबिंदू होते. साहजिकच मराठ्यांचे वर्चस्व असलेल्या स्वराज्यात जास्तीत जास्त बखरी या शिवाजी महाराजांवर लिहिल्या गेल्या. २०व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात नुसत्या मराठी बखरींमधील माहितीवर आधारलेल्या शिवचरित्रांवर टीका केली जाऊ लागली. वि. का. राजवाडे यांनी मराठी बखरींना इतिहासलेखनाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून वापरण्याला जोरदार विरोध केला. बखरी आणि मूळ ऐतिहासिक कागदपत्रातील फरक विषद करतांना राजवाडे नमूद करतात की, 'एक अस्सल चिटोरे सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास पुरेसे आहे'. इतिहासलेखनाचे साधन म्हणून बखरीच्या टीकात्मक चिकित्सेमुळे पुढील काळात शिवाजी महाराजांचा इतिहास लिहिण्यासाठी अस्सल दस्तावेज शोधण्याच्या मोहिमेला गती मिळाली. वि. का. राजवाडे, द. ब. पारसनीस आणि वा. वा. खरे यांनी मराठा इतिहासलेखनाला उपयोगी असणारी अस्सल मराठी साधने शोधणे आणि ती प्रकाशित करणे हे आपले जीवनकार्य केले. रान्केच्या विचारांचा प्रभाव असणारे राजवाडे आणि पारसनीस यांनी पायपीट करून व खटाटोप करून अस्सल लिखित कागदपत्रे प्राप्त केली. पुढे राजवाड्यांनी मराठा इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असे संकलित मूळ साधनांचे २२ खंड अभ्यासकांना उपलब्ध करून दिले.

ह्याच दरम्यान भारतीय इतिहासातील 'मोगल काळाचे' इतिहासकार म्हणून प्रसिद्ध असलेले सर जदुनाथ सरकार यांनी देखील शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिण्यास सुरुवात केली. मराठा इतिहासाचा अभ्यास करताना सर जदुनाथ सरकार यांनी मराठा इतिहासाची उपलब्ध असलेली जवळजवळ सर्व साधने वैज्ञानिक इतिहासलेखनाच्या दृष्टिकोनातून तपासली. उपलब्ध असलेल्या प्रत्येक साधनाचा शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिण्यासाठी कितपत उपयोग होतो, याची चिकित्सा केली. त्यांच्या मते इतिहासकारांनी शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिण्यासाठी मराठी साधनांचा उपयोग जपूनच करायला हवा व आपला पूर्ण विश्वास फारसी व इंग्रजी साधनांवर ठेवायला हवा. सर जदुनाथ सरकारांनी परकीय साधनांना दिलेल्या झुकत्या मापामुळे त्यांच्यावर महाराष्ट्रातील इतिहासकारांनी जोरदार टीका केली होती.

खरे तर, शिवाजी महाराजांचा इतिहास लिहिण्यासाठी उपलब्ध असलेल्या मराठी व परकीय साधनांचा उपयोग करण्याच्या संदर्भात अनेक प्रश्न आहेत. इ.स. १६८२ ते १७०७ या कालखंडात मुघलांच्या विरुद्ध सुरू असलेल्या मराठ्यांच्या स्वातंत्र्य लढ्यात मराठा राज्याची बहुतेक मूळ कागदपत्रे व इतर साधने नष्ट झालेली होती. शिवाजी महाराजांबद्दल माहिती देणाऱ्या बखरींमध्ये अनेक दंतकथा व आख्यायिकांनी प्रवेश केला होता. दुसरे असे की, फारसी, इंग्रजी, डच, पोर्तुगीज व फ्रेंच भाषेतील साधने जरी काही प्रमाणात कालक्रम ठरवण्यासाठी उपयोगी असली तरी त्यांच्या मधील माहिती ही विखुरलेल्या स्वरुपात होती. त्यामुळे इतिहासकाराला युरोपियन लोकांनी लिहिलेल्या विविध कागदपत्रांमधून माहिती वेचून ती एकत्रित करून आपली मांडणी करावी लागत असे. आणि असे केले तरी ह्या मांडणीमध्ये अनेक कच्चे दुवे राहण्याची शक्यता असे. हे कच्चे दुवे पूर्ण करण्यासाठी मराठी साधनांची मदत इतिहासकाराला घ्यावीच लागते.

आणखी एक असे की, फारसी व युरोपियन भाषेतील साधने ही शिवाजी महाराजांच्या अथवा एकूणच मराठा राज्याच्या शत्रूंनी निर्माण केली असल्यामुळे आपल्याला त्यामध्ये मराठ्यांबद्दल आक्षेपार्ह मजकूर लिहिलेला आढळतो. ह्या लोकांनी आपल्या लिखाणात मराठ्यांचे वर्णन उघडपणे चोर, गनीम, लुटारू अशा अपशब्दांनी केल्याचे दिसते. अशा प्रकारच्या पुर्वग्रहदुषित साधनांचा इतिहास लेखनात वापर केला तर मग एक विकृत इतिहास पुढे येण्याची शक्यता निर्माण होते. मराठ्यांचे ख्यातनाम इतिहासकार डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी आपल्या शिवकालीन महाराष्ट्र ह्या ग्रंथात मुघलांचे प्रसिद्ध इतिहासकार डॉ. इरफान हबीब यांनी आपल्या अग्रेरीयन सिस्टिम ऑफ मुघल इंडिया (१९६३) या ग्रंथात केलेल्या अशाच एका चुकीमुळे इतिहासाचे झालेले विकृतीकरण दाखवून दिले आहे.[५]

मराठ्यांचा इतिहास लिहिणाऱ्या काही आधुनिक इतिहासकारांनी तर परकीय भाषेतील पुर्वग्रहदुषित साधने वापरून मराठ्यांच्या बाबत एक लुटमारीचा सिद्धांतच' मांडला! त्यांच्या मते १८व्या शतकामध्ये मुघल साम्राज्याची वाताहत होण्यामध्ये मराठ्यांच्या लुटारू कारवाया जबाबदार होत्या. प्रसिद्ध बंगाली इतिहासकार डॉ. अनिरुद्ध रे यांनी आपल्या संशोधनाने दाखवून दिले आहे की, गुजरात मधील खंबायत (Cambay) प्रदेशामध्ये इ.स. १७२५ ते १८२५ या काळातील मराठ्यांची 'लुटारू'

प्रतिमा ही अत्यंत चुकीची आहे. मराठ्यांचे विरोधक असलेल्या इंग्रजांनी आपल्या समकालीन लिखाणात मराठ्यांच्याबाबत हा विपर्यास निर्माण केला होता.[६] शिवचरित्र लिहिणाऱ्या अलिकडच्या अभ्यासकासमोर ही एक महत्त्वाची समस्या आहे. मराठी व संस्कृत भाषेतील साधने ही शिवाजी महाराज आणि त्यांच्या पूर्वजांच्या कार्याचे वर्णन करतांना अतिशयोक्ती करतात तर बखरीमध्ये मोठ्या प्रमाणात दंतकथा व आख्यायिका आहेत, ज्यामुळे त्यांची ऐतिहासिक विश्वासार्हता कमी होते. याउलट, फारशी आणि युरोपियन भाषेतील बहुतेक मराठा इतिहासाची साधने पुर्वग्रहदुषित दृष्टिकोनातून लिहिली गेली आहेत. पण घटनांची कालक्रमणा ठरवण्यासाठी ती महत्त्वाची ठरतात. मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांची स्थिती संभ्रम तयार करणारी असल्यामुळेच शिवचरित्र लेखक व वाचक यांच्यावर अतीव जबाबदारीचा भार पडतो.

**शिवचरित्र वाचकांची जबाबदारी**

उपरोक्त चर्चेवरून एक गोष्ट स्पष्ट होते की, देशी भाषिक आणि परकीय भाषिक साधने शिवचरित्र लिहिण्यासाठी उपयोगी आहेत. दोन्ही प्रकारच्या साधनांमध्ये उपलब्ध झालेली माहिती इतर समकालीन विश्वसनीय साधनांशी ताडून पाहिल्याखेरीज ती प्रमाणभूत मानणे मूर्खपणाचे ठरेल. दुसरे असे की, साधन जरी समकालीन असले तरी साधन निर्माण करणाऱ्यांनी दिलेली माहिती ही स्वतःच्या निरीक्षणावर अथवा स्वानुभवावर आधारलेली आहे, याची खात्री करून घेणे आवश्यक ठरते. जर माहिती ऐकीव असेल तर ती इतर विश्वासू साधनांमधील माहितीशी ताडून पाहणे क्रमप्राप्त ठरते. ही झाली शिवचरित्रासाठी वापरण्यात आलेल्या साधनांच्या संदर्भातील गोष्ट.

आधुनिक इतिहासलेखन पद्धतीमध्ये साधनांची चिकित्सा करण्याबरोबर इतिहासकाराला लेखन करतांना 'वस्तुनिष्ठता' जोपासणे अपेक्षित असते. आधुनिक इतिहासकारांमध्ये प्रचलित असलेल्या 'वस्तुनिष्ठतेच्या संकल्पनेमध्ये एक महत्त्वाचा समज अंतर्भूत झाला आहे की, 'सत्य हे एक असते, ते परिप्रेक्ष्यीय नसते. थोडक्यात, ऐतिहासिक सत्य हे एकच असते, ते इतिहास लिहिणाऱ्या अभ्यासकाचे परिप्रेक्ष्य बदलले तरी ते बदलत नसते. इतिहासातील घटनांचे आकृतिबंध इतिहासकार शोधत असतो; तो ते आकृतिबंध तयार करत नसतो. इतिहासकाराची प्राथमिक निष्ठा व उद्देश वस्तुनिष्ठ ऐतिहासिक सत्य शोधून काढण्याकडे असतात.[७]

थोडे खोलात जाऊन पहिले तर, 'वस्तुनिष्ठ ऐतिहासिक सत्य' हे साधनांना प्रभुत्व दिले तरच शोधले जाऊ शकते, असे इतिहासकारांना वाटू लागले. म्हणूनच दुय्यम ऐतिहासिक साधनांवर (समकालीन नसलेल्या) जास्त अवलंबून न राहता, मूळ प्राथमिक (समकालीन) साधने वापरणे जास्त उचित व संयुक्तिक समजले जाऊ लागले. याचा परिणाम म्हणून 'मूळ साधनांचा वापर करा' अशा प्रकारची अट इतिहासकारांची योग्यता ठरवण्यासाठी वापरली जाऊ लागली.

इतिहासाच्या वाचकांनी, वरील सर्व चर्चेवरून जर कोणता धडा घ्यायचा असेल तर तो हा की, कोणत्याही इतिहासकाराने लिहिलेले शिवचरित्र समजून घ्यायचे असेल तर त्याचे वाचन डोळसपणे करणे गरजेचे आहे. कोणताही इतिहासकार सांगतोय म्हणून त्याच्या कोणत्याही म्हणण्यावर विश्वास ठेवणे हे आजच्या जगतात भाबडेपणाचे लक्षण होईल. इतिहासलेखन पद्धतीचे पालन केले आहे असा दावा सर्वच इतिहासकार करतात. मात्र त्यांनी किती प्रमाणात पालन केले आहे? किती प्रमाणात दंतकथा किंवा आख्यायिका दूर सारून सत्य घटनांची कास धरली आहे? अथवा प्रामाणिकपणे साधनांचे टीकात्मक परीक्षण करून सुसंगत अन्वयार्थ लावला आहे का? हे ठरवण्याची जबाबदारी वाचकाची असते. इतिहासकार अनेक वेळा पुर्वग्रहदुषित साधनांना विश्वासार्ह मानतात आणि या मुळे इतिहास लेखनात विपर्यास येतो. हे विशेषतः नाट्यमय किंवा चमत्कारिक घटनांच्या बाबतीत लक्षात ठेवणे गरजेचे ठरते. इतिहासकाराने एखाद्या बखरीचा आधार घेऊन जर एखादी नाट्यमय घटना रंगवली असेल, तर इतिहासाचे विकृतीकरण होण्याची दाट शक्यता आहे, हे वाचकांनी लक्षात ठेवले पाहिजे. विशेषतः शिवचरित्राच्या संदर्भात ही गोष्ट जास्त महत्त्वाची आहे.

आजकाल सर्व इतिहास अभ्यासकांना हे माहीत आहे की कोणत्याही इतिहासकाराकडून शंभर टक्के वस्तुनिष्ठतेची अपेक्षा करणे उचित नाही. इतिहासकार नेहमीच आपले पुर्वग्रह घेऊनच अभ्यास करत असतो आणि म्हणून इतिहास वाचकांनी विख्यात इतिहासकार ई.एच. कार यांनी दिलेला सल्ला उराशी बाळगणे गरजेचे आहे. ई. एच. कार यांनी आपल्या नावाजलेल्या 'इतिहास म्हणजे काय?' (What is History?) ह्या ग्रंथात म्हटले आहे की, जर इतिहास वाचकांना इतिहास समजायचा असेल तर त्यांनी इतिहासकाराची ओळख करून घेतली पाहिजे; त्याच्या डोक्यात

काय चालले होते, त्याची पुन्हा कल्पना (re-enact) केली पाहिजे. इतिहासकाराने मांडलेली घटिते (facts) वाचण्याआधी त्याचा अभ्यास केला पाहिजे व त्याच्या बद्दल माहिती मिळवली पाहिजे. त्याच्या डोक्यात कोणत्या मधमाशा आहेत, हे समजून घेतले पाहिजे आणि मग त्याने लिहिलेला इतिहास वाचताना त्या मधमाश्यांचा गुंजन ध्वनी ऐकला पाहिजे. कार म्हणतो की, जर वाचकाला ध्वनी ऐकू आला नाही तर तो बहिरा आहे किंवा ज्याने इतिहास लिहिला आहे तो एक सुमार इतिहासकार आहे. थोडक्यात, कार यांना असे म्हणायचे आहे की, प्रत्येक इतिहासकार माहितीच्या एका विशाल अगम्य समुद्रातून आपली माहिती व घटीते निवडत असतो. आपल्या लिखाणात तो कोणती माहिती वापरतो हे त्याच्या पूर्वग्रह किंवा दृष्टिकोनावर अवलंबून असते.[८] इतिहासकाराचा दृष्टिकोन व परिप्रेक्ष्य जाणल्याशिवाय त्याने विशिष्ट माहितीचा वापर विशिष्ट ठिकाणी का केला आहे हे वाचकाला समजणे कठीण असते.

उपरोक्त इतिहासलेखन दृष्टिकोनाचे प्रवाह स्पष्ट करण्याचे एकूणच प्रयोजन या साठीच होते की वाचकांना प्रस्तुत शिवचरित्राची समकालीन उपयुक्तता व मर्यादा लक्षात यावी.

**इतिहासकाराची ओळख**

कृष्णराव अर्जुन केळूसकर हे मूळचे कोकणातील वेंगुर्ले तालुक्यातील केळूस ह्या गावचे होते. त्यांचा जन्म दि. २० ऑगस्ट १८६० रोजी झाला. पुढे त्यांच्या वडिलांनी त्यांना मुंबईतील इंग्रजी शाळेत घातले. मुंबईचे प्रसिद्ध नागरिक नामदार नाना उर्फ जगन्नाथ शंकरशेट यांच्या शिफारशीमुळे ते मोफत शिक्षण घेऊ शकले. ते इ.स.१८८१ मध्ये मुंबईतील विल्सन हायस्कूल मधून मॅट्रिक झाले. इ.स. १८८६ मध्ये मुंबई मधील विल्सन हायस्कूल मध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारली. ही शाळा मिशनरी रेव्हरंड जॉन विल्सन यांनी स्कॉटिश मिशनरी सोसायटी ह्या ख्रिस्ती प्रोटेस्टंट पंथासाठी इ.स. १८३२ मध्ये सुरू केलेली होती. पुढे ह्याच जॉन विल्सनने मुंबई विद्यापीठाच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.[९] केळूसकर कशा प्रकारचे शिक्षक असावेत याची जाणीव डॉ. आंबेडकर यांच्या जीवनातील इ.स. १९०७ मधील एका प्रसंगावरून येते. केळूसकर हे ग्रंथ वाचण्यासाठी मुंबईतील एका बागेत जात असत. तेथे त्यांचा संपर्क शाळेत शिकत असलेल्या भीमराव आंबेडकरांशी आला. आंबेडकरांचा अभ्यासूपणा पाहून केळूसकरांनी त्यांना आपल्या संग्रहातील अनेक ग्रंथ वाचायला

दिले. याशिवाय त्यांचा नवीन ग्रंथ 'बुद्धचरित्र' भेट दिला. आंबेडकर नुकतेच मॅट्रिक पास झाले होते. त्यांचे अभिनंदन केळूसकर आणि थोर समाजसुधारक सी. के. बोले यांनी त्यांच्या घरी जाऊन केले. त्यांचा सत्कार करण्यासाठी एक सभा आयोजित करण्यात आली. ह्या सभेचे अध्यक्ष बोले होते व केळूसकर देखील उपस्थित होते. ह्या प्रसंगावरून ''दोघा सामाजिक नेत्यांची दृष्टी किती विशाल व कशी समतावादी होती हे कळते.''[१०] आपल्यासाठी महत्त्वाचा योगायोग असा की, प्रस्तुत सिंहावलोकन करत असलेल्या केळूसकर लिखित 'संक्षिप्त शिवचरित्राची' प्रस्तावना सी.के. बोले यांनी लिहिलेली आहे!

कृष्णराव केळूसकर आपल्या आत्मचरित्रात स्वतःचा संदर्भ 'ब्राह्मणेतर लेखक' असा देतात . इ.स. १९०६ मध्ये शिवचरित्र प्रसिद्ध झाल्यावर त्यांच्या मांडणीमुळे 'ब्रह्मवृंदास' झालेल्या त्रासाचा उल्लेख त्यांनी आपल्या आत्मचरित्रात केला आहे.[११] कृष्णराव केळूसकरांनी प्रकाशित केलेले शिवचरित्र छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज कोल्हापूर संस्थानाचे अधिपती छत्रपती शाहू महाराज यांच्या राजाश्रयाने प्रसिद्ध केलेले होते. ह्या शिवचरित्राचे पूर्ण शीर्षक *क्षत्रियकुलावतंस छत्रपती शिवाजीमहाराज यांचे चरित्र* असे होते. इ. स. १९०२ साली कोल्हापूर संस्थानात 'वेदोक्त प्रकरण' घडले होते. काही ब्राह्मण मंडळीनी छत्रपतींच्या 'क्षत्रियत्वावर' शंका घेतली होती. अशा तणावपूर्ण वातावरणात केळूसकरांनी छत्रपती शाहू महाराजांच्या वंशातील छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे पूर्वज यांच्या 'क्षत्रिय कुळाचा' इतिहास उलगडून दाखवणारे चरित्र लिहिले होते. केळूसकर स्वतः ब्राह्मणेत्तर जातीचे असल्यामुळे त्यांना देखील उच्चभ्रू ब्राह्मण लोकांचा तिरस्कार सहन करावा लागला होता, हे त्यांचे आत्मचरित्र वाचले की स्पष्ट होते.

इ.स. १९१९ मध्ये प्रसिद्ध झालेले शिवचरित्राचे इंग्रजी भाषांतर आणि इ.स. १९२० मध्ये प्रसिद्ध झालेली दुसरी आवृत्ती ही देखील छत्रपती शाहू यांच्याच आश्रयाने प्रसिद्ध केली गेली होती. इ. स. १९२२ साली छत्रपती शाहूंचा मृत्यू झाला, यामुळे इ. स. १९२७ मध्ये प्रसिद्ध केलेले 'संक्षिप्त शिवचरित्र', केळूसकरांनी छत्रपती शाहूंचे वारसदार छत्रपती राजाराम यांच्या आश्रयाखाली प्रसिद्ध केले. केळूसकरांचा छत्रपती शाहूंच्या सारखा एक प्रागतिक राजकीय दृष्टिकोन होता. त्यांचा ब्राह्मणेतर चळवळीच्या विचारांना व अस्पृश्य आणि मागासलेल्या वर्गातील लोकांच्या उद्धाराला पाठिंबा होता.

कृष्णराव केळूसकर हे महात्मा फुले यांच्या सहवासात आल्यामुळे त्यांच्यावर सत्यशोधक विचारांचा प्रभाव होता. केळूसकरांच्या मते ''जात्याभिमान, जातिभेद, अस्पृश्यता, जातिमत्सर, वर्णश्रेष्ठत्वाचा अहंभाव हीच आपल्या समाजाच्या, देशाच्या अवनतीची मूळ कारणे आहेत, ती दूर न करता जे देशाच्या राजकीय स्वातंत्र्याची चळवळ करतात त्यामुळे देशोद्धार होणार नाही.'' त्यांची अशी प्रामाणिक धारणा होती की, ''सर्वार्थाने मागासलेल्या व गुलामीत पडलेल्या आपल्या समाजाला शिवाजीमहाराजांचे चरित्र मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरते.''[१२]

## केळूसकरांच्या संक्षिप्त शिवचरित्राचा पूर्वेतिहास

कृष्णराव केळूसकरांनी शिवाजी महाराजांचे चरित्र इ.स. १९०३ मध्येच लिहायला हाती घेतले होते. मराठा प्रॉव्हीडंट फंडाचे श्री. गोविंदराव दळवी यांची इच्छा होती की फंडाच्या मार्फत शिवाजी महाराजांचे चरित्र प्रसिद्ध व्हावे. मात्र त्यांचा अकाली मृत्यू झाल्याने त्यांची ही इच्छा अपूर्ण राहिली होती. गोविंदरावांचे बंधू श्री दाजीबा दळवी हे केळूसकरांचे परममित्र होते. ते व त्यांचे दुसरे बंधू रामचंद्रराव दळवी यांनी गोविंदरावांची इच्छा पूर्ण करण्याच्या उद्देशाने शिवचरित्र पूर्ण करण्याची जबाबदारी केळूसकरांवर सोपविली. शिवचरित्र लिहिण्याचे काम साध्य करण्यासाठी घ्यावे लागलेल्या कष्टांचे वर्णन केळूसकरांनी आपल्या आत्मचरित्रात असे केले आहे: ''हे काम होईल तेवढे निर्दोष पुरे करावयाचे असा निर्धार करून मी त्यास लागणाऱ्या साहित्याची जुळवाजुळव साधेल तेवढी पुरी केली. शिवाजी महाराजांच्या संबंधी जेवढा म्हणून छापील मजकूर होता तेवढा सगळा वाचून त्याची टिपणे मी घेतली. शिवाय एक-दोन हस्तलिखित ग्रंथही मी पाहिले'' केळूसकरांनी लिहिलेले शिवचरित्र इ.स. १९०७ मध्ये प्रकाशित करण्यात आले.

कृष्णराव केळूसकरांनी पुढे ज्यांना मराठी येत नाही अशा लोकांपर्यंत शिवरायांचा यथार्थ व साधारण इतिहास पोहोचावा म्हणून त्यांच्या मराठी शिवचरित्राचे इंग्रजी भाषांतर करण्याचा उपक्रम हाती घेतला. मुंबई मधील विल्सन कॉलेजमधील इंग्रजी भाषेचे प्राध्यापक निलकंठराव ताकाखाव यांनी हे भाषांतर केले. प्रा. ताकाखाव हे चिकित्सक बुद्धीचे होते. त्यांनी केळूसकरांच्या ग्रंथाचे नुसतेच भाषांतर केले नाही, तर ग्रंथात केलेली विधाने ऐतिहासिक सत्याच्या कसोटीवर खरी उतरतात का, हे देखील तपासून पाहिले. याशिवाय ग्रँट डफ, सर जदुनाथ सरकार, सी. ए. किंकेड यांनी

इंग्रजीत लिहिलेल्या शिवचरित्रातून निर्माण झालेले पूर्वग्रह व गैरसमजुती दूर करण्याचा प्रयत्न केला. प्रा. ताकाखाव यांनी शिवाजी महाराजांच्या बाबतीत झालेले नवीन संशोधन वाचून ग्रंथाच्या इंग्रजी आवृत्तीमध्ये जागोजागी भर घातलेली आढळते. शिवचरित्राचे इंग्रजी भाषांतर तयार करण्याने केळूसकरांना मराठी आवृत्ती मध्ये भर घालण्याची संधी प्राप्त करून दिली. इ. स. १९२० मध्ये केळूसकरांनी शिवचरित्राची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध केली. ह्या दुसऱ्या आवृत्तीत त्यांनी पुष्कळ मजकूराची भर घातली होती. शिवचरित्राचे इंग्रजी भाषांतर तयार झाले असले तरी ते प्रसिद्ध करण्यासाठी पैसा उभा करणे अवघड होते.

शिवाजी महाराजांचे इंग्रजी चरित्र कसे छापले गेले याची गोष्ट केळूसकरांनी आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवली आहे. बडोदा संस्थानाचे सरदार खासेराव जाधव यांची केळूसकरांशी जुनी ओळख होती. ते एकदा मुंबईत आले असतांना केळूसकरांनी त्यांना भेट दिली. काही गप्पागोष्टी झाल्यावर खासेराव जाधवांनी केळूसकरांना विचारले, ''तुम्ही बंगालच्या जदुनाथ सरकारांना शिवाजी संबंधीची काही माहिती का देत नाही? ते इंग्रजी शिवचरित्र लिहित आहेत.'' यावर केळूसकर त्यांना म्हणाले, ''आमच्या राष्ट्रवीराचे चरित्र ते कायसे लिहिणार? आम्हीच ते लिहिले पाहिजे.'' यावर जाधव म्हणाले, ''आमच्याकडे त्यांच्याइतका चांगले लिहिणारा कोण आहे?'' केळूसकर म्हणाले, ''मी मराठीत लिहिलेले चरित्र आपल्याला पसंत आहे काय? त्याचे इंग्रजी भाषांतर मी एका पंडिताकडून करविले असून ते एका मोठ्या इंग्रज विद्वान गृहस्थांकडून तपासले आहे. ते छापावयास द्रव्य नाही म्हणून ते पडून राहिले आहे.'' खासेराव जाधवांनी भाषांतर केलेला ग्रंथ पाहण्यासाठी मागितला. केळूसकरांनी त्यांना इंग्रजी ग्रंथाचा शेवटचा भाग पाहायला दिला. जाधवांना शेवटचा भाग खूप आवडला व त्यांनी केळूसकरांना हे वचन दिले की ग्रंथ छापण्यासाठी लागणारे पैसे ते मिळवून देतील. लवकरच जाधवांनी आपले वचन पूर्ण केले आणि प्रा. ताकाखाव व केळूसकर लिखित छत्रपती शिवाजी महाराजांचे इंग्रजी चरित्र इ.स. १९२१ मध्ये छापले गेले.

इ.स. १९२७ मध्ये 'त्रिशतसांवत्सरिक शिवजयंती उत्सव' मोठ्या उत्साहाने साजरा केला गेला. मुंबई मधील प्रसिद्ध सामाजिक संस्था मराठा ऐक्येच्छु सभेने ह्या समारंभाचे औचित्य साधून शिवाजी महाराजांचा एक स्मारक ग्रंथ म्हणून केळूसकरांनी

लिहिलेल्या चरित्राची संक्षिप्त आवृत्ती प्रसिद्ध केली. ह्याच सभेने सन १८८७ मध्ये महाराष्ट्रामध्ये शिवजयंती उत्सव साजरा करण्याची परंपरा सुरू केली होती. सभेचे अध्यक्ष सीताराम केशव बोले यांनी ग्रंथाच्या प्रस्तावनेत सांगितल्याप्रमाणे "... विद्यार्थीजनांना आमच्या शिवरायाच्या उज्ज्वल चरित्राची माहिती व्हावी म्हणून हे संक्षिप्त चरित्र मराठा ऐक्येच्छु सभेनें सुप्रसिद्ध ग्रंथकार रा. रा. कृष्णराव अर्जुन केळूसकर यांच्याकडून तयार करविले आहे. त्यांनी लिहिलेल्या ६१४ पृष्ठांच्या विस्तृत चरित्राचा हा १५८ पृष्ठांचा संक्षेप आहे. तरी पण शिवरायाच्या चरित्रातील सगळ्या कथाप्रसंगाचा यात समावेश झाला आहे. त्यामुळे हे पुस्तक शिवरायांचे संकलित चरित्र कळण्यास चांगले उपयोगी पडण्यासारखे आहे."

**संक्षिप्त चरित्रामध्ये वगळलेला मजकूर**

संक्षिप्त चरित्रात 'मालोजीराजे यांचे वृत्त' हा मजकूर भाग दुसरा म्हणून छापण्यात आलेला आहे. हा मजकूर शिवचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीतील 'पूर्वजवृत्त' ह्या पहिल्या भागामध्ये समाविष्ट करण्यात आला होता. दुसऱ्या आवृत्तीतील भाग सातवा 'स्वसत्तावृद्धी', भाग बारावा-विजापूर सरकारच्या दुसऱ्या सरदाराचा पराभव, भाग चौदावा-पितृदर्शन, भाग अठ्ठाविसावा-इंग्रज व सिद्दी, भाग एकतिसावा- दौलतीचा हिशेब आणि भाग बत्तीसावा-गुणदोषविवेचन, हे संक्षिप्त आवृत्तीत वगळण्यात आले आहेत. याशिवाय दुसऱ्या आवृत्तीत केळूसकरांनी दिलेल्या सविस्तर टीपा संक्षिप्त आवृत्तीत वगळण्यात आल्या व बराच मजकूर देखील कमी करण्यात आला.

परिणामी समग्र शिवचरित्र जे ६१३ पृष्ठांचे होते; ते संक्षिप्त आवृत्तीत फक्त १५७ पृष्ठांचे झाले. एकंदरीत, संक्षिप्त आवृत्तीची पृष्ठ संख्या ६१३ वरून १५७ इतकी कमी करण्यासाठी केळूसकरांना मोठ्या प्रमाणात काटछाट करावी लागली. ह्यामुळे जरी शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घडामोडींचा अंतर्भाव संक्षिप्त चरित्रात झाला असला तरी त्यांच्या जीवन व कार्याचा केळूसकरांनी काढलेला अन्वयार्थ राहून गेला आहे. शिवचरित्राच्या भाषांतरित इंग्रजी ग्रंथात शेवटच्या प्रकरणाचे शीर्षक Character (चारित्र्य) असे आहे. शिवचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीमध्ये हे प्रकरण 'गुणदोषविवेचन' ह्या शीर्षकाखाली छापले आहे. मात्र संक्षिप्त शिवचरित्रात हे प्रकरण वगळण्यात आले आहे.

शेवटचा भाग वगळल्याने केळूसकरांनी शिवचरित्राचा लावलेला अन्वयार्थ अभिव्यक्त करायचा राहून गेला आहे. केळूसकरांनी केलेले शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्याचे विवेचन हे सद्यःस्थितीत देखील मार्गदर्शक ठरत असल्यामुळे त्याचा येथे थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**केळूसकर लिखित शिवचरित्राचा मतितार्थ**

कृष्णराव केळूसकरांनी आपल्या शिवचरित्रात अशा कित्येक गोष्टी पहिल्यांदा मांडल्या ज्यामुळे त्याकाळात प्रचलित असलेल्या इतिहासाच्या मांडणीला आव्हान निर्माण झाले. त्यातील काही बाबींची चर्चा खाली केली आहे.

शिवचरित्रात आजवर सर्वात जास्त चर्चा झालेला वादग्रस्त मुद्दा म्हणजे दादोजी कोंडदेव, रामदासस्वामी व शिवाजी महाराज यांच्यातील गुरु-शिष्य संबंध. कृष्णराव केळूसकर यांनी हे संबंध कपोलकल्पित असून एकाही विश्वसनीय ऐतिहासिक पुराव्यातून याला दुजोरा मिळत नाही हे नवीन साधनांच्या आधारे दाखवले. छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या उपक्रमात दादोजी कोंडदेव, रामदासस्वामी किंवा शहाजी महाराजांच्या इतर कोणत्याही सेवकाचा उपदेश किंवा मसलत मिळाली नाही. केळूसकरांच्या मते, शिवाजी महाराज दादोजी कोंडदेव यांचे ऐकत नसत. रामदास स्वामींचा आणि शिवाजी महाराजांचा फारसा सबंध महाराजांचा राज्याभिषेक होईपर्यंत आलेला नव्हता. थोडक्यात सांगायचे तर, शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी रामदासस्वामी यांच्याकडून स्फूर्ती मिळाली नव्हती. शिवाजी महाराजांनी जे स्वराज्य साध्य केले ते कोणाच्याही मार्गदर्शनामुळे केले नाही, तर त्यांच्या ठायी असलेल्या क्षमतेद्वारे व त्यांच्या गुणांमुळे केले.

कृष्णराव केळूसकरांनी न्यायमूर्ती रानडे यांच्या *मराठा सत्तेचा उत्कर्ष* ह्या ग्रंथातील युक्तिवादाला नकार दिला आहे. न्यायमूर्ती रानडे यांनी आपल्या ग्रंथात हे मांडले होते की, ''शिवरायांचा महाराष्ट्रापुरताच स्वराज्य स्थापण्याचा उद्देश व प्रयत्न होता.'' केळूसकरांनी अनेक साधनांचा आधार घेऊन न्यायमूर्ती रानडे यांचे म्हणणे खोडून काढून दाखवून दिले की, शिवाजी महाराजांचा अखिल हिंदुस्थानात स्वराज्य स्थापन करण्याचा हेतू होता. केळूसकरकृत शिवचरित्र वाचत असतांना एक मुद्दा ध्यानात ठेवला पाहिजे, तो हा की ते शिवाजी महाराजांचे पहिले समग्र चरित्र होते. त्यामुळे त्यांना इतर इतिहासकारांनी पूर्वग्रहदुषित साधनांच्या आहारी जाऊन शिवाजी महाराजांच्या

संबंधित केलेली वादग्रस्त विधाने खोडून काढावी लागली. छत्रपती शिवाजी महाराजांवर झालेला बंडखोरपणा, कपटीपणा, क्रूरपणाचा आरोप त्यांनी आपल्या युक्तिवादाने खोडून काढला आहे.

एका टिपेमध्ये त्यांनी सर जदुनाथ सरकारांनी लिहिलेल्या शिवचरित्राची कठोर समीक्षा केली आहे. जदुनाथ सरकार यांनी इंग्रजी भाषेत शिवचरित्र लिहिले होते. ते मूळचे मुघल कालखंडाचे इतिहासकार असल्यामुळे आणि त्यांना फारसी भाषा अवगत असल्यामुळे त्यांनी शिवचरित्र लिहिण्यासाठी फारसी साधनांचा मोठ्या प्रमाणात वापर केला होता. सरकारांनी वापरलेली बहुतांश साधने ही पुर्वग्रहदुषित असल्याकारणाने त्यातील अनुवादित मजकूर हा शिवाजी महाराजांच्या संदर्भात 'अनुदारतेचे व असत्यमय उल्लेख' करणारा होता. या शिवाय सरकारांनी महाराजांना संबोधण्यासाठी 'शिवा' असा तिरस्कार सूचक एकेरी शब्द वापरला होता. सरकारांच्या ह्या मांडणीचा योग्य समाचार घेऊन केळूसकर हे मत मांडतात की, ''हे एकेरी नाव वाचून खऱ्या देशभक्तांच्या व विशेषतः महाराजांविषयी यथार्थ अभिमान वाटणाऱ्या महाराष्ट्रीयांच्या मनाला वाईट वाटण्यासारखे आहे.''[१३]

सरकारांनी हा एकेरी शब्द वापरल्यामुळे अनेक मराठी लोकांमध्ये प्रक्षोभ निर्माण झाला होता. मराठ्यांचे ख्यातनाम इतिहासकार आणि सरकारांचे परममित्र गो.स. सरदेसाई यांनी देखील याबाबत सरकारांना एक पत्र लिहून जदुनाथ सरकारांना एक वैयक्तिक सूचना केली होती की, त्यांनी लिहिलेल्या शिवचरित्राच्या पुढच्या आवृत्तीत 'शिवा' ह्या शब्दाच्या जागी 'शिवाजी' असा उल्लेख करावा.[१४]

विशेष नमूद करण्याची गोष्ट अशी की, केळूसकरांनी शिवाजी महाराजांवरील द्रव्यलोभाने लूट केल्याच्या आरोपाचे सविस्तर खंडन केले. त्याकाळात काही लोकांमध्ये हा गैरसमज पसरला होता की महाराजांनी द्रव्य मिळवण्यासाठी शत्रू प्रदेशात हल्ले केल्यामुळे अस्वस्थता निर्माण झाली होती. केळूसकरांनी युक्तिवाद केला की शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी व त्याचे संरक्षण करण्यासाठी संपत्तीची गरज होती यात कोणतीही शंका नाही. मात्र, महाराजांनी ही संपत्ती मिळवण्यासाठी 'निर्बंधरहित' लूट केली नाही. शत्रू प्रदेशात हल्ले करतांना मराठा सैनिकांना काही नियम पाळावे लागत असत. मराठी सैनिकांवर महाराजांनी ठरविलेले अंकुश असल्यामुळे शत्रू प्रदेशात देखील ''गरीब रयतेस व शेतकऱ्यास त्याच्या लोकांकडून मुळीच उपद्रव

होत नसे.''[१५] शत्रू प्रदेशावर होणारे हल्ले हे त्यांची शक्ती क्षीण व्हावी म्हणून केले जात असत. सतत होणाऱ्या त्रासापासून मुक्त होण्यासाठी अदिलशहा व कुतुबशाह वार्षिक खंडणी देण्यासाठी तयार झाले. नंतर त्यांनी मराठ्यांचे चौथाई व सरदेशमुखी कर गोळा करण्याचे हक्क देखील कबूल केले. केळूसकरांनी समकालीन राजकीय परिस्थितीचे वास्तव वाचकांच्या पुढे उलगडून महाराजांनी शत्रू प्रदेशात केलेल्या आक्रमणांचे आणि संपत्ती संग्रहाचे समर्थन केले.

महाराष्ट्रामधील काही विचारवंतांमध्ये त्या काळात एक विचार प्रभावी होता की, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात भागवतधर्म पसरल्यामुळे समाजातील उच्च-नीच भावना कमी झाली. यामुळे जातीजमाती एकत्रित आल्या आणि त्यांच्यामध्ये एकी निर्माण झाली. पुढे रामदासस्वामी यांनी भागवत धर्माचे रुपांतर महाराष्ट्र धर्मामध्ये केले. परिणामी, शिवाजी महाराज आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मराठ्यांचे स्वराज्य स्थापन करणे शक्य झाले. केळूसकरांनी ह्या विचाराला विरोध केला. त्यांनी हे मांडले की, भागवत धर्माने सामाजिक उच्चनीच फुटीरतेमध्ये शिथीलता आणल्यामुळे शिवाजी महाराजांना मराठी लोकांनी पाठिंबा दिला, हा विचार चुकीचा होता. केळूसकरांनी युक्तिवाद करून हा निष्कर्ष काढला की, शिवाजी महाराजांनी ''जो एवढा लोकसंग्रह केला व त्यांच्याकडून जे हे अपूर्व देशकार्य करविले त्याच्या मुळाशी ... केवळ महाराजांच्या अंगच्या अलौकिक करामतींचे ते फळ होय.'' केळूसकर असे म्हणतात की, ''शिवाजी महाराजांच्या यशाची कारणमीमांसा अशा प्रकारे करणे म्हणजे आमच्या चरित्रनायकाच्या वास्तविक योग्यतेस लघुत्व आणणे होय.''[१६]

केळूसकरांनी शिवचरित्राच्या आवृत्तीच्या शेवटच्या प्रकरणातील शेवटच्या तीन पोट- भागांची शीर्षके - 'प्रकृत चरित्रापासून बोध', 'लोकाग्रणींनी घेण्यासारखा बोध', 'संसारी जनांनीं घेण्याजोगा बोध' अशी दिली आहेत. ह्या शेवटच्या पानांमध्ये केळूसकरांनी संस्थानिकांनी, लोकाग्रणींनी व सामान्य संसारी लोकांनी शिवचरित्रापासून काय बोध घ्यावा याबद्दल आपले विचार मांडले आहेत.

ब्रिटीश अमलातील संस्थानी राज्यकर्त्यांना त्यांनी हा सल्ला दिला की, तलवार घेऊन युद्ध करण्याचे दिवस गेले असले तरी शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे स्वराज्यासाठी परिश्रम घेतले त्याच प्रकारचे परिश्रम त्यांनी आपल्या जनतेची परिस्थिती सुधारण्यासाठी घेतले पाहिजे. समाजातील मागासलेल्या घटकांची स्थिती सुधारण्यासाठी विशेष

उपाय केले पाहिजे. राजाने काहीही केले तरी चालते असा गैरसमज करून घेऊ नये. जीवनामध्ये आचरण करताना त्यांनी शिवाजी महाराजांचे आचरण किती निर्दोष होते, हे सतत ध्यानात ठेवावे.

केळूसकरांसाठी समाजातील लोकाग्रणी व्यक्तींचा वर्ग महत्त्वाचा होता. समाजाच्या कल्याणासाठी, त्याच्या उत्कर्षासाठी वेगवेगळ्या संस्था चालवणारा हा वर्ग होता. अशा लोकांनी शिवाजी महाराजांनी उत्तम प्रकारे साधलेल्या लोकवशीकरणाच्या कलेचा अवलंब केला पाहिजे. शिवाजी महाराजांनी केवळ राज्यतृष्णावश होऊन फक्त स्वतःचे वैभव वाढवण्यासाठी जर खटपट केली असती तर त्यांना ह्या प्रचंड मराठी जनसमूहाने पाठिंबा दिला नसता. मात्र, शिवाजी महाराजांचा हेतू हा परकीय अन्यायकारी शत्रूची सत्ता नष्ट करून स्वराज्य स्थापन करण्याचा असल्यामुळे हा हेतू सिद्धीस नेण्यासाठी लोक त्यांच्या मागे उभे राहिले. केळूसकर ही कळकळ व्यक्त करतात की, भारतामध्ये अनेक धर्म, अनेक जाती प्रचलित असल्यामुळे समाजाचे अस्तित्व खंडीत झाले आहे. लोकांमध्ये स्वधर्माभिमान व स्वजात्याभिमान पसरल्यामुळे लोकांच्या हृदयात एकमेकांचा मत्सर व हेवा निर्माण झाला आहे; ते एकमेकाला हीन व तुच्छ समजत आहेत. अशा स्थितीत समाजातील लोकाग्रणी मंडळीनी जर स्वतःच्या जातीच्या अथवा धर्माच्या लोकांना एक करून त्यांचे हित साधण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना इतर लोकांचे सहाय्य मिळणार नाही. परिणामी, संघशक्ती लागणारी कार्ये यशस्वी होणार नाहीत.

कृष्णराव केळूसकरांच्या मते, येथे समाज नेत्यांनी शिवाजी महाराजांकडून प्रेरणा घेतली पाहिजे. शिवाजी महाराजांनी अमुक एका जातीवर अथवा लोकसमूहावर विशेष कृपादृष्टी केली, असे कधीही झाले नाही; त्यांनी सर्वांना समान वागणूक दिली, कोणताही भेदभाव केला नाही. पुढे पेशवाई मध्ये शिवाजी महाराजांचे हे धोरण पाळले गेले नसल्यामुळे जात्याभिमान पुन्हा एकदा उफाळून आला. ह्याचाच परिणाम मराठी माणसाला पुढील अनेक शतके भोगावा लागत आहे. जर महाराष्ट्रात एकी नांदायची असेल तर सामाजिक नेत्यांनी हे ध्यानात घेणे जरुरी होते की, ''जात्याभिमानमूलक पक्षपात व मत्सरभाव यांचा सांप्रतच्या दैन्यावस्थेत समूळ उच्छेद होणे अत्यंत इष्ट होय.''[१७]

शिवचरित्र वाचून सामान्य लोकांनी हे लक्षात घ्यायचे आहे की, उद्योगशीलता, निर्व्यसनीपण , दृढ निश्चय, सदाचार, साहस, बुद्धिमत्ता, कुशलता इत्यादी गुण जे शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये विकसित झाले होते, ते गुण जोपासले तर प्रपंच्यात नेहमी सुख व यश लाभते. केळूसकर म्हणतात, शिवचरित्रापासून लोकांनी हे शिकले पाहिजे की, सार्वजनिक हितसंबंधात खासगी द्वेष व मत्सर बाळगू नये व जातिभेद व उच्चनीचता नाकारून सामाजिक ऐक्य आणि परस्परप्रेम जोपासावे. केळूसकरांच्या मते, कोणत्याही धर्माचा अथवा जातीचा अभिमान बाळगून समाजात दुफळी किंवा कलह निर्माण करण्याचे दिवस राहिले नाहीत. त्यामुळे असे करणाऱ्यांचा सामान्य लोकांनी निषेध व अधिक्षेप केला पाहिजे. त्याला आपल्या जातीचा आहे किंवा धर्माचा आहे असे म्हणून पाठीशी घालता कामा नये. शेवटी त्यांनी सामान्य शिवचरित्र वाचकावर एक महत्त्वाची जबाबदारी टाकली की, ''स्वधर्माचा किंवा स्वजातीचा अपप्रयोजक किंवा दुर्हेतुक अभिमान चित्तात बाळगून जे लोकाग्रणी समाजात वैरभाव व दुफळी माजविण्यास प्रवृत्त होत असतील त्यांचे अग्रणीत्व बिलकुल मान्य करायचे नाही व त्यास कोणत्याही प्रकारचे उत्तेजन द्यावयाचे नाही.''[१८]

कृष्णराव केळूसकर यांनी समग्र शिवचरित्राच्या शेवटी शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्यामधून मिळणाऱ्या प्रेरणांचा उपयोग समता, न्याय व बंधुता ह्या आधुनिक मूल्यांवर आधारलेल्या नवसमाज निर्मितीसाठी कसा मार्गदर्शक ठरू शकतो, हे दाखवून दिले आहे. हाच केळूसकरांच्या शिवचरित्राचा मतितार्थ आहे.

## वाचकांना सूचना

कृष्णराव केळूसकर लिखित शिवचरित्राची संक्षिप्त आवृत्ती इ.स. १९२७ मध्ये प्रकाशित झाली. ज्या काळात केळूसकर लिहित होते त्या काळात शिवचरित्र लेखकांवर असलेल्या ऐतिहासिक साधने व दृष्टिकोनाच्या बाबतीतील मर्यादांची वर चर्चा झालीच आहे. केळूसकरांवर देखील ह्या मर्यादा होत्या हे वाचकांनी लक्षात ठेवले पाहिजे. त्याकाळात शिवचरित्राचे सुसंगत कथन व्हावे म्हणून इतिहासकारांना मराठी बखरींवर व उत्तरकालीन साधनांवर अवलंबून राहावे लागत असे. अस्सल मूळ कागदपत्रे फारच अल्प प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे शिवचरित्र कथानकामध्ये अनेक फटी राहत असत. साहजिकच चरित्रकार ह्या फटी बखरीतील मजकूर वापरून भरून काढत असत. २०व्या शतकाच्या प्रारंभी लिहिणारे बहुतेक शिवचरित्रकार ह्या अडचणीत अडकलेले आपल्याला दिसतात. केळूसकरदेखील याला अपवाद नव्हते.

वर सांगितल्याप्रमाणे मराठी बखरींमध्ये अतिशयोक्ती, चमत्कारिक घटना, मिथके व आख्यायिका यांचा सुळसुळाट होता. बहुतेक बखरी उत्तरकालीन ऐतिहासिक साधने असल्यामुळे त्यामध्ये दिलेली माहिती ताक फुंकून प्यावे तशी वापरली तरच इतिहासकाराचा हेतू साध्य होऊ शकतो. केळूसकरांनी जरी बखरीतील माहिती जपून वापरली असली तरी त्यांनी लिहिलेले शिवचरित्र हे ऐतिहासिक साधन म्हणून बखरींचा जो दोष होता त्यापासून मुक्त राहू शकले नाही. काही बखरी ह्या विशिष्ट भूमिकेतून लिहिलेल्या आहेत. उदाहरणार्थ बखरींमध्ये शिवाजी महाराजांना साक्षात अवतार मानण्यात आले होते. त्यांच्यावर भवानी देवीची कृपा दृष्टी होती, भवानी देवी शिवाजी महाराजांच्या अंगात संचारत असे व त्यांच्या मुखातून स्वतः बोलत असे; सभासद आणि चिटणीस बखरींमध्ये तर अशी अतिशयोक्ती केली आहे की, महाराजांच्या मुखातून देवीने बोललेले आदेश काही कारकून लिहून घेत असत. दुसरे असे की चिटणीस बखर सारख्या साधनांमध्ये शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचा उपक्रम हा हिंदु धर्माच्या संरक्षणासाठी व महाराष्ट्रामधील मुस्लीम सत्ता नष्ट करण्याच्या हेतूने हाती घेतलेला होता.[१९] ह्या पूर्वग्रहदुषित ऐतिहासिक साधनांच्या वापरामुळे इतिहासकारा-कडून समकालीन राजकारण धर्माच्या चष्म्यातून पाहण्याचा धोका निर्माण होतो.

कृष्णराव केळूसकरदेखील बखरींमधील ह्या चकव्याला बळी पडले आहेत. प्रस्तुत संक्षिप्त शिवचरित्रात काही ठिकाणी महाराजांच्या अंगात भवानी देवी संचारण्याच्या घटनांचा उल्लेख आला आहे (पृ. ८२,९३, १४८). याशिवाय केळूसकरांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सूनेची दंतकथा रंजकतेने सांगितली आहे (पृ.४०). शिवपुत्र संभाजी महाराजांबद्दल बखरींमध्ये प्रचलित असलेल्या आख्यायिकांवर विश्वास ठेवून अवमानकारक मजकूर लिहिला आहे (पृ. १५७- १५८). दुसरे असे की, बखरींमधील एक काल्पनिक घटना केळूसकरांनी सत्य म्हणून स्वीकारण्याची चूक केली आहे. त्यांनी महाराज विजापूरला गेले असतांना त्यांचा गोवध करणाऱ्या कसायावर कसा रोष निर्माण झाला, याबद्दलचा काल्पनिक वृत्तांत सत्य घटना म्हणून स्वीकारून संक्षिप्त शिवचरित्रात दिला आहे.[२०]

वाचकांनी आणखीन एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, केळूसकरांचे संक्षिप्त शिवचरित्र प्रसिद्ध होऊन ९० वर्षे झाली आहेत. त्याकाळात शिवचरित्र लिहिण्यासाठी खूप कमी ऐतिहासिक साधने उपलब्ध होती. उदाहरणार्थ कविंद्र परमानंद लिखित

शिवभारत हा ग्रंथ केळूसकरांना मिळालेला नव्हता. याशिवाय त्यांना शिवकाळातील वेगवेगळ्या सरदार घराण्यांची कागदपत्रे किंवा पोर्तुगीज, फ्रेंच, आणि इंग्रजी लोकांनी लिहिलेल्या कागदपत्रांची भाषांतरे उपलब्ध नव्हती. या सर्व गोष्टींमुळे त्यांच्या शिवचरित्रामध्ये काही घटनांचा कालक्रम चुकला असण्याची शक्यता निर्माण होते.

कृष्णराव केळूसकरकृत संक्षिप्त शिवचरित्र अत्यंत सोप्या व ओघवत्या भाषेत लिहिलेले असल्यामुळे अत्यंत प्रभावी झाले आहे. पृष्ठ संख्याही कमी असल्यामुळे व महाराजांच्या जीवन व कार्याचे कथन अतिशय सुसंगत असल्यामुळे हे संक्षिप्त शिवचरित्र एखाद्या रोमांचक छोट्या कादंबरी प्रमाणे जलद गतीने वाचून होण्यासारखे आहे. विद्यार्थ्यांचे शिवचरित्र वाचून प्रबोधन व्हावे म्हणून तयार केलेल्या ह्या आवृत्तीत कोणत्याही प्रकारच्या तळ टिपा किंवा संदर्भ टिपा अथवा परिशिष्ट नाही. याचा अर्थ असा होतो की वाचकाला केळूसकरांनी शिवचरित्रातील कोणती घटना कोणत्या ऐतिहासिक साधनांच्या आधारे मांडली आहे, हे कळणार नाही.

उपरोक्त चर्चेमुळे स्पष्ट होते की, जर वाचकाला असे वाटत असेल की प्रस्तुत शिवचरित्र वाचून आपल्याला योग्य बोध व्हावा तर त्यांनी हा ग्रंथ काळजीपूर्वक व जबाबदारीने वाचणे औचित्याचे ठरेल.

## संदर्भ टीपा

१. २०व्या शतकाच्या प्रारंभी शिवाजी महाराजांवर लिहिलेल्या ग्रंथांची इतर काही उदाहरणे खालील प्रमाणे आहेत: अंताजी रामचंद्र हर्डीकर, श्री शिवविजय अथवा छत्रपती शिवाजीमहाराज यांचे ओंवीबध्द चरित्र, १९०९; सीताराम नरहरी ढवळे, बाल शिवाजी, रत्नागिरी, १८८४ (नाटक); गोविंद नारायण दातार, छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र, १९०६.

२. सर जदुनाथ सरकार, शिवाजी अँण्ड हिज टाईम्स (१९१९); ह्युग रॉलिन्सन, शिवाजी, द मराठा: हिज लाइफ अँण्ड टाईम्स (१९२६); चि.वि. वैद्य, शिवाजी, द फाउंडर ऑफ मराठा स्वराज्य, (१९३१) आणि डॉ. बाळकृष्ण, शिवाजी, द ग्रेट (१९३१).

३. दीपेश चक्रवर्ती , कॉलिंग ऑफ हिस्टरी : सर जदुनाथ सरकार अँण्ड हिज एम्पायर ऑफ ट्रूथ , द युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो प्रेस, शिकागो, २०१५, पृ. १०४.

४. बाळ कृष्ण, शिवाजी द ग्रेट, खंड- १, डी. बी.तारापोरवाला सन्स अँण्ड कंपनी, मुंबई, १९३१, पृ. १-३४.

५. अ. रा. कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन , पुणे, पृ. १८९ ते १९०.

६. अनिरूद्ध रे, ट्रेड, पॉलिटीक्स अँण्ड प्लन्डर: द मराठास् अॅट क्यॉम्बे १७२५-१८२५, मुन्शींराम मनोहरलाल पब्लिशर्स, नवी दिल्ली, २००६.

७. पीटर नोविक, द्यॅट नोबल ड्रीम: द ऑब्जेक्टिविटी क्वेक्श्चन अँण्ड द अमेरिकन हिस्टोरिकल  प्रोफेशन, केंब्रिज  यूनिवर्सिटी प्रेस, १९८८.

८. इ. एच. कार , व्हॉट इज हिस्टरी?, मॅकमिलन, १९६१, पृ. २६.

९. अरुण टिकेकर,  द क्लॉइस्टर्स पेल : अ  बायोग्राफी ऑफ युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई , पॉप्युलर प्रकाशन , २००६, पृ. ११.

१०. धनंजय कीर, गुरूवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर: आत्मचरित्र व चरित्र, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९७७, पृ. १५९-१६० ; धनंजय कीर, डॉ. आंबेडकर: लाइफ अँण्ड मिशन , पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९०, पृ. १९-२०.

११. धनंजय कीर, गुरूवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर: आत्मचरित्र व चरित्र, पृ. १००- १०३.

१२. जयसिंगराव पवार (प्रमुख संपादक), छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, २०११,

१३. कृ. आ. केळूसकर, क्षत्रियकुलावतंस छत्रपति शिवाजी महाराज यांचे चरित्र, द्वितीय आवृत्ती, १९२०, पृ.५५९.

१४. हरी राम गुप्ता (संपादक), लाईफ  अँण्ड लेटर्स ऑफ सर जदुनाथ सरकार, पंजाब युनिव्हर्सिटी, होशियारपुर, १९५७, पृ. २७७.

१५. कृ. आ. केळूसकर, क्षत्रियकुलावतंस छत्रपति शिवाजी महाराज यांचे चरित्र, द्वितीय आवृत्ती पृ. ५६८.

१६. उपरोक्त,  पृ. ५७८ - ५७९.

१७. उपरोक्त, पृ.६१०.

१८. उपरोक्त, पृ. ६१२.

१९. प्राची देशपांडे, क्रिएटिव पास्ट्स : हिस्टोरिकल मेमरी अँण्ड आइडेंन्टिटी इन वेस्टर्न महाराष्ट्र १७०० –१९६०, पर्मनंट ब्ल्याक, २००७, पृ. २९–३२.

२०. वा. सी. बेंद्रे, छत्रपती शिवाजी महाराज : पूर्वार्ध , पार्श्व पब्लिकेशन्स, कोल्हापूर, १९७२, पृ. ४९.

**– अवनीश पाटील**

कोल्हापूर

मराठा–ऐक्येच्छु सभेच्या विद्यमानें त्रिशतसांवत्सरिक श्रीशिवजयंत्योत्सवाप्रित्यर्थ

## क्षत्रियकुलावतंस

# श्रीछत्रपति शिवाजीमहाराज

## यांचें संक्षिप्त चरित्र.



लेखक

श्रीयुत कृष्णराव अर्जुन केळूसकर.

-----

प्रकाशक–दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

-----

सन १९२७ इसवी.

-----

किंमत आठ आणे.

हे पुस्तक रा. रा. दामोदर सावळाराम यंदे यांनी नं. ३८८, गिरगाव रोड, मुंबई येथे आपल्या 'इंदुप्रकाश' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केले.

---

ह्या पुस्तकासंबंधाचे सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

क्षत्रियकुलावतंस

**श्रीछत्रपति राजाराममहाराज**

जी. सी. आय. ई., लेफ्टेनन्ट कर्नल,

**करवीरसंस्थानाधिपति**

यांच्या चरणारविंदीं त्यांच्या महाप्रतापी पूर्वजाचें

**हें जीवनवृत्त**

लेखकाने अत्यंत आदरबुद्धीने व परमनम्रतापूर्वक

अर्पण केलें आहे.

# प्रस्तावना

त्रिशतसांवत्सरिक श्रीशिवजयंत्युत्सव चालू वर्षाच्या वैशाख महिन्यातील पहिल्या सप्तकांत सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा होणार आहे. अशा अपूर्व पर्वणीस विद्यार्थिजनांना आमच्या शिवरायाच्या उज्ज्वल चरित्राची माहिती व्हावी म्हणून हें संक्षिप्त चरित्र मराठा–ऐक्येच्छु सभेनें सुप्रसिद्ध ग्रंथकार रा. रा. कृष्णराव अर्जुन केळूसकर यांच्याकडून तयार करविलें आहे. त्यांनीं लिहिलेल्या ६१४ पृष्टांच्या विस्तृत चरित्राचा हा १५८ पृष्ठांचा संक्षेप आहे. तरी पण शिवरायाच्या चरित्रातील सगळ्या कथांप्रसंगाचा यांत समावेश झाला आहे. यामुळें हें पुस्तक शिवरायाचे संकलित चरित्र कळण्यास चांगलें उपयोगी पडण्यासारखे आहे.

महाराष्ट्रांत शिवजयंत्युत्सव प्रथमतः आमच्या मराठा ऐक्येच्छु सभेनें चाळीस वर्षापूर्वी सुरू केला असून ही सभा हा उत्सव प्रतिवर्षी नेमानें करीत आली आहे. यंदांच्या त्रिशतसांवत्सरिक शिवजयंत्युत्सवाच्या अपूर्व पर्वणीस ह्या सभेकडून काहीतरी योग्य स्मारक व्हावें हें इष्ट वाटल्यावरून हा चरित्रलेख तिच्या विद्यमाने प्रसिद्ध करण्यांत येत आहे; आणि ह्या सभेचे उत्साही व प्रमुख सभासद रा. रा. दामोदर सावळाराम यंदे यांनी ह्या चरित्रलेखाच्या पाच हजार प्रती आपल्या इंदुप्रकाश छापखान्यात छापून प्रसिद्ध करण्याचें धाडस आपल्या नेहमीच्या उपयुक्त ग्रंथ तयार करून प्रसिद्ध करण्याच्या सत्संकल्पास अनुसरून केलें आहे. हा त्यांचा मराठा ऐक्येच्छु सभेवर मोठा अनुग्रह झाला आहे; आणि जें सद्‌गृहस्थ, सार्वजनिक संस्था व संस्थानिक आमच्या तरुण पिढीला शिवरायाच्या चरित्राची ओळख करून देण्याचें ह्या अपूर्व पर्वणीच्या सुसमयीं मनावर घेतील त्यांना हा चरित्रलेख चांगला सोईचा होईल अशी आम्हास उमेद आहे.

शिवरायाचा हा चरित्रलेख त्यांच्या गादीवर सांप्रत विराजमान असणारे त्यांचे महामनस्क वंशज **क्षत्रियकुलावतंस श्रीछत्रपति राजारामहाराज, जी सी. आय. ई.,** लेफ्टेनन्ट कर्नल, यांनीं आपणांस अर्पण करण्याची परवानगी कृपावंत होऊन दिल्याबद्दल सभा त्यांची अत्यंत ऋणी आहे.

प्रसिद्ध मूर्तिकार रा. रा. विनायकराव पांडुरंग करमरकर यांनी शिवाजीमहाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या चहुतऱ्यासाठी तयार केलेल्या तीन चित्रफलकांचे फोटो ह्या पुस्तकात छापण्यासाठी देण्याची कृपा केली, त्याबद्दल त्यांचे उपकार मानणें उचित आहे.

हें पुस्तक फार घाईनें छापून प्रसिद्ध करावे लागल्यामुळें बऱ्याच चुका राहून गेल्या आहेत; त्यांतील काहीचें शुद्धिपत्रक शेवटीं जोडले आहे. त्याप्रमाणें दुरुस्ती करून पुस्तक वाचावें अशी विनंती आहे.

केशवालय, दादर, मुंबई,
ता. २८, एप्रिल, सन १९२७.

**सीताराम केशव बोले,**
अध्यक्ष, मराठा ऐक्येच्छु सभा.

## अनुक्रमणिका


| | पा. क्र. |
|---|---|
| अध्यक्षांचे मनोगत | तीन |
| संपादकीय | अकरा |
| प्रस्तावना | तेहतीस |
| भाग पहिला- पूर्वजवृत्त | १ |
| भाग दुसरा - मालोजीराजे यांचें वृत्त | ४ |
| भाग तिसरा - शहाजीराजे यांचें वृत्त | ८ |
| भाग चवथा-शिवाजीमहाराजांचें बाळपण | १९ |
| भाग पाचवा-शिवाजीमहाराजांचें शिक्षण | २३ |
| भाग सहावा-स्वराज्यस्थापनेची सिद्धता | २६ |
| भाग सातवा-स्वराज्यस्थापनेला आरंभ | ३० |
| भाग आठवा-पितृसंकटनिवारण | ३७ |
| भाग नववा-मोगलांशी संबंध | ४२ |
| भाग दहावा-विजापूरकरांचा आणखी मुलूख काबीज करितात | ४६ |
| भाग अकरावा - अफझुलखानाचा वध | ५१ |
| भाग बारावा - विजापूरकरांस हतवीर्य केलें | ५९ |
| भाग तेरावा - आरमार व समुद्रांतील किल्ले | ६८ |
| भाग चौदावा-मोगलांशी युद्ध व शास्ताखानाची मोहीम | ७१ |
| भाग पंधरावा-सुरत, बारसीलोर वगैरे शहरांची लूट | ७७ |
| भाग सोळावा-जयसिंगाची स्वारी | ८२ |
| भाग सतरावा - आग्र्यास प्रयाण | ९१ |

## **अनुक्रमणिका**-समाप्त


| | पा. नं. |
| --- | --- |
| भाग अठरावा-गेलेले किल्ले व प्रांत परत घेतले | १०० |
| भाग एकोणिसावा-मोगलांच्या मुलखांत पुनः स्वाऱ्या | १०४ |
| भाग विसावा-विजापूरकरांशी पुनरपि युद्धप्रसंग | १११ |
| भाग एकविसावा- राज्याभिषेक | ११५ |
| भाग बाविसावा-राज्यव्यवस्था | ११९ |
| भाग तेविसावा- मोगल व विजापूरकर यांजशीं पुनः कलह | १२९ |
| भाग चोविसावा - कर्नाटकांतील मोहीम | १३४ |
| भाग पंचविसावा- मोगलांशीं शेवटलें युद्धप्रसंग | १४३ |
| भाग सव्विसावा - सज्जनसेवा | १४८ |
| भाग सत्ताविसावा- अंतकाळ | १५३ |


------

भाग पहिला

# पूर्वजवृत्त

श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांचें जन्म भोसले नांवाच्या एका नामांकित क्षत्रिय कुलांत झालें. ह्या कुळाची थोडीशी माहिती प्रथम सांगतो. अयोध्या प्रांतांत शिसोदे नांवाचे सूर्यवंशांतले राजे राज्य करीत होते, त्यांच्या वंशांतल्या एका पुरुषानें नर्मदानदीच्या दक्षिण तीरी येऊन तेथें स्वतंत्र राज्य संपादन केलें. पुढें शालिवाहन शककर्ता राजा झाला, त्यानें त्याच्या वंशजाचा पराजय करून त्याचें राज्य हिरावून घेतलें. तेव्हां त्यानें मेवाडप्रांतांतील चित्रकूट नामक किल्ल्याच्या आश्रयानें नवें राज्य स्थापिलें. हा चित्रकूट किल्ला इतिहासांत चितोड ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. पुढें दिल्लीस मुसलमानांचें राज्य स्थापन होऊन त्यांची रजपूत राजांशी वारंवार युद्धे होऊं लागली; आणि बरेच रजपूत राजे हतवीर्य होऊन त्यांचे अंकित झाले. इतरांप्रमाणें चितोडच्या राजांचे मुसलमानांशी बरेच घोर संग्राम झाले; तरी ते पुष्कळ वर्षे त्यांस हार गेले नाहींत.

ह्या चितोडच्या गादीवर लक्ष्मणसिंह नांवाचा राजा राज्य करीत असता स. १२७५ च्या सुमारास दिल्लीचा मुसलमान बादशहा अल्लाउद्दीन खिलजी याला असे कळले कीं चितोडच्या राजाच्या चुलत्याची पद्मिणी नांवाची एक अतिशय सुंदर स्त्री आहे. ती मिळवावी म्हणून त्यानें चितोडास मोठ्या सैन्यानिशीं वेढा दिला. राजानें किल्ला बरेच दिवस लढविला; पण शत्रूपुढे आपला टिकाव लागत नाही असें पाहून तो आपल्या लोकांनिशीं त्याच्यावर तुटून पडला. ह्या रणकंदनांत चौदाशें रजपूत प्राणांस मुकले, आणि किल्ला शत्रूच्या हाती लागला.

आपला वंश निर्मूळ होऊं नये म्हणून लक्ष्मणसिंहानें आपला द्वितीय पुत्र अजयसिंह याला ह्या समरयज्ञापासून निवृत्त करून पळून जावयास सांगितलें. पित्याच्या ह्या आज्ञेप्रमाणे तो आपल्या वडील बंधूचा अल्पवयी पुत्र हम्मीरसिंह यास बरोबर घेऊन पळून गेला. अजयसिंहानें आपल्या लोकांची पुन: जमवाजमव करून शत्रूने हस्तगत

केलेला बराच मुलूख काबीज करून हम्मीरसिंहास गादीवर बसविलें. पण ही गादी चितोड किल्ल्यावर न ठेविता राजनगर नांवाचा एक नवीन किल्ला बांधून त्यांत ती नेली. चितोडास परत न जाण्याचें कारण असें कीं त्या किल्ल्यातील सर्व राजचिन्हे, एक भव्य नौबत व किल्ल्याचे पंचरसी दरवाजे मुसलमानांनी काढून नेले होते; ही सगळी त्यांच्याकडून परत मिळवीपर्यंत त्या किल्ल्याची पायरी चढावयाची नाही अशी त्यांनीं प्रतिज्ञा केली होती. त्याप्रमाणेंच ज्या शत्रूंच्या पायी त्यांच्या घराण्याचा असा भयंकर संहार झाला व वडिलांच्या गादीचा असा धुव्वा उडाला, त्यांचा पुरा पराभव करून सूड उगवीपर्यंत आपली निशाणे मागून चालवावी, ताटांत भोजन करूं नये, पलंगावर निजू नये, श्मश्रु करूं नये असा त्यांनीं नियम केला! हा यवनद्वेष शिसोदे राजवंशाने पुढें असाच चालविला. ह्या वंशाने पुढें प्रबळ होऊन उदेपूर येथें गादी स्थापिली.

वर सांगितलेला अजयसिंह आपला पुतण्या हम्मीरसिंह यास गादीवर बसविल्यावर कांहीं वर्षांनी मरण पावला. तेव्हां त्याचा पुत्र सजनसिंह याने असें मनांत आणिलें कीं राज्यविभागासाठीं आपल्या चुलतभावाशीं कलह करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तर आपल्या पराक्रमाने नवे राज्य संपादन करावे यांतच खरा पुरुषार्थ आहे. असा पोक्त विचार करून ह्या शूर पुरुषाने दक्षिणेकडे येऊन सोंधवाड प्रांत काबीज केला आणि तेथें आपली गादी स्थापिली. याच्या वंशातला देवराजजी नांवाचा महाराणा मुसलमानांच्या सतत होणाऱ्या उपसर्गाला त्रासला आणि राज्यत्याग करून दक्षिणेकडे कृष्णा व भीमा ह्या नद्यांच्या तीरी पाळेगारी करून कसाबसा योगक्षेम चालवू लागला. इकडे आल्यावर त्यानें आपलें नाव पालटले, आणि तो आपणास भोसावंत भोसले म्हणवू लागला. येथें त्याला सिंगणापूरची पाटीलकी मिळाली, तीवर गुजारा करून तो स्वस्थ राहिला. पुढे त्याच्या वंशजांनी खानवट, हिंगणी, बेरडी, देऊळगाव, जिंती, वेरूळ, बनसेंद्र, कळसवावी, मुंगीपैठण, नानजव इत्यादि गांवांच्या पाटीलक्या मिळविल्या. आमच्या चरित्रनायकाचा पणजा बाबाजी हा वर सांगितलेल्या सजनसिंहाचा म्हणजे भोसावंत भोसले याचा वंशज होय. ह्या बाबाजींचे जन्म १५३३ सालीं झालें. हा मोठा सदाचारी व धर्मशील होता. ह्याला मालोजी व विठोजी असे दोन पुत्र होते. हे अनुक्रमे १५५० व १५५३ सालीं जन्मले. हे मोठे सद्गुणी, शूर व हुशार निपजले. हे वयांत येऊन संसार पाहू लागले असता देऊळगाव जो त्यांच्या वतनाचा गांव तेथल्या शेतकऱ्यांचे व यांचे

जमिनीसंबंधानें तंटे उपस्थित होऊन यांचें त्यांच्याशी पटेना. यास्तव ते तो गांव सोडून दौलताबादेजवळ वेरूळ गांवाचें वतन मिळवून तेथें राहू लागले. पण हें उत्पन्न खाऊन स्वस्थ राहण्यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं; तर आपल्या अंगची धमक व हुशारी यांचे योग्य चीज होईल असा कांहींतरी व्यवसाय पाहावा असें त्यांनी मनांत आणले, आणि सिंधखेडचा देशमुख लुखजी जाधव हा त्या वेळीं अहमदनगरच्या निजामशाहीत बारा हजार स्वारांचा मनसबदार होता, त्याच्या पदरी त्यांना १५७७ सालीं बारगिरची नोकरी धरिली.

***

भाग दुसरा

# मालोजीराजे यांचें वृत्त

मालोजी शरीराने मोठा मजबूत व धिप्पाड होता, तो इतका कीं, त्याच्या स्वारीला घोडे टिकत नसे; म्हणून जाधवाने त्याची आपल्या देवडीवर नेमणूक केली. तो मोठा चतुर, हुशार व गुणी असल्यामुळें जाधवाचा त्याच्यावर लौकरच लोभ जडला, आणि त्याचें ऊर्जित करावे म्हणून त्यानें त्याला मूर्तिजा निजांमशहापाशी नेऊन हा मोठा नेकीचा व उमदा पुरुष आहे अशी त्याची शिफारस केली. निजामशहा त्याला पाहून फार खुष झाला, आणि त्याला त्यानें आपल्या लष्करांत शिलेदारी दिली. विठोजीसहि त्याने शिलेदारी दिली. तेव्हांपासून ते घरची घोडीं व बारगीर ठेवून निजामशहाची नोकरी करूं लागले; तरी ते अजून जाधवरावाचेच अंकित होते.

मालोजीचें लग्न फलटणचा देशमुख जगपाळराव निंबाळकर याची बहीण दिपाबाई हिजशीं झालें. यांना पुष्कळ दिवस संतति होईना. आपल्या पोटीं मूल नाहीं म्हणून दिपाबाईस अतिशयित वाईट वाटूं लागलें. पुत्रप्राप्तीसाठी त्यांनीं पुष्कळ दानधर्म, अनुष्ठाने व नवससायास केले. अखेरीस त्यांनीं नगरास शहाशरीफ म्हणून एक पीर होता त्यास नवस केला. पुढें त्यांस १५९४ सालीं पुत्ररत्न झालें. हा पुत्र आपणांस त्या पिराच्या अनुग्रहाने झाला असें त्यांना वाटून त्यांनीं त्याचें नांव शहाजी असें ठेविले; नंतर लौकरच त्यांना दुसरा पुत्र झाला, त्याचें नांव त्यांनीं शरीफजी असें ठेविले.

शहाजी हा चांगला देखणा असून मोठा चलाख, हुशार व गुणी होता. त्याची वाणी मधुर असून चालचलणूक फारच मोहक असे. जाधवाला तो फार आवडत असे, व तो त्याला कधीकधों आपल्या घरीं नेत असे. तेथें तो त्याची कन्या जिजाऊ हिच्याशी खेळत बागडत असे. शहाजी पांच वर्षाचा असतां मालोजीनें त्याला जाधवाच्या घरी रंगपंचमीच्या समारंभास नेले. त्याला पाहताच जाधवाने त्याला आपल्याजवळ बोलावून मांडीवर बसविले; आणि जिजाऊ त्याला पाहून घरांतून धावत बाहेर आली आणि जाधवाच्या दुसऱ्या मांडीवर बसली. तेव्हां जाधव मोठ्या लडिवाळपणानें

बोलला: ''मुली, हा तुला नवरा पाहिजे?'' आणि सभासदांकडे वळून म्हणाला: ''खरोखर हा जोडा योग्य दिसतो.'' हे शब्द ऐकून तीं मुलें जवळच्या तबकातील रंगगुलाल घेऊन एकमेकांवर उडवूं लागली. तें पाहून सभासदांस मोठें कौतुक वाटलें व ते म्हणाले कीं जोडा योग्य आहे. तेव्हां मालोजी व विठोजी झटदिशी उठून सभासदांस म्हणाले: ''ऐका हो, जाधवराव आजपासून आमचे व्याही झाले व जिजाऊ आमची सून झाली. ते आतां काय बोलले तें तुम्ही सर्वांनी ऐकलेच आहे. आतां हा निश्चय बदलणार नाहीं. थोर लोक सभेत बोलल्यावर मागें सरणार नाहींत?'' हा प्रकार पाहून जाधव चकित झाला. त्यानें त्या वेळीं कांहींएक उत्तर केलें नाहीं.

दुसरे दिवशी मालोजीला जाधवाकडून भोजनाचें आमंत्रण आले तेव्हां त्यानें त्याला असा निरोप पाठविला कीं आम्ही तुम्ही व्याही झालो, आतां तुमच्याबरोबर भोजन लग्नसमारंभाच्या वेळीं होईल. मध्यंतरी आम्हांस बोलावूं नये. जाधवाची स्त्री म्हाळसाबाई हिला ही गोष्ट कळली तेव्हां मालोजीचा असा उद्दामपणा पाहून ती अतिशयित रागावली. आपल्या बरोबरीच्या सरदारांस सोडून यःकश्चित शिलेदाराच्या पोरास आपली मुलगी देऊं करणे तिला मुळींच पसंत पडलें नाहीं; आणि मालोजीनें आपलें विनोदाचें बोलणे खरें समजून असा उद्धटपणा केल्याबद्दल जाधवालाहि मोठा क्रोध आला आणि त्याला त्यानें नोकरीवरून दूर केलें. ह्याप्रमाणें त्या दोघां बंधूंची लष्करी नोकरी सुटून त्यांस वेरूळगांवीं परत जावें लागलें; आणि पुनः त्यांच्या हातीं नांगर आला.

ह्या अपमानामुळे मालोजीस पराकाष्ठेचे वाईट वाटलें. आपली योग्यता मोठी नाही, आपल्यापाशी दौलत नाही म्हणून जाधवरावाने आपला हा असा उपमर्द केला, तर आतां आपली योग्यता कशी वाढवावी याची मालोजीस सारखी तळमळ लागून राहिली. पुढें एके दिवशीं तो आपल्या शेतांतले एक वारूळ खणीत असतां त्यांत त्याला मोठा द्रव्यनिधि सापडला. तो पाहून त्याला अर्थात् परमहर्ष झाला; आणि त्यानें तें द्रव्य श्रीगोंदे येथील शेषावा नाईक पांडे नांवाच्या सावकाराकडे अनामत ठेविले आणि लोकांत असा प्रवाद पसरला कीं श्रीभवानी प्रसन्न होऊन तिने आपणास पुष्कळ द्रव्य दाखविले आहे आणि आमच्या कुळांत शककर्ता निर्माण होईल असा वर दिला आहे.

हा द्रव्यलाभ झाल्यावर मालोजीनें हजार घोडी खरेदी करून बरेच बारगीर व शिलेदार नोकरीस ठेविले. त्यानें क्षेत्रांच्या ठिकाणी पुष्कळ दानधर्म केला, कित्येक देवालयांचे जीर्णोद्धार केले आणि जागोजाग विहिरी व तलाव बांधिले. ह्याप्रमाणे अनेक धर्मकृत्ये करून त्यानें मातबरपणाविषयीं व पुण्यशीलतेविषयी मोठा लौकिक संपादिला. ह्याप्रमाणें आपला इतमाम व योग्यता वाढविल्यावर त्यानें जाधवापाशी मुलीविषयी पुनः मागणी केली; पण तो त्याच्याशी शरीरसंबंध करण्यास राजी होईना. तेव्हा त्याची चांगली खोड मोडण्याकरितां मालोजीनें निंबाळकरांकडून दोन हजार स्वारांची मदत मिळवून त्यांच्या जहागिरीस उपद्रव देण्याचा क्रम सुरू केला. याखेरीज त्यानें आणखी अशी युक्ति योजिली कीं दोन डुकरें मारून त्यांच्या गळ्यांत त्यानें चिठ्या बांधिल्या आणि तीं मुसलमानांच्या मशिदींत टाकिलीं. ह्या चिठ्यांत त्यानें निजामशहास येणेप्रमाणें अर्ज केला; ''जाधवराव आमच्या मुलास मुलगी देण्याचे कबूल करून आतां बायकोच्या सांगण्यावरून वचनास फिरला आहे व आम्हांस त्याने नोकरीवरून दूर केलें आहे; यास्तव निरुपाय होऊन आम्ही निंबाळकरांच्या आश्रयाने हा प्रकार केला आहे. त्याउपर बादशहा आमची दाद घेऊन जाधवरावाशी आमची सोयरीक करून देईल तर बरें, नाहीं तर आम्ही असाच प्रकार दुसऱ्या मशिदीतहि करूं.''

हा भ्रष्टाकार निजामशहास कळला तेव्हां त्यानें जाधवास बोलावून आणून सांगितलें कीं तुम्ही मालोजीशीं केलेला करार मोडता हें बरोबर नाहीं. तुमच्या ह्या वचनभंगामुळे आमच्या मशिदींत भ्रष्टाकार होऊं लागले आहेत. तरी मालोजीच्या मुलास मुलगी देऊन त्याच्याशी समेट करा. त्यावर जाधवाने असा जबाब दिला कीं भोसल्याच्या मुलास मुलगी देण्यासंबंधानें अपमान करण्याचें कारण एवढेंच आहे कीं त्याची आमची योग्यता सारखी नाहीं. हा त्याचा उद्दामपणाचा जबाब ऐकून निजामशहानें असें मनांत आणले की त्याचा गर्व हरण करण्यासाठीं मालोजीस चांगली मनसब देऊन योग्यतेस चढवावें. त्याप्रमाणें त्यानें त्यास मोठ्या स्नेहभावाने बोलावून आणून बारा हजार स्वारांची मनसब दिली व राजे हा किताब देऊन शिवनेरी व चाकण हे किल्ले व त्यांसभोवतालचा प्रांत सरंजामादाखल दिला, आणि पुणे व सुपे ह्या परगण्यांची जहागीर करुन दिली. हें वर्तमान स. १६०४ च्या मार्च महिन्यांत घडले.

ह्याप्रमाणें मालोजीचा पक्ष निजामशहानें घेतल्यामुळें जाधवाला आपली मुलगी त्याचा मुलगा शहाजी यास देणे प्राप्त झालें. निजामशहाच्या हुकमावरून हा विवाह दौलताबादेस स. १६०४ च्या एप्रिल महिन्यांत झाला. ह्या समारंभाला खुद्द निजामशहा व दरबारचे सगळे सरदार आले होते.

ह्या विवाहानंतर मालोजीराजे यांचें निजामशाहीत मोठे वजन वाढलें. त्यांच्या अंगच्या शौर्याचे व हुशारीचे त्या धामधुमीच्या काळी चांगले चीज झालें. त्या शाहीच्या अनेक बिकट कामगिऱ्या करून त्यांनीं दरबाराची शाबासकी मिळविली; आणि तेथें त्यांचें चांगलें तेज पडूं लागले. दरबारचे मुत्सद्दी मोठमोठ्या कामांत त्यांची मसलत घेऊं लागले; शिवाय त्यांचा स्वभाव मोठा प्रेमळ व उदार असल्यामुळें दरबारचे लोक त्यांना सर्वदा अनुकूल असत.

ह्याप्रमाणे मालोजीराजे आपल्या मनसबदारीचा पंधरा वर्षे मोठ्या इभ्रतीनें उपभोग घेऊन १६१९ सालीं निवर्तले; आणि निजामशहानें त्यांची दौलत व मनसब शहाजीराजे यांस दिली.

***

भाग तिसरा

# शहाजीराजे यांचें वृत्त

## निजामशाहींतील नोकरी

शहाजीराजांना निजामशाहीत मनसबदारी मिळाल्यावर त्यांना आपल्या अंगचे शौर्यवीर्यादि गुण दाखविण्याचा सुसमय दुसऱ्याच वर्षी म्हणजे १६२० साली प्राप्त झाला. ह्या वर्षी निजामशहाचा मुख्य कारभारी मलिकंबर याचे मोगलांशी मोठ्या निकराचें युद्ध झालें ह्या युद्धांत शहाजी राजे मोठ्या शौर्यानें लढले, व त्यांच्या अंगचे अप्रतिम युद्धकौशल्य चांगले निदर्शनास आले. ह्या लढाईत मलिकंबराचा पराजय होऊन त्यास मागें हटावे लागलें; पण शहाजीराजांनी कच न खाता मोगलांच्या सैन्यावर पुनःपुनः छापे घालून त्याला पुरेपुरे करून सोडले. ह्या मर्दुमकीस्तव दरबारांत त्यांची प्रशंसा झाली, आणि मलिकंबराचा त्यांच्यावर फारच लोभ जडला.

यानंतर शहाजहान जो पुढें दिल्लीचा बादशहा झाला त्यानें निजामशाही साफ बुडविण्याचा निर्धार करून त्या दरबारांतील लुखजी जाधव वगैरे कित्येक मराठे सरदारांस मोठी लालूच दाखवून वश करून घेतलें. त्यांचें मलिकंबराशीं चांगलेसे पटत नसल्यामुळें ते असे सहज फितूर झाले. शहाजीराजे मोगलांच्या ह्या लालचीस भुलले नाहीत. मलिकंबराच्या पक्षाकडे शेवटपर्यंत राहून त्यांनीं त्यास मोठ्या इमानाने साहाय्य केले. परंतु मोगलांच्या प्रबळ सैन्यामुळे त्यांचें कांहींएक चालले नाहीं, आणि मलिकंबरास त्यांच्याशी तह करावा लागला. हा सरदार पुढे फार दिवस जगला नाहीं. तो १६२६ सालात मृत्यु पावला.

मलिकंबराच्यामागे शहाजी राजांनी अनंत साबाजी नांवाच्या एका चतुर मुत्सद्याच्या साहाय्याने अल्पवयी मूर्तिजा निजामशहाच्या आईचा आपल्यावर भरंवसा बसवून घेतला आणि त्या शाहीचा सगळा कारभार आपण चालविला. इकडे लुखजी जाधव मोगलांकडे गेला होता, त्यानें शहाजहानाच्या सल्ल्यानें निजामशाही बुडविण्याचा घाट घातला. हें पाहून शहाजीराजांनी मूर्तिजाला कासार घाटात माहुली नांवाच्या एका

मजबूत किल्ल्यात नेऊन ठेविले. जाधवाने मोगलांच्या मोठ्या सैन्यानिशी त्या किल्ल्यास वेढा दिला, पण शहाजी राजांनी सहा महिनेपर्यंत त्यास दाद दिली नाही. शेवटीं जाधवाने निजामशहाच्या आईशी मिलाफ केल्यामुळें शहाजीराजे निरुपाय होऊन आपल्या कांहीं विश्वासू लोकांनिशीं किल्ल्यातून निसटून गेले, तेव्हां जाधव त्यांच्या पाठीस लागला. ही श्वशुरजामातांची धरपकड फलटणपर्यंत झाली. तेथून जाधवाने माघार घेतली कारण शहाजीराजांस फलटणच्या निंबाळकरांचे साहाय्य मिळून ते उलट खावून आपला धुव्वा उडवितील हें त्यास ठाऊक होते.

शहाजीराजे माहुली किल्ल्यातून निघाले त्या वेळीं त्यांची बायको जिजाबाई त्यांच्याबरोबर होती. ती त्या वेळीं सातमहिन्यांची गरोदर असून तिला घोड्यावर बसून निघावे लागलें. पाठीवर शत्रु असल्यामुळें त्यांना वेगानें दौड करावी लागली. काही कोस गेल्यावर जिजाबाईच्या पोटांत मनस्वी दुखू लागलें, व पुढें दौड करण्याचें तिला मुळीं त्राण उरले नाहीं. म्हणून तिला राजांनीं शिवनेरी किल्ल्यात नेऊन ठेविले आणि तिच्या रक्षणासाठी कांहीं लोक नेमून दौड पुढें चालविली. मागून जाधव त्या किल्ल्यापाशीं आला तेव्हां तो वर तिच्या समाचारास गेला आणि तिला म्हणाला, ''तूं सिंधखेडास माझ्या घरीं जात असलीस तर तुला मी तिकडे सुरक्षितपणे पोंचवितों.'' जिजाबाईने बापाला पुष्कळ दोष देऊन म्हटलें: ''त्यांच्याऐवजी मी तुमच्या हातीं सापडलें आहे. जें कांहीं पारिपत्य करावयाचें तें मला करा. मला माहेरी जावयाचें नाही. मी येथेंच राहणार.'' त्या मानी मुलीचा असा निर्धार पाहून जाधवाने तिच्या रक्षणासाठी आणखी आपले कांहीं लोक ठेवून पुढें कूच केलें.

शहाजीराजांनी विजापूरदरबारात वशिला लावून मोगलांच्या तावडीतून निजामशाही सोडविण्यासाठी सैन्याची कुमक मागितली. ती त्या सरकारानें दिल्यावर राजानी पुनः माघारी फिरून परिंड्याचा किल्ला व त्याच्या आसपासचा मुलूख काबीज केला व निजामशहाशीं पुनरपिसलोखा करून त्यास मोगलांच्या काचातून सोडविण्याचा बेत केला. परंतु निजामशहानें जाधवाशी विश्वासघात करून त्याला व त्याच्या मुलाला मारविलें हे वर्तमान कळल्यावरून राजांनी आपला पूर्वीचा बेत सोडला आणि मुलूख काबीज करून स्वतंत्र होऊन बसावे असे योजिले.त्यांनीं संगमनेरापासून पुणे व अहमदनगरापर्यंत सगळा मुलूख व बालेघाट हाताशी घातला आणि शामगडास आपलें ठाणे दिले.

ह्या सुमारास मोगल बादशहाचा खानजहान लोदी नांवाचा एक बलाढ्य सरदार बेदील होऊन दक्षिणेंत निजामशाहीच्या आश्रयास आला. त्यानें मोगलाशी विरोध चालविला तेव्हां त्यास मराठे सरदारांनीं मदत केली. शहाजी राजांनीहि त्याला चांगली कुमक केली. पुढें शहाजहानाने मोठ्या सैन्यानिशी दक्षिणेत येऊन ह्या लोदीचा पुरा मोड केला, आणि ज्यांनी त्याला मदत केली होती त्यांच्या नाशाला तो प्रवृत्त झाला. ह्या मोठ्या संकटांतून सुटण्यासाठी शहाजीराजे शहाजहानास शरण जाऊन त्यांच्या पदरी सरदारी पतकरून राहण्यास राजी झाले. मोगल बादशहाला हेंच पाहिजे होतें. राजांच्या शौर्यवीर्यादि गुणांची त्याला चांगली माहिती होती; आणि निजामशाही बुडविण्याच्या कामी अशा बलाढ्य सरदाराचा पुष्कळ उपयोग होईल अशी त्याची खात्री होती. त्यानें राजांना मोठी मनसब दिली व जुन्नर, संगमनेर, बैझापूर वगैरे परगणे त्यांच्याकडे कायम केले. हे वर्तमान १६३० सालांत घडले.

पुढें शहाजहानाने निजामशाहीचा मुख्य कारभारी फत्तेखान ह्याच्याशी तह करून त्याच्याकडून मोठी खंडणी घेण्याचे ठरविले. हा फत्तेखान मोठ्या जहागिरीच्या लालचीने त्याचा अंकित झाला आणि एका अल्पवयी मुलास निजामशाहीच्या तक्तावर बसवून सगळा कारभार स्वतः चालवूं लागला.

मोगल बादशहानें निजामशाहीवर आपला पुरा शह बसविण्यासाठी फत्तेखानास जी जहागीर दिली, तीतला बराच प्रांत त्यानें पूर्वी शहाजीराजांस देऊं केला होता. म्हणून त्यांस मोठा राग येऊन त्यांनीं मोगलांची नोकरी सोडून पुनः विजापूरदरबाराकडे धाव घेतली; आणि त्यास असें सांगितले की निजामशाहींत फारच बेबंदाई झाली आहे, म्हणून त्या शाहीच्या अमलांतला मुलूख काबीज करणें फार सोपे झालें आहे. तरी मला फौजेची कुमक द्याल तर मी तो मुलूख काबीज करून देतो. ही त्यांची मसलत पसंत वाटून अदिलशहानें त्यांच्या ताब्यात फौज दिली. ती घेऊन राजांनी दौलताबाद किल्यास वेढा देण्याचे ठरविले. हे वर्तमान फत्तेखानास कळताच त्यानें मोगलांची मदत मिळविली; आणि त्यांच्या सरदाराने शहाजीराजांस वाटेंत अडविले व त्यांच्याशी लढून त्यांस मागें हटविलें. मग त्यानें दौलताबादेच्या किल्ल्यापाशी आपल्या सैन्याचा तळ दिला. इकडे शहाजीराजांनी पाहिले कीं मोगलांच्या प्रबळ सैन्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं. म्हणून त्यांनीं फत्तेखानाशीं भेद करून त्यास अनुकूळ करून घेतलें; आणि त्यानें मोगल सैन्यावर किल्ल्यावरून तोफांचा मारा सुरू केला.

हा असा दगेखोरपणा पाहून मोगल सरदाराला चेव आला, आणि त्यानें किल्ल्यास बळकट वेढा देऊन तो शेवटी हस्तगत केला. शहाजीराजांनी बाहेरून मोगल सैन्यावर पुनःपुनः छापे घातले, पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. फत्तेखान शेवटीं मोगल बादशहास शरण गेल्यावरून त्यानें त्याला कांहीं वार्षिक वेतन ठरवून स्वस्थ बसावयास लाविलें, आणि जो अल्पवयी मुलगा त्यानें निजामशाही तक्तावर बसविला होता, त्याला ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवून त्या शाहीचा सगळा मुलूख आपल्या ताब्यांत घेतला. हें वर्तमान १६३३ सालीं घडले.

ह्या धामधुमीच्या वेळीं आमच्या चरित्रनायकावर एक जिवावरचे संकट आलें होतें. माता जिजाबाई त्यांस घेऊन बायझापूर येथें राजांच्या आज्ञेवरून रहात असे. मोगलांचा वेढा पडला असतां शहाजीराजे त्यांच्यावर वळोवेळां हल्ले करून त्यांस हैराण करू लागले, तेव्हां त्यांचा सूड उगवण्यासाठी मोगलांचा सेनापति मोहबतखान यानें जिजाबाईला तिच्या लहान मुलासह पकडून आणविलें. त्यांचा त्यानें नाश केला असता, परंतु मोगलांच्या त्या लष्करांत लुखजी जाधवाचा भाऊ जगदेवराव हा होता, त्यानें खानापाशी अशी रदबदली केली की, ‘‘शहाजीराजे यांचें आमच्या घराण्याशी वाकडे आहे. ह्या वैमनस्यामुळे त्यांनीं जिजाबाईस व तिच्या मुलास सोडून दिलें असून दोनतीन वर्षांपूर्वी मोहित्यांची कन्या तुकाबाई हिजशीं विवाह केला आहे. यामुळे तर जिजाबाईचा व त्यांचा पुरा बेबनाव झाला आहे. यास्तव यांना पकडून कैद केल्यास शहाजीराजांस कांहींच वाटणार नाहीं. आमच्या घराण्याची मात्र यामुळे इजत घेतल्यासारखे होणार आहे.’’ हे त्याचें म्हणणें खानास खरें वाटून जिजाबाईस त्यानें त्या जाधवाच्या स्वाधीन केलें; आणि त्यानें तिला शहाजीराजांच्या ताब्यांतील कोंडाणा किल्ल्यात सुरक्षितपणें नेऊन ठेविलें.

दौलताबाद घेण्याचा बेत फसून निजामशाही मोगलांनी बुडविली तरी शहाजीराजे कांहीं हताश झाले नाहींत. ते विजापूरकरांच्या सैन्याबरोबर माघारी न जातां, भीमगड जो त्या वेळीं त्यांच्या ताब्यांत होता तेथें जाऊन त्यांनीं लोकांची जमवाजमव केली आणि तिकडील मोगलांच्या ताब्यांत गेलेला मुलूख परत काबीज करण्याचा धुमधडाका चालविला. त्यांनीं ह्याप्रमाणें निजामशाहीचा बहुतेक मुलूख आपल्या कबजांत घेतला. ही त्यांची धामधूम बंद करून त्यांनीं परत मोगलांच्या लष्करास येऊन मिळावे म्हणून मोगल सरदारांनीं त्यांस मोठी लालूच दाखविली, पण तिला त्यांनी भीक घातली

नाहीं. परंतु त्यांना मोगलांच्या मोठ्या हल्ल्याची भीति असल्यामुळें त्यांनी विजापूरच्या अदिलशहाकडे पुढीलप्रमाणें बोलणे लाविलें: ''मला सैन्याची व द्रव्याची कुमक कराल तर मी निजामशाही पुनः उभी करून बहिरी घराण्याचा झेंडा उभारितों.'' हें त्यांचें बोलणे त्या दरबारास कबूल होऊन त्यानें त्यांना सगळ्या प्रकारचे साहाय्य केलें, आणि त्यांच्याकडून असा करार करून घेतला कीं, त्यांनीं निजामशाही वंशातील एकादा वारस पाहून गादीवर बसवावा व त्याच्या वतीने निजामशाहीचा कारभार पाहावा. ह्या कराराप्रमाणे राजांनी मूर्तिजा नांवाचा एक दहा वर्षांचा मुलगा श्रीवर्धन येथे नजर कैदेत होता त्यास सोडवून आणिलें व भीमगड येथें तक्ताची जागा करुन त्याला तेथें स. १६३३ च्या सप्टेंबर महिन्यांत ठेविले.

शहाजीराजांचे हें धाडस व स्तुत्य हेतु पाहून निजामशाहीतील पूर्वीचे बहुतेक जहागीरदार, सरदार व देशमुख त्यांस येऊन मिळाले. जे कोणी सरदार त्यांस प्रतिकूळ होते व जे स्वतंत्र होऊन बसले होते, त्यांस राजांनी मोडून काढलें. नंतर त्यांनीं जुन्नर येथे निजामशाहीचें तक्त नेले. निजामशाहीचा गेलेला बहुतेक मुलूख काबीज करुन राजांनी निजामशाही तक्ताची पुरी स्थापना केल्याचे ऐकून शहाजहान बादशहाने त्यांच्या पारिपत्यास मोठी फौज पाठविली. तिचा त्यांनीं परिडे येथें पुरा फडशा उडवून अहमदनगरांतील मोगलांस खानदेशाकडे पिटाळून लाविलें आणि दौलताबादेपर्यंत मोगलांच्या मुलखांत लुटालूट मांडिली. मोगल बादशहाने पुनः एक मोठे सैन्य राजांवर पाठविले; परंतु त्यासहि त्यांनी चांगलेच खडे चारिले. हें यश त्यांना अर्थात् अदिलशहाच्या मदतीनें मिळलें.

हा असा आपल्या सैन्याचा दोन वेळां मोड करून शहाजीराजे निजामशाहीचें पुनरुज्जीवन करण्याच्या कामी यशस्वी झाले हें पाहून शहाजहानास पराकाष्टेचा संताप आला, आणि प्रचंड सेनेनिशीं तो दक्षिणेंत उतरला. शहाजीराजांस विजापूरकरांचा पाठिंबा होता तो नाहीसा करण्याचा त्यानें प्रथम प्रयत्न केला, त्यांच्याशी त्यानें तहाचे बोलणे लाविलें, पण तें त्यांनीं कबूल केलें नाहीं. तेव्हां त्यानें आपल्या सैन्याचे चार भाग करून दोन अदिलशहाच्या मुलखावर पाठविले आणि दोन शहाजीराजांच्या ताब्यांतल्या मुलखावर दोन बाजूनी पाठविले. अशा रीतीनें शत्रूंनी दोहो बाजूंनी एकदम मारा सुरू केला तरी राजे यत्किंचित्हि डगमगले नाहींत. शत्रूंशी अढळ धैर्यानें टक्कर देऊन शेवटपर्यंत लढावयाचें, भिऊन हार जावयाचें नाहीं असा निर्धार त्या वीर्यशाली

पुरुषानें केला. ह्या बिकट प्रसंगीं राजानी आपलें सर्व क्षात्रतेज प्रगट केलें. त्यांचें अप्रतिम युद्धकौशल्य, विलक्षण रणवेग व पुरा गनिमी कावा पाहून त्यांच्या कट्ट्या शत्रूनें देखील तोंडांत बोट घातले. मोगलांच्या सैन्यास त्यांनीं पुष्कळ हैराण केले. परंतु त्यांचा जमाव मोठा असल्याकारणाने राजांच्या ताब्यातील बरेच किल्ले व ठाणी त्यांनीं काबीज केली. व शेवटीं मोगलांच्या दोन्ही विभागांनी एकवट होऊन राजास एके जागी गांठले; परंतु त्यांस झुकांडी देऊन ते पार निघून गेले; आणि विजापूरकरांची कुमक मिळताच त्यांनीं पुनः उलट खाल्ली व मोगलांच्या सैन्यावर छापे घालून व त्यांची रसद मारून त्यांस दाणावैरण मिळेनासें केले. त्यामुळें राजांशी सामना करण्याचा किंवा त्यांच्या पाठीस लागण्याचा आवाका त्यांना उरला नाहीं.

ह्याप्रमाणें शहाजीराजे वठणीस येत नाहींत असें पाहून त्यांना कुमक करणारे जे विजापूरकर त्यांच्या राज्यांत मोगल सरदारांनीं शिरून जिकडेतिकडे धुमाकूळ उडवून दिला. तेव्हां अदिलशहानें घाबरून जाऊन त्यांच्याशी तह करून त्यांस प्रतिवर्षी बारा लक्ष होन खंडणी देण्याचें कबूल केलें; आणि शहाजीराजे लढाई सोडून देऊन मोगल बादशहास शरण गेले नाहीत तर त्यांस अदिलशहानें आपल्या राज्यांत थारा देऊं नये. ह्या तहांत अदिलशहाला निजामशाहीचा बराच प्रांत मिळाला. हा तह १६३६ साली झाला.

हा असा विजापूरकरांचा आधार तुटला तरी शहाजीराजांनी धीर सोडला नाहीं. मोगलांशी शेवटपर्यंत लढण्याचा त्यांनीं निर्धार केला. पण शत्रूंच्या प्रचंड सेनेपुढें त्यांचा तग निघेना. त्यांत आणखी विजापूरकरांनीं मोगलांस सैन्याची मदत दिली; आणि त्यांनीं त्यांच्या ताब्यातले किल्ले व ठाणी भराभर काबीज केली. तेव्हा शेवटीं नाइलाज होऊन राजे माहुलीच्या किल्ल्यावर आपली सगळी फौज जमवून राहिले. त्या किल्ल्यास मोगलांनी वेढा दिला. तो उठविण्याचें सामर्थ्य राजांस राहिले नाहीं. म्हणून त्यांनीं शहाजहान बादशहाशी तहाचे बोलणे लाविले; आणि आपणास बादशहा क्षमा करीत असला तर त्याच्या नोकरीस राहण्यास आपण तयार आहों असे त्याला सांगून पाठविले. शहाजहानाने त्यांचें हें म्हणणें कबूल केले नाही. पण त्यांना विजापूरकरांच्या आश्रयाने राहण्यास आपली हरकत नाही असा उलट निरोप पाठविला. ह्यावरून राजांनी माहुलीच्या किल्ल्यावर जो बालराजा निजामशाही तक्तावर बसविला होता त्याला मोगलांच्या हवाली करून आपल्या लोकांनिशी विजापूराकडे प्रयाण केलें. हें वर्तमान १६३७ साली घडले.

## शहाजीराजांची अदिलशाहींतील नोकरी

शहाजीराजांना अदिलशहानें मोठ्या इतमामाने आपल्या पदरी ठेवून घेतले असा कर्तृत्ववान्, शूर, धाडशी व चतुर योद्धा लाभल्याबद्दल त्यास आनंद वाटला. राजांची सगळी जहागीर मोगलांशी केलेल्या तहाप्रमाणें अदिलशहाच्या हाती आली होती. तीपैकी पुणे व सुपें हे परगणे त्यानें राजांकडे जहागिरीदाखल कायम केले. ह्या जहागिरीची व्यवस्था पाहण्याचे काम त्यांनीं दादाजी कोंडदेव नावाच्या एका हुशार व विश्वासू ब्राह्मणास सांगितलें आणि तिच्या रक्षणासाठी एक हजार स्वार ठेवून दिले.

पुढल्या वर्षी अदिलशहानें त्यांस रणदुल्लाखानाबरोबर कर्नाटकांत आपली सत्ता बसविण्यासाठीं रवाना केले. तिकडे त्यांनी दोनतीन वर्षे लढाया लढून अक्कलकोट, बागलकोट, कोल्हार, बेंगरूळ, बाळापूर व शिरटे हे परगणे काबीज केले. ह्या माहिमेंत शहाजी राजांनी मोठी पराक्रमाची कामे केल्याबद्दल अदिलशहाची त्यांच्यावर अधिकच मर्जी बसली; आणि कर्नाटकांत त्यांनीं काबीज केलेले सगळे परगणे त्यांस जहागीर करून दिले आणि महाराष्ट्रांत इंदापूर, बारामती व मावळप्रांत हे परगणे त्यांच्या जहागिरीस जोडले. याशिवाय आणखी कऱ्हाड प्रांतांतील बावीस गांवांच्या देशमुखीची सनद त्यानें त्यांना करून दिली.

नंतर कांहीं दिवसांनी अदिलशहानें कर्नाटक व द्रवीड ह्या प्रांतांचा नीट बंदोबस्त व व्यवस्था लावण्यासाठी शहाजीराजांस त्या प्रांताची सुभेदारी देऊन तिकडे पाठविलें. राजांनी तिकडची सगळी बेबंदशाई मोडून टाकून सुव्यवस्था लाविली; महाराष्ट्रातील कांहीं हुशार ब्राह्मण तिकडे नेऊन जमाबंदीची वगैरे नवी पद्धत सुरू केली; आणि तिकडील लोकांशी न्यायानें व ममतेनें वागून त्यांचा लोभ संपादिला. अदिलशहाचे तिकडील बरेंच उत्पन्न वाढवून तें त्याला नेमाने पावते करण्यास ते कधीं कसूर करीत नसत. ह्या कारभारांत त्यांनीं आपलाहि बराच फायदा करून घेतला. तिकडील तंजावर व त्रिचनापल्ली हे नवे मुलूख त्यांनी काबीज केले. ते अदिलशहानें त्यांच्याकडेच जहागिरीदाखल ठेविले.

ह्याप्रमाणें अदिलशहाची सुभेदारी पतकरून शहाजीराजांनी आपल्या अंगच्या शौर्यवीर्यादि अप्रतिम गुणांच्या योगाने कर्नाटकांत आपलें वर्चस्व चांगल्या प्रकारे स्थापित केलें आणि अदिलशहाचा पुरा विश्वास संपादन केला. ह्या वेळी राजांच्या मनांत कर्नाटकांत स्वतंत्र राज्य स्थापण्याचा विचार येणे स्वाभाविक होतें. परंतु तसें

करण्याचा घाट घातल्यास आपणांला यश येणे शक्य नाही असें वाटून ते असल्या धाडसाला प्रवृत्त झाले नाहीत असें दिसतें. त्यांचा असा मानस होता हें सिद्ध करण्यास बराच पुरावा आहे. उदाहरणार्थ ते सुभेदारीच्या हुद्यावर असतां त्यांच्या हातचे सनदा वगैरे जे दस्तऐवज लोकांकडे अद्यापि आढळतात, त्यांवर वरिष्ठ सरकाराच्या वतीनें वगैरे आशयाचा जो मायना नेहमीच्या पद्धतीस अनुसरून असावयाचा त्याच्या ऐवजी 'शहाजीराजे भोसले यांच्या दरबारांतून असा उल्लेख आढळतो. दुसरा मोठा पुरावा असा कीं शिवाजीमहाराजांनीं विजापूरकरांच्या मुलखांत धामधूम सुरू केली तेव्हां त्यांस शहाजीराजांचीच फूस असली पाहिजे असा वहीम येऊन अदिलशहानें त्यांस असा जरबेचा हुकूम पाठविला 'कीं तुम्ही आपल्या पुत्राच्या बेबंद वर्तनास आळा घालून त्याचा योग्य बंदोबस्त करा.' त्यावर राजांनी त्याची अशी समजूत केली की 'मी माझ्या पूर्वीच्या बायकोचा न तिच्या त्या मुलाचा कधीच त्याग केला असून दुसरें लग्नहि केलें आहे. सरकारानेच त्याचा वाटेल त्या रीतीनें बंदोबस्त करावा.' ह्या उडवाउडवीच्या जबाबाचे खरें इंगित असें होते की आपला मुलगा जें धाडसाचें काम करीत आहे ते आपल्या इष्ट उद्देशाच्या सिद्धीस अनुकूळ आहे असें त्यांस वाटत असल्यामुळें त्यांच्या अल्लड वर्तनास आळा घालण्यास ते प्रवृत्त झाले नाहींत, आणि आपल्यावरचा वहीम कसाबसा उडवून ते नामानिराळे झाले.

पुढें महाराष्ट्रांत शिवाजी महाराजांची बंडाळी बेसुमार वाढत चालली, आणि शहाजीराजेहि कर्नाटकांत स्वतंत्र होण्याचा बेत करीत असून त्यासाठी साधनसामग्री जमवीत आहेत असा अदिलशहास पुरा वहीम आला, आणि त्याने राजांस शासन करण्याचा निश्चय करून त्यांस पकडून आणण्याचें काम आपल्या एका मुसलमान सरदाराला सांगितले. राजांवर उघड हल्ला करून पकडण्याची ताकद त्याला नव्हती. त्यानें बाजी घोरपडे मुधोळकर नांवाच्या एका सरदाराला राजांना युक्तीप्रयुक्तीने पकडून आणण्याची कामगिरी सांगितली. घोरपड्याचा राजांशी स्नेहसंबंध होता. त्यानें त्यांस मेजवानीस म्हणून आपल्या घरी बोलाविले. आणि तेथें दग्यानें गिरफदार करून विजापुरास रवाना केलें. तेथें त्यांस भिंतींत चिणून ठार मारण्याची दहशत अदिलशहानें घातली. ती अर्थात् अशा हेतूने कीं त्यांनीं आपल्या बेकैद पुत्राचा योग्य बंदोबस्त करावा. परंतु त्याचा तो हेतू शिवाजी महाराजांनी मोगल बादशहाशीं संधान बांधून सिद्धीस जाऊं दिला नाही; आणि अदिलशहाला राजांस त्या वेळीं कांही एक अपाय

करितां आला नाही. त्याने त्यांस विजापुरास चार वर्षे नजरकैदेत ठेविले होते. एवढ्या अवधीत राजांनी दरबारच्या लोकांस वश करून घेऊन आपल्यावरचा वहीम साफ उडविला, आणि कर्नाटकची सुभेदारी व आपली तिकडील सगळी जहागिरी पुनः मिळवून ते परत तिकडे गेले. जाते वेळी त्यांनी महाराजांना असा निरोप पाठविला कीं तुम्ही माझे खरे पुत्र असाल तर घोरपड्याला चांगले शासन कराल. वडिलांच्या ह्या आज्ञेप्रमाणें वागण्याची संधि महाराजांना पुढे १६६१ सालात आली. ह्या सालीं हा बाजी घोरपडे अदिलशहाच्या हुकमावरून वाडीच्या सावंतास महाराजांशी लढण्याच्या कामी मदत करण्यासाठी दक्षिणेंत येऊन प्रथम आपल्या जहागिरीच्या गांवीं गेला असतां, महाराजांनी त्याच्यावर अकस्मात् हल्ला करून त्याला व त्याच्या सगळ्या लोकांना व नातलगांना ठार केलें. यानंतर राजे कर्नाटकांत शेवटपर्यंत मोठ्या सावधगिरीने वागले. तिकडे त्यांनीं अदिलशहाचा अंमल अधिकाधिक दृढ करण्याची कामगिरी उत्तम प्रकारें बजाविल्याबद्दल त्यांचा त्या दरबारांत मानमरातब फारच वाढला. इकडे शिवाजीमहाराजांचा विजापूरकरांशीं कांहीं वेळ तह झाल्यामुळे आपल्या पराक्रमी सत्पुत्राची भेट घेण्याची ही चांगली संधि आहे असें राजांच्या लक्षांत येऊन त्यांनीं महाराष्ट्रांत जाण्याविषयी अदिलशहाकडे परवानगी मागितली. ती त्यानें अशा अटीवर दिली की त्यांनीं काम संपतांच पुनः परत आलें पाहिजे, तिकडे आपल्या पुत्राशी मिलाफ होऊन राहता कामा नये.

ह्याप्रमाणें शहाजी राजांनी महाराष्ट्रांत येऊन आपल्या सत्पुत्राची भेट घेतली. महाराजांनी त्यांचा परमपूज्यबुद्धीनें व अत्यादरपूर्वक सन्मान केला. असें सांगतात की महाराज त्यांना पायांनी सामोरे गेले, आणि त्यांना पालखीत बसवून त्यांचे जोडे घेऊन आपण पालखीबरोबर चालले; आणि त्यांना अग्रासनी बसवून आपण त्यांच्यापाशी नम्रभावानें उभे राहिले. त्यांची ती पितृनिष्ठा, नम्रता व संपादन केलेली दौलत पाहून राजांना अतिशयित समाधान वाटलें. महाराजांनी त्यांना अशी आग्रहाची विनंति केली कीं, ''आपण आतां अशा उतार वयांत यवनांची ताबेदारी पतकरून उरलेले आयुष्य त्यांच्या सेवेंत घालविणे इष्ट नाहीं. आपण इकडे राहून मी संपादिलेल्या सगळ्या दौलतीचे मालक व्हावें व मजकडून सेवा घ्यावी.'' यास राजांनी असा जबाब दिला कीं, ''मी जी कर्नाटकांत जहागिरी संपादली आहे ती तुमच्या लोभास्तव घालविणे बरोबर नाहीं. मी तुमच्याकडे राहिलो तर अदिलशहा ती खात्रीने जप्त करील, आणि

तितके अदिलशहाचे बळ वाढेल.'' अशी त्यांची समजूत घालून राजे कर्नाटकात परत आले; परन्तु तिकडे ते फार दिवस जगले नाहींत. महाराष्ट्रांतून परत आल्यावर ते दोन वर्षांनी निवर्तले. ते एके दिवशीं बंदेकीर नांवाच्या गावी शिकारीस गेले असतां सशाची पारध उठून त्यांनी आपला घोडा त्याच्या मागे लाविला. धावता धावता भेंडाळींत घोड्याचा पाय अडकून ते खालीं पडले, व छातीवर घोड्याचा पाय पडून त्या धक्यानें त्यांचें तेथेंच प्राणोत्क्रमण झालें. हें वर्तमान १६६४ सालीं घडले. ते ज्या जागी वारले तेथें त्यांची छत्री बांधिली व अदिलशहाकडून सनद आणवून त्या गांवाचे उत्पन्न तिच्या खर्चास लावून दिलें.

शहाजीराजांस एकंदर तीन औरस पुत्र होते. त्यांपैकी वडील पुत्र संभाजी. राजे, दौलताबादेस असतां हा जिजाबाईच्या उदरी सन १६२३ त झाला. त्याच्यावर राजांचें फार प्रेम असून तो नेहमी त्यांच्याबरोबर असे. हा सन १६५३ त कनकगिरीच्या लढाईत तोफेचा गोळा लागून मरण पावला. त्याच्या मृत्यूमुळे राजास पराकाष्ठेचें दुःख झाले. कनकगिरीच्या संस्थानिकाच्या पारिपत्यासाठी त्यांनीं त्याला फौज देऊन पाठविलें होतें. तेथें त्याचा असा अंत झाला म्हणून संतप्त होऊन त्याच्यावर जातीने हल्ला करून त्या संस्थानिकाचा पुरा धुव्वा त्यांनीं उडविला. ह्या कलहांत विजापूरकरांचा सरदार अफझुलखान याचे त्या संस्थानिकाला साहाय्य असल्याचें राजांना कळून आलें. परंतु त्याचें शासन करण्यास प्रवृत्त होणें धोक्याचे आहे असें वाटल्यावरून त्याच्या वाटेस ते गेलें नाहींत. परंतु पुढें लौकरच ह्या संभाजीचा धाकटा बंधु त्या अफझुलखानाचा सूड घेणार होता हे शहाजीराजांच्या स्वप्नीहि त्या वेळीं आलें नाहीं.

राजांचा दुसरा औरस पुत्र अर्थात आमचे प्रौढप्रताप चरित्रनायक. त्याचे जन्म शिवनेरी किल्ल्यावर सन १६२७ त झालें. ह्या किल्ल्यावर जिजाबाई कशा येऊन राहिल्या होत्या हे मागें सांगितलेंच आहे. राजांनी सन १६३० त मोहित्यांची तुकाबाई हिजशी विवाह केला होता; तिच्या पोटीं त्यांस एकच मुलगा झाला. त्याचें नाव व्यंकोजी. हा सन १६३१ त जन्मला. ह्या मायलेकांस राजांनीं चंदावर प्रातांत नेऊन ठेविले होतें. महाराष्ट्रांतील आपल्या पराक्रमी पुत्राची मोठी दौलत व तिची व्यवस्था पाहून गेल्यावर राजांनी ह्या व्यंकोजीस जवळ बोलावून येणेप्रमाणें बोध केला: ''तुमचे वडील बंधु शिवाजीराजे यांनी जवामर्दी करून नवे राज्य संपादिलें आहे. तुम्ही आमच्या इकडील दौलतीचे मालक आहां. आमचे काका विठोजीराजे व आमचे बंधु

शरीफजीराजे यांच्या कुटुंबाचे तुंम्ही चालवावें. प्रजापालन यथान्याय करून राज्यकारभार चालवावा. तुमचे वडील बंधू शिवाजीराजे यांनीं तर सर्व पृथ्वीला आक्रमण करण्याचा प्रचंड उद्योग आरंभिला आहे. ईश्वरकृपेने त्यांचें मनोरथ परिपूर्ण झाले तर ते सर्वाचें संगोपन करितीलच. परंतु त्यांच्यावर कदाचित समय गुदरला तरी आम्ही इकडील दौलतीचा अदिलशहाकडून इतल्ला तोडून घेतला आहे. ही दौलत तुमची दोघांची आहे. सांप्रत ह्या दौलतींचे रक्षण तुम्ही हुशारीनें करावे. तुम्ही माझे आवडते पुत्र असून पराक्रमी शिवाजीराजांचे बंधु आहां हें ध्यानांत ठेवा. पदरी चार विश्वासू माणसे आहेत त्यांच्या विचाराने चालल्यास तुमचे कल्याण होईल.''

***

भाग चवथा

# शिवाजीमहाराजांचें बाळपण

मागे सांगितलेंच आहे कीं शहाजीराजे शत्रूच्या प्रबळ सैन्याच्या पाठलागास्तव दौड करीत असतां जिजाबाई बरोबर होती. ती गरोदर असल्यामुळें तिला घोड्यावरून नेता येईना म्हणून त्यांनी तिला शिवनेरी किल्ल्यांत ठेविले. तेथें ती शके १५४९, प्रभव नाम संवत्सर, वैशाख शुद्ध पंचमी, सोमवार (ता. १० एप्रिल सन१६२७) ह्या दिवशी प्रसूत झाली. ह्याप्रमाणें मराठी साम्राज्याच्या संस्थापकाचा जन्म ह्या अशा धामधुमीच्या वेळी शिवनेरी किल्ल्यांत झालें. जिजाबाईस पुत्ररत्न झाल्यामुळें आश्रित मंडळीस अत्यानंद झाला. त्या ठिकाणी आणि त्या स्थितीस अनुकूल झाला तेवढा उत्सव त्यांनीं केला. आसपासच्या गावाताल मोलमजुरी करणाऱ्या बायका किल्यावर आल्या तेवढ्यांना बारातेरा दिवस भोजन घालून लुगडी, चोळखण वगैरे बक्षिसें दिली.

जिजाबाई ह्या किल्ल्यावर तीन वर्षे होती. पुढें शहाजीराजांनी तिला कांहीं दिवस बायझापुरास ठेविलें होतें. येथे असतां मागें सांगितल्याप्रमाणें तिला व बाळराजांला मोगलांनी पकडून नेले, आणि त्यांच्या तावडीतून सुटल्यावर ती काही दिवस कोंडाणा किल्ल्यात व कांहीं दिवस माहुलीच्या किल्ल्यांत राहत होती. सन १६२७ पासून सन १६३० पर्यंत शहाजीराजे मोगलांशी एकसारखे झगडत असून एवढ्या काळात त्यांना स्वस्थता अशी केव्हांच लाभली नाही. तथापि त्यांनी ह्या आपल्या स्त्रिच्या व पुत्राच्या रक्षणासंबंधानें केव्हाहि हयगय केलेली दिसत नाही. जिजाबाई मोठी मानी स्त्री असल्याकारणाने ती आपल्या माहेरी तर केव्हांहि जाऊन राहली नाहीं. मोगलांच्या सैन्याची वावटळ जिकडूनतिकडून सुटली असतां व शाहाजीराजांच्या ताब्यांतील एकएक किल्ला व ठाणें शत्रु सर करीत असतां तिचा हा निर्धार कायम राहावा हें मोठेच नवल होय. ह्या दहा वर्षात तिला रात्रंदिवस किती चिंता लागून राहिली असावी याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. शत्रु केव्हा घाला घालून आपल्या प्रिय पुत्राचा नाश करील याचा नेम नाहीं असा तिला एक सारखा घोर लागून राहिला होता.

त्याप्रमाणेंच शहाजीराजांनी मोगलांसारख्या अतिप्रबळ शत्रूशी चालविलेल्या अतिघोर संग्रामाचा शेवट कसा काय होतो ह्याचा तिला हृद्रोग लागला होता. तरी पण तिने आपल्या लाडक्या मुलाच्या त्या काळास उचित अशा शिक्षणांच्या बाबतीत हेळसांड केली नाहीं. घोड्यावर बसणे, तिरंदाजी करणे, बंदूक मारणे, पट्टा फिरविणें इत्यादि युद्धोपयोगी कलांचा अभ्यास तिनें त्यांच्याकडून ह्या लहान वयांत करविला व त्याला लिहिणेवाचणे शिकविण्याचीहि व्यवस्था करविली.

शहाजीराजांना निरुपाय होऊन विजापूरच्या अदिलशहाच्या पदरी सन १६३७ त नोकरी पतकरून राहावे लागलें तेव्हां त्यांनीं बाळराजांला व जिजाबाईला कांहीं दिवस विजापुरास नेले होते. पण पुढें लौकरच त्यांना कर्नाटकांत मोहिमेवर जावे लागल्यामुळें त्यांनीं पुण्याकडील आपल्या जहागिरीच्या बंदोबस्ताकडे आपल्या पदरचा विश्वासू कारकून दादाजी कोंडदेव याची नेमणूक करून जिजाबाईस व बाळराजांस त्याच्या हवाली केले. दादाजीने त्यांना पुण्यास आणिलें आणि त्यांच्यासाठी एक वाडा बांधवून त्यांत ठेविले. येथे आल्यावर बाळराजांच्या शिक्षणाची सगळी व्यवस्था दादोजी पाहूं लागला; आणि सन १६४० त शहाजीराजांच्या सांगण्यावरून त्यानें त्यांचा शिरक्याची कन्या सईबाई हिजशी विवाह करून दिला.

शहाजीराजे कर्नाटकांतली मोहीम आटपून विजापुरास परत आले तेव्हां पुनः त्यांनी जिजाबाईसह बालराजांस विजापुरास नेले. ह्या वेळी आमच्या चरित्र नायकाचें वय चौदा वर्षांचे होते. एवढ्या अल्प वयांत त्यांची सगळ्या युद्ध कलात चांगली गति झाली होती. ते अंगाने बळकट व देखणे असून अतिशयित चपळ व चौकस होते. विजापुरास आल्यावर त्यांना नाना प्रकारच्या कारखान्यांची माहिती मिळविण्यास चांगली संधि सापडली, तेथल्या मोठमोठ्या कामदारांचा व सरदारांचा स्नेह त्यांनीं संपादन केला, आणि त्यांना नाना प्रकारचे प्रश्न विचारून त्यांच्याकडून मिळवेल तितकी माहिती मिळविली. हलकट, व्यसनी व शोकी माणसांच्या वाऱ्यासहि ते राहत नसत. त्यांचा त्यांना पुरा तिटकारा असे. वडिलांची अवज्ञा किंवा अमर्यादा त्यांच्या हातून यत्किंचित्‌हि होत नसे. हे असे गुण त्यांच्या अंगी अल्प वयांतच विकास पावलेले पाहून राजांकडे येणारे सरदार लोक मोठे कौतुक करीत.

विजापुरास असतां तेथील अनेक प्रकार पाहून शिवाजी महाराजांच्या ठायींचा यवनद्वेष अधिकच वाढला. त्यांना अदिलशहाच्या भेटीस नेण्याचा शहाजीराजांनी बेत

केला तो त्यांना मुळीं पसंत वाटला नाहीं. त्यांची परस्पर समजूत पाडण्याचा प्रयत्न राजांनी पदरच्या लोकांकडून व जिजाबाईकडून करविला. पण महाराज आपला हेका सोडेनात. तेव्हां शेवटी राजांनीं त्यांना आपल्या समक्ष बोलावून आणून पुढीलप्रमाणें बोध केला: ''आज यवन पृथ्वीपति आहेत. स्वधर्मरक्षण करुन त्यांची सेवा करण्यास काय हरकत आहे? ईश्वरी सूत्राप्रमाणें आम्हांस सांप्रत त्यांची सेवा पतकरून योगक्षेम करणें भाग आहे. देवास असें करणें नसतें तर हिंदूंचे राज्य त्यांच्या हातीं कां बरें जातें? कालवर्तमानानुरूप वागून आम्ही हें वैभव संपादिलें आहे. हें जतन करण्यास तुम्हांला बादशहाची कृपा संपादन केली पाहिजे.'' हा उपदेश ऐकून महाराजांनी समर्याद व सविनय उत्तर दिलें तें असे: ''मला वडिलांची आज्ञा शिरसा वंद्य आहे. परंतु गोहत्या व देवब्राह्मणांची विडंबना यवन करितात ती माझ्यानें बिलकूल पाहवत नाहीं.'' ह्या उत्तराने राजांस वाईट तर वाटलें नाहींच, परंतु उलट त्यांचा पाणीदारपणा व यवनद्वेष पाहून कौतुकच वाटले. तरी त्यांनीं त्यांची नाना प्रकारीं समजूत घालून त्यांस शेवटीं अदिलशहाच्या भेटीस दरबारांत नेले. त्यांना जमिनीस हात लावून मुजरा करावयास सांगितलें असून त्यांनीं अदिलशहाला नुसता सलाम केला. तेथें त्यांस वस्त्रे जवाहीर वगैरे देऊन त्यांचा मान केला. ह्या नंतर ते राजांबरोबर वेळोवेळा दरबारांत जात. परतु त्यांनीं एके दिवशीं वडिलास असें सांगितले कीं स्वधर्म व ब्राह्मण यांची येथें सदोदित निंदा चालते ती मला बिलकूल ऐकवत नाहीं. भररस्त्यात गोवध होतो तो पाहून तर मला पराकाष्ठेचे वाईट वाटतें व असा त्वेष येतो कीं गोवध करणारांचा शिरच्छेद करावा. मुसलमानांचा मला मुळीं संसर्ग नको असें वाटतें. मला आपल्या बरोबर दरबारांत यावयाची आज्ञा करूं नये. तेव्हां अर्थात राजांनीं त्यांना बरोबर येण्याविषयीं, सक्ती केली नाही; आणि दरबाराकडून त्यांनीं असा हुकूम करविला की रस्त्यांतून कोणी गोवध करूं नये व गोमांसाची दुकाने मांडू नयेत.

हा असा बंदोबस्त झाल्यावर महाराज पुनः दरबारास जाऊं लागले. एके दिवशी ते आपल्या कांही समवयी मित्रांसह घोड्यावर बसून चालले असतां एक कसाई शहराच्या दरवाजापाशी गोमांस विकावयास बसलेला त्यांनीं पाहताच तलवार उपसून त्याचा तेथल्यातेथें शिरच्छेद केला. ह्या गोष्टीचा मोठा गवगवा होऊन ती अदिलशहाच्या कानावर गेली. तेव्हां तो म्हणाला की शिवाजीराजांनीं केलें तें योग्य आहे. त्या कसायानें हुकूम मोडला त्याचे त्याला योग्य शासन मिळाले. ह्या प्रकरणामुळें मुसलमान

फार खवळले आणि वाटेल ते बोलू लागले. या गोष्टीची राजांना मोठी चिंता लागून राहिली. त्यांनीं व जिजाबाईने शिवाजीमहाराजांना असा बोध केला कीं, असला हूडपणा करून यवनद्वेष असा स्पष्टपणे दाखविणे बरोबर नाहीं; त्यांत आपल्या दौलतीचा व आपला नाश होणार आहे. ह्यावर महाराजांनी स्पष्टपणे पण मर्यादशीलतेनें जबाब दिला तो असा: ''तुमचा उपदेश मला शिरसा वंद्य आहे. परंतु तुरकाला जमिनीस हात लावून मुजरा करणें, स्वधर्मविडंबना व गोवधादि अनन्वित कर्मे होत असलेली पाहणे मला बिलकूल आवडत नाहीं. तीं दृष्टीस पडली म्हणजे मला एवढा संताप येतो कीं माझें देहभान नाहींसे होतें. ह्या गोष्टीस माझा निरुपाय आहे. तुर्कांचे अन्न खाऊन राहण्यांत स्वधर्महानि आहे असें मला वाटतें. यानंतर माझ्या हातून कांहीं अविचाराची कृत्ये होऊं नयेत असें आपल्या मनांत असेल तर मला येथें ठेवू नका, यवनांच्या राज्याबाहेर कोठे तरी दूर ठेवा. हें असें मी आपणांस निक्षून सांगतो तें आपली अवज्ञा किंवा उपमर्द करावा म्हणून नव्हे. ही माझी आपणांस हात जोडून विनंति आहे.'' हें त्यांचें निर्वाणीचे उत्तर ऐकून राजांनी असें ठरविलें कीं यांना पुण्यास पाठवून द्यावें. या वेळी दादाजी कोंडदेव दौलतीचा हिशोब घेऊन विजापुरास आला होता, त्याच्याबरोबर त्यांनीं जिजाबाईस व महाराजांस पुनः पुण्यास पाठवून दिलें.

असें सांगतात की महाराजांचा आणखी एक विवाह विजापुरास अदिलशहाच्या आग्रहास्तव झाला. ह्या विवाहास खुद्द अदिलशहा व दरबारचे सगळे सरदार आले असून या वेळीं नजरनजराणा व आहेर किती झाला याची गणना नाही. राजांनी दानधर्म, भोजने, मेजवान्या इत्यादिकांत विपुल द्रव्य खर्चिले. महाराजांच्या दुसऱ्या बायकोचे नांव सोयराबाई असें ठेविले.

***

भाग पांचवा

# शिवाजीमहाराजांचें शिक्षण

महापुरुष निर्माण होण्यास अनुकूल परिस्थिति व सुशिक्षण यांची अपेक्षा असते. ही शिवाजी महाराजांस चांगली प्राप्त झाली होतीं त्यांच्या ठायीच्या ज्या अपरिमित यवनद्वेषामुळे त्यांस शहाजीराजांनी आपणाकडून दूर केले त्याचे बाळकडूं त्यांना त्यांच्या परमप्रिय मातेकडून मिळालें होते; आणि स्वातंत्र्यप्राप्तिविषयीची प्रबळ आकांक्षा त्यांच्या ठायीं उद्भवून विकास पावण्यास त्यांची जिजामाताच कारण झाली. भोसल्यांच्या कुळांत शककर्ता निर्माण होणार असें जें भविष्य होतें तें त्या भाविक स्त्रीला खरें वाटे. शहाजीराजांनी केलेल्या पराक्रमांचे पर्यवसान स्वातंत्र्यप्राप्तीत होईल असें तिला वाटण्यास प्रबळ कारण असल्यामुळें ही गोष्ट असंभाव्य नाही असे तिला वाटत असे. मोगलांच्या प्रबळ सेनेपुढे राजांना हार खावी लागली नसती तर हा योग खात्रीने प्राप्त झाला असता. पुढे आपल्या पुत्राच्या ठायीं विकास पावत असलेले सद्गुण पाहून तिला असें वाटू लागले कीं हा आपला पुत्र हें भविष्य खरें करून दाखवील; आणि भोसल्यांच्या व जाधवांच्या घराण्याचें राज्य ज्या यवनांनी हिरावून घेतलें व आपल्या महापराक्रमी पतीला हतवीर्य केलें, त्यांचा सूड उगविण्याचें सामर्थ्य ह्या आपल्या पुत्राला प्राप्त होईल असें स्वप्न तिला एव्हांपासूनच पडूं लागलें होतें. ह्या संबंधाच्या गोष्टी ती आपल्या बाळराजांशी नेहमी बोलत असे. उभय कुलांच्या राजवैभवाचे हरण यवनांनी केल्यामुळें आपणांस किती हीन स्थिति प्राप्त झाली आहे तें ती त्यांस वेळोवेळा सांगत असे. शहाजीराजांनी नुकतेच जे पराक्रम केले होते त्यांचें वर्णन ती त्यांजपाशी पुनःपुन: करून त्यांच्या हृदयांत तसे पराक्रम करण्याची इच्छा जागृत होईल असें करण्याविषयी ती नेहमी झटत असे. गोहत्या करणाऱ्या, देवब्राह्मणांची विडंबना करणाऱ्या, क्रूर व विश्वासघातकी अशा यवनांची सेवा करून योगक्षेम चालविणे अत्यंत निंद्य व विपत्तिमूलक आहे असा बोध ती त्यांना अहर्निश करीत असे. ती मोठी धर्मशील असल्यामुळें घरीं नेहमी पोथ्यापुराणें वाचवी. त्यांतील कथा ऐकण्याचा नाद महाराजांस

लहानपणापासून लागला होता. ह्यामुळें स्वधर्माविषयीचा अभिमान व श्रद्धा ही त्यांच्या हृदयांत अल्प वयांतच उद्भवली. रामरावण, कौरवपांडव इत्यादिकांचे युद्धप्रसंग ऐकून त्यांच्या अंगांत स्फुरण येत असे; आणि आपल्या वडिलांचे पराक्रम स्वमातेच्या तोंडून पुन पुनः ऐकून तसे आपण करू व स्वजीविताचे सार्थक्य करू असा हुरूप त्यांच्या ठायी समजू लागल्यापासून उत्पन्न होऊन तो दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेला. त्यांच्या आचरणास चांगले वळण लागावे, त्यांना कुसंगति लागू नये, त्यांना कोणहि व्यसन किंवा ढंग लागू नये म्हणून जिजामाता फारच जपत असे. ह्याप्रमाणे महाराजांच्या ठायीं साहस, धैर्य, शौर्य, मर्दुमकी, सदाचारप्रीतिं, स्वधर्मनिष्ठा, स्वातंत्र्यप्रीति इत्यादि सद्‌गुणांचा विकास ह्या माउलीच्या शिक्षणानें चांगला झाला. यवनांचे ताबेदार होऊन परतंत्रतेंत आयुष्य क्रमण करण्यांत काहीएक पुरुषार्थ नाहीं, यवनांवर भरंवसा ठेवून त्यांची सेवा कितीहि इमानानें केली तरी तिचे काहीएक चीज व्हावयाचें नाहीं व खऱ्या सौख्याचा लाभ घडावयाचा नाहीं, ह्या विचारांचे बाळकडू ह्या मातेने बाळराजांस भरपूर पाजले होतें. शिवाय त्यांचें बाळपण अतिबिकट स्थितींत गेलें असल्यामुळें मातेचा हा सुबोध त्यांच्या हृदयांत चांगलाच प्रतीत झाला. एकंदरींत तात्पर्य काय कीं जिजाबाईसारखी परम सात्विक, भाविक, स्वाभिमानी व स्वोत्कर्षप्रिय माता शिवाजीमहाराजांसारख्या परममातृभक्त व बुद्धिमान् पुरुषाला सुदैवाने प्राप्त होऊन तिच्या अतिप्रेमळ बोधाचा ठसा त्यांच्या चित्तावर उत्कष्ट उठून त्यांच्या हातून सर्व जगास थक्क करून सोडणारे व हिंदू प्रजेस यवनत्रासापासून मुक्त करणारे पराक्रम घडले.

आतां दादाजी कोंडदेवाकडून महाराजांस कोणत्या प्रकारच्या शिक्षणाचा लाभ झाला तें सांगतो. हा ब्राह्मण मोठा हुशार, स्वकर्तव्यदक्ष व स्वामिकार्यासाठी अतिप्रामाणिकपणानें व परिश्रमपूर्वक झटणारा असा होता. त्यानें महाराजांस युद्धकला शिकविण्याची उत्तम व्यवस्था केली. ह्या प्रकारच्या शिक्षणास जिजाबाईने यापूर्वीच आरंभ केला होता. याशिवाय आणखी तिने महाराजांकडून विद्याभ्यासहि थोडासा करविला होता. हें शिक्षण दादाजीच्या व्यवस्थेखालीं विशेष चांगले झालें. महाराजांना पारशी व उर्दू ह्या भाषा चांगल्या शिकविल्या असून त्यांना थोडेंसें संस्कृतहि शिकविले होते. त्यांनीं कांहीं पदे व आरत्या केल्या असून त्यांत उर्दू भाषेतील शब्द बरेच आहेत असें म्हणतात. दादाजी स्वतः धर्मशील असल्यामुळें तो नेहमी कीर्तन करवी व पुराणे वाचवी. त्यांचें महाराजांस नित्य श्रवण घडूं लागलें.

प्रत्यक्ष दादाजीकडून महाराजांस आणखी एका प्रकारचे चांगलें शिक्षण मिळाले. तो प्रकार असाः जमाबंदीचें काम कसें करावे, प्रांतांचें उत्पन्न वाढविण्यास कोणते उपाय योजावे, रयतेस खुष कसें राखावें, हाताखालील लोकांशी कसें ममतेनें वागावे, न्यायमनसुबा कसा निपक्षपातीपणानें व निरपेक्षबुद्धीनें करावा, घोडे वगैरे जनावरांची जोपासना कशी करावी, शिपाईप्यादे वगैरे नोकर पदरी ठेवावयाचे ते कसे पारखून ठेवावे, नोकरांस राजी राखून त्यांच्याकडून इष्ट कामें कशी बिनबोभाट करून घ्यावी, पागा व लष्कर यांची शिस्त कशी राखावी इत्यादि गोष्टींचे ज्ञान त्यांस लहान वयांतच चांगलें मिळाले. शिवाय मुत्सद्देगिरीचे शिक्षण त्यांस दादाजीकडून बरेंच मिळाले. महाराज दुसऱ्या खेपेस विजापुरास गेले तेव्हां त्यांचे वडील इतर सरदारांशी व मुत्सद्यांशीं राजकीय वाटाघाटी नेहमी करीत त्या ते लक्षपूर्वक ऐकत बसत; व अदिलशाही दरबारातहि त्यांना बऱ्याच गोष्टी ऐकावयास व पाहावयास मिळाल्या. त्यामुळें त्यांच्या व्यावहारिक व राजकीय शिक्षणांत अल्प वयांतच पुष्कळ भर पडली.

येथपर्यंत महाराजांच्या बहुतेक व्यवहारिक, नैतिक व राजकीय शिक्षणाचा प्रकार सांगितला. याशिवाय आणखी त्यांच्याकडून ग्रंथाध्ययन करविल्याची विश्वसनीय अशी माहिती मिळत नाही. तरी त्यांना लिहिणे वाचणे शिकविलें असून पारशी, उर्दू व संस्कृत ह्या भाषाहि थोड्याफार शिकविल्याचा पुरावा असल्याचेवर सांगितलेंच आहे. शिवाय वामन, तुकाराम, रामदास, भूषण वगैरे कवींनी त्यांच्या संबंधानें जे स्तुतिपर उद्धार आपल्या काव्यांत काढिले आहेत त्यांवरून त्यांचें विद्याध्ययन बरेंच झालें होतें असें दिसते.

***

भाग सहावा

# स्वराज्यस्थापनेची सिद्धता

विजापुराहून परत आल्यावर शिवाजीमहाराजांनी आपला कृतसंकल्प पुढीलप्रमाणें बोलून दाखविला. ''वडिलांनीं यवनांची ताबेदारी पतकरून संपादिलेल्या दौलतीवर निर्वाह करून राहणे मला योग्य वाटत नाहीं. स्वतांच्या पराक्रमाने नवीन दौलत संपादण्याचा मी निर्धार केला आहे. माझ्या हातून काही नवीन कमाई होईल तरच भोसल्यांच्या कुळांत जन्म घेतल्याचे सार्थक्य. पुरुषाने स्वतःच्या कमाईचे अन्न खावे यांतच खरा पुरुषार्थ आहे. दैवावर भरवसा ठेवून राहणे सर्वथा योग्य नव्हे. दैव पंगु आहे. पुरुषानें स्वप्रयत्नानें त्यास अबल केलें पाहिजे. यवनांनी आम्हा हिंदूच्या स्वातंत्र्याचा अपहार करून गोब्राह्मणास व क्षेत्रादिकांस अनेक प्रकारीं त्रास दिला आहे, व हिंदू धर्माची चोहोकडे ग्लानि होत चालली आहे. हा अनिष्ट प्रकार बंद करून स्वातंत्र्याची पुन: स्थापना करण्याविषयी तनमनधनेंकरून उद्योग आरंभिण्याचा मी निश्चय केला आहे. ह्या सत्कार्यसिद्धीसाठी प्रयत्न करितांना सर्वस्वनाश होऊन स्वप्राण वेचावे लागले तरी चिंता नाहीं. आजपर्यंत माझें वय व्यर्थ गेलें त्यास आतां उपाय नाहीं. इतःपर आयत्या पिठावर रेघा ओढीत बसून प्राप्त स्थितींत समाधान मानून राहण्यात मुळींच पुरुषार्थ नाहीं.'' हा त्यांचा संकल्प दादाजीस कळला तेव्हां त्याने त्यांना त्यापासून परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण तो सगळा व्यर्थ गेला. त्याचा नेभळेपणाचा उपदेश त्यांनीं मुळी मनास आणिला नाही. त्यांचे तेज विलक्षण असून अंगीकृत कार्याचें महत्त्व व ते साध्य करून घेण्यास लागणारी साधनसामुग्री यांचे ज्ञान त्यांच्या ठायीं पूर्णपणे वसत असल्याकारणानें ते आपल्या संकल्पापासून अणुमात्र परावृत्त झाले नाहींत. त्यांच्या मनांत केवळ अल्प वयांत असा दृढ संकल्प उद्‌भवण्याला त्यांची स्वाभिमानी व महत्त्वाकांक्षी परमप्रिय माताच केवळ कारण होय. हा मातृबोधाचा प्रभाव किती विलक्षण आहे पाहा! मातृमुखानें निघालेला प्रेमळ व मधुर असा एक शब्द दशसहस्त्र उपदेशकांच्या बोधप्रचुर व्याख्यानांहून अधिक आहे अशी एक उक्ति

आहें तिची सत्यता महाराजांच्या चरित्रांत चांगली प्रत्ययास येते. यवनाची ताबेदारी प्राण गेला तरी करूं नये; त्यांचें अन्न खाणे म्हणजे विषभक्षण करणें होय; स्वराज्य स्थापन करून हिंदू प्रजेस यवनत्रासापासून मुक्त करण्याच्या प्रयत्नाला मनःपूर्वक लागावयाचें, इत्यादि मर्दुमकीचे विचार त्यांच्या हृदयांत लहानपणीच उद्भवून उत्तरोत्तर दृढ होत गेले ते जिजामातेच्या शिक्षणामुळेच होत. ह्या संबंधाचे सगळे श्रेय ह्या माउलीसच दिले पाहिजे.

महाराजांच्या ह्या धाडसाच्या संकल्पास प्रोत्साहक अशी आणखी एक गोष्ट म्हटली म्हणजे त्यांच्या महाप्रतापी व शौर्यशाली वडिलांचे विलक्षण पराक्रम त्यांच्या डोळ्यांसमोर होते. आपल्यापाशी लोकांचा चांगला जमाव असला तर यवनांशी टक्कर देऊन त्यांस जेरीस आणण्याचे काम कांहीं कठीण नाही हें शहाजीराजांच्या उज्ज्वळ चरित्रावरून त्याच्या लक्षांत चांगले आलें होते. म्हणूनच हे धाडस करण्यास ते बेधडक प्रवृत्त झाले.

पुण्यास परत आल्यावर आपली सगळी जहागीर प्रत्यक्ष जाऊन पाहण्याच्या भिशानें आसपासच्या पाहाडी मुलखात महाराज एकसारखे फिरू लागले. जवळच्या माहीतगार लोकांस बरोबर घेऊन व निरनिराळ्या गांवीं नवे स्नेही करून त्यांच्या साहाय्याने जवळपासच्या बहुतेक स्थलांचे व किल्ल्यांचे निरीक्षण त्यांनी मोठ्या उत्साहाने केले. प्रत्येक किल्ल्याच्या चोरवाटा व दऱ्याखोऱ्यांतील बहुतेक बिकट रस्ते त्यांनी एकूणएक स्वत: हिंडून पाहिले. त्यांची ह्या माहितीविषयींची एवढी उत्कंठा पाहून बरोबरच्या लोकांस मोठे कौतुक वाटे; आणि ऊन किंवा पाऊस, बिकट चढाव किंवा हिंसक श्वापदे यांची भीति किंवा परवा न करितां अशा अल्पवयी राजबिंड्या मुलाने रानावनांतून अविश्रांतपणे भ्रमण करावे हें त्यांस चमत्कारिक वाटे. ज्या प्रांतांत आपल्या चळवळीस आरंभ करावयाचा त्यांतील लोकांशी स्नेह करून त्यांस ते आपलेसे करून घेऊं लागले. कोणी कसाहि मनुष्य असला तरी त्याच्याशी त्यांनीं थोडा वेळ भाषण केलें की तो त्यांस अगदीं भाळून जात असे. ही अप्रतिम कला त्यांस अगदीं अल्प वयांत साध्य झाल्यामुळेच मुख्यत: त्यांस अंगीकृत कार्यात पुढें उज्जवल यश लाभले.

महाराज पदरच्या माणसांना राजी ठेवून त्यांशी ममतेने वागत. आपण हलके व हे श्रेष्ठ असा भास त्यांच्या मनांस बिलकूल होऊं नये अशी सावधगिरी ते त्यांच्याशी वागण्यांत सर्वदा घेत असत. त्यांस कांहीं संकट किंवा अडचण असल्यास ती मोठ्या

स्नेहभावाने ऐकून घेऊन आपल्याकडून होईल तितके द्रव्यादिकांचें साहाय्य त्यांना करण्यास ते सर्वदा तत्पर असत. त्यामुळें ज्यालात्याला वाटूं लागलें कीं हा धनी परम दयाळू आहे. याशी इमानाने वागून याच्या आज्ञेत आपण सर्वदा राहिलो तर आपलें कल्याण होईल. असा त्यांनीं सर्वांस वेध लाविला. मावळे लोकांवर त्यांची फारच मेहरबानी असे. हे लोक अडाणी व बावळट दिसत. तरी ते मोठे इमानी होते व सांगितलेलें काम हुशारीने व अनन्य भावाने करण्यास झटत. केलेल्या कामगिरीबद्दल थोडेसे इनाम दिलें तरी तेवढ्यानेंच संतुष्ट होऊन ते आपल्या धन्याशीं अधिकाधिक इतबारानें वागत. हा मायाळू व उदार धनी आपल्याशी प्रेमळपणानें वागतो व गोड बोलतो हें पाहून ते त्यांच्यावर अतिशयित प्रीति करूं लागले. त्यांच्या मनांत महाराजाविषयीं अत्यंत अभिमान व भक्ति ह्या वृत्ति उत्पन्न झाल्या; आणि जेथे ह्या धन्याचे चरण तेथें आपलें शिर, त्याच्या इष्टकार्यसिद्धीसाठीं समयी प्राणहि देणे प्राप्त झालें तरी चिंता नाही असा त्यांच्या मनाचा निर्धार झाला.

ह्या मावळ्यांचे पुढारी काहीं देशमुख होते, त्यांचा महाराजांनी स्नेह संपादून त्यांना आपल्या इष्टकार्यास अनुकूळ करून घेतलें. त्यांपैकीं एसाजी कंक, तानाजी मालुसरे व बाजी पासलकर हे तिघे इतिहासांत प्रसिद्ध आहेत. हे तिन्ही पुरुष महाराजांच्या प्रत्येक कारस्थानांत पहिल्यापासून होते. दादाजी कोंडदेव आपल्या उद्दिष्ट कार्यास उत्तेजन देत नाहीं हें पाहून महाराजांनी त्याच्या हाताखालच्या कारकूनमंडळीकडे आपला बेत बोलून दाखवून त्यांस आपल्या मसलतीस अनुकूळ करून घेतलें. गावोगावचे देशमुख व मराठे सरदार कामानिमित्त पुण्यांस आले म्हणजे त्यांस एकीकडे बोलावून आपली मसलत महाराज सांगत व त्यांच्याशीं अशा युक्तीनें व मोहक रीतीनें भाषण करीत कीं ते तत्काळ त्यांच्या त्या मसलतींत सामील होत. त्यांचें वय लहान होतें तरी त्यांचें मर्दुमकीचे व उत्साहजनक भाषण ऐकून व त्यांनीं योजलेल्या मसलतीची साध्यता कितपत आहे हें लक्षांत घेऊन ते देशमुख व सरदार त्यांना तत्काळ वश होऊन त्यांच्या मसलतीत शिरण्यास उद्युक्त होत. सारांश काय कीं महाराजांचा आदरशीलपणा, त्यांचा वीर्योत्साह, त्याचा यवनांविषयी पराकाष्ठेचा द्वेष, स्वधर्मरक्षणाविषयी त्यांचा पूर्ण निर्धार व स्वराज्य स्थापनेने होणाऱ्या अनंत फायद्याचे मनोवेधक रीतीनें प्रतिपादन करण्याची त्यांची उत्कृष्ट शैलीही पाहून कोणी कसाहि कुर्रेबाज, आपढंगी किंवा आपल्यापुरते पाहणारा असला तरी तो महाराजांस अगदी भाळून जात असे.

महाराजांचा स्वराज्यप्राप्तीचा उद्देश सिद्धीस जाण्यास अनुकूल अशी स्थिति ह्या वेळीं पुणे, मावळ वगैरे प्रांतांची होती. हे प्रांत पूर्वी निजामशाहीचे असून ती शाही बुडाल्यावर नुकते अदिलशहाच्या ताब्यांत आले होते. यामुळे त्या सरकारने ह्या प्रांतांची व्यवस्था अद्यापि चांगलीशी लाविली नव्हती. व इकडील किल्ल्यांचा बंदोबस्त नीट ठेविला नव्हता. शिवाय त्या वेळीं अदिलशाही दरबारांत मुत्सद्दीमंडळांत बखेडा माजला होता. मालोजी व शहाजी ह्यांच्याकडे पुणे, सुपे वगैरे प्रांत जहागिरीदाखल असून त्यांचा बंदोबस्त दादाजी सारख्या हुशार कारकुनाने चांगला ठेविल्यामुळें त्यातील प्रजाजन आबाद व सुखी होते, आणि हिंदूंचे राज्य होईल तर आपण सुखी होऊं असे त्यांस वाटूं लागलें होतें. म्हणून शहाजीराजांसारख्या फौज बाळगून असणाऱ्या महापराक्रमी पुरुषाच्या तेजस्वी पुत्राच्या मनांत स्वराज्यस्थापनेची स्फूर्ति होऊन तत्सिद्ध्यार्थ उपाययोजनेतहि तो परम कुशल आहे अशी त्यांची खात्री होऊन त्यास तनमनधनें करून साहाय्य करण्यास ते उद्युक्त झाले.

हें स्वराज्यसाधनसाहित्य महाराजांसारख्या तेजस्वी व कुशाग्रबुद्धि पुरुषास आरंभी अनुकूल झालें तेवढे बस होते; आणि जिजामातेनें त्यांच्या सुपीक मनोभूमीत लावलेले स्वराज्यसाधनप्रीतीचें सद्बीज उत्तम प्रकारें अंकुरित होऊन त्या माउलीच्याच हस्ते त्याचें यथास्थित सेचन झालें, आणि त्यास अनुकूल परिस्थितीचें व उत्साह, आवेश, स्वोत्कर्षलालसा, स्वातंत्र्यप्रीति यवनद्वेष, पित्याचे प्रोत्साहक चरित्र इत्यादि गोष्टीचे उत्कृष्ट खत मिळून त्या अंकुराचा सुंदर वृक्ष बनला; आणि त्याचा शाखाविस्तार समग्र जगास चकित करून टाकणारा असा झाला. ह्या स्वराज्यरूप विशाल वृक्षाच्या मधुरतम फळांचा आस्वाद कांहीं काळ महाराष्ट्रीयांस घडून ते सुखी, संपन्न व कीर्तिमान् झाले.

***

भाग सातवा

# स्वराज्यस्थापनेला आरंभ

मागल्या भागांत सांगितल्याप्रमाणें आसपासच्या प्रांतांची व किल्ल्यांची माहिती चांगली मिळवून महाराजांनी असें ठरविलें कीं मोगल व मुसलमान त्यांच्या ताब्यांत सह्याद्रिबांधारा आहे, त्यावरील किल्ल्यात त्यांचा चांगलासा बंदोबस्त नसल्यामुळें ते हाताशी घालण्याचा क्रम प्रथम सुरू करावा; म्हणजे असें होईल कीं त्या किल्ल्यासभोवतालचा मुलूख सहज जेरदस्तीत येईल; आणि अशा बिकट किल्ल्यांच्या आश्रयाने यवनांशी थोड्याशा लोकांनिशीं टक्कर देता येईल व जे देशमुख आपणांस अनुकूळ होणार नाहींत त्यांच्यावर जरब ठेवून त्यांना आपले अंकित करितां येईल. परंतु विजापूरकरांच्या कोणत्याहि किल्यावर हल्ला करून तो घेण्याचे सामर्थ्य त्यांना त्या वेळीं नव्हतें; व असा स्पष्ट विरोध त्या सरकाराशी करण्यास धजणें त्या वेळीं बरोबर नव्हतें. म्हणून त्यांनी प्रत्यक्ष लढाई टाळून कोणत्यातरी युक्तीने किल्ले हस्तगत करण्याचें ठरविलें.

ह्याप्रमाणें पुण्याच्या नैऋत्येस सुमारें वीस मैलांवर तोरणा नांवाचा एक किल्ला आहे. त्यावरील अमलदाराशीं बोलणे लावण्याकरितां महाराजांनी येसाजी कंक, तानाजी मालसुरे व बाजी पासलकर यांस पाठविलें. त्यांना त्यांनीं असें सांगितलें कीं हा किल्ला तूर्त आमच्या स्वाधीन करा. तो आम्ही पातशहापासून आपल्याकडे करून घेणार आहों. ह्याप्रमाणें त्यांच्याशी सामोपचाराचे बोलणे करून व त्यांस कांहीं लाच देऊन हा किल्ला १६४६ साली महाराजांनी आपल्या ताब्यांत घेतला; आणि विजापूरदरबारांत आपला वकील पाठवून असें कळविले कीं हा किल्ला आमच्या हाती असल्यानें सरकारच्या ताब्यांतल्या इकडच्या मुलखाचा बंदोबस्त नीट राहून उत्पन्नहि जास्त मिळेल. ही आपली बतावणी पचावी म्हणून त्या सालचे नेहमींच्यापेक्षां पुष्कळ जास्त उत्पन्न त्यांनीं विजापुरास पाठवून दिलें.

ह्या किल्याची दागदुजी वगैरे हा करून त्यांना मजबूत केला व त्याला प्रचंडगड असें नवें नांव दिलें. हा किल्ला खणीत असतां त्यांत त्यांना मोठा द्रव्यनिधि सापडला. तो आपणांस देवी प्रसन्न असल्यामुळें सापडला असा प्रवाद त्यांनी चोहोकडे पसरविला. त्यामुळें त्यांच्यावरील लोकांची श्रद्धा विशेषच वृद्धिंगत झाली. ह्या किल्ल्याच्या आग्नेयीस तीन मैलांवर मुरबाड नावाचा एक मोठा डोंगर आहे, त्यावर एक मोठा मजबूत किल्ला बांधून त्यास राजगड असे नांव दिलें: आणि ह्या डोंगराच्या तिन माच्यांना मजबूत तटबंदी करून त्यांस सुवेळा, संजाविती व पद्मावती अशीं नावे दिली; आणि ह्या किल्ल्याजवळील एका खेड्यात फर्माशी आब्यांचीं झाडे लावून तेथें नवी पेठ वसविली व तिला शिवापुरी असें नाव दिलें. येथें मावळे व कोकणें लोक जमवून ते राजकारणे करू लागले. हें त्यांनीं चालविलेले किल्ल्यांचें बांधकाम बंद करण्याविषयी अदिलशहानें त्यांना हुकूम पाठविला, व शहाजीराजे कर्नाटकांत होते त्यास ह्या गोष्टाचा जाब विचारिला. राजांनी असा जबाब पाठविला कीं माझा मुलगा सरकाराच्याविरुद्ध मुळीं वर्तावयाचा नाहीं. तो जो कांहीं खटाटोप करीत असेल तो सरकारच्या तिकडील सत्तेला व आमच्या तिकडील जहागिरीला मजबुती आणण्याकरितांच असला पाहिजे. असा जबाब राजांनी अदिलशहास पाठविला व दादाजीला पत्र पाठवून ह्या गोष्टीबद्दल ठपका दिला. दादाजीने महाराजांना अशी धामधूम न करण्याविषयी यापूर्वी अनेक प्रकारी सांगितले होतें, परंतु तें त्यांनी मनास आणिले नव्हतें. वडिलांच्या ह्या पत्राचाहि त्यांनी मुळी विचार केला नाही. आपल्या धन्याचा मुलगा असा आडदांडपणा करून आदिलशहाच्या इतराजसि पात्र होणार व आपल्या धन्याची दौलत घालविणार हें मनांत येऊन दादाजी झुरणीस लागला आणि शेवटीं आजारी पडून मृत्यू पावला. कोणी म्हणतात कीं ह्या विश्वासू सेवकाने विष प्राशन करून स्वदेहत्याग केला महाराज दादाजीला वडिलांसारखा मान देत असत. ही एक गोष्ट खेरीज करून इतर बाबतीत ते त्याच्या आज्ञेचे सहसा उल्लंघन करीत नसत. दादाजी बिछान्यास खिळला तेव्हां त्याच्यापाशी सगळा वेळ बसून राहून त्याची त्यांनीं शुश्रूषा केली आणि त्यांना औषधोपचारांची वगैरे मुळीं उणीव पडू दिली नाहीं. मरते वेळी दादाजीनें त्यांना एवढेच सांगितलें कीं आपली जहागीर घालवून वडिलांवर संकट न येईल अशी खबरदारी घेऊन जें काय करणें तें करा.

दादाजी मरण पावल्यावर पुण्याकडील सगळ्या जहागिरीची व्यवस्था करण्याचा कुलअखत्यार शहाजीराजांनी आपल्या ह्या कर्तबगार मुलास दिला, व तिथे सारे उत्पन्न

त्यांनीं आपल्या स्वतांच्या खर्चास लावावे असें ठरविलें. राजांच्या जहागिरीपैकी सुपेपरगण्यावर त्यांचा मेहुणा मोहिते याला ठेविलें होतें. त्याला शिवाजी महाराजांनीं असा निरोप पाठविला की तुमच्याकडच्या वसुलाचा सगळा ऐवज व तुमच्या ताब्यांत असलेली तीनशें घोडी घेऊन पुण्यास यावे. तो त्यानें न मानिल्यामुळें त्यांना राग आला, मग त्याच्याकडे शिमग्याचे पोस्त मागण्याच्या बहाण्याने जाऊन त्यांनी त्याला कैद केलें व त्याच्या ताब्यांतली पागा व प्रांत ही हस्तगत केली. तो आपल्या वडिलांचा मेहुणा होता म्हणून त्याचा कोणत्याही प्रकारे उपमर्द न करितां त्याला त्यांनी मोठ्या इतमामाने कर्नाटकांत वडिलांकडे रवाना केले.

पुण्याच्या पूर्वेस चाकण किल्ला आहें. तो शहाजीराजांच्या जहागिरीपैकी असून फिरंगोजी नरसाला याच्या ताब्यांत होता. दादाजी कोंडदेव वारल्यावर हा नरसाला त्या किल्ल्यावर स्वतंत्र होऊन बसला होता. महाराजांनी त्याला सामोपचारानें वश करून घेऊन आपला अंकित केलें, आणि त्या किल्ल्याची व्यवस्था त्याच्याकडेच ठेविली. पुढें शिवनेरी किल्ला त्यांनीं हस्तगत केला त्याचीहि व्यवस्था ह्या नरसाल्याकडेच दिली. हे किल्ले ताब्यांत आल्यावर बारामती व इंदापूर येथील ठाणेदार आपण होऊन महाराजांचे अंकित होऊन त्यांचा हुकूम मानू लागले. पुण्याजवळील कोंडाणा किल्ला त्यावेळी विजापूरकरांच्या ताब्यांत असून त्यावर फौजफाटा बराच होता. हा किल्ला आपल्या हातीं आल्यावाचून आपल्या पुण्याच्या जहागिरीस बळकटी येणार नाहीं असे वाटून तो कसा हस्तगत करावा याचा महाराजांना विचार पडला. तो लढून सर करण्याचें सामर्थ्य त्यांना त्या वेळीं नव्हतें; व असा उघड विरोध केल्याने आपला नाश होण्याची त्यांस भीति होती. म्हणून त्यांनी त्या किल्ल्यावरील मुसलमान अमलदारास लाच देऊन तो आपल्या ताब्यात घेतला. तो किल्ला हाती आल्यावर त्याची नीट दागदुजी वगैरे करून त्याला त्यांनी सिंहगड असे नाव दिले.

यानंतर त्यांचें लक्ष पुरंदर किल्ल्याकडे गेलें. तो नीळकंठ नांवाच्या एका ब्राह्मणाच्या हाती असून तो त्यावर स्वतंत्र होऊन बसला होता. तो मरण पावल्यावर त्याचे तिघे मुलगे निळोपंत, पिलाजी व संक्राजी हे त्या किल्ल्याच्या वाटणीसाठी भांडू लागले. त्यांनी हे आपलें भांडण मिटावण्याचें काम महाराजांना सांगितलें. त्याचें भाडण मिटविण्याच्या मिशानें त्यांच्या किल्यावर जाऊन महाराजांनी त्या तिघा भावांस कैद केले आणि किल्ला हस्तगत केला. मग त्यांपैकीं वडील भावास त्यांनीं किल्ल्याखालील

कांहीं जमिनीचे उत्पन्न लावून दिले व दुसऱ्या दोघां भावांस आपल्या पदरी नोकरीस ठेविले. हा किल्ला हाती आल्यामुळें त्यांच्या इंदापूर, सुपे वगैरे परगण्यांना बळकटी आली. असाच विसापूरचा किल्लाहि त्यानीं हस्तगत केला. ह्या किल्ल्यावर शहाजीराजांच्या हाताखालचा शिद्धी बिलाल हबशी या नांवाचा एक सरदार होता. त्याच्याकडेच त्या किल्ल्याचा हवाला राहू द्यावा असा महाराजाचा मनोदय होता. परंतु त्या सरदाराचें असें म्हणणें पडलें की ''शिवाजी राजे पुंडावा करीत आहेत. त्यांचे आचरण केवळ बेकैद आहे. हा त्यांचा स्वनाशाचा उद्योग आहे. अशांच्या पदरी मी राहूं इच्छीत नाहीं.'' हे त्याचें उत्तर ऐकून महाराजांना मुळीं राग आला नाही; कांकीं तो शहाजीराजांचा जुना नोकर होता. त्याची यत्किंचित्‌ह बेअदबी होऊं न देता उलट त्याची चांगली बिदागी करून त्यास त्यांनीं शहाजीराजाकडे रवाना केलें. यापुढे त्यांनी तिकोना, लोहगड व राजमाची हे पुणेंपरगण्याच्या वायव्येकडील किल्ले हस्तगत केले.

ह्याप्रमाणें महाराजांनी आपल्या जहागिरीच्या आसपासचे मुख्यमुख्य किल्ले आरंभी स्वाधीन करून घेऊन तिला चांगली बळकटी आणिली आणि चाकण किल्ल्यापासून निरा नदीपर्यत सगळा प्रांत त्यांच्या सत्तेत आला. काबीज केलेल्या प्रत्येक किल्ल्याची दागदुजी वगैरे करून त्यावर त्यांनी मावळे लोक रखवालीस ठेविले. सांपडतील तेवढे हुशार व इमानी लोक चांगले पारखून आपल्या पदरीं ठेवण्याचा क्रम त्यांनीं चालू ठेविला. ह्या वेळीं त्याच्यापाशी मावळे लोकांचा दहा हजारापर्यत जमाव झाला, व त्यांची पागा तीन हजारांपर्यंत वाढली. येसाजी कंक, तानाजी मालसुरे व बाजी पासलकर यास त्यांनीं मावळ्यांच्या लष्करावर सरदार नेमिले. ह्या वेळीं त्यांच्याकडे द्रव्यबळ नसल्यामुळें त्यांना आपलें सैन्यबळ वाढविता येईना. त्यांच्या पदरी राहून नोकरी करण्यास पुष्कळ लोक तयार झाले होते, पण त्यांना मुशाहिरा देण्याचे सामर्थ्य महाराजांना नव्हते. यास्तव कोठूनतरी द्रव्य मिळविल्यावांचून स्वराज्यसंपादनाचें आपले कार्य सिद्धीस जाणें अशक्य आहे असें त्यांस वाटलें; आणि मोठमोठ्या सावकारांकडून कर्जी द्रव्य घेण्याचा क्रम त्यांनीं सुरू केला. जे सावकर त्यांना कर्ज देण्यास राजी नसत त्यांच्यावर जुलूम करून त्यांचें द्रव्य ते जप्त करीत असत. असा जुलूम करणें बरोबर नव्हतें हें खरें. परंतु स्वराज्यसिद्धि व स्वधर्मरक्षण ही महत्कार्ये साध्य करण्यासाठी त्यांना हा अन्याय नाइलाजास्तव करावा लागला.

एके समयी त्यांना अशी बातमी लागली कीं कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद याच्याकडून मोठा खजिना विजापूरदरबारी जात आहे, तो लुटण्याचे मनांत आणून महाराजांनी खजिना घेऊन जाणारांवर हल्ला करून त्यास उधळून लाविलें आणि सगळा ऐवज हस्तगत करून राजगडावर नेला. ह्या धामधुमीत महाराजांचे जे लोक पडले त्यांच्या कुटुंबांचा निर्वाह महाराजांनी चालविला आणि ज्यांनी चांगली कामंगिरी केली त्यांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें इनामे वगैरे देऊन उत्तेजन दिले. पुढे ह्या मुल्लाशी उघड वैर माजून त्याच्यावर महाराजांनी आबाजी सोनदेव यांस फौज देऊन पाठविलें. त्याने कल्याण हस्तगत करून मुल्लास कैद केले. हे विजयाचें वर्तमान महाराजास कळताच ते जातीनें कल्याणास गेलें. त्यांनीं मुल्लास बंदीतून सोडवून त्याचा मोठा आदरसन्मान केला व मोठ्याइतमामानें त्याला विजापुरास रवाना केले. ह्या लढाईच्या गर्दीत आबाजी सोनदेवानें ह्या मुल्लाची एक सून पकडून ठेविली होती. महाराज कल्याणास आले तेव्हां त्यानें त्यांस म्हटलें: ''ह्या मोहिमेत एक अतिलावण्यसंपन्न तरुण स्त्री सापडली आहे. ती महाराजांच्या सेवेस योग्य आहे असे वाटल्यावरून तिला ठेवून दिलें आहे.'' हें ऐकून महाराजांनी तिला आपल्याकडे घेऊन यावयास सांगितलें. आबाजीने तिला चांगली सजवून महाराजांपुढे आणिलें. तिला पाहून ते म्हणाले: ''आमच्या मातुश्रीचे लावण्य ह्या बाईसारखें असतें तर आमचेंहि रूप हिच्यासारखें झालें असतें.'' हे ऐकून जवळच्या लोकांस त्यांची अशी निग्रही वृत्ति पाहून मोठा अचंबा वाटला. महाराज आबाजी सोनदेवास म्हणाले: ''ज्याला यश पाहिजे आहे त्यानें परस्त्रीचा अंभिलाष कदापि धरूं नये. राजानें उच्छिष्ट स्त्रीचा अंगीकार करूं नये. परस्त्रीचा अभिलाष केल्यानें रावणासारखे बलाढ्य पुरुष नाश पावले आहेत, तेथें आमच्या सारख्याची कथा काय! राजास सर्व प्रजा अपत्यासमान आहे.'' अशा तरुण सत्ताधीशाचा हा असा मनोनिग्रह व पापभीरूता पाहून व त्याचा तो गंभीरपणाचा बोध ऐकून सर्वांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला, आणि हे कोणी महापुरुष आहेत अशी सगळ्यांची भावना झाली. मग महाराजानी त्या तरुण स्त्रीस वस्त्राभरणें देऊन विजापुरास तिच्या सासऱ्याकडे पाठवून दिलें. ताब्यांत आलेल्या ह्या मुलखाच्या बंदोबस्ताचें काम त्यांनीं आबाजी सोनदेवास सांगितले.

ह्या विजयाने महाराजांस व त्यांच्या लोकांसहि मोठाच हुरूप आला, आणि त्यांनी आसपासचे किल्ले हस्तगत करण्याचा धुमधडाका चालविला. किल्लेदार सामोपचाराने

किल्ले सोडून देतात किंवा नाहीं ते ते पाहत; तसे ते करारास आलें नाहींत तर किल्ल्यावर अकस्मात् छापे घालून ते सर करीत. एखाद्या किल्ल्यावर अशा रीतीनें प्रवेश नच झाला तर त्या किल्ल्यावरील थोड्याबहुत रखवालदारांशी भेद करीत आणि धारकऱ्यांच्या डोक्यांवर गवताच्या व लाकडांच्या मोळ्या देऊन त्यांतून तरवारी, बंदुका वगैरे किल्ल्यावर नेत. मग तेथल्या फोडलेल्या लोकांच्या साहाय्याने इतरांशी लढून किल्ला सर करीत. असा महाराजांनी क्रम चालू ठेवून कांगारी, तुंग, तिकोनी, लोहगड, राजमाची, कुवारी, भोरप, धनवड, केलना, माहुली वगैरे येथे चित्र आहे. किल्ले घेतले. त्या प्रांतांत देशमुख पुंडावा करीत व पाळगार रयतेस फारच उपद्रव देत, त्यांस महाराजांनीं जेरीस आणून किंवा ममता दाखवून आपले अंकित केले, व सगळा मावळप्रांत त्यांच्या त्रासांतून सोडवून सुखी व आबाद केला.

कोंकणातला बराच मुलूख जंजिऱ्याच्या शिद्दीने हाताखाली घातला होता; आणि तो हिंदू प्रजेस फार छळी. त्याच्या नोकरीस सोडवळकर व कोडवळकर असे दोघे जमेदार होते, त्यांची अनुकूलता मिळाल्यावरून महाराजांनीं कोंकणांत स्वारी करून तळा व घोसाळा हे किल्ले स्वाधीन करून घेतले; आणि ह्या किल्ल्याच्या आसपासचा बराच प्रांत त्यांच्या ताब्यात आला. हा प्रांत कायमचा हातीं राहावा म्हणून त्यांनीं बीरवाडी व रायरी ह्या डोंगरांवर मजबूत किल्ले बांधिले. त्यापैका एक रायगड ह्या नावाने पुढे प्रसिद्धीस आला.

त्या वेळीं राजापूरशहर शिद्दीच्या अमलातील होतें. ह्या शहरांत मोठा व्यापार चालत असून येथें चांगले धनिक लोक आहेत असें कळल्यावरून महाराजांनी त्यावर हल्ला करून व त्याची नाकेबंदी करून तें लुटण्याचा बेत केला. तेथल्या कमावीसदारानें त्यांच्याशी सामना करण्याचा घाट घातला; पण त्यास त्यांनी चांगले शासन केल्यामुळें तो शरण आला. मग तेथल्या व्यापाऱ्यांकडून व श्रीमंत लोकांकडून काढवलें तितकें द्रव्य त्यांनीं काढिले.

कोंकणांतल्या ह्या पहिल्या मोहिमेंत महाराजांस दोन मोठे लाभ झाले. एक असा: त्यांना गोवलकर सावंतांनी एक मोठी नामी तरवार नजर केली. तीबद्दल त्यांनी त्यांस तीनशे होन व पोषाख दिला व आपल्या पदरीं नोकरीस ठेविले. ह्या तरवारीचें नाव त्यांनीं भवानी असे ठेविले. ही तरवार घेतल्यावाचून ते पुढें कोणत्याहि मोहिमेंस निघत नसत. ती हाती असली म्हणजे आपणांस यश हटकून यावयाचें अशी त्यांची भावना असे. म्हणून ते तिची नित्य पूजा करीत.

दुसरा लाभ असा : त्यांना ह्या मोहिमेंत बाळाजी आवजी चिटणीस हा अत्यंत इमानी व हुशार कारकून मिळाला. ह्या बाळाजीचा बाप आबाजी हरि चित्रे हा शिद्दिचा दिवाण होता. त्याजवर शिद्दीची इतराजी होऊन त्याने त्याला व त्यांच्या भावाला ठार मारिलें व त्याच्या बायकोमुलांस मक्केस नेऊन गुलाम म्हणून विकण्यासाठी रवाना केलें. बाळाजीची आई मोठी हुशार बाई होतीं. तिने खलाशांचे मन वळवून आपणांस राजापुरास नेऊन विकावयास सांगितलें. तेथें तिचा भाऊ विसाजी शंकर हा मोठा व्यापारी होता. त्यानें त्यांस खलाशाकडून विकत घेतलें. त्या बाईचे तीन मुलगे होते. एक बाळाजी, हा वडील मुलगा; दुसरा चिमणाजी व तिसरा शामजी. यांचें त्या मामाने चांगले संगोपन करून त्यांस शिक्षण दिलें. बाळाजी मोठा झाल्यावर एका कसबेदाराच्या हाताखालीं कारकून होता. शिवाजीमहाराजांची स्वारी कोंकणांत आली तेव्हा त्यानें त्यांस आपल्या दैन्यावस्थेच्या हकीकतीचे एक पत्र पाठविले. त्याच्या त्या पत्राचे अक्षर पाहून महाराज फार खुष झाले आणि त्याला आपले पदरी कारकुनाची नोकरी पतकरून राहावे असा जबाब पाठविला. त्यास बाळाजीने असें प्रत्युत्तर पाठविलें कीं मामाचे कर्ज आहे तें फिटल्यावाचून मला आपल्याकडे येववत नाही. पुढें महाराज राजापुरास गेले तेव्हां त्यांनीं बाळाजीचा शोध करवून त्याला आपल्याकडे आणविले. हें बाळाजीच्या आईस कळताच ती घाबरून गेली, आणि महाराजांपाशीं येऊन तिने त्यांच्या चरणी लोटांगण घालून आपली सगळी हकीगत त्यांस निवेदन केली. ती ऐकून महाराजांस फार गहिंवर आला; आणि तिच्या दुसऱ्या दोघां मुलांसहि बोलावून आणून तिला महाराजांनी आश्वासन दिलें कीं, ''जसे हे तुझे तिघे मुलगे तसाच मी तुझा चवथा मुलगा असें समज. ह्या तिघा मुलांस मजबरोबर पाठीव मी त्यांचें कल्याण करीन.'' असें बोलून त्यांनीं बाळाजीस आपला चिटणीस नेमिलें, चिमणाजीस जमाखर्ची लिहिणें चांगले येत असे म्हणून त्याला आपला दफ्तरदार केलें. आणि शामजीस रायगडचा कारखानीस केलें.

***

भाग आठवा

# पितृसंकटनिवारण (सन १६४९– ५३)

शिवाजीमहाराजांनी विजापूरदरबारांत जाणारा खजिना लुटला, कल्याणास अदिलशहाचा सुभेदार होता त्याचें समूळ उत्पाटन करून कल्याणाचा सगळा प्रांत काबीज केला, जवळपासचे बहुतेक किल्ले हस्तगत केले व नवीन किल्ले बांधिले, जंजिऱ्याच्या शिद्दीचे कांहीं किल्ले व प्रांत सर केले, राजापूरशहर लुटले इत्यादी गोष्टी विजापूरदरबारास कळून तेथें मोठी खळबळ उडून गेली. महाराजांच्या ह्या धामधुमीमुळें अदिलशहाला असा संशय आला कीं शहाजीराजांनी आपल्या ह्या मुलास आंतून सांगितल्यावरून यान हें असें उघड बंड आरंभिलें आहे. त्यांत आणखी शहाजीराजांच्या हातीं कर्नाटक प्रांताची व्यवस्था आल्यावर तिकडच्या लोकांचा विश्वास संपादून ते तिकडे स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या बेतांत आहेत असाहि त्याला पक्का वहीम आला होता.

असा संशय अदिलशहास आला खरा, पण त्या पितापुत्रांचे उघडपणे पारिपत्य करण्यास प्रवृत्त होणें धोक्याचे होतें. म्हणून त्यानें त्यांचा काटा काढण्याची कांहींतरी युक्ति योजावी असें ठरविलें. त्यानें शहाजीराजांस असा हुकूम पाठविला कीं, तुम्ही शिवाजीचा पुंडावा बंद करावा. त्याचा बंदोबस्त तुम्ही करणार नाहीत तर तुमच्यावर इतराजी होऊन तुमची जहागीर जप्त करण्यांत येईल व त्याला आणि तुम्हांला शासन करण्यांत येईल.'' शहाजीराजांनी ह्याचा जबाब पाठविला तो असा: ''शिवाजी माझ्या हुकमांत नाहीं. माझा त्याच्यापुढे कांहीं इलाज चालणार नाही. मी पातशहाचा एकनिष्ठ सेवक आहें. यांत माझी तकशीर बिलकूल नाही. हजरतींनी शिवाजीवर स्वारी करून त्याला वाटेल ती शिक्षा करावी. त्यास मी आड आलों तर माझा मुलाहिजा ठेवू नये.'' ह्याप्रमाणें राजांकडून आलेल्या उत्तराने अदिलशहाची खात्री झाली नाहीं. कर्नाटकांत मुस्तफाखान मोहिमेवर गेला होता, त्यास त्यानें असा गुप्त हुकूम पाठविला कीं

शहाजीराजांस युक्तीने पकडून विजापुरास पाठवावे. त्यानें ती कामगिरी मुधोळच्या घोरपड्यास सांगितल्यावरून त्यानें राजास कसें दग्यानें पकडून विजापुरास रवाना केले तें मागें सांगितलेंच आहे.

अदिलशहानें त्यांस असें निक्षून सांगितले कीं तुम्ही आपल्या मुलाचे बंड मोडून टाका, नाहींतर देहांतशासनास तयार व्हा. राजांनीं त्यांस एकच जबाब दिला, तो असा: ''शिवाजीचा व माझा कांहीं एक संबंध नाही. सरकारानेंच त्याला हवे तसें शासन करावे.'' ह्या उत्तराने अदिलशहाचे समाधान न होऊन त्यानें त्यांच्याकडून महाराजांना पुढील आशयाचे पत्र आपल्या समक्ष लिहविलें: ''तुम्ही एकदम विजापुरास निघून यावें व विजापूरसरकाराचे जे काहीं किल्ले व प्रात बळकाविले असतील ते त्यांच्या स्वाधीन करावे. तुमच्यामुळे आमच्यावर त्यांची अतिशयित इतराजी झाली आहे.''

हे असे वडिलांचे पत्र आले तेव्हा महाराजांना मोठा विचार पडला. त्यांची आज्ञा शिरसा वंद्य करून आजपर्यंत मिळविलेले किल्ले व प्रांत सोडून द्यावे व यवनांचे अंकित होऊन रहावे तर आपण आरंभिलेले कार्य असिद्ध रहाते; आणि ज्या स्थितीचा आपणास येवढा तिटकारा वाटत आहे ती पुनरपि स्वीकारून राहणे भाग पडणार आहे, हा विचार त्यांच्या मनात येऊन ते अगदी चिंताक्रांत झाले. परंतु त्यांची स्त्री सईबाई, मातुश्री व पदरचे कारकून यांचे असे मत पडले की राज्य साधून स्वधर्मांचे व गोब्राह्मणांचे रक्षण करावयाचे तर असा मोह काय कामाचा? हा विचार त्यांना पसंत वाटून त्यांनी वडिलांस असा जबाब पाठविलाः ''आम्ही तिकडे आल्याने काही एक उपयोग होणार नाही. घेतलेले किल्ले व प्रांत आम्ही सोडून देण्यास कदापि तयार होणार नाही व आरंभिलेला उद्योग सहसा सोडणार नाही. तरी आपल्या दैवी असेल तसे आपणांस होईल, व आमच्या दैवी असेल तसें आम्ही करूं.''

हें महाराजांचे पत्र राजांनीं आदिलशहास दाखविले. परंतु तेवढ्यानें त्याचें समाधान झालें नाही. यांत सगळी शहाजीराजांची लबाडी आहे, तरी त्यांना शिक्षा केली म्हणजे शिवाजी महाराज ताळ्यावर येतील असें त्याला वाटलें. मग त्यानें भिंतीस दगडांचा एक कोनाडा करवून त्यांत बसण्यापुरती थोडीशी जागा ठेविली. तीत राजास चिणून एक चिरा मात्र लावायाचा ठेविला आणि त्यांना असें सांगितले कीं तुमचा मुलगा आम्हांस शरण आला नाही तर उरलेला चिरा कायमचा बसवून टाकू. हा असा

अतिभयंकर प्राणांतप्रसंग वडिलांवर आल्याचे महाराजांस कळले तेव्हा त्यांना पराकाष्ठेचें दुःख झालें. आपल्या पायी वडिलांचा प्राणनाश खचीत होतो असें मनात येऊन त्यांचे हृदय शोकविव्हल झालें. अशा महापराक्रमी नरपुंगवाचा असा परम उद्वेगकारक रीतीनें अंत व्हावा, व तो आपण आरंभिलेल्या कार्यामुळे व्हावा हें त्यांच्यासारख्या पितृभक्ताच्या हृदयास अत्यंत दुःख देणारे होतें.

खऱ्या वीर्यशाली व दृढनिश्चयी पुरुषाची परीक्षा अशाच बिकट प्रसंगी होत असते. महाराजांच्या अंगचे अनेक गुण ह्या अत्यंत उद्वेगजनक समयीं चांगले कसाला लागले. एक तर त्यांच्या ठायीं पितृभक्ति किती नि:सीम होती हे दिसून आलें. ते केवळ स्वार्थसाधु व राज्यलोभी असते तर त्यांनीं स्वपित्याच्या जिवाची पर्वा केली नसती. राज्यतृष्णेस वश होऊन पितृहत्या करण्यासहि कित्येक नराधम प्रवृत्त होतात, तर स्वकष्टाने संपादिलेले राज्य स्वपित्याच्या प्राणरक्षणासाठी सोडण्यास कितीसे पुत्र तयार होतील? परंतु महाराज अशा कोटीतले मानव नव्हते. महाराजांच्या ठायींचा दुसरा उज्वल गुण निदर्शनास आला, तो अर्थात असा कीं आरंभिलेले सत्कार्य कसेंहि संकट प्राप्त झाले तरी कदापि असिद्ध सोडावयाचे नाहीं असा त्यांचा अढळ निश्चय झाला होता. यवनांच्या सत्तेतून स्वदेश सोडवून स्वतंत्र करण्याचा जो निर्धार एक वेळ त्यांनीं केला तो प्रकृत प्रसंगी पितृमोहास्तव चळण्याचा समय प्राप्त झाला होता. कृतसंकल्प सोडला नाहीं तर पितृहत्येस आपण कारण होतों, आणि पितृरक्षणासाठी यवनांस शरण जावें तर केलेला थोर संकल्प असिद्ध राहून जगांत हसे होते; ह्याप्रमाणे इकडे आड तिकडे विहीर अशी महाराजांच्या मनाची अवस्था त्या वेळीं होऊन गेली. परंतु ह्या आणीबाणीच्या समयी त्यांनीं पितृसंकटनिवारण्याची एक उत्तम युक्ति योजून हा अतिबिकट प्रसंग टाळला. ती युक्ति अशी :

हा वेळपावेतो त्यांनी मोगलांच्या ताब्यातल्या मुलखास मुळी उपद्रव केला नव्हता; आणि विजापुरकरांची सत्ता कमकुवत करण्याचा आपला उपक्रम शहाजहान बादशाहास पसंत वाटण्यासारखा होता हे त्यास ठाऊक होतें. कारण निजामशाहीप्रमाणें अदिलशाहीसुद्धां बुडविण्याचा त्याचा इरादा असल्यामुळें शिवाजी महाराज आपले कार्य सोपे करीत आहेत अशी त्याची भावना होणें साहजिक होतें. शहाजहानाने विजापूरकरांशी नुकतेच : युद्ध करून त्यांस बरेच हैराण केलें होते व त्यांच्याशी आपणांस अनुकूळ असा तह केला होता. यास्तव आपण ह्या समयी शहाजहानास

शरण जाऊन आपल्या वडिलास संकटमुक्त करण्याविषयी अदिलशहास हुकूम पाठविण्यास सांगितले तर तो आपले ऐकेल; आणि त्याचा हुकूम अदिलशहास अमान्य करण्याचे धैर्य होणार नाही असे त्यांना वाटून त्यांनीं त्या बादशहाचा मुलगा मुरादबक्ष त्या वेळीं दक्षिणेच्या सुभ्यावर होता, त्याच्याद्वारे त्याला पुढील आशयाचा अर्ज केला: ''आमचे वडील शहाजीराजे यांजवर विजापूरसरकारची इतराजी होऊन त्यांस भिंतींत चिणून मारण्याचा ठराव अदिलशहानें केला आहे; तरी त्यांस ह्या प्राणसंकटांतून सोडविण्याची मेहरबानी करावी व त्यांस आपल्या पदरी न्यावे. त्याप्रमाणेंच आम्हीहि आपल्या नोकरीस राहावयास तयार आहो. अशा शूर व इमानी सरदारास जीवदान द्याल तर दक्षिणेत मोगली अंमल वृद्धिंगत व दृढ करण्यास त्यांच्याकडून व आम्हांकडून चांगले साहाय्य होईल.''

हा असा अर्ज घेऊन महाराजांचा वकील मुरादबक्षाकडे गेला तेव्हां अर्थात् त्याच्या तोंडास पाणी सुटले असावें. शहाजीराजांनी निजामशाहीस हस्तालंब देऊन विलक्षण शौर्य व पराक्रम प्रकट केला होता, त्याचा त्यास विसर पडला नव्हता. त्याप्रमाणेंच शिवाजीराजांनी स्वराज्यस्थापनेच्या कामी प्रदर्शित केलेली अचाट कर्तबगारी व युक्तिमत्ता त्याच्या कानी वेळोवेळा गेलीच होती. त्यानें शहाजहानाकडे त्यांच्या संबंधानें रदबदली करून त्याच्याकडून अदिलशहाला सन १६४८ च्या मार्च महिन्यांत असा खलिता पाठविला कीं शहाजीराजे भोसले यांस कोणत्याही प्रकारचे शासन न करितां सोडून द्यावें. हा खलिता पाहताच अदिलशहाला शहाजीराजांस सोडणे प्राप्त झालें. तरी त्यानें त्यांस जामिनावर खुले करून विजापुरासच नजरकैदेत ठेविले. ह्याप्रमाणें सुमारें चार वर्षे ते विजापुरास अडकून पडले होते. त्यांस कर्नाटकांत परत पाठविण्याविषयीं दरबारच्या मोठमोठ्या सरदारांनीं रदबदली केली. परंतु अदिलशहानें ती मनास आणिली नाहीं. चार वर्षांनी त्यांना कर्नाटकांत परत पाठविण्याचे कारण असें झालें कीं तिकडे मोठमोठे पुंड उठून चोहोकडे धुमाळी सुरू झाली. तेव्हां त्या पुंडांचा बंदोबस्त शहाजीराजांसारख्या शूर सरदाराच्याच हातून चांगला होण्याचा संभव आहे असें अदिलशहाच्या लक्षात येऊन त्यानें त्यांची तिकडे रवानगी केली. जातांना त्यांना त्यानें असें निक्षून बजाविले कीं घोरपड्यास व त्याच्या जहागिरीस मुळी उपद्रव करूं नये. परंतु शहाजीराजांनी कर्नाटकांत गेल्यावर महाराजांस असें सांगून पाठविलें कीं तुम्ही आमचे पुत्र असाल तर बाजीघोरपड्यास चांगली शिक्षा कराल.

वास्तविक पाहता ह्या पित्राज्ञेची त्यांना आवश्यकता नव्हती. त्या घोरपड्याचा सूड उगविण्याचा त्यांनी पुरा निश्चय केला होता, व ते अनुकूळ संधीची वाट पाहत होते. राजे विजापुरास नजरकैदेत होते तोपर्यंत तर त्यांना असा कांहीच प्रकार करिता आला नाही. ते सुटून कर्नाटकात गेल्यावर काही वर्षांनी घोरपड्याला शिक्षा करण्याची संधि त्यांना प्राप्त झाली. सन १६६१ त महाराजांचें वाडीचे खेमसावंत व लखमसावंत देसाई यांशी युद्ध जुंपले असतां विजापूरकरांनीं त्यांच्या मदतीसाठी बाजी घोरपड्यास पाठविलें. त्याप्रमाणें तो सैन्य घेऊन कोंकणांत जावयास निघाला. पण तिकडे जाण्यापूर्वी पहिल्यानें तो आपला जहागिरीचा गांव मुधोळ येथें गेला. महाराज त्या वेळीं विशाळगडावर होते. घोरपडे मुधोळास आल्याचें वर्तमान कळताच त्यांनीं अकस्मात् त्याच्यावर छापा घातला. घोरपड्याची व त्यांची मोठी निकराची लढाई झाली. तींत घोरपडे पडला. मग महाराजांनी सगळे मुधोळ शहर लुटून जाळून उद्ध्वस्त केलें व घोरपड्याचे सगळे नातलग व लोक एकसहा ठार मारिले. असें सांगतात कीं ह्या वेळी तीन हजार लोकांचा संहार महाराजांनी केला! एवढे भयंकर कृत्य त्यांच्या हातून ह्यापूर्वी किंवा ह्यानंतर कधींहि घडले नाहीं. यवनांचा पक्ष धरून केवळ आपला तळिराम गार करण्यासाठी ह्या घोरपड्याने शहाजीराजांचा जीव धोक्यांत घातला ह्याबद्दल महाराजांच्या मनांत केवढा प्रखर दंश होता हें ह्यावरून दिसून येते, व पितृभक्ति त्यांच्या ठायीं किती उज्ज्वल होतीं हेहि चांगले व्यक्त होतें.

आपल्या कार्यसिद्धीसाठी शहाजहानाचे अंकित होऊन त्याच्या पदरी राहण्यास आपली तयारी आहे असे जें महाराजांनी लिहून कळविले होतें ते मुरादबक्षाला खरें वाटून त्यानें त्यांस वचनाप्रमाणें वागण्याचा तगादा लाविला. पण इष्टकार्यासिद्धि झाल्यावर त्यांनी त्याची पुरी निराशा केली. शहाजीराजे विजापुरास नजरकैदेत होते तोपर्यत महाराजांनीं विजापूरकरांच्या मुलखात धामधूम करण्याचें बंद केलें, व मोगलांच्याहि मुलखास त्यांना एवढ्या अवधीत उपद्रव करितां आला नाहीं. विजापूरकरांनाहि शिवाजी महाराजांवर चढाई करून त्यांच्या पारिपत्याचा प्रयत्न मोगलांच्या भीतीस्तव करितां आला नाही, किंवा त्यांनी घेतलेले किल्ले व प्रांत सोडून देण्याविषयीची अट त्यांना घालतां आली नाहीं.

ह्याप्रमाणें महाराजांना जवळजवळ चार वर्षे पुरी स्वस्थता मिळाली. तिचा उपयोग त्यांनीं आपल्या किल्ल्यांची दागदुजी वगैरे करून नीट बंदोबस्त करण्याकडे व हाती आलेल्या प्रांतांची जमाबंदीच्या वगैरे बाबतीत चांगली व्यवस्था लावण्याकडे केला.

***

भाग नववा

# मोगलांशी संबंध (सन १६५०–५७)

महाराजांना मोगल बादशहाकडून करार केल्याप्रमाणें आपली नोकरी पतकरण्याविषयीचा तगादा पुनःपुनः येऊ लागला तेव्हां त्यांनीं मुरादाकडे आपला वकील रघुनाथपंत यास पाठवून अशी मागणी केली कीं, ''जुन्नर व अहमदनगर ह्या प्रांतांत आमचे वडिलोपार्जित सरदेशमुखीचे हक्क अलीकडे वसूल झाले नाहींत ते मंजूर व्हावे. ह्या आमच्या मागणीचा अनुकूळ विचार होईपर्यंत आम्हांस कराराप्रमाणे वागता येत नाहीं.'' ह्या तुमच्या मागणीचा विचार आम्ही बादशहाच्या हुजुरास गेल्यावर करूं असा जबाब मुरादबक्षाने त्यांना दिला. ह्याप्रमाणे शहाजहानाची नोकरी धरण्याविषयीचा आग्रह त्यांनीं कांहींना कांहीं निमित्त पुढें करून चालढकलीवर टाकला.

पुढे १६५७ सालांत शहजहानानें औरंगजेबला विजापूरचे राज्य काबीज करण्याकरिता मोठ्या सैन्यानिशीं दक्षिणेत रवाना केलें. त्यानें महाराजांच्या ताब्यांतील कल्याण वगैरे प्रांत सर करण्याचा सपाटा चालविला, तेव्हां महाराजांनी त्याला पुढीलप्रमाणे निरोप पाठविला: ''आम्ही दिल्लीपतीचे नोकर आहों. ह्या मोहिमेत तुम्हांला आम्ही लागेल तें साहाय्य करूं. आम्ही विजापूरकराचे जे प्रांत व किल्ले घेतले आहेत ते आमच्याकडे राहू द्यावे. तुम्हांला आम्ही अदिलशहाचा समुद्रकिनाऱ्याचा मुलूख काबीज करून देतो.'' हें त्यांचें म्हणणें औरंगजेबाला मान्य होऊन त्याने त्यांना तो प्रांत सर करावयास सांगितले आणि असा उलट निरोप पाठविला की, ''ह्या मोहिमेत तुमचा व आमचा हितसंबंध सारखाच आहे. तुम्ही आम्हांला सामील होऊन मदत कराल तर त्यांत तुमचे पुष्कळ कल्याण होणार आहे.'' हें असें आमीष दाखवून त्यानें त्यांस वश करून घेण्याचा प्रयत्न केला. पण ते त्याच्या ह्या गुलकावणीस मुळी फसले नाहींत. आपण दिल्लीपतीचे ताबेदार आहो असे वरपांगीं बोलून त्यांनीं त्याच्या सैन्याची वावटळ आपल्या मुलखास कांहीएक उपद्रव होऊं न देता दूर घालविली.

मोगल सैन्याने विजापूरकरांच्या मुलखात धुमाकुळ मांडला तेव्हां विजापूरकरांनी महाराजांना मोठी लालूच दाखवून मोगलांच्या नैऋत्येकडील प्रांतावर स्वारी करावयास सांगितलें, ते अर्थात् अशा हेतूने कीं मोगल ईशान्येकडून त्यांच्या प्रांतावर चालून आले होते ते आपल्या प्रांताच्या रक्षणासाठी तिकडे जातील. ह्या त्यांच्या सांगण्याप्रमाणे महाराजांनी मिनाजी भोंसल्यास तिकडे पाठविलें. तो मोगलांच्या प्रांतात लुटालुट करण्याचा धडाका चालवीत अहमदनगराच्या वेशीपर्यंत जाऊन थडकला. इकडे महाराजांनी जातीने जुन्नर शहरावर चाल करून तें यथेच्छ लुटले. हें शहर त्या वेळीं चांगले संपन्न होते. त्यांत त्यांना तीन लाख होन, दोनशे घोडी व इतर पुष्कळ बहुमोल चीजवस्तू सापडली. ती त्यांनी लागलीच राजगडावर पाठवून दिली आणि त्या शहराच्या आसपासच्या प्रांतांत धुमाकुळ उडवून दिला. औरंगजेबानें मिनाजी भोसल्यांवर व महाराजावर फौजा पाठविल्या, पण त्यांनीं त्यांस मुळीं दाद दिली नाहीं. ही अशी शत्रूंनी लगट केली असूनहि महाराजांनी अकस्मात् अहमदनगरावर चाल करून ते लुटले. पण त्यांच्यावर किल्ल्यातील व बाहेरील मोगल सैन्याचा हल्ला झाल्यामुळे त्यांना तें शहर यथेच्छ लुटावयास मिळाले नाहीं. शत्रूंशी टक्कर देऊन त्यांच्या तावडीतून ते निसटून गेले. तरी ह्या झटापटींत त्यांना बरेंच द्रव्य, सातशे घोडे व चार हत्ती मिळाले.

ह्याप्रमाणें मोगल सैन्य पाठीवर असतां जुन्नर व अहमदनगर ही शहरे महाराजांनी लुटल्याचे औरंजेबास कळले तेव्हां त्याने त्यांच्यावर दुसरे काही सरदार मोठ्या फौजेनिशी पाठविले आणि त्यांचे सगळे किल्ले व ठाणी सर करून हाती लागतील तेवढ्या मराठ्यांची एकसहा कत्तल उडविण्याचा त्यांस हुकूम दिला. नैऋत्येकडील आपला मुलूख सुरक्षित राहावा म्हणून त्यानें चारपाच ठिकाणी चांगली नाकेबंदी केली. त्यानें या वेळी असा निश्चय केला होता कीं विजापूरकरास जेर केल्यावर शिवाजीमहाराजांचा पुरा समाचार घ्यावयाचा.

इकडे विजापूरकरांना मोगलांनी अगदीं जेरीस आणून त्यांच्याशी हवा तसा तह केला. हें वर्तमान महाराजांस कळले तेव्हां आतां आपल्यावर औरंगजेबाचा मोर्चा खास फिरणारं व आपला त्याच्या प्रचंड सैन्यापुढे मुळीं निभाव लागणार नाहीं. हे मनांत येऊन त्यांनीं त्याच्याशी नम्रतेने वागून आपल्यावरचे संकट टाळण्याची युक्ति योजिली. त्यांनी त्याला नम्रतेचा अर्ज केला तो असाः ''मी आपल्या दोन शहरांस

उपद्रव दिला त्याबद्दल मला क्षमा करावी. अशी आगळीक मी पुनः करणार नाही; इतःपर मी आपल्या सेवेंत हजर राहीन व आपला पक्ष सहसा सोडणार नाहीं.'' हे पत्र त्याच्याकडे गेले त्या वेळीं औरंगजेब दिल्लीस जाण्याच्या गडबडींत होता. शहाजहान आजारी पडल्याचें वर्तमान त्याला कळल्यावरून तो तिकडे फौज घेऊन निघाला. तेव्हां त्यांनी त्यास पुनः पत्र लिहून पुढीलप्रमाणे कळविलें: ''केलेल्या अपराधांबद्दल आम्हास पस्तावा झाला आहे. प्रकृत प्रसंगीं आम्ही तुम्हांस लागेल ती मदत करूं. तुमच्या इकडील मुलखाच्या रक्षणाचे काम आम्हांला सांगाल तर तें आम्ही मोठ्या खुषीनें करूं. मात्र तुमच्या हातीं गेल्याल्या कांहीं प्रांतांमध्ये आमचे वंशपरंपरागत हक्क आहेत ते तुम्ही चालू करावे. आमच्या घराण्याच्या जहागिरीचा जो भाग तुमच्या कबजांत गेला आहे तो आमचा आम्हांला परत मिळावा; जुन्नर व अहमदनगर ह्या प्रांतांतील आमची देशमुखी आम्हांस परत मिळावी; आणि आपल्या ताब्यांतल्या कोंकण प्रांतांची व्यवस्था आमच्याकडे द्यावी.'' ह्या त्यांच्या पत्रास त्या धूर्त औरंगजेबानें पुढील आशयाचा जबाब पाठविला: ''तुम्ही केलेल्या अपराधाबद्दल तुम्हांस पश्चात्ताप झाला आहे म्हणून तुम्हांस क्षमा केली आहे. कोंकण प्रांत तुम्ही कबज्यात घ्यावा. आबाजी सोनदेवास आमच्याकडे पाठवून द्यावे. म्हणजे तुमच्या वडिलोपार्जित हक्कांसंबंधाने वाटाघाट करिता येईल, व तुमच्याआमच्यामध्ये शेवटचे करार नक्की झाले म्हणजे आमच्या कुमकेस तुम्ही पाचशे स्वार पाठवावे.''

हा असा उभयतांचा पत्रव्यवहार झाला, पण त्यांत काहीएक निष्पन्न झालें नाही. आपल्यावरचा तात्कालिक अनर्थ टळावा म्हणून औरंगजेबास महाराजांनी अशा रीतीनें झुलविण्याचे योजून त्याला अशी वरपांगी नम्रता दाखविली पण औरंगजेब मोठा धूर्त व कावेबाज होता. महाराजांची ही नम्रता केवळ मानभावीपणाची असून आपली पाठ वळताच ते आपल्या मुलखास त्रास देण्यास कमी करणार नाहींत हें त्यास पक्के कळून चुकले होते. म्हणून उत्तरेकडे जातांना त्याने आपल्या सरदारांना असे बजावून सांगितलें कीं, ''शिवाजीवर सक्त नजर ठेवा. आपल्या मुलखावर झडप घालण्यास तो अगदी टपून बसला आहे.'' त्याप्रमाणेंच विजापूरकरांस त्याने असा निरोप पाठविला कीं, ''शिवाजी किल्ल्यांतून लपूनछपून राहतो आणि आमच्या व तुमच्या मुलखास सारखा उपद्रव देत असतो, तरी त्याला तेथून हुसकून लावून द्या. तुम्हांस त्याला आपल्या पदरी ठेवावयाचे असल्यास त्याला जहागीर देऊन दूर कर्नाटकांत रवाना करा.''

औरंगजेब दिल्लीस गेला व आपला बाप शहाजहान ह्यास कैदेत घालून आपल्या भावांशी लढू लागला, तेव्हां त्यानें दक्षिणेतील सरदारांस पत्रे पाठवून आपल्या मदतीला बोलाविले. शिवाजीमहाराजांसहि अशा आशयाचे पत्र आलें. तें वाचून पाहतांच त्यांच्या अंगावर शहारे आले. आपल्या वृद्ध पित्याला बंदीत ठेवून व वडील भावांचा नाश करून तक्त बळकावण्याचा त्याचा अत्यंत अधम उद्देश पाहून त्यांनीं त्याचा धिक्कार केला, आणि पत्र घेऊन येणारास हाकून दिलें. ते पत्र त्यांनीं कुत्र्याच्या शेपटास बांधिलें व साऱ्या पुणे शहारातील रस्त्यांतून फिरवून ह्या त्याच्या दुष्कर्माबद्दल सर्व लोकांमध्ये त्याचा उपहास केला. आपल्या पत्राचा असा अनादर झाल्याचे ऐकून औरंगजेब अतिशयित संतापला, आणि ह्याबद्दल महाराजांचा चांगला सूड उगविण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. पण ती कधीहि शेवटास गेली नाहीं.

पुढे १६५९ सालांत महाराजांनी अफझुलखानास ठार करून विजापूरकरांचा चांगलाच पराजय केल्याचें वर्तमान औरंगजेबास कळले तेव्हां त्याने त्यांना मोठ्या गौरवाचे व शाबासकीचे पत्र पाठवून विजापूरकरांच्या सरहद्दींवरचे दोन किल्ले पारितोषिक म्हणून दिले, आणि आपला स्तुत्य क्रम नेटाने चालू ठेवण्याविषयीं आग्रहपूर्वक सांगून आणखी असें उत्तेजन दिलें कीं विजापूरकरांचे जे मुलुख तुम्ही काबीज कराल त्यांवर आम्हांस मिळणारी खंडणी आम्ही तुम्हास माफ करू. ह्या वेळीं महाराजांची अशी पाठ थोपटण्यांत त्याचा असा हेतु होता कीं त्यांनीं अदिलशाही चांगली कमजोर केली म्हणजे ती बुडविण्यास आपणास फारसे श्रम पडणार नाहींत; आणि अदिलशाही बुडविली म्हणजे शिवाजीसारख्या बांडगुणासहि सहज छाटून टाकता येईल. परंतु हे शेवटले काम पुढें किती जड व असाध्य होणार होतें हें त्या धूर्त व कपटी बादशहाच्या लक्षांत आलें नव्हते.

***

भाग दहावा

# विजापूरकरांचा आणखी मुलूख काबीज करितात (सन १६५४–५८)

शहाजीराजे विजापुरांत नजरकैदेत होते तोपर्यंत महाराजांनी अदिलशहाच्या मुलखात काहीएक धामधूम केला नाहीं हे मागे सांगितलेंच आहे. राजे अटकेतून सुटून कर्नाटकांत आपल्या जहागिरीवर रुजू झाल्यावर महाराजांनीं त्या शाहींत पुनः धामधूम सुरू केली. घाटमाथा व कोंकणपट्टी येथील विजापूरकरांच्या ताब्यांत उरलेला मुलूख व किल्ले सर करण्याचा क्रम त्यांनीं सुरू केला. ह्या वेळीं त्यांच्याशी उघड सामना करण्याचें सामर्थ्य विजापूरकरांत उरले नव्हतें. यास्तव त्यांस युक्तीने पकडून आणण्याची कामगिरी अदिलशहानें बाजी शामराज नांवाच्या एका सरदारास सांगितली. तो बरोबर दहा हजार लोक घेऊन पारघाटात आला आणि जावळीच्या चंद्रराव मोऱ्याच्या आश्रयाने दबा धरून बसला. हें वर्तमान महाराजांस कळताच त्यांनीं त्याच्यावर अकस्मात् हल्ला करून त्याच्या लोकांची एकसहा कत्तल उडविली आणि त्याचा पुरा पराजय केला. तेव्हां तो निरुत्साह होऊन रडत माघारीं विजापुरास गेला.

ह्या बाजी शामराजाला कृष्णाजी बाजी चंद्रराव मोरे यानें आश्रय व कुमक दिल्याबद्दल महाराजांस त्याचा मोठा राग आला; आणि त्याचें उत्पाटन करण्याचा त्यांनीं निश्चय केला. ह्या मोऱ्याच्या ताब्यात कृष्णा व वारणा ह्या नद्यांच्या दरम्यानचा घाटमाथ्यावरील प्रांत होता. तो अदिलशहाचा अंकित असून त्यास करभार देत असे. त्याच्या ताब्यांत बरेच किल्ले व खोरी होती. महाराजानी त्याला यापूर्वी असा निरोप पाठविला होता की, ''तुम्ही विजापूरकरांची ताबेदारी सोडून आमचे अंकित व्हा, व त्यांस देता तो करभार आम्हांस द्या आणि आम्हास प्रसंग पडेल तेव्हां पांच हजार लोकांनिशीं मदत करा. आमचे अंकित न व्हालतर तर तुमची जावळी हस्तगत करू.'' हें त्यांचे म्हणणे त्याला मान्य झाले नाहीं, आणि त्याने त्यांना असा उलट जबाब

पाठविला कीं, त्याचें म्हणणें ''तुम्ही जावळीला याल तर तुमचा एक माणूसहि परत जाणार नाहीं. तुमच्यांत पुरुषार्थ असेल तर उद्या येणार ते आजच या. आमच्याशी कटकट कराल ती विचार करून करा. येथें उपाय कराल तो अपाय होईल. यश न घेता अपयशास पात्र व्हाल.''

ह्या मोऱ्याच्या पदरी महाराजांप्रमाणेच मावळ्यांचा चांगला जमाव असून त्याचे ठाणे बरेंच बिकट होतें. त्याच्यावर एकदम चालून गेलें असतां आपणांस हटकून यश येईल अशी त्यांना खात्री नव्हती. म्हणून त्यांनीं रघुनाथ बल्लाळ यास कांही लोकांनिशीं पाठवून मोऱ्याच्या किल्ल्यांची व ठाण्यांची स्थिति कशी काय आहे ते पाहावयास लाविले; आणि आपण महाबळेश्वराजवळ मोठ्या सैन्यानिशी तळ देऊन राहिले. रघुनाथ बल्लाळने मोऱ्याचा सगळा मुलूख हेरून महाराजांना त्याच्यावर एकदम हल्ला करण्याचा इशारा केला. तेव्हा ते निसणीच्या घाटाने उतरून जावळीस गेले व मोरे हशमगडास होता त्यास वेढा घालून त्याच्याशी लढू लागले. तेथें एक महिनाभर रण माजून राहिलें. शेवटीं मोरे हशमगडावरून पळून रायगडावर जाऊन राहिला. महाराजांनी त्याचा पाठलाग करून त्या किल्ल्यास वेढा दिला. मोऱ्याने तो किल्ला तीन महिने लढविला. शेवटीं त्यास हार खावी लागून तो महाराजांस शरण आला. आणि त्याचा हा किल्ला त्यांनी सर केला. महाराजांनीं त्याला आपल्याबरोबर चाकणच्या किल्ल्यावर नेले. त्यांच्या मनांतून त्याची पुन: जावळीस स्थापना करून त्याला आपला अंकित करून ठेवावयाचे होते. परंतु मोऱ्यानें मुधोळच्या व्यंकाजी घोरपड्याशी संधान बांधण्याचा प्रयत्न केला. ह्या संबंधाचा त्याचा पत्रव्यवहार महाराजांच्या हातीं लागला. तेव्हां त्याच्यावर बेइमानपणाचा टपका ठेवून त्याचा त्यांनी शिरच्छेद केला. मोऱ्याच्या बायकांमुलांस त्यांनीं पुरंदर किल्ल्यावर नेऊन ठेविले व त्यास कांहीं नेमणूक करून देण्याचें योजिले. परंतु त्याच्या दोघा मुलांनी विजापूरसरकाराकडे आपल्या सुटकेविषयी गुप्त पत्रव्यवहार केला, तो त्यांच्या हातीं लागल्यामुळे त्यांनीं त्यांस पुण्यास नेऊन देहांतशासन दिले व मोऱ्याच्या बायकांस व मुलीस सोडून दिले.

ह्या कृष्णराव बाजी मोऱ्याचा हनमंतराव म्हणून एक मोठा शूर बंधु होता. तो ह्या धामधुमीत निसटून तळकोकणांत पळाला होता. जावळी महाराजांच्या कबजांत गेल्यावर तो तिकडे राजा होऊन बसला व जावळी परत घेण्याच्या खटपटीस लागला. त्याच्याशी लढून आपल्या लोकांचा आणखी नाश करणें बरें नाही असे मनांत आणून त्याला

युक्तीनें पकडण्याचा बेत महाराजांनीं केला आणि ह्या कामगिरीवर संभाजी कावजी यास रवाना केले. त्यानें हणमंतरावाशी मोठ्या स्नेहभावाने बोलणे करून सांगितले कीं तुम्ही महाराजांच्या पदरी असामी पतकरून राहावें आणि त्यांच्याशी शरीरसंबंध करून आपलें कल्याण करून घ्यावे. हें असें बोलणे हणमंतरावाशी एकांती करीत असता त्याने त्याच्या पोटांत कट्यार चालवून त्याला तेथेच पुरा केला; आणि आपल्या लोकांना त्याच्या लोकांवर सोडून त्यांना उधळून लाविले.

मोऱ्याच्या आश्रयाने शिवतर खोऱ्यांत बाबाजी कोंडदेव त्या नांवाचा एक ब्राह्मण होता. मोऱ्याचा नायनाट झाल्यावर तो स्वतंत्र होऊन पुंडावा करूं लागला होता. महाराज त्या प्रांतांत आपला अमल बसवू लागले तेव्हा हा ब्राह्मण शिरजोर होऊन त्यांस मुळीं जुमानीना. त्यावरून त्यास त्यांनी कैद केले. ब्राह्मणास जिवे मारू नये असा महाराजाचा नियम असल्यामुळे त्याचे डोळे काढण्याचा हुकूम त्यांनीं दिला.

ह्या मोऱ्याच्या प्रांतांत वाईजवळ गोळेवाडी म्हणून एक गाव आहे. तो गोळे नावाच्या एका मराठे सरदाराच्या ताब्यांत होता. मोरे नामोहरम झाल्यावर हा सरदार स्वतंत्र होऊन बसला होता. महाराजांनी त्याचा मोड करून गोळेवाडी काबीज केली. ह्या धामधुमीत महाराजांच्या एका ब्राह्मण सरदाराने ह्या गोळ्याची सून कैद करून महाराजांपुढे आणून उभी केली. ती अतिशयित सुंदर असल्यामुळे महाराज तिचा अंगीकार करतील असें त्यास वाटले होते. परंतु ते पापभीरू असल्या कारणानें कल्याणच्या यवनसुभेदाराची तरुण सून पाहून जे उद्धार त्यांनीं काढिले होते तेच त्यांनीं ह्या प्रसंगींहि काढिले.

ह्या वेळीं हिरडस मावळांत बांदल देशमुख स्वतंत्र होऊन बसला होता. तो रोहिडा नांवाच्या किल्ल्यात मजबूत ठाणे करून राहिला होता. तो सामोपचाराच्या सौम्य उपायांनीं वश होईना म्हणून महाराजांनीं जातीने त्याच्या किल्ल्यावर छापा घातला. त्यांच्यापुढे आपले कांहीं चालणार नाहीं हें त्याला पक्के ठाऊक होते. परंतु तो मोठा मानी व शूर असल्यामुळें त्यांच्याशी शेवटपर्यंत लढावयाचे असा निर्धार करून तो आपल्या लोकांनिशी त्यांच्यावर तुटून पडला. उभय पक्षांकडील लोक मोठ्या शौर्यानें लढले. खुद्द बांदल हातीं शस्त्र घेऊन लढत होता. शेवटी त्याचा पराभव होऊन तो रणांत पडला; आणि त्याचे उरलेले लोक महाराजांना शरण आले.

ह्या लढाईत महाराजांना एक मोठा लाभ झाला. तो असा: ह्या बांदलाचा बाजीप्रभु देशपांडे ह्या नांवाचा एक दिवाण होता. बांदलाचे जे लोक महाराजांना शरण आले त्यांमध्यें हा दिवाण प्रमुख होता. त्याची मर्दुमकी पाहून महाराज फार खूष झाले होते. त्यांनीं त्याला मोठ्या औदार्याने व ममतेने वागवून त्याची वतनवाडी त्याच्याकडे कायम केली आणि त्याला आपल्या पदरी नोकरीस ठेविले. हा मोठा हुषार, स्वामिकार्यदक्ष व शूर पुरुष पुढें महाराजांच्या उपयोगी कसा पडला तें यथास्थलीं सांगू.

जावळीचा व त्याच्या आसपासचा मुलूख आपल्या ताब्यांत सुरक्षित राहावा म्हणून त्यांनीं कृष्णानदीच्या उगमापाशी बिकट व खडकाळ डोंगर पाहून त्यावर एक भक्कम किल्ला महाराजांनी बांधून त्याचें नांव प्रतापगड असें ठेविले. ह्या वेळीं त्यांनीं महाबळेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार करून कृष्णानदीच्या उगमापाशी एक देवालय व पोवळी बांधिली. येथून पुढें कोंकणांत उतरून त्यांनीं तिकडची समुद्रकिनाऱ्यावरची रत्नागिरि, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, साळशी, खारेपाटण वगैरे ठाणी हस्तगत केली.

ह्याप्रमाणें कोंकणपट्टी आपल्या सत्तेखालीं आणण्याच्या उद्योगास महाराज लागले तेव्हां त्यांस जंजिऱ्याच्या शिद्दीपासून फारच त्रास होऊं लागला. महाराजांनी काबीज केलेल्या प्रांतास शिद्दी आपल्या आरमाराच्या साहाय्याने फारच उपद्रव देऊ लागला. तेव्हां ह्या रिपूस जिंकल्यावांचून आपली तिकडील सत्ता व प्रजा निर्बेध होत नाही असें पाहून महाराजांनी त्याच्या पारिपत्यासाठी शामराजपंत पेशव्यास मोठी फौज देऊन पाठविलें. पण शिद्दीपुढें त्याचें काहीएक न चालून त्याला हार खावी लागली. ह्या पराजयामुळें महाराजांची शामराजपंतावर इतराजी होऊन त्यांनी त्याच्याकडचा पेशवाईचा हुद्दा काढून घेतला व तो मोंरोपंत त्रिंबक पिंगळे यास दिला. ह्या मोरोपंताकडे हा हुद्दा आमरण राहिला. शिद्दीशी पुढें आणखी युद्ध चालविण्याच्या कामगिरीवर त्यांनीं रघुनाथपंताची योजना केली. त्यानें शिद्दीशी बराच वेळ झुंज केलें, परंतु तो कांहीं केल्या जेरीस येईना इतक्यांत पावसाळा आल्यामुळे ही त्याची मोहीम चार महिने तहकूब झाली. पावसाळा संपताच त्याच्यावर मोठी फौज पाठवून त्याचा पुरा धुव्वा उडविण्याचा महाराजांचा बेत होता. पण तो त्यांना त्या वेळी तहकूब ठेवावा लागला. कारण विजापूरकरानीं त्यांच्यावर अफझलखान नांवाच्या मोठ्या बलाढ्य सरदाराला मोठी फौज देऊन पाठविलें. ह्या नव्या अरिष्टाकडे त्यांचें सगळें लक्ष वेधले.

वर सांगितल्याप्रमाणे शिद्दीशी युद्ध चालले असतां वाडीच्या सावंतांस असें कळले कीं शिवाजीमहाराजांनी कोकणपट्टीत आपली सत्ता बसविण्याचा सपाटा चालविला असून आपल्यावर त्यांची चढाई लौकरच होण्याचा रंग आहे. तेव्हां आपली जावळीच्या मोऱ्यासारखी गत व्हावयाची, ती टाळण्यासाठी त्यांनीं आपण होऊन महाराजांपाशीं तहाचे बोलणे लाविलें. ते त्यास कबूल होऊन त्यांनीं त्यांच्याशीं पुढीलप्रमाणे तह केला: सावंतांनी आपल्या जहागिरीच्या उत्पन्नाचा अर्धा हिस्सा महाराजांस द्यावा व बाकीचा त्यांनीं निर्वेध भोगावा. त्यांनीं इतःपर विजापूरकरास कर देऊं नये. त्यांनीं आपल्या जहागिरींतील एकंदर किल्ल्यावर आपले लोक ठेवून त्यांची चांगली व्यवस्था राखावी आणि जरूर पडेल तेव्हां महाराजांना तीन हजार पायदळानिशी मदत करावी. ह्याप्रमाणे केवळ निरुपायास्तव सावंतांनी महाराजांशीं तह केला. परंतु त्या मानी देशमुखांस लवकरच पश्चात्ताप होऊन ते तहाप्रमाणें वागण्यास तयार झाले नाहींत; आणि आपल्यावरील महाराजांचा ताबा उडवून देऊन ते पुनरपि विजापूरकरांचे अंकित झाले. ह्याबद्दल महाराजांनी त्याची कशी खोड मोडली तें यथास्थलीं सांगू.

ह्या सुमारास आणखी एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट झाली, ती अशी: मोगलांनी विजापूरकरास बरेच जेरीस आणून त्याच्यावर मोठी खंडणी बसविली. यामुळें त्यांना मोठी फौज बाळगण्याचें त्राण उरले नाहीं. म्हणून त्याच्या लष्करातील बेकार झालेले सातशे पठाण महाराजांकडे नोकरी मागावयास आले. तेव्हां त्यांना नोकरीस ठेवावें कीं कसें हा प्रश्न उद्भवला. बऱ्याच जणांनी अशी सल्ला दिली की मुसलमान लोकांवर इतवार ठेवून आपल्या लष्करांत त्यांना ठेवणे मोठे धोक्याचे आहे. एकदोन असामींचें असें म्हणणें पडलें की त्यांना नीट पारखून आपल्याकडे नोकरी देण्यास काहीएक हरकत नाहीं. महाराजांना ही दुसरी सल्ला पसंत होऊन त्या पठाणांना आपल्या समोर आणविले व त्यास नीट निरखून पाहून व उलटसुलट प्रश्न विचारून त्यांचें हृद्गत ताडले; आणि त्यांना आपल्याकडे नोकरीस ठेविलें असतां कंहींएक दगा व्हावयाचा नाही अशी त्यांची खात्री झाल्यावर त्यांनीं त्यांस आपल्याकडे ठेवून घेतले. त्यांच्या पथकावर राघो बल्लाळ अत्रे यांस सरदार नेमिले.

***

भाग अकरावा

# अफझुलखानाचा वध

येथवर वर्णिल्याप्रमाणे शिवाजीमहाराज उत्तरोत्तर बलाढ्य होत गेल्यामुळे विंजापूरकरांस मोठी दहशत वाटून त्यांचा कांटा नाहीसा करण्याचा विचार त्या दरबारात होऊं लागला. अदिलशाही तक्तावर त्या वेळीं वीस बावीस वर्षांचा तरुण मुलगा बसला असून त्याची आई मुत्सद्यांच्या साहाय्याने सगळा कारभार चालवीत असे. तिला बडी साहेबीण म्हणत. तिने एके दिवशी सगळ्या सरदारास दरबारास बोलावून असें विचारले कीं शिवाजी आमच्या पातशाहतीमध्ये फारच पुंडावा करीत आहे; त्याला पकडून आणण्याच्या कामगिरीवर कोण जाण्यास तयार आहे? ही बिकट कामगिरी पतकरण्यास कोणीहि पुढे सरसावेना. हें पाहून अफझुलखान नांवाच्या एका सरदारास ईर्षा चढून तो त्या कामगिरीवर जाण्यास सिद्ध झाला व बरोबर मोठे सैन्य घेऊन ह्या मोहिमेवर निघाला. वाटेत तुळजापूर, पंढरपूर वगैरे ठिकाणीं जी देवस्थाने लागली त्यांची नासधूस करीत व महाराजांचे कोटकिल्ले सर करीत तो पुण्याकडे वळला.

ही त्याची भयंकर वावटळ आपणांवर येत आहे असें ऐकून महाराजांनी प्रतापगडावर जाऊन जय्यत तयारीनें राहण्याचा विचार केला. तो अर्थात् अशा हेतूनें कीं अफझुलखानाचा मोर्चा तिकडे वळला म्हणजे त्याला बिकट जागेत चांगले गाठता यावें. परंतु त्यांच्या पदरच्या कांहीं जणाचें असे मत पडलें कीं खानापाशी मोठी फौज आहे. त्याच्याशी सामना केल्यानें आपणांस यश येण्याची फारशी आशा नाहीं. तरी त्याला शरण जाऊन विजापूरकरांशी सख्य करावें हें बरें. महाराजांना ही मसलत बिलकूल पसंत पडली नाहीं. ते म्हणाले; ‘‘यवन बेइमान आहेत. ते विश्वास दाखवून आपला नाश करावयास चुकणार नाहींत. अफझुलखान मला पकडून नेण्यासाठी आला आहे. तरी त्याच्याशी समर करून आपली मर्दुमकी त्यास दाखविण्याचा हा समय आहे. समरांगणात पराक्रम करून मरावें हे मला श्रेयस्कर वाटतें. शत्रूस शरण

जाऊन प्राणनाश व्हावा हें अत्यंत अनुचित होय. जगदंबेने मला स्वप्नांत दर्शन देऊन तू यशस्वी होशील असा आशीर्वाद दिला आहे. अफझुलखानाशीं युद्ध करून त्याला गर्दीस मिळविण्याची हिंमत मला जगदंबेच्या प्रसादाने आली आहे. मी लढाईत पडलो तर माझ्या मागें माझ्या कमाईचे रक्षण करा व मिळविलेल्या स्वराज्याची माझ्या मातुश्रीच्या आज्ञेत वागून व्यवस्था नीट ठेवा म्हणजे झाले.''

ह्याप्रमाणें स्वनिश्चय कथन करून प्रतापगडावर जावयाची तयारी करण्याचा हुकूम त्यांनीं केला; आणि जिजाबाईच्या चरणावर मस्तक ठेवून आपला बेत तिला कळविला. संकट किती बिकट आहे व त्यांतून निभावण्याचा संभव किती अल्प आहे हें तिच्या लक्षांत येऊन तिला अतिशयित गहिवर आला. तरी त्या मातेनें त्याच्या मस्तकी हात ठेवून असा आशीर्वाद दिला कीं, ''तूं ह्या युद्धांत यशस्वी हो. शत्रूशी मोठ्या शौर्याने व हुशारीने लढून मला वीरमाता म्हणीव.'' मातेचा असा आशीर्वाद घेऊन ते प्रतापगडावर गेले.

महाराज प्रतापगडावर जाऊन राहिले आहेत असें कळताच खानानें आपली फौज तिकडे नेऊन वाईस तळ दिला. त्याला प्रतापगडावर चाल करण्याचें धैर्य होईना. कारण तें ठिकाण मोठे बिकट होतें. महाराजांनाहि असे कळून चुकले कीं खानाची फौज फार मोठी असून त्याची तयारी मजबूत आहे. म्हणून त्याच्यावर हल्ला करण्यांत मोठा धोका आहे. इकडे अफझुलखानाने असा बेत केला कीं महाराजांशी सलोख्याचे व ममतेचें बोलणे लावून त्यांना मोठी लालूच दाखवावी आणि वाईस भेटींला म्हणून आणून पकडावे. ह्या उद्देशाने कृष्णाजी भास्कर नांवाच्या एका हुशार ब्राह्मणास त्यानें प्रतापगडावर महाराजांकडे पाठविलें. महाराजांनी त्या वकिलांचा बहुमान केला व दरबार भरवून त्याचें सगळें म्हणणें ऐकून घेतलें. दरबार बरखास्त झाल्यावर त्या वकिलास एकांती गांठून महाराजांनी त्याच्याशी अत्यंत गोड व मोहक शब्दांनी पुढील आशयाचें भाषण केले: ''आजपर्यंत मीं जें कांहीं केले आहे तें केवळ हिंदूधर्म व हिंदू लोक यांच्या रक्षणासाठी केलें आहे. हें कार्य मी जगदंबेच्या आज्ञेने आरंभिलें आहे. त्यास आपल्या सारख्या वर्णश्रेष्ठ ब्राह्मणाचे साहाय्य अवश्य मिळाले पाहिजे. आपला धर्म बुडत चालला आहे. देव ब्राह्मणांस पीडा होत आहे. सर्व भरतखंड म्लेच्छमय होण्याचा समय आला आहे. याबद्दल तुम्हांला अवश्य खेद वाटला पाहिजे. ही दुःस्थिति नाहीशी करण्याचा जो हा उद्योग मीं आरंभिला आहे तो आपल्यासारख्या

श्रेष्ठ वर्णातील थोर गृहस्थांच्या साहाय्यानेच सिद्धीस जाणार आहे.'' हें भाषण ऐकून कृष्णाजी भास्कराची वृत्ति तत्काळ पालटली. त्याच्या ठायीं धर्माभिमान जागृत झाला. महाराजांच्या पदरी राहून त्यांची इमानानें नोकरी करण्याची आणभाक त्यानें केली; आणि खानास फसवून जावळीस आणण्याचे अभिवचन दिलें.

ह्याप्रमाणे खानाच्या वकिलास पुरा वश करून घेऊन त्याच्याबरोबर पंताजी गोपीनाथास खानाकडे रवाना केलें. जाते वेळीं महाराजांनी खानास पुढील आशयाचा निरोप द्यावयास सांगितलें: ''आम्हीच तुमच्या भेटीस यावें, पण आम्हांला पराकाष्टेची भीति वाटत आहे. वाईस भेटीस यावयाला आम्हांला धैर्य होत नाहीं. तुम्ही आम्हांला वडिलांसमान आहां. आम्हांला धीर देऊन पातशहाच्या दर्शनास घेऊन जाल व आमची त्याजपाशीं शिफारस कराल तर त्यांत तुमचा थोरपणा आहे. खरा विश्वास असेल तर मेहरबानी करून तुम्हीच जावळीला यावें; म्हणजे आम्ही तुमच्या मुलाखतीला अवश्य येतो.'' खानाच्या वकिलास निरोप देतांना महाराजांनी भरजरी वस्त्रे, मोत्याचा चौकडा, सोन्याची कडी व पदके, एक अरबी घोडा व पांच हजार होन एवढे बक्षीस दिले.

कृष्णाजी भास्कर व पंताजी गोपीनाथ यांनी खानाकडे जाऊन अशी उत्तम बतावणी केली कीं त्याला त्यांचे सगळे म्हणणें खरें वाटून तो जावळीस गेला. तो तिकडे जावयास निघाला तेव्हां महाराजांनी त्याच्या वाटेतली दाट झाडी वगैरे तोडून त्याच्या सैन्यास सुखानें कूच करितां येईसें केले. त्याचा जेथें तळ पडावयाचा होता तेथें त्याच्या सैन्याच्या राहण्याच्या वगैरे सगळ्या सोई करून ठेविल्या होत्या. खानाचें सैन्य रडतोंडीचा घाट चढून यावयाचे होतें म्हणून त्यानें आपला तोफखाना वगैरे अवजड सामान वर आणलें नाही. त्यांच्या भेटीची जागा गडाखाली बुरजाजवळ मुक्रर करून तेथें मोठी सुंदर सदर तयार केली. उभयतांनी एकएक हुजऱ्या बरोबर घेऊन सदरेस यावें असे ठरले. खान आपल्या बरोबर एक हुजऱ्या व सैदबंडा नांवाचा एक पटाईत व शूर शिपाई घेऊन सदरेस आला. त्याचा पेहराव दरबारी थाटाचा होता व त्याच्या हातात एक तरवार होती. त्यानें आपले पंधराशे लोक भेटीच्या ठिकाणापासून कांहींसे दूर खालीं ठिकठिकाणी उभे करून ठेविले होते.

इकडे महाराजांनी किल्ल्याच्या आसपास व खानाच्या सैन्याचा तळ होता त्याच्यापासून कांहीं अंतरावर दाट रानांत आपल्या सैन्यास दबा धरून राहावयास

सांगितले होते. किल्ल्यावर पांच तोफा होतांच त्यांनीं चोहोंकडून हल्ला करून खानाचें सैन्य उधळून लावावे असे त्यांस फर्मावून ठेविले होतें. एवढा कडेकोट बंदोबस्त केल्यावर ते खानाच्या भेटीस जाण्याच्या तयारीस लागले. त्यांनी स्नान करून श्रीभवानीची सोत्कंठ होऊन प्रार्थना केली. तेव्हां भवानी त्यांच्या अंगात संचरून पुढीलप्रमाणे बोलली; ''अरे मुला चिंता करू नको. या समयी तुझ्या पाठीवर मी उभी आहें. खानास मोह घालून तुझ्या संन्निध मीं आणिले आहे. तूं निर्भय चित्ते अवसान धरून त्याचा वध कर. त्याचे शिर कापून माझ्या पुढे ठेव.'' जवळच्या कारभाऱ्यांनी हे शब्द टिपून ठेविले. अंगातले वारे जाऊन ते सावध झाले तेव्हां हे देवीचे शब्द त्यांना वाचून दाखविले. ते ऐकून त्यांस अधिकच हुरूप आला. मग त्यांनीं आपल्या सरदारांस म्हटले: ''आम्ही तर जीवित तृणप्राय समजून शत्रूच्या अंगावर चालून जात आहो. यांत यश आले तर ठीकच आहे. परंतु काही भलताच प्रकार झाला तर तुम्ही घाबरून जाऊ नका. ठरविलेल्या बेताप्रमाणे शत्रूवर चालून जाऊन त्याचा फडशा उडवा व राज्याचें संरक्षण करा. तुम्ही सारे शूर व पराक्रमी आहां. आमची सगळी मदार तुमच्यावर आहे. तुमच्यासारखे इमानी व वीर्यशाली पुरुष सहाय्य आहेत म्हणून आम्हास यवनांची परवा वाटत नाहीं. या समयी सर्वांनी आपल्या शौर्याची व पराक्रमाची पराकाष्ठा करावी. तुमची अनुकूलता आहे म्हणून मला अफझुलखानाचा मुळीच हिशोब वाटत नाहीं. आजपर्यंत केलेली कमाई तुमच्या शौर्याचे व साहाय्याचे फळ आहे. ती आपली कमाई कायम राखण्यास जिवाची पर्वा न करिता ह्या समयी झटाल तर तुमची किर्ती अधिकच वाढेल.'' हे असे वीर्योत्साहाचे उद्दीपन करणारे भाषण ऐकून सगळ्यांच्या अंगात स्फूरण चढले. ते म्हणाले: ''आपण आम्हास जी आज्ञा केली आहे तदनुसार वागण्यांत आम्ही यत्किंचित्‌हि कसूर करणार नाहीं. त्यासाठी आमचे प्राणहि बळी पडले तरी त्याची आम्हांला क्षिति नाहीं. हे प्राण एकवार आपल्या चरणी वाहिले आहेत. ते आतां आमचे नव्हत. ते स्वामिकार्यी गत झाले तर तें आम्ही मोठेच भूषण समजू.''

ह्या प्रमाणें पदरच्या लोकांच्या ठायीं उत्साह व अभिमान जागृत करून महाराज खानाच्या भेटीस जावयास निघाले. त्यांनीं अंगांत जिरे घालून त्यावर झगा चढविला. डोकीस जिरेटोपी घालून वरती पागोटें घातले. उजव्या हातांत बिचवा घेऊन तो अस्तनींत लपविला; व डाव्या हाताच्या पंजांत लोखंडी वाघ नख चढविलें. मग खालीं उतरतांना पुनः एक वेळ देवीचे दर्शन घेऊन ते मातुश्रीचा निरोप घ्यावयास गेले.

त्यांनीं तिच्या चरणी मस्तक ठेविले तेव्हां ती गहिवरून म्हणाली: ''बाळा तूं जगदंबेच्या कृपेने विजय पावशील. माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे. कुंतीचे पुत्र भीम व अर्जुन हे जसे पराक्रमी निपजले तसा तूं भोसल्यांच्या कुळांत निर्माण झाला आहेस. ह्या कुळाचें नांव जगांत गाजीव. अफझुलखानास रणात ठार करून स्वराज्याची अभिवृद्धि कर. शिवबा, तूं मला कुंतीच्या पंक्तीस बशीव. खानाला जीवंत सोडू नको. त्याचा शिरच्छेद कर. तुझा वडिल बंधु संभाजी ह्या खानाच्या पायी प्राणास मुकला आहे, त्याचें उसने घे.''

गडाखाली उतरण्यापूर्वी त्यांनी खानाला सांगून पाठविलें कीं त्यानें आपल्याबरोबर सदरेवर कोणी शिपाई ठेवू नये. त्याप्रमाणें त्यानें सैदबंडा वगैरे आपल्याबरोबरच्या शिपायांस सदरेपासून अंतरावर उभे राहण्यास सांगितलें. कारण त्याला अशी हिंमत वाटत होती कीं शिवाजीमहाराज आपल्या हातीं लागतांच त्याला आपण स्वतः कैद करू. किंवा ठार मारू. मग महाराज आपल्याबरोबर जिवा महाल्या व संभाजी कावजी यांस घेऊन सदरेस गेले. ते भ्याल्याचें मिष करून थबकत थबकत खानापुढें गेले. ते आंत आल्याबरोबर खान उठून कांहीं पावले पुढे सरसावला. त्याचें धूडमोठे विशाळ होते आणि महाराजांचा बांधा अमळ ठेंगणा व सडपातळ होता. म्हणून त्याला वाटलें होतें कीं महाराजांना आपण आता सहज गिरफदार करू.

कृष्णाजी भास्कराने रीतीप्रमाणे उभयतांची ओळख करून दिल्यावर ते एकमेकांस आलिंगन करण्यास सरसावले, तो खानाने झट्दिशी महाराजांची मुंडी कवटाळून डाव्या कांखेखाली घट्ट धरिली व हातातली कट्यार त्यांच्या कुशीत चालविली. परंतु महाराजांच्या अंगांत जिरे असल्यामुळें त्यांना ती लागली नाहीं. हा असा त्याचा दगा पाहून महाराजांनी हातांतले वाघनख खानाच्या पोटांत चालविले व दुसऱ्या हातांतल्या बिचव्याचा मारा केला; आणि त्याच्या काखेतले आपले डोके चपळाईने काढून घेतलें. वाघनखाचा मारा होतांच खानाचे पोट फाटून आतडी बाहेर आली. तीं डाव्या हातांत सावरून धरून उजव्या हांतांतल्या तरवारीचा एक सज्जर वार त्यानें महाराजांवर केला. तो त्यांनीं चपळाईनें चुकविला. तरी तो त्यांच्या शिरस्त्राणास निसटता लागून जवा इतकी जखम झाली. इतक्यांत महाराजांनी डोळ्याचे पाते लवते न लवते तो खानावर आणखी एक वार करून त्यास अगदीं घायाळ केले, व त्याच्या हातची तरवार ते हिसकावून घेऊं लागले. तेव्हां खान, ''मारले! मारले! दगा! दगा!'' असें

मोठ्याने ओरडला त्या बरोबर उभय पक्षांचें लोक सदरेकडे धावत येऊन त्यांची हाणमार सुरू झाली. खानाचा विश्वासू व शूर शिपाई सैदबंडा त्या जागी सगळ्यांच्या अगोदर तेथें जाऊन महाराजांवर तरवार उपसून धावला; तेव्हां महाराज जिवा महालियाकडची तरवार घेऊन त्याच्याशी लढू लागले. इतक्यांत जिवा महालियानें सैदबंडाच्या खांद्यावर फिरंगीचा वार करून त्याचा पट्ट्याचा हात तोडून टाकला. ह्याप्रमाणे उभय पक्षांकडील लोकांचे रणकंदन माजून खानाचे वर चढून आलेले बहुतेक लोक खलास झाले. मोरोपंत, नेताजी वगैरे सरदारांनीं संकेताप्रमाणे किल्ल्यावर पांच तोफा होतांच शत्रूच्या सैन्यावर हल्ला करून त्यांची कत्तल उडविली. हें सैन्य अर्थात् बरेंच बेफाम होतें; आणि तोफा सुटल्या त्या भेट झाल्याच्या सुचनेसाठीं असाव्या असें त्यांस वाटल्यामुळें ते अधिकच गाफील झाले होते.

ह्या गर्दीतून खानाचें प्रेत पालखीत घालून त्याचे लोक खालीं नेत असतां एसाजी कंक व तानाजी मालुसरे यांनी त्याच्या पालखीमागून धावत जाऊन भोयांचे पाय तोडून पालखी खालीं पाडली आणि खानाचें शिर तोडून गडावर नेऊन देवीस वाहिले.

ह्या रणांत खानाचे जे लोक पाडाव झाले त्यांना महाराजांनी आपल्या नेहमीच्या क्रमास अनुसरून मोठ्या औदार्यानें व ममतेने वागविले व त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांना वाटखर्च, घोडी वगैरे देऊन विजापुरास रवाना केलें. हा त्यांचा थोरपणा पाहून खानाच्या सैन्यातले जे मराठे शिपाई पाडाव झाले होते ते महाराजापाशी नोकरीस राहिले. ह्या वेळीं झुंजारराव घाटगे ह्या नांवाचा एक मोठा सरदार महाराजांच्या हातीं लागला होता. त्याचा बाप शहाजीराजांचा मोठा स्नेही होता, म्हणून त्याला आपल्या पदरी राहण्याचा महाराजांनीं आग्रह केला, परंतु तो कांहीं केल्या ऐकेना. तेव्हां त्याला वस्त्रालंकार वगैरे देऊन मोठ्या सन्मानाने विजापुरास पाठविलें. ह्या लढाईत अफझुलखानाचा मुलगा फाजलखान हा घायाळ होऊन रानावनांत भटकत असतां त्याला खंडुजी काकडे नांवाच्या एका इसमाने पकडले. तेव्हां त्याच्याकडून कांहीं लाच मिळाल्यामुळें खंडूजीने त्याला महाराजांकडे न नेता सोडून दिलें. ह्या गुन्ह्याबद्दल त्याला महाराजांनी देहांतशासन दिलें.

ह्या लढाईत महाराजांस पुष्कळ लूट मिळाली. शेपाऊणशे हत्ती, सातआठ हजार घोडी, हजारबाराशे उंट, सगळा तोफखाना, दोनतीन हजार बैल, मोहरा, होन, वगैरे रोख नाणे दहाबारा लक्षांचे, सोने, रत्ने, मोत्ये–वगैरे जडजवाहीर दोनतीन लक्ष किंमतीचे,

कापड सुमारें दोनहजार ओझी, डेरे, राहुट्या, पाले वगैरे स्वारीच्या उपयोगाचे मुबलक सामान इतकी लुट त्यांस मिळाली. याशिवाय आणखी खानाच्या लष्करांतलें पुष्कळ मराठे शिपाई महाराजांची मर्दुमकी व औदार्य पाहून त्यांच्या नोकरीस मोठ्या खुषीनें राहिले. ह्याप्रमाणें महाराजांच्या लष्करांत पुष्कळ भरती झाली.

आपल्या सैन्याची हालहवाल महाराजांनीं प्रत्यक्ष जाऊन पाहिली. युद्धांत घायाळ होऊन जे बेजार झाले होते त्यांची शुश्रूषा योग्य प्रकारे व्हावी अशी त्यांनीं तजवीज करविली. त्यांनीं प्रत्येकाकडे स्वत: जाऊन त्याचा परामर्ष घेतला व त्याच्याशी मधुर व उत्तेजनपर भाषण करून त्याच्या वेदनांचे त्याला फारसें कांहीं न वाटेसें केलें. रणामध्यें पडलेल्या एकूणएक शिपायाची यादी त्यांनीं करविली, व त्यांच्या बायकामुलांचें समाधान करून व आश्वासन देऊन त्यांच्या निर्वाहासाठी त्यास वेतने करून दिली.

लढाईत घायाळ झालेल्या शिपायांच्या जखमा प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून त्यांच्या मानानें कोणांस दोनशे, कोणास शंभर, कोणांस पाऊणशे असे होन त्यांनीं बक्षीस दिले; शिवाय ज्यांच्यात्यांच्या योग्यतेप्रमाणे कोणास पागोटीं, कोणास कडी वगैरे इनामें दिलीं. जे वरच्या दरजाचे जुमले व सरदार होते त्यांस भंदिले, झगे, सोन्याची कडीं, कंठमाला, शिरपेच, मोत्यांचे तुरे, आंगठ्या, घोडी वगैरे इनामें त्यांनीं दिली. ज्यांची जशी मर्दुमकी नजरेस आली तिच्या मानानें त्यांची बढती त्यांनी केली. कोणी पायदळापैकी होते त्यांस घोडी दिली, कोणांस सरदाऱ्या दिल्या, कोणांस पालख्या व अबदागिऱ्या दिल्या. युद्धांत पडलेल्या ज्या योद्ध्यांचे मुलगे ज्वान होते त्यांस बोलावून आणून नोकरीस ठेविले. इनामें व बढत्या देण्याचा हा समारंभ महाराजानी सगळ्या लोकांस जमवून त्यांच्या समक्ष केला; व ज्यांनीं मर्दुमकी केली होती त्यांची तारीफ प्रसिद्धपणें केली. त्यामुळें सर्वांस अतिशयित उत्साह व उत्तेजन प्राप्त झाले; आणि महाराजांच्या ठायीचे हें औदार्य, हा दयाळूपणा, व गुणांची बूज करण्याची ही उत्कृष्ट पद्धत पाहून त्यांची नोकरी विशेषच जोमाने, उत्साहानें व इमानाने करण्याचा हुरूप प्रत्येकास आला. ह्या वेळीं ते कृष्णाजी भास्कर व पंताजी गोपीनाथ ह्या वकिलांची उत्तम कामगिरी विसरले नाहींत. त्यांस त्यांनीं पुष्कळ द्रव्य देऊन एकएक गांव इनाम दिला, आणि विश्वासरावाने हेराचे काम उत्तम केल्याबद्दल त्यालाहि मोठे बक्षीस दिलें.

ही मोठी फत्ते झाल्याबद्दल प्रतापगडावर व इतर ठिकाणी आनंदोत्सव केला. हत्तीवरून शकरा वांटल्या. ब्राह्मणांस भोजने व दक्षिणा दिल्या. गोरगरिबांस खैरात केली.

महास्थलीचे सिद्ध, साधु, गोसावी यांस पूजोपचारार्थ द्रव्य पाठविले. तुळजापूर, पंढरपूर, शिंगणापूर, वगैरे ठिकाणची देवस्थाने भ्रष्ट करणाऱ्या यवनाचा असा वध झाला तो पुराणांत वर्णिलेल्या एकांद्या राक्षसांच्या वधासारखा लोकांना वाटला. त्याचा नाश झाला यात कांहींतरी ईश्वरी सूत्र आहे अशी त्यांच्या मनाची भावना झाली. सर्वांच्या हृदयांत स्वदेशाभिमानाचें वारें संचरलें; आणि हा विजय झाला तो सगळ्या हिंदू राष्ट्राचा झाला असें मानून लोकांनी तत्प्रीत्यर्थ मोठा उत्सव केला. असें सांगतात कीं जिजाबाईने अफझुलखानाच्या वधाचे वर्णन एका शाहिराकडून पोवाड्याच्या रूपानें करवून त्याला एक शेर सोनें व एक घोडा इनाम दिला.

अफझुलखानाचें शिर किल्ल्यासमोर पुरून त्याच्यावर एक बुरूज बांधिला व त्यास अफझुलबुरूज असें नांव दिलें. हा विजय आपणांस तुळजापूरच्या भवानीच्या प्रसादाने प्राप्त झाला असें मानून महाराजांनी तिच्या नमुन्याबरहुकूम एक चांगली मूर्ति घडवून प्रतापगडावर तिची स्थापना केली व तिच्यासाठी एक सुंदर देवालय बांधिलें. ह्या देवालयांत नित्यपूजा, नैवद्य व ब्राम्हणभोजनें करण्यासाठी ब्राह्मण वगैरे नेमून त्यांस तनखे लावून दिले. देवालयांत उत्सवादि तुंळजापुराप्रमाणें व्हावे म्हणून त्यांच्या खर्चासाठी दागदागिने व वस्त्रे मुबलक दिली.

अफझुलखानाचा वध होऊन त्याजबरोबर गेलेली सारी फौज गारद झाल्याचे वर्तमान अदिलशहा व त्याची आई बडीसाहेबीण यांस कळले तेव्हां त्यांना पराकष्टेचे दुःख झालें. तीं तीन दिवस अन्नसेवन न करितां पलंगावर पडून रडत होतीं. पातशाही नौबत तीन दिवस बंद पडली. आतां अदिलशाहिची धडगत दिसत नाहीं; शिवाजीमहाराज आपल्या विजयी फौजेनिशीं चालून येऊन विजापूर शहर हस्तगत करितात आणि अदिलशाही पातशाहत बुडवितात असा धाक अमीरउमरावांस पडून ते चिंताक्रांत झाले.

ह्या अफझुलखानाविषयींची एक दंतकथा अशी आहे कीं तो शिवाजी महाराजांवर मोहीम करावयास निघाला तेव्हा तीत आपला नाश होणार अशी त्याच्या मनाची भावना होऊन त्यानें आपल्या ६३ बायका होत्या त्यांना एकवट केल्या आणि एका डोहांत आपल्या हाताने लोटून देऊन बुडवून मारिल्या!आपल्या पश्चात परपुरुषांच्या हातीं त्या लागूं नयेत म्हणून त्यानें हें अत्यंत अमानुष कृत्य केलें असें म्हणतात. विजापुरास जाणाऱ्या प्रवाशांना हा डोह अजून दाखवितात.

***

भाग बारावा

# विजापूरकरांस हतवीर्य केलें
# (सन १६५९–६०)

अफझुलखानाचा वध करून त्याच्या मोठ्या सैन्याचा पुरा नाश केल्यावर महाराजांचा धाक चोहोंकडे बसून त्यांना स्वराज्यविस्ताराचें पुढील कार्य विशेष सुलभ झाले. त्या सरकाराचे आणखी किल्ले व प्रांत काबीज करण्यास त्यांना आतां फारसे कठिण गेलें नाही.

विजापूरकरांचा पन्हाळा किल्ला फार मजबूत व चांगला होता. त्यावरील किल्लेदार लाच घेऊन आपण होऊन किल्ला स्वाधीन करून देण्यास तयार झाला. तेव्हा अन्नाजी दत्तो नांवाच्या आपल्या एका सरदाराला कांहीं मावळ्यांसह त्या किल्ल्यावर महाराजांनी पाठविलें, आणि त्या किल्लेदाराने तो किल्ला स. १६५९ च्या आक्टोबर महिन्यांत बिनहरकत स्वाधीन करून दिला. पावनगड असाच त्यांच्या कबजांत आला. हे किल्ले ताब्यांत आल्यावर महाराजांनी वसंतगड छापा घालून घेतला; आणि कृष्णा नदीच्या दोन्ही तीरांवरील प्रांतांत आपला अंमल बसवून बत्तीस शिराळाच्या गढीपर्यंत आपलीं ठाणीं ते बसवीत गेले.

पन्हाळा कबजांत आल्यावर महाराज त्या गडावर जाऊन राहिले, आणि तेथून सह्याद्रीच्या माथ्यावरील व त्याखालील बहुतेक किल्ले त्यांनीं लढाई वगैरे फारशी न करितां आपल्या ताब्यांत घेतले. रांगणा व खेळणा ह्या किल्ल्यांवर मात्र छापा घालून त्यांस लढावे लागलें. खेलणा किल्ला सर करावयास त्यांना बरेच प्रयास पडले म्हणून त्याचें नांव त्यांनीं विशाळगड असें ठेविले. ह्याप्रमाणें सगळा कोल्हापूरप्रांत व त्यांतील किल्ले महाराजांनी अफझुलखानाचा वध केल्यावर दोनतीन महिन्याच्या अवकाशांत घेतले.

ह्या वेळीं मिरज येथे रुस्तम जमान नावाचा एक सरदार विजापूरकरांनी ठेविला असून त्याच्या हातीं कोल्हापुरापासून रत्नागिरीपर्यंतच्या प्रांताची व्यवस्था असे. परंतु

त्यानें महाराजांच्या वर निर्दिष्ट केलेल्या धामधुमीस मुळी प्रतिबंध केला नाही. याचे कारण असें की त्याच्याजवळ सैन्यबळ फारसें नसून महाराजांचा त्याला मोठा धाक होता. अदिलशहानें त्याला महाराजांवर चालून जाऊन त्यांच्यांशी सामना करावयास सांगितलें. तेव्हां तो निरुपाय होऊन पन्हाळ्याजवळ चालून गेला. त्याचा महाराजांनीं पुरा मोडा करून त्याला कृष्णेपार घालवून दिलें; इतकेंच नव्हे, तर त्याचा पाठलाग करीत करीत ते थेट विजापुरापर्यंत गेले. वाटेत त्यांनीं मोठमोठे गाव लुटून पेठा होत्या त्यांवर दस्त बसविला. रुस्तमजमान विजापुरांत शिरला असें पाहून ते परत मोठ्या वेगाने निघून विशाळगडावर आले; आणि तेथून लागलीच कोंकणांत उतरून तिकडील बंदरे व शहरें काबीज करण्याचा त्यांनीं सपाटा चालविला. त्या वेळीं चेऊल शहर मोठें सधन होतें. त्यांत शिरून त्यांनीं तें तीन दिवस यथेच्छ लुटले.

ही अशी विलक्षण धामधूम चालवून अदिलशाही अमल कमजोर करून संपुष्टांत आणण्याचा क्रम महाराजांनी एकसारखा चालू ठेविला. तेव्हां त्यांच्या पारिपत्यासाठी आता कोणास पाठवावे हा विचार विजापूर दरबारास पडला. त्यांच्यावर मोहीम करण्यास कोणीहि सरदार कबूल होईना. अफझुलखानाचा मुलगा फाजलखान हा आपल्या बापाचा सूड उगविण्यासाठी अदिलशहापाशी नेहमी अजीजी करीत असे. पण त्याला एकट्याला महाराजांवर मोहीम करण्याची छाती नव्हती. ह्या वेळीं शिद्दी जोहार नावाचा एक हबशी सरदार अदिलशहाच्या पदरी होता, त्याच्यावर त्याची अवकृपा झाली होती. त्याला त्यानें असें सांगून पाठविलें कीं तूं शिवाजीवर मोहीम करून त्याची खोडं मोडून येशील तर तुला आम्ही मोठ्या योग्यतेस चढवू. हा सरदार जात्या मोठा शूर व हिंमतदार असल्यामुळें त्यानें ही कामगिरी पतकरली; आणि फाजलखान त्याच्याबरोबर निघाला. ह्याच वेळीं जंजिऱ्याच्या शिद्दीला आणि वाडीच्या सावंताला महाराजांच्या ताब्यांतील कोंकणपट्टीवर स्वारी करावयास अदिलशाहानें सांगितलें.

शत्रूंकडून ह्या अशा चोहोंकडून होणाऱ्या हल्ल्यास टक्कर देण्याची महाराजांनीं कडेकोट तयारी केली. रघुनाथपंतास जंजिऱ्याच्या शिद्दीशीं झुंजावयास पाठविलें; कल्याणभिवंडीच्या रक्षणाची कामगिरी आबाजी सोनदेवाकडे सोपविली; बाजी पासलकरास वाडीच्या सावंतांशी टक्कर द्यावयास पाठविलें; घाटावरील पुरंदर, सिंहगड वगैरे किल्ल्याचे रक्षण करण्यास मोरोपंताला नेमिले; पन्हाळ्याच्या बचावाचें काम

स्वतः पतकरून त्यावर ते मोठ्या बंदोबस्तानें राहिले; आणि शिद्दी जोहारांच्या सैन्यावर बाहेरून पुनःपुन: छापे घालून त्यास हैराण करण्याचें काम त्यांनीं नेताजी पालकरास सांगितलें.

शिवाजी महाराज पन्हाळ्यावर आहेत असें कळतांच शिद्दी जोहारानें त्या किल्ल्यास मजबूत वेढा दिला. नेताजी त्यांच्या सैन्यावर रात्रीचे छापे घाली व त्याची रसद बंद करून त्यास दाणावैरण मिळेनासे करून त्याला अगदी हैराण करी. परंतु शिद्दी जोहारानें पुरा नेट धरून आपला वेढा उत्तरोत्तर अधिकच मजबूत केला. तेव्हा त्याच्या तावडीतून सुटून जाण्याची महाराजांनी एक युक्ति योजिली, ती अशी: त्यांनीं त्या सरदाराला असा निरोप पाठविला कीं आम्ही किल्ला स्वाधीन करून देण्यास तयार आहो, तरी आमच्या जिवास काहीएक धोका होणार नाहीं असें अभय दिल्यास आम्ही स्वतः किल्ल्याच्या खालच्या माचीवर तहाचें बोलणेकरण्याकरितां येतो. हा निरोप ऐकून शिद्दीस मोठा आनंद झाला, व त्यानें त्यास अभयवचन दिलें. मग महाराजानी ठरल्याप्रमाणें संध्याकाळच्या वेळीं खालच्या माचीवर जाऊन त्याच्याशी तहाच्या कलमांची वाटाघाट सुरू केली. पण रात्र फार झाल्यामुळें सगळे करारमदार उदयिक नक्की करू असें बोलून ते परत केल्ल्यावर गेले. इकडे शिवाजी महाराज शरण आले असें समजून शिद्दीचे लोक किल्ल्यावरचा मारा बंद करून मजा मारीत राहिले. ह्याप्रमाणें ते गाफील व बेफाम होऊन स्वस्थ घोरत पडले असतां महराज आपल्या निवडक मावळ्यांनिशीं मध्यरात्रीच्या काळोखांत किल्ल्याखाली उतरून शत्रूच्या गराड्यांतून बेधडक निसटून गेले, आणि विशाळगडाकडे दौड करीत चालले.

शिवाजी महाराज पळून गेल्याचे कळल्यावर फाजलखान आपले घोडदळ घेऊन त्यांच्या पाठलागास निघाला, आणि त्याच्यामागून पायदळहि निघाले. इकडे महाराज विशाळगडापासून सहा मैलावर घाट चढू लागले तेव्हा आपल्या मागून शत्रूंनी एकदम लगट करू नये म्हणून त्यांनीं घाटाच्या खिंडीत बाजी देशपांड्याला कांहीं मावळ्यासह ठेवून सांगितले कीं आपण किल्ल्यावर जाऊन पांच तोफा सोडीतोंवर शत्रूस तेथें अडवून ठेवावे. ह्या हुकमाप्रमाणें त्यांनीं मुसलमानाच्या घोडदळाशी व पायदळाशी बराच वेळ टक्कर देऊन त्यांस खिंडीपाशी थोपविले. ह्या वेळी उभय पक्षांकडचे लोक मोठ्या आवेशाने लढले. बाजी देशपांडे तर ह्या रणकंदणात ठार झाला. परंतु त्याचें प्राणोत्क्रमण होण्यापूर्वी किल्ल्यावरून पांच तोफांची सरबत्ती झालेली ऐकिली तेव्हां

तो इमानी वीर मरणवेदना लागल्या होत्या तरी आनंद पावला. आपणांवर सोपविलेली कामगिरी आपण मर्दुमकीने पार पाडली व स्वामिकार्यी आपला प्राण खर्ची पडला याबद्दल त्यास पूर्ण समाधान वाटले. आपला शूर सरदार पडला व आपणांस नेमून दिलेली कामगिरीहि आटोपली असें पाहून मावळे रानांत वाट सापडेल तिकडे पांगले व सगळे किल्ल्यावर चढून गेले. जातांना त्यांनीं आपल्या शूर सरदाराचे प्रेत वाहून नेले.

खिंडीवरील मावळे पसार झाले तेव्हां शत्रूचें सैन्य घाट चढून किल्ल्याखाली आले. परंतु त्याला मोर्चे लावून वेढा देण्याचे काम मोठे बिकट असून आसपासचे नद्यानाले साफ वाळून गेल्यांमुळे त्यांचा टिकाव निघण्यासारखा नव्हता. शिद्दी जोहार पन्हाळ्याखालचा तळ उठवून फाजलखानाच्या कुमकेस येण्यास कबूल नव्हता. म्हणून निरुपाय होऊन त्याला परंत पन्हाळ्याकडे यावें लागलें. पन्हाळ्यांच्या रक्षणाचे काम महाराजांनी राघो बल्लाळ यास सांगितलें होते. त्यानें तो किल्ला मोठ्या हुशारीनें लढविला. शिवाय त्याला बाहेरूनहि चांगली कुमक मिळाली. वेढ्यांतल्या लोकांवर महाराजांचे सैन्य वारंवार छापे घालून त्यांस हैराण करू लागले. इतक्यांत पावसाळ्याचे दिवस आले. तेव्हां वेढा पुढें नेटानें घालून राहणे शत्रूला दुरापास्त झालें. शिद्दीची बरीच फौज खलास झाली असून उरलेले लोक परत स्वदेशी जावयास उत्कंठित झाले. म्हणून त्याला निरुपायास्तव विजापुरास परत जावे लागलें.

ह्याप्रमाणे विजापूरकरांच्या ह्या मोहिमेचा शेवट होऊन महाराज विजयी झाल्यावर ज्या एका असामान्य वीराच्या मर्दुमकीमुळें त्यांच्या प्राणावरचें संकट टळले होतें त्याच्या विषयींची कृतज्ञता व्यक्त करण्यास महाराज विसरले नाहींत. बाजी देशपांड्याचा वडील मुलगा बाळाजी बाजी म्हणून होता, त्याला त्यांनीं बोलावून आणून त्याचें समाधान केले व त्याला त्याच्या बापाची सरदारी दिली. ह्या बाळाजीचे सात भाऊ होते, त्यांसहि महाराजांनी चांगले हुद्दे देऊन आपल्या पदरी ठेविले. त्याप्रमाणेच राघो बल्लाळ अत्रे यानें मोठ्या हुशारीने, धैर्याने व इमानाने पन्हाळा किल्ला शत्रूशी शेवटपर्यंत लढविला, आणि शिद्दी जोहार जरी त्याला लाच देऊन फितूर करू पाहत होता तरी त्यानें इमान सोडले नाहीं, म्हणून त्याला महाराजांनी चांगली बढती देऊन पन्हाळा किल्ला व त्या खालचा प्रांत यांचा सुभा सांगितला.

ह्याप्रमाणे घाटावर धामधूम चालली असतां खाली कोकणांत रघुनाथपंतास जंजिऱ्याच्या शिद्दीशी लढण्याचें काम सांगितलें होतें. त्यानें शिद्दीशी अनेक सामने

करून त्याला अगदीं जेरीस आणिले, आणि त्याच्या ताब्यांतला दंडाराजपुरीचा सगळा प्रांत काबीज केला. तेव्हां निरुपाय होऊन शिद्दीनें रघुनाथपंताशी तह केला आणि त्याचा बहुमान करून त्यास उंची पोषाख व घोडा नजर केला. विजापूरकरांच्या हुकमावरून वाडीच्या सावतानींहि ह्या वेळी महाराजांशी शत्रुत्व प्रगट केले होते. त्यांच्याशी टक्कर देण्याची कामगिरी बाजी पासलकरास सांगितली होती. त्यानें त्यांच्याशी अनेक सामने करून जय मिळविला. शेवटी सावंतांना शिद्दीची कुमक मिळून त्यांनीं पासलकराशी राजापुरापाशी सामना दिला. उभय पक्षांचे लोक मोठ्या आवेशाने लढले. पासलकर स्वत: हातांत फिरंग घेऊन रणात लढत होता. त्याची कायसावंताशी गाठ पडून दोघाचें द्वंद्वयुद्ध जुंपले. दोघेहि वीर मोठे बलवान् व युद्धकुशल असल्यामुळें त्यांची झटापट मोठ्या निकराची झाली. त्यांनीं एकमेकांस मोठ्या जखमा केल्या; आणि शेवटी ते परस्परांच्या वारांनी एकेच वेळीं समरांगणांत पडून गतप्राण झाले. पासलकर पडला तरी त्याच्या लोकांनी धीर न सोडता शत्रूशी शेवटपर्यंत लढून त्याचा पुरा मोड केला. बाजी पासलकर धारातीर्थी पडल्याचे ऐकून महाराजास अतोनात दुःख झाले. आपला अत्यंत इमानी व जिवलग मित्र व मोठा शूर सरदार आपणास शिद्दीच्या व सावंताच्या वैरामुळे अंतरला, हे मनांत येऊन त्यांस चांगली शिक्षा करण्याचा निर्धार महाराजांनी केला.

शिद्दी जोहार व फाजलखान पुष्कळ सैन्याची व द्रव्याची खराबी करून रडत परत आले तेव्हां विजापूरदरबारांत मोठीच खळबळ उडाली. शिवाजीसारखा यःकश्चित जहागीरदार असा शिरजोर होऊन आपल्या मोठ्योठ्या सरदारांस नामोहरम करितो हें काही ठीक नव्हे; तरी आपण स्वतः मोठी सेना घेऊन त्याच्यावर स्वारी करून त्याचा पुरा नायनाट करावा असा निश्चय करून अदिलशहा स्वतः मोहिमेस निघाला; आणि महाराजांच्या ताब्यांत गेलेले एक एक किल्ले हस्तगत करण्याचा सपाटा त्यानें चालविला. महाराजांची बरीच फौज ह्या वेळीं कमी झाली असून अदिलशहाच्या प्रचंड सैन्यास तोंड दिल्याने आपले आणखी लोक खलास होतील असें त्यांना वाटलें. तरी किल्ले काबीज करण्याच्या कामांत त्याचे बरेचसे लोक कमी झाले म्हणजे त्याच्याशी सामना करून विजय मिळविणे सोपे जाईल, व तो काबीज करील ते किल्ले सहज परत घेता येतील असा विचार करून ते बादशहाच्या वाटेस न जातां कोंकणांत उतरले.

त्यांनी राजापुरावर हल्ला करून ते हस्तगत केले. ह्या शहरात इंग्रज व्यापाऱ्यांची वखार होती. त्यांचें ह्या वेळीं मोठे नुकसान झालें. त्या वखारीवरच्या रिव्हिग्टन, जिफर्ड वगैरे चार इंग्रज व्यापाऱ्यांस त्यांनी कैद करून नेले. इंग्रज व्यापाऱ्यांवर हा असा राग काढण्याचे कारण असें कीं शिद्दी जोहारानें पन्हाळ्यास वेढा घातला होता तेव्हां त्यांनीं त्यास दारूगोळा पुरवून मदत केली होती. इतकेंच नव्हे तर द्रव्यलोभानें त्यांनीं शिद्दी जोहाराच्या लष्करात जाऊन एक प्रकारचे कुलपी गोळे किल्ल्यावर सोडण्याचे काम केलें होतें. तीन वर्षानंतर त्यांच्याकडून खंड घेऊन त्यांस बंधमुक्त केलें.

राजापूर हस्तगत केल्यावर महाराजांनीं शृंगारपुराकडे आपला मोर्चा फिरविला. शृंगारपुरास सुर्वे ह्या आडनावाचा एक मराठा सरदार स्वतंत्रपणें राज्य करीत होता. तो नेहमीं आसपासच्या मुलखात पुंडावा करीत असे. त्याच्यावर स्वारी करून महाराजांनी त्याचा मोड केला. लढाईत सुर्वे पडला. ह्या सुर्व्याच्या पदरी शिरके म्हणून एक दिवाण होता. तो लढाईतून निसटून पळून गेला. पण तो शिद्दीच्या साहाय्याने पुनः धामधूम करील असे वाटून महाराजांनी त्याला शृंगारपूर वगैरे कांहीं गांव इनाम करून दिले व आपला ताबेदार केलें.

इतक्यांत पावसाळा सुरू झाला. तरी महाराजांनी कोकणातली मोहीम बंद न ठेवितां जंजिऱ्याच्या शिद्दीशी लढून त्याचें समूळ उत्पाटन करण्याचा निश्चय केला. कारण पावसाळा संपेपर्यंत थांबल्यास वाडीचे सावंत व विजापूरकर यांचें त्याला साहाय्य मिळाल्यानें त्याला जिकणें कठीण जाईल असें त्यांना वाटलें. महाराजांनी शिद्दीवर स्वारी करण्यास व्यंकाजीपंतास पाठविलें. त्यानें दंडाराजपुरी व आसपासचा बराच प्रांत काबीज केला. हा प्रांत आपल्या हाती कायमचा राहावा म्हणून महाराजांनीं त्यांत किल्ले बांधून त्यावर पाचसहा हजार लोक ठेविले. ह्या वेळीं शिद्दीच्या ताब्यांत एक जंजिरा तेवढा राहिला.

तिकडे घाटावर अदिलशहाने चालविलेली मोहीम पावसाळ्यामुळे बंद पडली; आणि तो चिमलगे येथें तळ देऊन राहिला. पावसाळा संपल्यावर महाराजांचा पुरा नाश करण्याचा त्यानें निश्चय केला. पण इतक्यांत कर्नाटकांतील त्याच्या मुलखांत मोठी बंडाळी सुरू होऊन त्याची तिकडील सत्ता साफ नाहीशी होण्याची त्याला भीति पडली. म्हणून महाराजांच्या मागून धावपळ करीत राहण्याचे तूर्त रहित करून कर्नाटकांत

फौज घेऊन जावे असा त्याला सल्ला मिळाला. म्हणून त्यानें महाराष्ट्रांतली आपली फौज कर्नाटक प्रांतांत नेली; आणि वाडीचे देशमुख लखम सावंत व खेम सावंत यांना मुधोळच्या बाजी घोरपड्याने व बहिलोलखानाने मदत करून शिवाजी महाराजांशी लढावे असे त्यानें फर्माविले. पण बाजी घोरपडे महाराष्ट्रांत आपल्या जहागिरीच्या गांवीं आल्याचे कळताच महाराजांनी त्याच्यावर अकस्मात हल्ला करून त्याचा कसा संहार करून आपल्या पित्याचा सूड उगविला हें मागें सांगितलेंच आहे. ह्या सरदाराच्या जागी आदिलशहानें खवासखानाची नेमणूक केली. परंतु त्यालाहि त्यानें कर्नाटकांत बोलावून घेतलें: तेव्हा अर्थात् वाडीचे सावंत एकटेच उरले. त्यांनीं महाराजांशी लढण्यासाठी आपण होऊन अदिलशहापाशी मदत मागितली होती. म्हणून त्यांना चांगली शिक्षा करण्याचा निश्चय करून महाराजांनी त्यांच्या मुलखावर स्वारी केली व त्यांच्याशी युद्ध आरंभिले. त्यांचे कुडाळ, बांदें वगैरे प्रांत त्यांनीं काबीज केले. त्या सावंतांना विजापुराकडून मदत मिळण्याची आशा नसल्यामुळे त्यांनी फिरंगणांत पळून जाऊन गोव्याच्या सुभेदाराचा आश्रय धरिला. पण महाराजांनी त्या सुभेदारास धमकीचा निरोप पाठविल्यावरून त्यानें त्यांस फिरंगणांतून काढून लाविले.तेव्हां ते निरुपाय होऊन महाराजांस शरण गेले. त्यांनीं त्यांच्याकडे वाडीचा देशमुखी कायम करून त्यांच्यावर खंड बसविला. ह्या सावंतांच्या पदरी नानसावंत व रामदळवी असे दोघे शूर सरदार होते, त्यांस महाराजांनी आपल्या पदरी नोकरीस ठेविलें.

ह्या मोहिमेत त्यांनी आणखी पंचमहाल, मर्दनगड, बारदेश वगैरे प्रांत जिंकले आणि खुद्द गोव्यावर रोख धरिला. फिरंगी घाबरून गेले, आणि त्यांनी कुडाळच्या सरदेसायाचा सबनीस अनंत शेणवी याला त्यांच्याशी तहाचें बोलणें करावयास पाठविलें. ह्या शेणव्याने तहाचे बोलणे. लाविलें; परंतु आतून महाराजांचा विश्वासघात करण्याचा घाट घालून त्यानें फिरंग्यांस अशी मसलत दिली कीं शिवाजीमहाराज तहाचें बोलणे होत असल्यामुळे अमळ बेफाम राहतील, तरी त्यांच्या छावणीवर रात्रीचा एकाएका छापा घालून त्यांचा नाश करावा. ही मसलत फिरंग्यांच्या आरमारावरील गणोजी नांवाच्या भंडारी तांडेलाच्या कानी आली, आणि त्यानें ती महाराजांस तत्काळ कळविली. ती ऐकून महाराज सावध राहिले. सदरील मसलतीप्रमाणें अनंत शेणवी फिरंग्यांचे दहा हजार लोक बरोबर घेऊन मध्यरात्रीच्या सुमारास महाराजांच्या गोटावर गुपचूप चालून आला. इकडे महाराज आपलें ठाणें सोडून अर्धा कोश मागे हटले

आणि तयारीनें उभे राहिले. फिरंगी सैन्य सारी रात्र त्यांच्या तळावर तोफाबंदुकांची सरबत्ती करीत राहिले. महाराजांनी सकाळपर्यंत कांहींएक हालचाल केली नाहीं; आणि उजाडताच त्यांच्या घोडेस्वारांनी त्या लोकावर एकदम चालून जाऊन कापाकापी सुरू केली; आणि त्यांचा पुरा मोड करून त्यांस उधळून लाविलें. ह्या झटापटींत फिरंग्यांचे बहुतेक लोक पडले. महाराजांच्या लोकांनी पुढें चाल करून फिरंगी मिळेल तेवढा कापून काढण्याचा सपाटा सुरू केला. फिरंगी सावकारास धरून आणून त्यांनीं त्यांच्यावर जबर खंड बसविला. आतां गोवेंप्रांतहि आपल्या हातचा जातो अशी फिरंग्यास भीति पडली आणि त्यांनी कृतापराधाची क्षमा मागून पुनः तहाचें बोलणे लाविलें. तें महाराजांना मान्य होऊन असें ठरलें कीं फिरग्यांनीं महाराजांस प्रतिवर्षी नव्या तोफा व दारूगोळा पुरवावा, आपल्या जहाजास महाराजांकडून कौल घ्यावे, व त्यांस प्रतिवर्षी कांहीं जवाहीर खंड म्हणून द्यावें.

कोकणपट्टीत असा आपला अमल बसविण्यांत महाराज गुंतले असतां घाटावरील जे किल्ले व प्रांत अदिलशहानें घेतले होते ते सगळे त्यांच्या सरदारांनीं अदिलशहा महाराष्ट्रातून कर्नाटकांत गेल्यावर परत घेऊन त्यांवर आपला अमल पक्का बसविला आणि विजापूरकरांकडून पुनरपि आपल्या मुलखास उपसर्ग होऊं नये असा कडेकोट बंदोबस्त ठेविला.

ह्याप्रमाणें महाराजांची सत्ता कोंकणपट्टींत व त्यावरील घांटमाथ्यावर पक्की बसून ते अतिप्रबळ झाले हे पाहून अदिलशहा व त्याचे मुत्सद्दी अगदीं हतवीर्य झाले. महाराजांशी लढण्याचा त्यांस मुळी आवाका उरला नाही. शिवाय कर्नाटकांत वारंवार होत असलेल्या बंडाळीमुळें तर ते अगदीं टेकीस आले होते. त्यांनीं आतां असा विचार केला की महाराजांशी तह करून त्यांच्यापासून होणारा उपसर्ग बंद करावा. पण ही मसलत अदिलशहाच्या कांहीं मुत्सद्यांना कबूल नव्हती. परंतु अदिलशहाच्या मुख्य वजिरानें दुसरा कांहीं तरणोपाय नाहीं असें पाहून महाराजांशी गुप्तपणे पुढीलप्रमाणे तह केला:

(१) महाराजांनी आजपर्यंत जिंकलेला मुलूख आपल्याकडे ठेवावा. तो परत घेण्याची खटपट विजापूरसरकारांनीं करूं नये. याशिवाय ते मागतील तो मुलूख त्यांस तोडून द्यावा.

(२) शिवाजीमहाराजांचे स्वातंत्र्य विजापूरसरकारानें कबूल करावे. ते आपले अंकित आहेत असें त्यानें इतःपर समजू नये.

(३) विजापूरकारानें शिवाजीमहाराजांस प्रतिवर्षी नेमानें सात लक्ष होन खंडणी द्यावी.

(४) परस्परांनी परस्परांस प्रसंग पडेल तेव्हां मदत करावी.

(५) विजापूरदरबारात शिवाजीमहाराजाचा वकील असावा. ह्याप्रमाणे शामजी नाईक पुंडे ह्यास त्या दरबारांत पाठवून दिलें.

हा तह झाल्यानंतर महाराजांनीं अदिलशहाच्या उरलेल्या मुलखास उपद्रव करण्याचे बंद केलें. शहाजीराजांस हें तह झाल्याचे वर्तमान कळले तेव्हा ते आपल्या ह्या पराक्रमी पुत्राचा भेटीविषयीं उत्कंठित होऊन विजापूर सरकारची परवानगी घेऊन महाराष्ट्रात आले. ह्या पितापुत्राच्या भेटीची हकीकत मागें दिलीच आहे.

***

भाग तेरावा

# आरमार व समुद्रांतील किल्ले

महाराजांनी कोंकणपट्टी स्वसत्तेखाली आणिल्यावर ती आपल्या हाती निर्वेध राहावी म्हणून तिकडील बहुतेक पुंडांचा उपसर्ग कायमचा नाहींसा केला. एकटा जंजिऱ्याचा शिद्दी तेवढा शिल्लक राहिला. त्याच्यावर वेळोवेळां स्वाऱ्या करून त्याचा बहुतेक सगळा मुलूख त्यांनीं काबीज करून तेथें आपली ठाणी बसविली.एक जंजिरा काय तो त्याच्या हातीं राहिला. हा घेण्याचे अनेक प्रयत्न महाराजानी केले, पण ते सारे व्यर्थ गेले. कारण त्याचे आरमार असल्यामुळें त्याला समुद्रांतून हवी तेवढी सामुग्री किल्ल्यावर भरता येत असे; म्हणून त्याला तो किल्ला हवे तितके दिवस लढविता येऊन शत्रूचे सगळे प्रयत्न निष्फळ करितां येत असत. शिवाय महाराजांच्या समुद्रतीरींच्या गावास व शहरास वाटेल तेव्हां उपसर्ग करून व ते लुटून निसटून जातां येत असे; आणि अरबी समुद्रांतून जाणाऱ्या व्यापाऱ्यांच्या जहाजांवर हल्ला करून त्याला त्यांच्याकडून हवा तसा खंड वसूल करिता येत असे. हें पाहून महाराजांनी आपलें एक आरमार तयार करण्याचा निर्धार केला आणि दूरदूरचे कारागीर आणून पुष्कळ लहान मोठी जहाजे तयार केली. हे आरमार तयार करण्याकडे त्यांना त्या वेळीं दहा लाख रुपये लागले. तारवांवर तोफा वगैरे लढाऊ सामान चढवून ती त्यांनी चांगली सज्ज केली; आणि त्यांवर राहून लढणारे लोक पुष्कळ तयार केले. हे बहुतेक जातीने भंडारी असत. कोंकणपट्टीच्या किनाऱ्यावरील गांव बहुतेक भंडाऱ्यांनी वसविले असून ते पुरातन काळापासून जहाजे चालविण्याच्या कामात निष्णात असत. पश्चिम किनाऱ्यावरील सगळ्या बंदराशी व्यापार करणारी बहुतेक जहाजे ह्या लोकांची असत. असें सांगतात की मूर लोकांचा ह्या पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांशी फार प्राचीन काळापासून व्यापार चालू होता. ह्या व्यापाऱ्यांच्या लगटीने हे भंडारी परदेशांतील दूरदूरच्या बंदरांशी व्यापार करीत असत. अरबी समुद्रांत चांचे लोकांची

भीति फार असे. हे चांचे मोठे शूर व कडवे असत. हे बहुतेक भंडारी असत. भंडाऱ्यांप्रमाणे कोळीहि या कामात प्रसिद्ध असत. ह्या दोन जातींच्याच दर्यावदी लोकांचा भरणा महाराजांच्या आरमारावर असे. आरमाराचे सेनापतित्व मायनाक व दर्यासारंग ह्या दोघां भंडाऱ्याकडे होते.

हे असे महाराजांचे आरमार तयार होऊन समुद्रांत फिरूं लागलें. त्याने मोगलाई, फिरंगी, वलंदेजी, फराशीस व इंग्रज तारवांवर हल्ले करून तीं लुटण्याचा सपाटा चालविला. अशा रीतीनें आरमाराचा मोठा खर्च बाहेरच्या बाहेर भागू लागला; व हबशास चांगलीच दहशत पोचली. त्याच्या व महाराजांच्या आरमाराच्या चकमकी वारंवार झडू लागल्या. फिरंगी, इंग्रज वगैरे व्यापारी आपल्या जहाजांस उपद्रव होऊं नये म्हणून महाराजांस वार्षिक खंड देऊं लागले. आपल्या जहाजास निवाऱ्याच्या जागा मिळाव्या म्हणून महाराजांनी समुद्राच्या तीरावरील आपल्या किल्ल्याची चांगली दागदुजी करून ते मजबूत केले कुलाबा किल्ला हस्तगत करून त्याच्यापाशी आपल्या आरमाराचे मुख्य ठाणे केलें. सर्व ठिकाणच्या जहाजांची झडती या ठिकाणी होत असे. सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग वगैरे किल्ल्यापाशी त्यांचे आरमार नेहमी जय्यत असे.

शिद्दी व फिरंगी यांस आता महाराजांची विशेष दहशत वाटू लागली. फिरंग्यानी महाराजाशी पूर्वी केलेला तह कायम करून त्यांचा आपल्या जहाजांस उपद्रव न पोचेसें केलें. हा असा आपल्या शत्रूस व परदेशस्थ व्यापाऱ्यास शह देण्यापुरताच आपल्या आरमाराचा उपयोग करावयाचा असा महाराजांचा उद्देश नव्हता; तर दूरदूरच्या बंदरांशी आपल्या मुलखाचा व्यापार चालवावा असाहि त्यांचा इरादा होता. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील सगळ्या बंदरांशी त्यांच्या जहाजांचा व्यापार चाले; इतकेंच नव्हे तर इराण, अरबस्थांन वगैरे देशाच्या बंदरांतहि त्यांची जहाजे जाऊं लागली होती.

महाराजांच्या आरमाराची यादी चित्रगुप्ताच्या बखरींत येणेप्रमाणे दिली आहे: मोठ्या गुराबा ३०, गलबते १००, महागिऱ्या१५०, लहान गुराबा ५०, तारवें ६०, पाल २५, जूग १५, मचवे ५० व होड्या १५०. कारवारास इंग्रज व्यापारी होते, त्यांचा असा लेख आहे कीं एके समयी महाराजांचे आरमार कारवारापाशी आलें होतें, त्यांत एक डोल काठीची, तीसपासून दिडशे टनपर्यंत वजनाची ८५ जहाजे व तीन मोठी जहाजे होतीं. मुंबईचे इंग्रज शिद्दीशीं स्नेहानें वागून त्यांस मदत करूं लागले,

तेव्हां महाराजांनी एकशे साठ जहाजे मुंबई बेटाच्या ब्याकबे समोर उभी केली होती असा तेथल्या इंग्रजांचा लेख आहे. यावरून चित्रगुप्ताची यादी फारशी अविश्वसनीय नसावी असें वाटतें.

हें आरमार मुख्यतः शिद्दीच्या आरमाराशी टक्कर देऊन त्यास हतवीर्य करण्याच्या उद्देशाने महाराजांनी निर्माण केले. त्याचा जंजिरा काबीज करून त्याचें समूळ उत्पाटन करण्याचा त्यांचा निर्धार झाला होता. परंतु पुढें ह्या शिद्दीने विजापूरदरबाराचा आश्रय सोडून मोगलांची ताबेदारी पतकरिली, आणि त्यांच्या आरमाराच्या साहाय्याने तो चांगला सावरून, महाराजांस मोजिनासा झाला. हे पाहून महाराजांनी त्याला कायमचा शह देण्याच्या इराद्यानें आपला एक जंजिरा असावा. असें मनांत आणिलें आणि मालवणचा किनारा असा जंजिरा बांधण्यास चांगला सोईचा आहे असें पाहणी करून ठरविलें. येथें त्यांनीं समुद्रांत एक भक्कम किल्ला बांधून त्याचें सिंधुदुर्ग असें नांव ठेविले. हा असा जंजिरा या ठिकाणी बांधल्यामुळें त्यांना गोव्याच्या फिरंग्यांस व वाडीच्या सावंतास धाकांत ठेवितां आलें. ह्या किल्ल्यासाठीं महाराजांनी पुष्कळ द्रव्य वेंचलें; आणि तो आपल्या देखरेखीखाली उभारला. असें सांगतात कीं महाराज स्वतः कधींकधीं आपल्या हातानें येथें काम करीत असत. ह्या किल्ल्यांत चांगली फौज ठेवून आणखी त्यापाशीं आरमारहि बरेंच जमा केलें होतें.

***

भाग चौदावा

# मोगलांशी युद्ध व शास्ताखानाची मोहीम (सन १६६० – ६३)

औरंगजेबाने आपल्या बापास कैदेत घालून व भावांस नेस्तनाभूद करून तक्तनिशीन झाल्यावर पुनः आपलें लक्ष दक्षिणेकडे वळविले. उत्तरेकडचे राजकारण आटोपल्यावर त्यानें आपला मामा शास्ताखान याला बरोबर प्रचंड सेना देऊन दक्षिणेंत रवाना केलें आणि विजापूरकरांस शिवाजीमहाराजांशी निकराचा सामना करून त्यांचा अफझुलखानाच्या वधाबद्दल चांगला सूड उगविण्याविषयीं निरोप पाठविला. त्याप्रमाणें विजापूरकरांनीं शिद्दीजोहार याला बरोबर मोठे सैन्य देऊन महाराजांवर स्वारी करावयास पाठविलें, आणि वाडीचे सावंत व जंजिऱ्याचा शिद्दी यांस महाराजांशी नेटाचा सामना करण्यास प्रवृत्त केले. यांना टक्कर देऊन कसें हतवीर्य केलें याचे वर्णन मागें आलेंच आहे.

हा असा युद्धप्रसंग महाराज त्यांच्याशी करीत असतां शास्ताखानानें दक्षिणेंत येऊन महाराजांच्या मुलखावर १६६० सालीं स्वारी केली, आणि त्यांचें किल्ले व प्रांत एकामागून एक सर केले. असे सांगतात कीं ह्या खानाबरोबर एक लाख फौज, पांचसातशे हत्ती, चारपाच हजार उंट, तीनहजार दारूगोळ्याचे छकडे, दोनहजार घोड्यांचे छकडे व बत्तीस कोटींचा खजिना एवढी मोठी सामग्री होती. ह्या अशा प्रचंड सेनासमुद्रापुढें महाराजांच्या लोकांचा निभाव लागणे शक्य नव्हतें. खानाच्या फौजेचा हल्ला आला म्हणजे किल्ले, कोट व ठाणीं सोडून ते पळत सुटत. तरी ते लगेच उलट खाऊन खानाच्या सैन्यावर चोहोंकडून छापे घालून त्यास साधेल तेवढे हैराण करीत. किल्लेदार थोडे दिवस नेटाने लढत, परंतु शेवटीं निरुपाय होऊन किल्ल्यांतून आपल्या लोकांसह निसटून जात.

खानाने सुपें व पुणे हे प्रांत सर करून तेथें आपली ठाणी बसविली आणि आपल्या अवाढव्य फौजेचा तळ पुणे येथे दिला. त्याच्या सैन्यास दाणावैरण वगैरे मिळू न देण्याचा महाराजांनी बंदोबस्त केला. त्यामुळे त्याच्या सैन्यांचे फार हाल होऊ लागले. हे पाहून त्याने असें मनात आणिले कीं, पुण्यापासून अठरा मैलावर चाकण किल्ला आहे तो सर करून त्याच्यावर आपले ठाणे बसविल्यानें अहमदनगराकडून दाणावैरण आणविणे सोपे पडेल. असा बेत करून त्यानें त्या किल्ल्यास मोठ्या फौजेनिशीं जातीनें वेढा दिला. त्या किल्ल्यावर फिरंगोजी नरसाळा हा सुभेदार होता. त्यानें तो बरेच दिवस मोठ्या शौर्याने लढविला. परंतु अखेरीस किल्ल्याच्या तटांस शत्रूच्या तोफांच्या माऱ्यानें मोठी भगदाडे पडून मोगलांचे लोक आंत शिरले. त्या समयी उभय पक्षांचें तुमुल युद्ध जुंपलें. खानाच्या फौजेच्या मोठ्या जमावापुढे त्यांचा निभाव लागला नाही. स्वतः फिरंगोजी जिवावर उदार होऊन मोठ्या आवेशानें लढत होता. पण शेवटीं त्याला हार खावी लागून तो व त्याचे कांहीं लोक शत्रूच्या हाती लागले. खानाने फिरंगोजीची त्याच्या मर्दुमकीबद्दल मोठी तारीफ करून त्याचा बहुमान केला; आणि तो त्याला म्हणाला कीं तूं मोगलबादशहाच्या नोकरीस रहा; मी तुला मोठ्या योग्यतेस चढवितो. खानाच्या ह्या लालचावणीस फिरंगोजी मुळींच भुलला नाहीं. शिवाजी महाराजांशी बेइमान होण्याची ही कल्पना त्याला मुळीं रुचली नाहीं. ही त्याची एकनिष्ठ स्वामिभक्ति पाहून खानाला वाईट न वाटता उलट त्याबद्दल त्याचें गौरव करून त्यानें त्याला महाराजांकडे जाऊं दिलें. त्यांच्याकडे तो गेल्यावर त्यांनीं त्याच्या इमानाबद्दल त्याला नावाजून त्याच्या मर्दुमकीबद्दल मोठे इनाम दिलें.

महाराजांच्या ताब्यातील किल्ले घेण्याच्या कामी खानाचे बरेच लोक खलास झाले. चाकण किल्ल्यास त्याला दोन महिने वेढा घालून लढावें लागल्यामुळे तेथें त्याचे पुष्कळ लोक पडले. अशा रीतीनें त्याला आतां कळून चुकले कीं महाराजांचे किल्ले काबीज करण्याचें काम अतिबिकट आहे. म्हणून आपली हालचाल बंद करून तो पुणे येथें आपल्या सैन्याचा तळ देऊन दोन वर्षे राहिला. पण येथें त्याला महाराजांच्या लोकांचा सारखा उपसर्ग होई. ते त्याच्या फौजेवर वेळोवेळां छापे घालीत व त्याचें कहिकवाड व रसद बंद करीत. महाराजांचा शूर सेनापति नेताजी याने औरंगाबाद व अहमदनगर येथपर्यंतचा मोगलांचा मुलूख लुटून उद्ध्वस्त करण्याचा धूमधडाका चालविला. त्याचा उपद्रव नाहीसा करावा म्हणून खानाने त्याच्यावर मोठी फौज

पाठविली. त्याला ह्या फौजेने गांठवून त्याच्याशी युद्ध केले. शत्रूच्या सैन्याचा जमाव फार मोठा असल्यामुळें त्याचा त्यापुढे निभाव न लागून तो त्याला झुकांडी देऊन मोठ्या वेगाने निघून गेला; आणि त्याचा पाठलाग कितीहि केला तरी तो हातीं लागेना म्हणून खानाची फौज माघारी फिरली.

महाराज ह्या वेळीं कोकणांतल्या मोहिमेवर गुंतले होते. मागें सांगितल्याप्रमाणें तिकडची आपली सत्ता कायम करुन व विजापूरकरांस हतवीर्य करून तें पुण्याकडे वळले. कल्याणभिवंडी वगैरे प्रांत व किल्ले शत्रूनें हस्तगत केले होते ते पुनः काबीज करण्याचें काम त्यांनीं मोरोपंताला सांगितलें, आणि इतर कांहीं किल्ले काबीज करण्याचें काम स्वतः पतकरलें. नेताजीनें तर आपला पूर्वीचा क्रम सारखा चालू ठेविला होता. मोगलांच्या मुलखात एवढी विलक्षण धामधूम त्यांनीं चालविली होती तरी शास्ताखान पुण्याहून मुळीं हालला नाहीं. महाराजांनीं विजापूरकरांस नामोहरम केल्याची वार्ता कळल्यावरून औरंगजेबानें यशवंतसिंगाबरोबर आणखी फौज देऊन या वेळीं दक्षिणेत खानाच्या मदतीस पाठविले होतें. तरी पण त्या दोघांना महाराजांवर स्वारी करण्याची छाती होईना.

शास्ताखान पुण्यास कायमची छावणी करून आपल्या ताब्यांतले पूर्वीचें किल्ले व नवीन काबीज केलेले किल्ले हातचे सहसा जाऊं द्यावयाचे नाहींत असा बंदोबस्त करून स्वस्थ बसला होता. त्याला तेथून कसा हालवावा ह्या विचारांत महाराज होते. त्याच्या एवढ्या मोठ्या सैन्यावर हल्ला करून त्याच्याशी सामना केला तर आपल्या लोकांची खराबी होऊन यश येण्याची आशा फारशी नव्हती. ते ह्या वेळीं सिंहगडावर आपल्या सैन्याची वगैरे कडेकोट तरतूद करून शत्रूची हालचाल पाहत राहिले होते. महाराज सिंहगडावर आहेत हें खानास ठाऊक होतें. तेथून ते आपणांवर केव्हा घाला घालतील याचा नेम नाहीं असें वाटून त्यानें पुण्यातील आपल्या छावणीचा बंदोबस्त अगदीं काळजीने केला होता. सिंहगडाला वेढा घालून किल्ला हस्तगत करून महाराजास पकडण्याची ही चांगली संधि होती. पण चाकण किल्ल्यापाशीं आलेल्या अनुभवामुळे तसें करण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं.

ह्या वेळीं शास्ताखानानें एका ब्राह्मणाच्या हस्तें महाराजांना एक पत्र पाठविले. त्याचा आशय असाः ''तूं मर्कटासारखा डोंगरांत राहणारा आहेस. तूं आपल्या किल्ल्याच्या आश्रयानें राहून वाटेल तशी बंडाळी करत आहेस. युद्धाचा प्रसंग आला

म्हणजे तूं किल्ल्यांत दडी मारून बसतोस. असा तूं कितीहि दिवस लपून बसलास तरी तुझा पिच्छा मी सोडणार नाहीं. मी राजा इंद्र आहे. तुला मज बरोबर युद्ध करण्यास धैर्य नाहीं.'' ह्या पत्राचें उत्तर महाराजांनी पाठविले ते असे: ''मी मर्कटासमान आहे म्हणतोस, तर ज्या मर्कटांनी रावणाचा नाश करून लंका हस्तगत केली, त्यांच्यासारखा मी आहे. मी तुला पळता भुई थोडी करून सोडीन.''

शास्ताखानाला पुण्याहून कसा हुसकून लावावा ह्या विचारांत महाराज गुंग असतां त्यांच्या अंगांत भवानी संचरुन येणे प्रमाणें बोलली: ''माझ्या लेकरास म्हणावे कीं शास्ताखानाची फिकीर किमपि न करणें. जसा अफझुलखान प्रतापाने मारिला, तसाच हा दुष्ट यवन तुझ्या हस्ते शिक्षास्पद करिते. याविषयी तूं कांहीं चिंता करूं नको.'' हें देवीकडून आश्वासन मिळाल्यावर हुरूप येऊन महाराजांनी अशी शकुनगांठ बांधिली की देवीच्या प्रसादाने आपली फत्ते होईल. मग त्यांनीं असें मनांत अणिले कीं शास्ताखानास देहांतशासन दिलें म्हणजे त्याच्या सैन्याचा मोड सहज करितां येईल. हा बेत सिद्धीस नेण्याची त्यांनीं पुढील युक्ति योजिली: त्यांनीं दोन ब्राह्मण पुण्यास पाठवून खानाच्या लष्करातील एक मराठा शिलेदार फितूर करविला आणि त्याला असें सांगितलें कीं त्यानें लग्नसमारंभ करण्याचा बहाणा करून शहरांतून वाजतगाजत वरात काढण्याची परवानगी मिळवांवी; आणि अशी वरात लष्करांतल्या दुसऱ्या कांहीं हिंदू शिपायांच्या मदतीने अमुक दिवशीं व अमुक वेळी काढावी. ह्याप्रमाणे व्यवस्था करून ते ब्राह्मण परत आल्यावर हजार दीडहजार निवडक मावळे बरोबर घेऊन महाराज गडाखाली आले: आणि त्यांनीं कात्रजच्या घाटांत जागोजाग झाडास पोत बांधविले, बैलांच्या शिंगांस पोत बांधवून ते निरनिराळ्या ठिकाणीं उभे करून ठेविले व कांहीं करणेकरी व शिंगाडे डोंगराच्या बिकट जागी ठेवून दिले. ह्या झाडांपाशी व बैलांजवळ मावळे ठेवून त्यांस असे सांगून ठेविले कीं खानाच्या गोटावर हल्ला करून फत्ते मिळवून आम्ही गडाकडे जातांना इशारतीचा करणा वाजला म्हणजे तुम्ही झाडांच्या व बैलांच्या शिंगांचे पोत उजळावे व करणे व शिंगे एकदम वाजवीत तेथून सर्वानी चालते व्हावें. या युक्तीचा उद्देश अर्थात असा होता कीं खानाचे लोक पाठलागास निघाले म्हणजे ते कात्रजाच्या घाटांत उजेड पाहून तिकडे धावत सुटतील व आपणांस सिंहगडावर सुरक्षितपणें जातां येईल. महाराजांनीं बरोबरच्या बऱ्याच मावळ्यांस जागोजाग ठेवून कांहीं जणांस खानाच्या गोटाबाहेर उभे केलें; आणि त्यांस असें सांगून ठेविलें. कीं करण्याचा इशारा होतांच सर्वांनी पुढें चाल करून यावें.

ह्याप्रमाणें कडेकोट व्यवस्था करून पूर्वसंकेताप्रमाणे फितूर केलेल्या शिलेदाराची वरात मिरवत वेशीपाशी येतांच महाराज पंचवीस लोकांसह तिला जाऊन मिळाले आणि खानाच्या गोटांत प्रविष्ट होऊन मध्यरात्र होईपर्यंत स्वस्थ राहिले. लोक झोपी जाऊन चोहींकडे सामसूम झाल्यावर त्यांनीं आपल्या बरोबरच्या लोकांसह खान राहत होता त्या वाड्यावर छापा घातला. तो वाडा त्यांचाच असल्यामुळें त्यांना त्याची रचना चांगली ठाऊक होती. त्या वाड्याच्या स्वयंपाक घराला एक खिडकी होती ती बुजविली होती. ती खणून काढून त्या वाटे महाराज बरोबर दोनतीन मनुष्य घेऊन आत उतरले. अफझुलखानाच्या भेटीस जातांना केलेला पोषाख त्यांनीं या वेळीं चढविला होता. त्यांची चाहूल लागतांच खानाच्या जनानखान्यांतील बायका जाग्या झाल्या, व त्यांनीं त्याला उठविलें. तो उठून घाबरा होऊन एका खिडकीवाटे खालीं उतरू लागला. इतक्यांत महाराजांची त्याच्यावर नजर जाऊन ते त्याच्याकडे धावत गेले आणि त्याच्यावर वार करून म्हणाले: ''शिवाजी तो मी. तूं मजवर मोहीम करून आलास; पण तुला ठार मारण्यास मला विलंब लागणार नाहीं. तुला आपला जीव प्यारा असल्यास आमच्याशी युद्ध करण्याचा बेत सोडून तूं आमच्या प्रांतांतून आपल्या सैन्यासह लवकर निघून जा.'' महाराजांच्या ह्या वारानें खानच्या हाताचे एक बोट तुटलें. इतक्यांत त्याचा मुलगा अबदुल फत्तेखान व त्याच्या तैनातीचे शिपाई महाराजांवर चालून आले. त्या सर्वांची कत्तल उडवून ते आपल्या लोकांसह सुरक्षित बाहेर पडले. गलिमाने छापा घातल्याचा पुकारा खानाच्या लष्करांत होऊन सर्व लोक गलबलून उठले; आणि जिकडेतिकडे एकच गोंधळ माजून राहिला. जोतो गलीम कोठे आहेत म्हणून शोधू लागला. महाराज त्या गर्दीत 'गलीम कोठे आहे' असें ओरडत आपल्या लोकांनिशीं शहराबाहेर सुरक्षितपणें आले आणि जागोजाग ठेवलेल्या लोकांसह सिंहगडाकडे पळत सुटले. इकडे इशाऱ्याचा करणा वाजताच कात्रजच्या घाटातील पोत पेटून करणें व शिंगे वाजू लागली. तेव्हां गलीम त्या वाटेने जात आहेत असें वाटून खानाच्या फौजेनें त्या : दिशेकडे दौड केली. पण सूर्योदयाच्या वेळीं त्या लोकांच्या लक्षांत तो कावा आला, आणि त्या सगळ्यांनी सिंहगडाकडे चाल करून येऊन त्याला मजबूत वेढा दिला. पण वरून तोफांचा एकसारखा भडीमार होऊं लागल्यामुळे त्यांची लौकरच धांदल उडाली, आणि त्यांना वेढा उठवून माघार घ्यावी लागली. इकडे नेताजी पालकराने आपल्या हाताखालच्या एका सरदाराला त्या

लोकांवर पाठविलें. त्यानें त्यांची कत्तल उडवून पुरी धुळधाण केली. हे वर्तमान ता. ५ एप्रिल, सन १६६३ ह्या तारखेस घडले.

हा असा आपल्या लोकांचा पुरा धुव्वा उडालेला पाहून शास्ताखान अगदीं बेदील झाला. मुलाच्या मृत्यूमुळें त्याचें चित्त शोकाकुल झालें त्याचा प्राण जाण्याची पाळी आली होती, ती थोडक्यांत चुकली. शिवाजीमहाराज मोठे दगेखोर असून ते केव्हा काय करितील याचा नेम नाही असें वाटून तो अगदींच घाबरून गेला. शिवाय त्याचे जे थोडे लोक उरले होते ते अगदीं निरुत्साह होऊन त्यांच्यांत काहीएक वकूब राहिला नव्हता. शास्ताखानास आणखी असा वहीम आला कीं आपल्या गोटात फितुरी झाली आहे, तेव्हां अशा फितूर झालेल्या लोकांचा इतबार धरून पुढें लढाई चालविण्यांत काही अर्थ नाहीं; आणि शिवाजीमहाराज जवळपास असतांना पुण्यास तळ देऊन राहणें मोठें धोक्याचे आहे असें वाटून तेथला तळ हालवून तो पेडगांवास गेला.

हें वर्तमान औरंगजेबास कळले तेव्हां तो फार खिन्न झाला. त्याच्या घराण्यातल्या व दरबारच्या सर्व लोकांच्या मुद्रा उदास झाल्या. अशा यःकश्चित् बंडखोरानें आपल्या एवढ्या मोठ्या सेनेची खराबी करून आपल्या शूर मामाची पांचावर धारण बसविली याची बादशहाला मोठी शरम वाटली; आणि तो म्हणूं लागला की शिवाजी मोठा सैतान पैदा झाला आहे. कोणाच्या कधीं ध्यानींमनीं येणार नाही असें अचट कृत्य करून केवढाहि मोठा शूर सरदार असला तरी त्याचा नाश करण्यास तो चुकणार नाही. मग त्यानं शास्ताखानास बंगालचा सुभेदार करून तिकडे पाठविले आणि सुलतान मोअझीम यास दक्षिणेचा सुभेदार नेमिले.

ह्या वेळी यशवंतशिंग म्हणून जो रजपूत सरदार खानाच्या मदतीसाठी पाठविला होता त्याला शिवाजी महाराजांनी लाच देऊन वश करून घेतल्याचा वहीम खानाला येऊन त्यानें तें औरंगजेबाला कळविले होतें, आणि पुण्याच्या छावणीत जी गाफीलगिरी झाली तिचा दोष ह्या रजपूत सरदाराचा होता असें त्याचें म्हणणें होते. पुढें शास्ताखानाची बदली होऊन मोअझीम दक्षिणेत आल्यावर आपले इमान व शौर्य यांचें प्रदर्शन करण्याच्या इराद्याने यशवंतसिंगानें सिंहगडास मोठ्या फौजेनिशी वेढा देऊन तो सर करण्याचा निश्चय केला. परंतु त्याचा तो निश्चय व्यर्थ गेला. त्याचे हजारों लोक गडाखाले गतप्राण झाले व उरलेले रानोमाळ पळत सुटले; आणि तो स्वतः मुठीत प्राण घेऊन जेमतेम औरंगाबादेस जाऊन पडला.

***

भाग पंधरावा

# सुरत, बारसीलोर वगैरे शहरांची लूट

शास्ताखानासारखा मोठा मोगल सरदार बरोबर अवाढव्य सैन्य घेऊन दक्षिणेंत महाराजांचा नायनाट करण्याची प्रतिज्ञा करून आला व तेथे दोन-तीन वर्षे सारखा लढून व शह देऊन राहिला; आणि त्याच वेळीं विजापूरकरांचा बलाढ्य सरदार शिद्दी जोहार मोठी सेना घेऊन महाराजांच्या नाशाचा चंग बांधून त्यांच्या मुलखावर आला. ह्या अशा दोन प्रचंड रिपूंशी दोन वर्षे सारखे झुंजावें लागल्यामुळे त्यांचे बरेच लोक कमी झाले व खजिनाहि खलास झाला. नव्या लोकांची भरती करावयास द्रव्यबळ पाहिजे ते कसें मिळवावे हा त्यांना आतां विचार पडला. इतक्यांत त्यांचा मोठा विश्वासू हेर बहीरजी याने अशी बातमी आणली कीं सुरत शहर मोठे धनाढ्य आहे. तेथें प्राचीन काळापासून परस्थ लोकांशी धनत्तर व्यापार चालत आला असल्यामुळे तेथले सावकार मोठे श्रीमंत आहेत; आणि त्या शहरांत मोगलांचा चांगलासा बंदोबस्त नसल्यामुळे त्यांत प्रवेश करण्यास फारसे आयास पडणार नाहींत.

ही बातमी बहीरजीनें देऊन आणखी त्या शहरांतील श्रीमंत लोकांची तपशीलवार माहिती महाराजांपुढे सादर केली. तेव्हां त्यांनीं त्या शहरावर स्वारी करून ते लुटण्याचा बेत केला, व दहा हजार निवडक मावळे घेऊन ते तिकडे निघाले.

शिवाजीमहाराज सुरत शहर सुटावयास येत आहेत अशी बातमी कळताच तेथले लोक अगदीं घाबरून गेले. कांहीं लोक आपली बायकामुले घेऊन तापी नदीपलीकडे पळत सुटले; कांहीं श्रीमंत लोकांनी मोगल किल्लेदारास लाच देऊन किल्ल्याचा आश्रय धरिला. तेथल्या मोगल सुभेदारानें आपला एक माणूस खंडाचें बोलणे लावावयास महाराजांकडे पाठविला, त्याला त्यांनीं अटकेत ठेविले. तेव्हां तो सुभेदार घाबरून जाऊन त्यांना कोणत्याहि प्रकारचा अटकाव करण्याचें सोडून देऊन किल्ल्यावर जाऊन राहिला. शहरांत प्रवेश करण्यापूर्वी महाराजांनी तेथल्या चारपाच अतिधनाढ्य सावकारांना

असें लिहून कळविले कीं तुम्ही येऊन शहराचा खंड ठरविल्यास. आपण शहरांतल्या कोणत्याहि लोकांस मुळीं उपद्रव करणार नाही. ह्या पत्राचा जवाब कोणांकडूनहि न आल्यामुळें ते शहरांत शिरले. त्यांनीं तेथल्या मोठमोठ्या सावकारांच्या वाड्यांवर जप्ती बसवून त्यांच्याकडून द्रव्य मिळविलें. जे कोणी आपलें जवाहीर वगैरे लपवून ठेवित त्यांस देहांतशिक्षेची ते भीति घालीत. ह्याप्रमाणे त्यांनीं चार दिवसपर्यंत तें शहर बिनहरकत लुटले.

तेथल्या डच व इंग्रज व्यापाऱ्यांनी आपल्या वखारींचा बचाव जहाजांवरील तोफा आणून केला. डच लोकांच्या वखारीजवळ बहरजी भोरा ह्या नांवाच्या एका अतिसंपन्न सावकाराचा वाडा होता. तो महाराजांच्या लोकांनी एक सबंध अहोरात्र लुटला. त्यांत त्यांस अगणित जवाहीर वगैरे मिळाले. डच लोकांनी त्या वाड्याच्या रक्षणांचा काहीएक उपाय केला नाहीं. असाच एका दुसऱ्या धनाढ्य सावकाराचा वाडा इंग्रजांच्या वखारीच्या लगत्यास होता. त्या वाड्याचा मालक सैयद बेग हा किल्ल्यावर पळून गेला होता. त्याचा वाडा लुटावयास महाराजांचे लोक गेले तेव्हां इंग्रजांनीं त्यांना ताबडतोब प्रतिबंध केला. त्यामुळें त्यांना तो यथेच्छ लुटता आला नाहीं. त्यांना तेथून निघून जावे लागले. शिवाजीमहाराज शहर लुटावयास येत आहेत हें कळलें तेव्हां तेथल्या इंग्रज व्यापाऱ्यांचा प्रमुख ऑक्झेन्डन याने आपल्या जहाजांवरच्या तोफा, दारूगोळा व खलाशी वगैरे वखारीपाशी आणून ठेविले होते व दुसरे कांहीं देशी शिपाई जमा केले होते, व वखारीच्या आसपास तोफा रचून ठेविल्या होत्या. ही त्यांची तयारी पाहून महाराजांचे लोक त्यांच्या वाटेस गेले नाहींत. सैयद बेगचा वाडा लुटण्यास इंग्रजांनीं हरकत केल्याचा राग येऊन महाराजांनी ऑक्झेन्डन याला असा निरोप पाठविला कीं, ''सैयद बेग याचा वाडा आम्हांस लुटू द्या अगर त्याबद्दल तीन लाख रुपये आमच्याकडे पाठवून द्या. दोहोंतली एकही गोष्ट न कराल तर मी स्वत: येऊन तुमच्या एकूणएक माणसाची कत्तल उडवीन.'' याचा जबाब त्यानें असा पाठविला कीं,''यांतली कोणतीहि गोष्ट करण्यास आम्ही तयार नाहीं; तुम्हाला वाटेल तेव्हां तुम्ही चालून यावे.'' ह्या त्याच्या धिटाईच्या जबाबावरून त्याचें शासन करण्यास महाराजांस मुळी कठीण नव्हतें. परंतु त्या वेळीं मोगलांची फौज सुरतेकडे. रवाना झाल्याची बातमी त्यांस मिळाल्यामुळे या शहरापाशीं अधिक वेळ न खोळंबता मिळालेली लूट आपल्या मुलखात सुरक्षितपणे न्यावी हें त्यांस इष्ट दिसलें, आणि ते स्वदेशाकडे त्वरेने निघून गेले.

ह्या शहराची लूट चालली असतां महाराजांनी तेथल्या सगळ्याच लोकांस आपलें उग्र स्वरूप दाखविले नाही, असें एकदोन गोष्टींवरून दिसते. त्यापैकी एक गोष्ट अशी: सुरतेस ह्या वेळीं फादर आंब्रोज ह्या नांवाचा एक कापुशियन पाद्री राहत असे. त्याच्या घरावर हल्ला करण्याची आपल्या लोकांस महाराजांनी मनाई केली. ते म्हणाले कीं हा पाद्री धर्मगुरू असून पवित्र आचरणाचे असतात. यांना उपद्रव करणें बरोबर नाहीं. दुसरी गोष्ट अशी: त्या शहरांत मोहनदास पारख या नांवाचा एक मोठा धर्मशील व सदाचारी पुरुष होता. तो डच लोकांचा दलाल असून त्याची मोठी संपत्ति होती. तो ह्या वेळीं मरण पावला असून त्याची बायकोमुलें मागे होतीं. महाराजांना त्या सत्पुरुषाची कीर्ति विदित होती. त्यांनीं त्याच्या घराला हात लावला नाहीं.

ह्या शहरांत मिळालेली सगळी लूट त्यांनीं रायगडावर सुरक्षितपणें नेली. तिचा हिशोब करितां ती साडेआठ कोटि होन किंमतीची भरली. याशिवाय आणखी ह्या मोहिमेंत त्यांना पुष्कळ घोडी मिळाली. त्यांच्या त्याच्या डाव्या टिरीवर खूण करून त्यांची एक निराळी पागा त्यांनी बनविली.

सुरतेहून परत आल्यावर शहाजीराजे मृत्यू पावल्याची अत्यंत शोकजनक वार्ता महाराजांस कळली. त्यामुळें त्यांस पराकाष्ठेचे दुःख झाले. या वेळी ते सिंहगडावर होते. तेथें त्यांनीं स्वपित्याचें और्ध्वदेहिक करून कांही दिवस दुःखात घालविले. तेथून त्यांनीं रायगडावर जाऊन आपल्या एकंदर कारभाराची व निरनिराळ्या खात्यांची सुव्यवस्था लाविली. स्वपित्याच्या पश्चात त्यांनीं आपल्या नांवास राजे हा किताब जोडला व आपल्या नांवाचे नाणे पाडलें. हें वर्तमान स. १६६४ त घडलें.

महाराजांचा विजापूरकरांशी झालेला तह फार दिवस टिकला नाहीं. हा तह कायम होतां तोवर त्यांचे नेताजी पालकर वगैरे सरदार फक्त मोगलांच्या मुलखात एकसारख्या मोहिमा करून लुटालूट करीत असत. त्यांचें आरमारहि मोगलाच्या व्यापारी जहाजांवर व मक्केच्या यात्रेस जाणाऱ्या तारवांवर हल्ले करून ती लुटली. सुरत शहर लुटल्याची वार्ता औरंगजेबास कळल्यावर त्याने महाराजाच्या पारिपत्यासाठी पुनः एकवेळ प्रयत्न करण्याचा निर्धार करून जयसिंगास दक्षिणेत मोठ्या सैन्यानिशी पाठविण्याची तयारी चालविली, आणि विजापूरकरास निरोप पाठवून महाराजांच्या शासनास उद्युक्त होण्याविषयी भर दिली. हें असे मोगल बादशहाचें प्रोत्साहन मिळाल्यावर अदिलशहानें महाराजांशी केलेला तह मोडून त्यांच्या मुलखात पन्हाळा येथील आपल्या

सरदारांस स्वारी करण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें त्यांनीं धामधूम सुरू करून कोंकणातली काही ठाणी सर केली. हे वर्तमान कळतांच महाराजांनी स्वतः मोठ्या त्वरेने तिकडे जाऊन त्या सरदारांशी युद्ध केलें. ह्या युद्धांत शत्रूच्या हजारो योद्ध्यांची कत्तल उडाली व ते सरदार अगदीं दीन होऊन पळून गेले.

ह्यानंतर त्यांनी आपलें कांहीं घोडदळ कृष्णानदीच्या पलीकडील विजापूरकरांच्या मुलखात पाठविलें. त्यानें तेथें एकसारखा धुमाकुळ मांडला. त्या वेळी हुबळी शहर व्यापाराचे मोठे ठाणे होते, ते त्यांनी लुटलें. त्याचप्रमाणें त्यांनीं तिकडील आणखी व्यापाराच्या पेठा लुटल्या. महाराजांनी स्वत: ह्या वेळी आपल्या आरमाराच्या साहाय्याने विजापूरकराच्या समुद्रतीरावरील शहरांवर हल्ले करण्याचा बेत केला व सिंधुदुर्ग येथे आपलें आरमार जमवून दक्षिण किनाऱ्यावरील शहरांवर रोख धरिला. त्या वेळीं बारसीलोर नांवाचे शहर अतिधनाढ्य असल्याचें कळल्यावरून त्यांनीं त्या शहरावर प्रथम हल्ला केला आणि ते स्वस्थपणें लुटले. ह्या शहराच्या लुटीत त्यांना दोन कोटि होनांचा ऐवज मिळाला असें म्हणतात.

मग त्यांनीं त्या किनाऱ्यावरील कडवाळ, मिर्जान, अंकोला, कोद्रे, हुमाऊद वगैरे बऱ्याच शहरांवर हल्ला करून तीं सर केलीं व त्यांवर आपला अमल बसविला. त्या प्रमाणेंच त्यांनी गोकर्णमहाबळेश्वर हस्तगत केलें. बेदनूर प्रांतांत शिवाप्पा नाईक नावाचा एक विजापूरकरांचा सरदार स्वतंत्र होऊन बसला होता, त्याला त्यांनीं आपला अंकित करून त्याच्यावर तीन लाख रुपयांचा वार्षिक खंड बसविला. नंतर ते कारवारापाशीं येऊन दाखल झाले. तेथल्या विजापूरकरांच्या सरदाराने त्यांना विरोध करण्याचा प्रथम आव घातला. तेथें इंग्रजव्यापारी होते. त्यांनी आपली सारी चीजवस्तू एका मुसलमानाच्या जहाजावर लपवून ठेविली. शेवटीं त्या सरदाराने महाराजांस कांहीं खंड देण्याचे कबूल करून तो ऐवज त्यांच्याकडे पावता केला. ह्या वेळीं इतर व्यापाऱ्यांप्रमाणें इंग्रजांसहि कांहीं रक्कम द्यावी लागली. हा खंड मिळाला तेवढ्यांत संतोष मानून ते कारवारच्या बंदरांतून निघून गेले.

येथून पुढें जलमार्गानेंच जाऊन बंदरकिनाऱ्यावरील आपल्या सगळ्या किल्ल्यांची, प्रांतांची व आरमाराची व्यवस्था पाहावी व शिद्दीची कशी काय हालहवाल आहे ती प्रत्यक्ष पाहावी असा त्यांनीं बेत केला. पण प्रतिकूल वारा लागून त्यांना पुष्कळ दिवस पाण्यांत खोळंबून राहावें लागलें; आणि स्वराज्यात कशी काय हालहवाल आहे,

शत्रूची हालचाल कोठेंकोठें चालू आहे हें कळण्याचा मार्ग अगदीं खुंटेला. हें पाहून जलमार्गाने पुनः कधीं स्वतः मोहीम करावयाची नाही असा त्यांनीं निर्धार केला.

शिवाजीमहाराजाच्या पराक्रमांचे व रणवेगाचें वर्णनं त्या वेळचे इंग्रज व्यापारी येणेप्रमाणें करितात: ''शिवाजीचा देह वायुरूप असून त्याला पंख असावे असें ज्याला त्याला वाटूं लागलें आहे. कारण तो कोणत्यी वेळी कोठे प्रगट होईल याचा कांहींच नेम नाहीं. तो आज एके ठिकाणी आहे तर उद्या दूर कोठे गेल्याची बातमी येते. ज्या ठिकाणचा कडेकोट बंदोबस्त असतो त्यावर हल्ला करून आपल्या लोकांची खराबी करावयास तो कधीहि उद्युक्त होत नाहीं. ज्या शहरास व गांवांस तटबंदी नसून लष्करी बंदोबस्त फारसा नाही, त्यांवरच हल्ला करून तीं तो लुटतो. त्याच्या ठायीं उद्योगशीलता, श्रमसहिष्णुता, जोम व चपळता हे गुण विलक्षण आहेत असे जो तो बोलत असतो. शिवाजीचा जिकडेतिकडे विजय होतं आहे. त्याला प्रतिरोध करण्याचा आवाका कोणालाहि नाहीं. सगळ्या लहानमोठ्या राजांना त्याचा पराकाष्ठेचा धाक वाटत आहे.''

***

भाग सोळावा

# जयसिंगाची स्वारी (सन १६६५ – ६६)

शिवाजीमहाराजांचा पराकाष्ठेचा राग येऊन औरंगजेबाने त्यांचा समूळ नाश करण्याचा निर्धार केला; आणि राजा जयसिंग, दिलेरखान वगैरे युद्धकुशल व शूर सरदारांस ऐंशी हजार फौज देऊन दक्षिणेत रवाना केले. त्याच वेळीं त्याने विजापूरकरांस पुढील आशयाचे पत्र लिहिले: ''शिवाजी फार दंगा व फंदफितुरी करीत आहे. त्यानें चोहोंकडे पुंडावा मांडला आहे. मुसलमान रयतेस तो फार पीडा देत आहे. याकरिता त्याचें पारिपत्य करण्याच्या बाबतीत ढिलाई व चालढकल केल्यास मुसलमानी राज्य बुडून जाईल. याकरिता ह्या सर्व फंदफितुरीचे व बंडाचे मुळ कारण जो शिवाजी त्याचा समुळ नाश करून गरीब रयतेस त्याच्या जाचांतून सोडविणें आम्हां उभय मुसलमान बादशहास प्राप्त झालें आहे. याविषयीं यत्न करण्यास यत्किंचित्‌हि आळस करून उपयोग नाहीं. यास्तव आमची अशी मनीषा आहे कीं इकडून त्या खराब शिवाजीच्या पारिपत्यासाठी मोठे शूर योद्धे रवाना होत आहेत, तसेंच आपणांकडूनहि रवाना व्हावे; आणि आम्ही दोघांनी त्या शिवरूपी सापाचे मस्तक फोडून त्याच्या गैरशिस्त वागणुकीचा सूड घ्यावा. हा जबददस्त उपद्रव देऊ पाहणारा कांटा फार बळावला नाहीं तोच काढून टाकल्याशिवाय स्वस्थता प्राप्त होणार नाहीं. ही गोष्ट आपणांस पसंत पडल्यास आम्हां उभय बादशहांमध्यें साफी व मित्रता राहील; कांहीं एक कपट किंवा वैर राहणार नाहीं.'' औरंजेबाच्या ह्या पत्रावरून विजापूरकरांनीं महाराजांशी लढण्याचा उपक्रम केला असतां त्याची कशी खोड मोडली तें मागल्या भागांत सांगितलेंच आहे.

महाराजांचे पारिपत्य करण्यासाठीं जयसिंग मोठ्या फौजेनिशीं दक्षिणेंत आला खरा; पण त्यांचे पराक्रम वेळोवेळा त्याच्या कानी गेले होते, व त्यांची युक्तिमत्ता, साहस, धैर्य, शौर्य व धमक हे गुण अप्रतिम असून त्यांच्या पदरचे लोक हातावर शिर घेऊन इमानानें व शौर्यानें लढण्यास सर्वदा सिद्ध असत हें त्याला चांगले कळून आलें होतें. यास्तव अशा प्रतापशाली पुरुषाशी सामना करण्याचें काम मोठें जोखमाचें व

बिकट होतें हें तो जाणून होता; आणि आपली मोहीम कशी यशस्वी होईल याची त्यास सारखी चिंता लागून राहिली होती. महाराजांशी ज्यांचे वैर होतें अशा सगळ्या लोकांना जयसिंगाने पत्रे पाठवून त्यांच्यावर उठविलें आणि त्यांस आपल्या पक्षाला सामील करून घेतलें. विजापूरकरांस खंडणी कमी करण्याची लालूच दाखवून महाराजांशी लढण्यास त्यानें प्रवृत्त केलें. इंग्रज वगैरे व्यापाऱ्यास महाराजांच्या आरमारावर वेळोवेळा हल्ले करावयास त्यानें सांगितले. जंजिऱ्याच्या शिद्दीस त्यांच्याशीं लढण्यास त्यानें प्रोत्साहन दिलें. मोगलांच्या आरमारानें महाराजांच्या कोंकणपट्टीवर हल्ले करावे अशी त्यानें योजना केली. महाराजांनी ज्याज्या मराठे सरदारांना वगैरे उपसर्ग केला होता त्यांचे नातलग महाराजांचा सूड उगविण्यासाठी जयसिंगास जाऊन मिळाले. जंव्हार वगैरे ठिकाणचे कोळी राजे त्याला मदत करावयास उद्युक्त झाले. फार काय पण दक्षिणेकडचे शिवप्पा नाईक वगैरे त्याच्या मदतीस गेले. अफझुलखानाचा मुलगा फाजलखान व मोऱ्याचे दोन मुलगे जयसिंगाच्या फौजेंत जाऊन राहिले.

ह्याप्रमाणें महाराजांचे सगळे शत्रु जयसिंगाच्या मदतीस गेल्यावर त्यानें त्यांच्या सत्तेतील मुलखांत प्रवेश केला आणि सर्व बाजूंनी व रस्त्यांनी आपल्या फौजेची मोठमोठी ठाणी बसवून महाराजांच्या सैन्याची हालचाल व धामधूम अगदीं मर्यादित केली. या वेळीं नेताजी पालकर हा महाराजांच्या हुकूमाप्रमाणें न वागल्यामुळे त्याला सरनौबतच्या हुद्यावरून दूर करून तो त्यांनी प्रतापराव गुजरास दिला. त्यामुळें नेताजी नाराज होऊन महाराजांची नोकरी सोडून गेला. म्हणून मोगलांच्या सैन्यावर घाले घालंण्याचें काम चांगले होईनासें झालें.

वर सांगितल्याप्रमाणें चोहोकडून कडेकोट बंदोबस्त करून जयसिंगाने आपल्या फौजेचा तळ सासवडच्या मंध्यवर्ती ठाण्यावर दिला. मग त्यानें दिलेरखानांस पुरंदर किंल्ल्यास वेढा घालावयास पाठविले आणि आपण स्वतः सिंहगडास वेढा दिला. ह्या वेढ्यांस महाराजांच्या लोकांचा उपसर्ग होऊ नये म्हणून त्यानें जागोजागी आपले लोक ठेवून दिले. इतकी उत्तम ठाणेबंदी करूनहि जयसिंगाच्या मनाला बिलकूल स्वस्थता नव्हती. दक्षिणेत पाय ठेवल्यापासून त्याला अशी दहशत वाटत होती कीं अफझलखान व शास्ताखान यांच्यासारखी आपली दशा केव्हा होईल याचा नेम नाहीं. यास्तव आपली कामगिरी कशी तरी एकदांची उरकून दक्षिणेतून निसटता पाय घ्यावा असें त्याच्या मनाने घेतलें. दुसरें असें कीं स्वधर्मरक्षण व स्वराज्यस्थापना यांप्रीत्यर्थ

महाराज अहर्निश उद्योग करीत आहेत. यास्तव अशा पवित्र कार्यास उद्युक्त झालेल्या तेजस्वी पुरुषाशी युद्ध करून यश मिळण्याची त्याला आशा वाटली नाही. म्हणून त्यानें महाराजांस पुढील आशयाचें पत्र लिहिलें: ''औरंगजेब अतिबलढ्य आहे. त्यांच्याशी शत्रूत्व करून परिणाम लागणार नाहीं. त्याच्याशी तुम्ही सख्य करावे हे उत्तम. तुम्ही थोर वंशांत निपजला असून हिंदुधर्माचा तुम्हांस पूर्ण अभिमान आहे हे पाहून आम्हांस मोठा संतोष वाटत आहे. स्वधर्मरक्षणार्थ व स्वराज्यस्थापनार्थ तुम्ही चालविलेल्या सदुद्योगास आमची पूर्ण अनुकूलता आहे. तुमचा बचाव करून तुमची सत्ता कायम राखावी असें आमच्या मनांत आहे. या बाबतीत तुमचा मानस काय आहे तें कळवावे.''

अशा आशयाचे पत्र जयसिंगाकडून आल्याने महाराजाची चिंता बरीच दूर झाली. त्याच्या अंगांत देवीने संचरून त्यांस जयसिंगाशी सख्य करावयास सांगितले; व पदरच्या लोकांचाहि असाच अभिप्राय पडला. म्हणून त्यांनी रघुनाथपंतास जयसिंगाकडे समेटाचें बोलणे करावयास पाठविलें. ह्या वकिलाबरोबर जयसिंगाला त्यांनीं पत्र पाठविले त्याचा आशय असाः ''आपण वार्तिकाबरोबर पत्र पाठविलें ते पाहून अत्यानंद झाला. तें दोन्ही हातांनी घेऊन पितृदर्शनतुल्य मानून मी हृदयाशी धरिलें. आपणाकडून पत्र येण्याचा किमपि भास नसता ते आले याबद्दल पूर्ण समाधान वाटून चिंता दूर झाली. पत्रींचा भाव समजून तें ममतेनें भरले आहे असे वाटले. पत्र वाचतांक्षणीच दर्शनास बिनदिक्कत यावे; कोणत्याहि गोष्टीचा मनांत अणुमात्र आक्षेप न आणितां व हे परकी आहेत अशी चिंता मनांत अल्पहि न करितां आपल्यावर अवलंबून राहिल्याने वांच्छित हेतु परिपूर्ण होऊन माझे सर्व प्रकारी कल्याण होईल असे मला वाटले. जसे आपले चिरंजीव रामसिंगराव राजे तद्वत मला समजून आपण ममतापूर्पक पत्र लिहिले तेणेकरुन माझें चित्त अतिसंतोष पावले. ही अशी वृत्ति माझी झाली आहे की कसें तें एक जगदंबा जाणे. तुमचें दिल्लीहून दक्षिणेंत आगमन झाले ही उत्तम गोष्ट घडून आली. माझे सर्व मनोरथ सिद्ध होतील अशी माझ्या दिलाची खात्री झाली. माझे सर्व भय नष्ट होऊन मन आनंदातिशय पावले. आपण क्षात्रधर्मसंरक्षणकर्ते आहां. बादशहाची आम्हांवर इतराजी तर बहुत झाली आहे. पुढें कांही तरणोपाय दिसत नाही. ही विवंचना आम्हास लागून राहिली आहे. बादशहा सर्वाचे खावद हें प्रमाण. परंतु क्षात्रधर्मास अवरोध झाला. म्लेच्छमय धरा झाली. अविधा उन्मत होऊन हिंदुधर्म बुडवीत चालले. संपूर्ण पुण्यक्षेत्रे भ्रष्ट करून त्या स्थली ते गोवध करूं लागले. देवालयें पाडून तेथें

त्यांनीं मशिदी बांधिल्या. त्यांचा हेतु कीं हिंदुधर्म रहित धरा करावी. हा सर्व प्रकार असह्य वाटून वडिलांच्या प्रतापाने व श्रीजगदंबेच्या अनुग्रहाने यवनांशी आजपर्यंत मी यथाशक्ति विरोध केला. हिंदुधर्माचा अभिमान हिंदुराजांनी टाकिला हे कांहीं चांगले नाही. ह्या भूमिचें राज्य हिंदू राजे पुरातन काळापासून करीत आले असून सांप्रत ते पदभ्रष्ट होऊन यवनांचे अंकित झाले आहेत हे पाहून मन उद्विग्न होते. ह्या गोष्टीसंबंधानें आपणांस पूर्ण ईर्षा असावी. आतां बादशहाची मी अनेक प्रकारी आगळीक केल्यामुळें त्याला क्रोध येऊन त्याने आपणास मजवर पाठविलें आहे. तरी पादशहाचे दरबंदगीस मी अंतर करणार नाहीं. मजकडे जे किल्ले व प्रांत आहेत ते मीं आपल्या बाहुबलानें परराज्यातून काबीज केले आहेत. त्यांस बादशहाकडून उपद्रव ना होता त्याचें मन माझ्याविषयी स्वच्छ व्हावे हे मला इष्ट आहे. त्याच्या मनात दक्षिण काबीज करावयाची आहे. त्यास मी मनापासून मदत करीन.'' रघुनाथपंताबरोबर हे पत्र देऊन आणखी पुष्कळ बहुमोल नजराणा महाराजांनी जयसिंगास पाठविला.

जयसिंगाने रघुनाथपंताची भेट आदरपूर्वक घेतली व महाराजांकडून आलेल्या नजराण्याचा प्रीतिपूर्वक स्वीकार केला. महाराजांनी पाठविलेलें पत्र वाचून व तोंडचा आणखी निरोप ऐकून त्याला समाधान वाटलें; आणि त्यानें त्या वकिलाच्या हातीं महाराजांस निरोप पाठविला तो असा: ''औरंगजेबासारख्या बलाढ्य बादशहाशी स्पर्धा केल्याने काहीएक हित होणार नाहीं. तुम्ही आमच्याबरोबर बादशहाच्या भेटीस चलावे. अणुमात्र भीति चित्तांत वागवूं नये. जसे आमचे पुत्र रामसिंग तसेच तुम्ही मला आहां. आम्ही रजपूत सत्यवक्ते आहो. आमच्यापासून बेइमानपणा होणार नाही. अशी निशा मानून तुम्ही प्रांजल चित्तानें आमच्या भेटीस यावें. मनांत कांहींएक दिक्कत धरू नये. बादशहापाशी तुमची सर्व गोष्टीनी शिफारस करून तुम्हांला स्वराज्यास यावयाला निरोप देववितो. मग जयसिंगानें रघुनाथपंतास दिलेरखानाच्या भेटीस नेले; आणि त्या दोघांच्या सल्ल्यानें असें ठरलें की महाराज कोणत्या गोष्टी औरंगजेबापासून ठरवून घेऊ इच्छीत आहेत त्या त्यांनी नीट खुलासेवार कळवाव्या, म्हणजे त्यासारखा विचार करता येईल. हा असा निरोप देऊन जयसिंगाने रघुनाथपंतास वस्त्रालंकारांनी गौरविले व महाराजांसाठी त्याजकडे नजराणा दिला.

हा निरोप आल्यावर महाराजांनी आपल्या करारांची एक यादी तयार केली, तीतील आशय पुढीलमाणे होताः ''आम्ही जे प्रांत व किल्ले काबीज केले आहेत ते

दरोबस्त आमचे आम्हांकडे राहावे, आणि वरकड दक्षिण प्रांताची चौथाई व सरदेशमुखी आमच्याकडे चालावी.'' ही यादी घेऊन रघुनाथपंत पुनः जयसिंगाकडे गेला तेव्हां त्यानें त्याला असें सांगितलें कीं राजे आमच्या भेटीस आल्यावर तहाच्या अटी नीटपणे ठरवू. परंतु जयसिंग शिवाजी महाराजांची भेट घेऊन तहाची कलमे मुक्रर करणार हे दिलेरखानास पसंत वाटले नाही. त्यानें त्याला असें सांगून पाठविलें की बादशहाची मंजुरी घेतल्यावांचून तहाची गोष्ट बोलू नका. मी पुरंदरास वेढा घातला आहे, तो मी कांहीं झालें तरी घेतल्यावांचून राहणार नाहीं. तुम्हीहि सिंहगड काबीज करावा. जयसिंगाने त्याची अशी समजूत घालण्याचा प्रयत्न केला कीं शिवाजीमहाराजांच्या एकूणएक किल्ल्याचा बंदोबस्त उत्तम आहे. त्यांचा एकएक किल्ला काबीज करण्याच्या प्रयत्नांत हजारो लोकांचा नाश होऊन किती तरी दिवस रखडावे लागणार. निजामशाहीचे जेवढे किल्ले शिवाजीमहाराजांनी हस्तगत केले आहेत तेवढे त्यांच्याशी तह करून सोडवून घेतले म्हणजे आपलें काम झाले. ही मसलत त्या सरदाराला रुचली नाही, आणि महाराजांशी सलोख्याचा तह करण्याचें जयसिंगाला तहकूब करावें लागले.

दिलेरखानाने पुरंदरास पुष्कळ लोकांनिशीं वेढा दिला होता. त्या किल्ल्यावरचा हवाला मुरार बाजी प्रभु नांवाच्या एका सरदाराकडे होता. तो अतिशयित शूर व हुशार होता. किल्ल्यांत अन्नसामग्री व दारूगोळा मुबलक होता. त्याने मोगलांच्या सैन्यास पुष्कळ दिवस मुळीं दाद दिली नाहीं. मोगलांचे हजारो शिपाई त्या किल्ल्याखाली गतप्राण झाले. तरी दिलेरखान लोकांची नवीनवी भरती करून किल्यावर तोफांचा मारा एकसारखा करीत होता. शेवटीं त्यानें किल्याच्या एका बाजूला सुरुंग लावून तटाला भगदाड पाडलें व त्यांतून आपले लोक वर चढविले. मुरार बाजीने त्यांचा तो हल्ला मागें हटविला. ह्या वेळी मुरार बाजी अगदीं जिवावर उदार होऊन हाती ढालफिरंग घेऊन सर्वांच्या पुढें होऊन लढत होता. त्यामुळे मावळ्यांना पराकाष्ठेचा चेव आला. पुष्कळ मावळे धारातीर्थी पडले, व मोगल सैन्याचीहि अतोनात कत्तल उडाली. हा असा महाराजांच्या त्या शूर सरदाराचा पराक्रम पाहून दिलेरखान अगदी चकित झाला. त्याने मोगलांचा हल्ला मागें रेटीत रेटीत किल्ल्याच्या तळापर्यंत पोचविला. हे पाहून दिलेरखानासहि अतिशयित त्वेष येऊन त्यानें आपला हत्ती रणकंदनांत पुढें नेला आणि आपल्या लोकांस उत्तेजन देण्याची शिकस्त केली. मुरार बाजीच्या हातातली ढाल

तुटून पडली असून तो हाताला शेला गुंडाळून त्यावर शत्रूचे प्रहार घेत होता. तो असा लढत लढत जवळ आला असे पाहून दिलेरखानानें त्याला हाक मारून म्हटले: ''तूं मोठा शूर योद्धा आहेस. तुझा हा आजचा अद्‌भूत पराक्रम पाहून मी केवळ चकित झालो आहे. तूं ह्या समयी कौल घेऊन माझ्या स्वाधीन हो. मीं तुला मोठ्या योग्यतेस चढवितो.'' हे त्याचे शब्द ऐकून मुरार बाजी त्याचा धिक्कार करून बोलला: ''तुम्ही तुरुकडे, तुमचा हिसाब काय? मी शिवाजीमहाराजांचा नोकर आहे. मी तुझा कौल घेतो कीं काय? मी ह्या रणांत आपला देहपात करीन, पण तुला सहसा शरण येणार नाही.'' असें बोलून खानावर आपल्या तरवारीचा वार करण्याच्या बेतांत तो होता, इतक्यांत खानाने तीर मारून त्याचे शिर उडविलें!

आपला मोहरा पडला तरी मावळ्यांनी धीर न सोडता खानांच्या लोकांशीं लढत लढत पुन: किल्ल्यावर चढून जाऊन दरवाजे लावून घेतले. इतक्यांत महाराजांकडून आणखी कुमक येऊन त्यांना नवा दम आला. इकडे खानानें असा पण केला कीं हा किल्ला घेण्याच्या कामीं कितीहि लोक खर्ची पडले तरी न डगमगतां तो सर केल्यावांचून राहावयाचे नाहीं. असें सांगतात कीं त्यानें आपल्या डोकीची पगडी उतरून अशी प्रतिज्ञा केली कीं हा गड घेईन तेव्हां पगडी परत घालीन. परंतु ही त्याची प्रतिज्ञा महाराजांच्या शूर मावळ्यांनी शेवटास जाऊं दिली नाही.

इकडे सिंहगडास वेढा घालण्यास ज्या सरदाराला जयसिंगानें पाठविलें होतें तोहि रडत माघारी गेला. त्याच्या बहुतेक फौजेची महाराजांच्या लोकांनी कत्तल उडविली. ते मोगलांच्या छावण्यावर जिकडूनतिकडून छापे घालून कापाकापी व लुटालूट करीत व हातीं लागतील तेवढे घोडे, बैल, उंट वगैरे घेऊन जात, त्यांना दाणा, वैरण वगैरे कोठूनहि मिळू देत नसत व जवळपासच्या रानास आग लावून देऊन त्यांस घाबरे करीत. हा असा चोहोकडून एकसारखा उपसर्ग होऊं लागल्यामुळें जयसिंगाला आपण येथून जिवांनिशी कसे सुटून जातो अशी चिंता वाटू लागली; आणि पुरंदर किल्ल्यापाशीहि खानाच्या लोकाची अतोनात खराबी होऊन तो अगदीं जिकिरीस आला आहे असें कळले. तेव्हां त्यानें त्याला असा निरोप पाठविला कीं, शिवाजीमहाराजांशीं तह करून आपण संकटमुक्त व्हावें हें बरें दिसतें. या वेळीं खानाला त्याचें म्हणणें पटून तहाचें बोलणे लावण्यास त्यानें मान्यता दिली.

मग जयसिंगानें पुनः एक वेळ वार्तिक पाठवून महाराजांना असें कळविलें की तुम्ही घातलेल्या अटींप्रमाणे तह करण्याची आमची तयारी आहे; मात्र पुरंदर किल्ल्यावर खानाच्या आग्रहास्तव आमचें निशाण लावू द्यावे. मग तहात तो किल्ला हवा असल्यास परत घ्यावा. तुम्ही आम्हांस भेटून जे कांहीं करार करावयाचे ते करावे. आमच्यावर पूर्ण भरवसा ठेवून बिनदिक्कत आमच्या भेटीस यावे. जयसिंगाच्या ह्या निरोपाला महाराजांनी असा जबाब पाठविला कीं, ''पुरंदर किल्ल्यावर तुमचें निशाण लावू देणें तर दूरच राहिलें, पण त्या किल्यापुढची खानाची फौज उठवून रुद्रमाळ त्यानें घेतला आहे तो परत द्यावा, म्हणजे मग भेटीस येऊन तह करण्याचा विचार पाहू.'' हा त्यांच्याकडचा जबाब आल्यावर जयसिंगानें त्यांची ही अट कबूल करून त्यांस आपल्या भेटीस बोलाविले.

त्यावरून महाराज मोठ्या थाटाने जयसिंगाच्या भेटीस गेले. ते जवळ आले असें कळताच जयसिंग कांहीं लोकांसह त्यांस सामोरा गेला. तो आपणांस सामोरा आला असें पाहून महाराज हत्तीवरून खाली उतरून पुढें पायी चालत गेले. जयसिंगहि आपल्या हत्तीवरून उतरून चालत पुढें आला. त्यांनी एकमेकांस प्रेमालिंगन दिले. त्याबरोबर उभय पक्षाची वाद्यें वाजू लागली. मग जयसिंगाने महाराजांस आपल्या अंबारीत बसवून वाजतगाजत डेऱ्यास नेलें. तेथें गेल्यावर ते दोघे एका आसनावर बसले. महाराजांची ती इभ्रत व ते तेज पाहून जयसिंग व इतर सरदार अगदीं दंग झाले. मग जयसिंग म्हणाला: ''आम्ही तुम्हांस सर्व प्रकारे अनुकूल आहो. आम्हांस तुमचा पूर्ण अभिमान आहे. तुम्ही आम्ही काही निराळे नाहीं. तुमच्या इच्छेप्रमाणे बादशाहाकडून सर्व कांहीं व्यवस्था करवितो.'' जयसिंगाचे असें आदराचे व प्रेमाचे भाषण ऐकून महाराज म्हणाले: ''तुम्ही मला वडिलांसमान आहां. तुमच्या ठायी माझा पूर्ण भाव आहे. मीं मिळविलेले राज्ये सारे तुमचे आहे, मीहि तुमचाच आहे. वडिलांच्या मांडीवर माझें लेकराचे उसे आहे. तुमच्या आज्ञेप्रमाणे मी तुमच्या दर्शनास आलों आहें. या गोष्टीचा अभिमान धरून जें योग्य दिसेल तें करण्यास वडील समर्थ आहेत. तुम्हांस जे किल्ले पाहिजेत ते देण्यास मी तयार आहें.'' हे त्यांचें नम्रतेचे भाषण ऐकून जयसिंग संतोष पावला. मग त्यानें त्यांस दिलेरखानाच्या भेटीस पाठविले. तो त्या वेळीं पुरंदर किल्ल्यापाशी असून त्याच्या लोकांचा किल्ल्यावर चोहोकडून तोफांचा मारा सुरू होता. महाराजांनी त्याची भेट घेऊन मोठ्या नम्रतेचें भाषण केलें आणि अशी विनवणी केलीं कीं, ''माझे आजपर्यंतचे वर्तन मनास न आणितां माझी

बादशहापाशी रदबदली करून तो मला आपल्या पदरी नोकरीस ठेवील असें करा. ह्या किल्ल्यावर आता मारा करण्याचें बंद करा. तो मी तुमच्या स्वाधीन करितों. त्याच्या किल्ल्या ह्या मीं तुम्हांला द्यावयाला आणिल्या आहेत.'' त्या किल्या हातीं पडताच खान खूष झाला आणि म्हणालाः''जयसिंग वडील आहेत. ते जें काही करितील तें मला मान्य आहे.'' मग त्यानें त्या किल्ल्याचा वेढा उठविला व किल्ल्यावरच्या लोकांस महाराजांनी निरोप पाठविल्यामुळे तेहि स्वस्थ झाले. असें सांगतात कीं ह्या किल्ल्यावरच्या आपल्या उरलेल्या लोकांची कत्तल होऊं नये व त्यांची बायकामुले शत्रूच्या हातीं लागून त्यांची विडंबना होऊं नये म्हणून महाराजांनी तह करण्याची ही अशी त्वरा केली.

ह्याप्रमाणें मोगल सरदारांस स्वस्थ बसावयास लावून महाराजांना जयसिंगाशी तहाच्या अटीसंबंधाने बरीच भवतिनभवति केली; आणि शेवटीं तहाची कलमे ठरली तीं अशीं:

''महाराजांनी मोगलांचे घेतलेले सगळे किल्ले सोडून द्यावे; निजामशाहींतील त्यांनीं सर केलेले व नवीन बांधलेले एकंदर बत्तीस किल्ले होते त्यापैकी वीस किल्ले आसपासच्या प्रांतांसह त्यांनीं जयसिंगाच्या स्वाधीन करावे, व बाकीचे बारा किल्ले व त्यालगतचा सारा प्रांत जहागिरीदाखल आपल्याकडे ठेवावा; शिवाजी महाराजांनीं विजापूरकरांच्या सत्तेतील जे प्रांत व किल्ले काबीज केले आहेत ते त्यांच्याकडे निर्वेध राहावे; आणि ही सगळी दिल्लीच्या बादशहाकडून जहागीर मिळाली आहे असें समजून त्यांचें अंकितत्व स्वीकारून त्यांनीं राहावे. त्यांचा मुलगा संभाजी जो त्या वेळीं आठ वर्षाचा होता त्याला बादशहाकडून पांच हजार स्वारांची मनसब मिळावी. निजामशाहींतील आपले वडिलोपार्जित हक्क त्यांनीं सोडून द्यावे व त्यांच्या मोबदल्यादाखल विजापूरकरांच्या अमलातील जो मुलूख मोगल जिंकतील त्यातून घाटावरचा पांच लाख होन उत्पनाचा व कोकणातील चार लाख होन उत्पन्नाचा प्रांत त्यांस द्यावा. अदिलशहाच्या अमलातील घांटावरच्या प्रांतांची चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क महाराजांस द्यावा व जंजीरा त्यांच्या स्वाधीन करावा. ह्या शेवटल्या तीन अटी औरंगजेबास मान्य होऊन त्याबद्दलचे फरमान त्याच्याकडून आल्यास महाराजांनी त्यास चाळीस लाख होन पेशखुष म्हणून द्यावे; ही रकम त्यांनी तीन लाख रुपयांच्या वार्षिक हप्त्यांनीं भरावी. मोगलास साहाय्य करण्याकरितां महाराजांनी आणखी स्वार चाकरीस ठेवावे.''

जयसिंगाने ह्या तहाच्या अटी औरंगजेबाकडे अर्जाच्या रूपाने पाठवून अशी शिफारस केली कीं ह्या अटी मान्य करून शिवाजीस आपला अंकित केलें तरच आपणांस विजापूरकराचे राज्य बुडवून दक्षिणदेश काबीज करितां येणार आहे. औरंगजेबाने जंजिऱ्यासंबंधाची तेवडी अट खेरीजकरून सगळ्या अटी कबूल केल्या आणि महाराजांना एक मोठे पत्र, खिलात (शिरपाव) व फरमान अशी पाठवून दिली.

पुढे जयसिंगाने विजापूरकराशीं युद्ध सुरू केले, त्यांत महाराजांनी त्याला चांगली मदत केली मंगळवेढे येथे मोगलांची व विजापूरकरांची मोठी लढाई झाली. तीत उभय पक्षांकडे नामांकित मराठे सरदार होते. महाराजांचा सावत्र भाऊ व्यंकोजी ह्या लढाईत अदिलशहाच्या वतीनें लढला. खुद्द महाराज व प्रतापराव गुजर मोगलांच्या तर्फेने लढले. ह्या वेळी त्यांनी शौर्याची व युद्ध कौशल्याची अगदीं पराकाष्ठा केली. महाराजांचे अलौकिक धैर्य व युद्ध वापल्य पाहून जयसिंग अगदीं थक्क झाला. त्याने औरंगजेबाला पत्र पाठविलें त्यांत त्यानें महाराजांची अतिशयित स्तुति केली. ह्यावरून औरंगजेबाने महाराजांस पुनः एक पत्र पाठवून त्यांची फारच तारीफ केली आणि आपल्या कृपेचें सूचक म्हणून त्यास शिरपाव आणि रत्नखचित खंजीर पाठवून दिला.

ह्याप्रमाणें महाराजांची योग्यता औरंगजेबाच्या ध्यानांत येऊन त्याला अगदीं आपलासा करून टाकण्याच्या इराद्याने त्याने मोठ्या गौरवाचें पत्र पाठवून त्यांना आपल्या भेटीसाठी आग्र्यास बोलाविले आणि असे अभिवचन दिले कीं इकडे आल्यावर तुम्हांस मोठ्या योग्यतेस चढवू व मोठा किताब देऊन दक्षिणेत परत जाण्यास रजा देऊं. जयसिंगास त्यानें असें लिहिलें की शिवाजी महाराजांस युक्तिप्रयुक्तीनें आपल्या दरबारी पाठवून द्यावे व त्यांच्या वाटखर्चाला एक लाख रुपये द्यावे. हा असा हुकूम आल्यावर जयसिंगाने महाराजास आग्र्यास जाण्याचा फारच आग्रह केला. तो महाराजांना म्हणाला: ''तिकडे जाण्यासंबंधानें मनांत कांहीं एक किंतु धरू नये. तेथें माझा मुलगा रामसिंग आहे तो तुमची सगळी तजवीज ठेवील. तो तुम्हांस कोणत्याहि प्रकारचा दगाफटका होऊं देणार नाहीं. हा असा जयसिंगाचा आग्रह पडल्यामुळे व आश्वसन मिळल्यामुळें औरंगजेबाच्या भेटीस जाण्याचा महाराजांनी निश्चय केला.

***

भाग सतरावा

# आग्र्यास प्रयाण (सन १६६६ – ६७)

जयसिंगाचा अत्याग्रह पडल्यामुळे व औरंगजेबाचेहि उत्तेजनपर पत्र आल्यावरून महाराजांनी दिल्लीस जाण्याचा ठराव केला. तो त्यांच्या पदरच्या सरदारास मुळी पसंत वाटला नाहीं. ते त्यांच्या बेताला अनेक प्रकारीं हरकती घेऊ लागले. त्यावर महाराज म्हणाले: ''आतां दिल्लीस जाणे प्राप्तच आहे. तिकडे गेल्याने उत्तरेकडील मुलूख, बादशहाचें दरबार व आमच्या पूर्वजांनी उत्तरदेशी राज्ये केली तीं स्थानें पाहावयास मिळतील. तिकडील रजपूत राजांच्या व सरदारांच्या ओळखी होतील. तिकडील तीर्थाचे दर्शन घडेल. जयसिंग राजांनी आश्वासन दिलें असल्यामुळें भीतीचे कांहीएक कारण उरले नाही. इतकेंहि करून एकादा बिकट प्रसंग आला असतां त्यांतून आम्ही श्रीच्या कृपेने निभावून येऊ अशी आम्हांस धमक आहे.'' ह्याप्रमाणें त्यांची हरकत मोडून काढून त्यांनीं संभाजीसह दिल्लीस जाण्याचा विचार कायम केला.

मग मोरोपंत पेशवे, अण्णाजी दत्तो सुरनीस व निळोसोनदेव मुजुमदार ह्या तिघांस सर्वाव्यक्ष नेमून त्यांनी त्यांच्या स्वाधीन सगळा राज्यकारभार केला. आणि आपल्या सगळ्या सरदारांस व कारभाऱ्यांस त्यांच्या आज्ञेत वागून मिळविलेल्या मुलखाचा उत्तम बंदोबस्त ठेवावयास सांगितलें. ते म्हणाले: ''तिकडे कसाहि प्रसंग आला तरी न डगमगता त्यांतून हरयुक्तीने पारपडून आम्ही स्वदेशी येऊ. आम्हांस कांहीं दगाफटका झाल्यास तिकडील जयसिंगासारखे राजे आमच्या वतीने भांडण्यास तयार होतील अशी आमची खात्री आहे. आमची चिंता तुम्ही करूं नये. आमच्या मातोश्रीसाहेबांचें समाधान तुम्ही वारंवार करीत जा. त्यांना काहीएक उणे पडूं देऊं नका. यदाकदाचित् आमच्यावर तिकडे अस्मानीसुलतानी गुदरली तरी तुम्ही बिलकूल न घाबरता स्वराज्याचे रक्षण करा व राजारामाच्या नावे राज्यकारभार चालवा. तुमच्या इमानावर, हुशारीवर व हिंमतीवर पूर्ण विश्वास ठेवून सर्व राज्य तुम्हांस निरवून मी उत्तरेस जात आहे.''

ह्याप्रमाणे मागली सगळी व्यवस्था लावून महाराजांनी आपल्या बरोबर कांही कारकून व तीनचार हजार निवडक मावळे बरोबर नेण्यास तयार केले. मग मातुश्रीचें दर्शन घेऊन, तिचे चरण वंदून व तिचा आशिर्वाद घेऊन ते जयसिंगाच्या भेटीस पुनः गेले. तेथें त्यानें त्यांस थाटाची मेजवानी देऊन मोठ्या प्रेमाचा निरोप दिला. त्यानें आपला मुलगा रामसिंग जो त्या वेळी औरंगजेबाच्या दरबारीं होता त्याला एक पत्र दिलें आणि त्यांची आणखी एक वेळ अशी खातरजमा केली कीं, ''तुम्ही दिल्लीतून परत येईपर्यंत मी दक्षिणेत राहतो, व इकडे तुमच्या ताब्यांतील प्रांतांस व किल्ल्यांस मोगलांकडून काहीएक उपद्रव होणार नाही असा बंदोबस्त ठेवितो. औरंगजेबाने तुमच्याशी कांही दगाबाजी केल्यास माझा पुत्र रामसिंग तर तुमचा बचाव करण्यास अवश्य झटेल. इतकेंच नव्हे तर तो तुमच्या प्रीत्यर्थ बादशहाशी विरोध करण्यास चुकणार नाहीं; व मीहि इकडून त्याची खोड मोडण्यास तयार होईन.''

शिवाजीमहाराज आपल्या भेटीस यावयास निघाल्याचे औरंगजेबास कळले तेव्हां त्यांची व त्यांच्या फौजेची प्रत्येक टप्प्यास चांगली व्यवस्था ठेवण्याविषयी औरंगजेबाने आपल्या ठिकठिकाणच्या महालकऱ्यांस व मोकासदारांस ताकीद पत्रे पाठविली. त्या वेळी बादशहाने आपला दरबार आग्ऱ्यास नेला असून तेथेंच तो राहू लागला होता. यास्तव महाराजांस त्या शहरी जावे लागले. औरंगजेबाने त्यांच्या मुक्कामासाठी एक हवेली ठरविली होती, तीत ते जाऊन राहिले. बादशहाने त्यांच्या व त्यांच्या बरोबरच्या लोकांच्या खर्चाची वगैरे तरतूद चांगली ठेविली. परंतु ह्या वेळीं शास्ताखानाची बायको तेथें होती, तिने आपल्या मुलाचा व आपल्या नवऱ्याचा सूड उगविण्याचा निश्चय केला व जनानखान्यांतील बायकांकडे वशिला लावून शिवाजीमहाराज चांगले हाती लागले आहेत, तरी त्यांचा नाश करून आपल्या दक्षिणेतील राज्याचा हा मोठा रिपु नाहीसा करण्याची मसलत बादशहाला देवविली. परंतु ती त्याच्या दरबारच्या सरदार लोकांस पसंत पडली नाही. कारण जयसिंग, रामसिंग वगैरे सरदार अशा विश्वासघाताच्या कृतीने बिथरून जाऊन बंड करितील असा त्यांना धाक होता. ह्या त्यांच्या इशाऱ्यामुळे औरंगजेबाने महाराजांचा घात करण्याचा बेत रहित केला.

औरंगजेबाच्या वाढदिवसानिमित्त ता. १२, मे, सन १६६६ रोजी दरबार भरणार होता, त्या दिवशीं महाराजांना भेटीस आणावें असें त्याने रामसिंगास फर्माविले. बादशहानें त्या दिवशीं मोठ्या तरतुदीनें दरबार भरविला. मोठमोठ्या इमानी सरदारांस

व पठाणांस चांगले सज्ज करून आपल्या तक्ताच्या आसपास नंग्या तरवारीनिशी उभे केलें. कारण त्याला अशी दहशत होती कीं शिवाजी सामान्य पुरुष नव्हे; तो केवळ सैतान आहे; प्रसंग पडल्यास तो वीसपंचवीस हात उडी मारितो. सदरीलप्रमाणें कडेकोट बंदोबस्त करून त्यानें अंगांत चिलखत चढविले होतें व वरून मझलीनचा झगा घातला होता. आपल्या सिंहासनाजवळ त्यानें पांच हत्यारे अगदी तयार ठेविली होतीं. त्या दिवशी दरबारास एकंदर सरदार व शेटसावकार आले होते. महाराजांस पाहण्याची उत्कंठा सर्वांना लागून राहिली होती.

महाराज आपल्याबरोबर थोडेसे निवडक लोक घेऊन रामसिंगासमवेत कचेरीस गेले. त्यांनीं रितीप्रमाणे कुरनिसात करून बादशहाच्या तक्तापुढे नजराणा ठेविला; व त्यांची रामसिंगानें नेहमीच्या रिवाजाप्रमाणे रुजवात केली. बादशहानें त्यांना कुशलप्रश्न विचारले, त्यांची त्यांनीं समर्पक उत्तरे दिली. मग त्यानें त्यांस उजव्या हाताकडील बाजूस साधारण प्रतीच्या रांगेत जाऊन उभे राहावयास हाताने खूण केली. त्या बाजूचे सरदार पंचहजारी होते, त्यांत त्यांची गणना केल्याबद्दल महाराजांस राग आला: आणि ते तेथें बाकीच्यांबरोबर उभे न राहता खाली बसून रामसिंगापाशीं कटार मागू लागले. ह्या प्रकाराकडे बादशहाचे लक्ष जाऊन त्यानें काय गडबड आहे म्हणून विचारले. तेव्हां जवळच्या सरदारांनीं महाराजांचे म्हणणें त्याला कळविले. त्याबरोबर बादशहा दचकला. आतां हा काय करील कोण जाणे अशी दहशत वाटून त्यानें रामसिंगास हुकूम केला कीं शिवाजीराजांस निरोपाचे विडे देऊन परत घेऊन जावें. उदंयिक पुनः मुलाखत होईल. ह्यावरून रामसिंगाने महाराजांस दरबारातून बिऱ्हाडीं नेले. महाराजांस देण्यासाठी बादशहाने शिरपाव, जवाहीर व हत्ती ही तयार ठेविली होतीं. तीं त्यांना देण्याचे त्या गडबडीत राहून गेलें.

ह्यानंतर पुनः औरंगजेबाने महाराजांस भेट देण्याचें नाकारले. त्याचा काय मानस आहे तें समजण्यासाठी महाराजांनी रामसिंगास त्याच्याकडे पाठविलें. त्याला त्यानें उत्तर दिलें ते असे: ''शिवाजीराजांस आमच्या पदरी ठेवून त्यांस मोठमोठीं कामें सांगावी असें आमच्या मनांत आहे. दक्षिणेतली जहागीर त्यांनीं आपल्या पुत्राच्या नांवें करून द्यावी. आम्ही त्याला इकडे कोरोडो रुपयांची नवी जहागीर करून देऊं. लाखपन्नास हजार फौज हाताखाली घेऊन त्यांनीं इकडे मोठमोठ्या कामगिऱ्या कराव्या. त्यांच्यासारख्या शूर, चतुर व कर्तबगार पुरुषाचे चीज ह्या दरबारांत चांगले होईल.''

ह्या जबाबावरून महाराजांच्या लक्षात आलें कीं ह्या कपटी बादशहाच्या मनांत मला येथें गुंतवून ठेवून माझा दक्षिणेंतील काटा अजिबात काढून टाकण्याचा इरादा आहे.

मग त्यांनीं आपला वकील रघुनाथपंत याला बादशहाकडे पाठवून अशी अजीजी केली कीं, ''अशा परक्या मुलखांत राहून परके लोक हाताखाली घेऊन माझ्या हातून बादशहाची नांव घेण्यासारखी कांमगिरी होणार नाहीं; तरी मला कराराप्रमाणे जी काय बढती द्यावयाची ती देऊन व कामगिरी सांगून परत दक्षिणेत पाठवावें. रामसिंगाबरोबरहि त्यांनीं असाच निरोप पाठविला व आपल्याशी केलेला करार मोडणें बरोबर नाहीं असे त्याला सुचवावयास सांगितले. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. बादशहाने त्यांना पुष्कळ लालूच दाखवून आपल्या दरबारी राहण्याविषयी आग्रह केला. पण त्याला ते कबूल झाले नाहीत.

हा असा त्यांचा हट्ट पाहून त्यांना जरब दाखवून आपल्या म्हणण्यास अनुकूल करून घेण्याचा घाट बादशहानें घातला, आणि शहराचा कोतवाल पोलादखान यास महाराजांच्या हवेलीस पांच हजार स्वारांनिशीचौकी देण्याचे फर्माविले. महाराजास कोठे जाणेयेणे झालें तर त्यांच्यावर सक्त पाहारा ठेवावा, आणि त्यांच्या लोकांस परवान्यावाचून आंतबाहेर जाऊं देऊं नये अशी व्यवस्था त्याला करावयास सांगितले. हा आपला कोंडमारा पाहून महाराजांनी रामसिंगाबरोबर बादशहास सांगून पाठविलें कीं मी बादशहाच्या मर्जिप्रमाणें दरबारी राहण्यास तयार आहें. परंतु हें त्याचें म्हणणे बादशहास खरे वाटलें नाही.

ह्या अटकेतून कसें सुटून जावें हा त्यांना विचार पडला. पण लागलीच त्यांना एक चांगली युक्ति सुचून तिची योजना करण्याचा त्यांनी निश्चय केला. मग आपल्याबरोबर आलेल्या लोकांस दक्षिणेंत पाठवून देण्याची परवानगी मिळविली. ते लोक महाराजांस अशा संकटांत सोडून जाण्यास तयार होईनात; पण त्यांनीं त्यांची अशी समजूत केली कीं तुम्ही जवळ असल्यानें आम्हीं सुटून जाण्याची केलेली युक्ति सिद्धीस जाणार नाहीं. आमच्या विषयी तुम्ही मुळीं काळजी करूं नये. असे महाराजांनी त्यांना निक्षून सांगितल्यावरुन ते निरुपाय होऊन स्वदेशी निघून गेले.

महाराजांस अटकेंत ठेवल्याचें वर्तमान जयसिंगास कळले तेव्हां त्यानें बादशहास पुढील आशयाची पत्रे पाठविलीः शिवाजीराजांच्या जिवास अपाय झाल्याने परिणाम चांगला होणार नाही. बादशहाच्या एका मोठ्या सरदाराने केलेली आणभाक खोटी

ठरून आमच्यावर कोणीहि कसल्याहि बाबतींत विश्वास ठेवणार नाहीं. अशाने आमची बेअब्रू होईल. शिवाजीमहाराजांचा प्राणघात केला तरी त्याच्या राज्याचा असा कडेकोट बंदोबस्त आहे कीं तें आमच्या हातीं सहसा येणार नाही; आणि त्यांचे शूर सरदार व योद्धे बिथरून जाऊन आम्हांम अतोनात त्रास देतील, आमच्या शत्रूस जाऊन मिळतील व आमची खोड मोडण्यास प्रवृत्त होतील. ह्या अशा इशाऱ्यामुळे औरंगजेबाला महाराजांच्या जिवास धक्का लावण्याचें धैर्य झाले नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणे आपल्या लोकांस स्वदेशी पाठवून दिल्यावर महाराजांनी बादशहाच्या परवानगीनें त्या दरबारच्या सरदारांच्या ओळखी रामसिंगाच्या मदतीने करून घेतल्या. त्यांचें बोलणेचालणें मोहक असल्यामुळें त्या सरदारांचा स्नेह संपादण्यास त्यांना विलंब लागला नाहीं. नंतर आपण गुरूवारचें व्रत करून मोठा उत्सव करितो असा बहाणा करून त्यानिमित्त आपल्या नवीन दोस्त उमरावांच्या घरीं मेवामिठाई पाठविण्याचा क्रम त्यांनीं आरंभिला. मिठाई आणण्यानेण्यासाठीं वेळूचे मोठमोठे दहा पेटारे त्यांनीं करविले. त्यांत मिठाई भरली म्हणजे त्यांस दोऱ्या बांधून मध्यें वांसे घालून दोनदोन माणसांना ते न्यावे लागत. हे पेटारे जाऊं लागले म्हणजे चौक्यांवराचे शिपाई ते उघडावयास लावून तपासीत व मग पुढें जाऊं देत. हा क्रम दर गुरुवारी चालू ठेविल्यामुळें पुढेंपुढें पाहरेकरी सगळेच पेटारे उघडून न पाहता एकदोन पाहून सोडून देत. शिवाय ह्या चौक्यावरील लोकांना वेळोवेळा इनामें देऊन महाराजांनीं खुष ठेविलें होतें. ह्याप्रमाणे त्या चौकीवाल्यांच्या मनांतला संशय घालविण्याचा प्रयत्न केल्यामुळें ते अमळ गाफीळ राहू लागले; आणि आता आपली सुटून जाण्याची युक्ति सिद्धीस जाण्याचा दृढ संभव दिसूं लागला असें पाहून त्यांनीं आपल्याजवळ जे थोडेसे लोक होते त्यांसहि एकामागून एक स्वदेशी पाठवून दिलें; व त्यास तेथून जाऊन अमुक ठिकाणीं आपली वाट पाहत राहावें असें सांगितलें. शेवटीं हिरोजी फर्जंद व दुसरे एकदोन हुजरे खेरीज करून महाराजांपाशीं कोणीहि राहिले नाहींत.

ह्यानंतर त्यांनी आपण आजारी असल्याचें मिष करून आपल्या जवळ कोणी येऊन आपणांस त्रास देऊं नये असें सांगितलें. असा गैरराबता राखून त्यांनीं आणखी थोडे दिवस काढले; व नंतर आपल्या प्रकृतीस आराम पडत चालला आहे असें सांगून ते आपल्या मित्रांस व अमीरउमरावांस खुशालीदाखल मिठाईचे पेटारे एकसारखे पाठवूं लागले, गोरगरिबांस दानधर्म करूं लागले, व मशिदीतील फकिरास खैरात

करण्याकरितां मेवामिठाईचे पेटारे भरून पाठवू लागले. मग एके दिवशीं संध्याकाळीं कांहीं पेटारे मिठाईनें भरून एका पेटाऱ्यात आपण बसले व दुसऱ्यांत संभाजीस बसविले; आणि सगळे पेटारे चौक्यांवरून चालविले. शिपायांनी नित्याच्या परिपाठाप्रमाणें एकदोन पेटारे उघडून पाहून सगळे पेटारे बिनदिक्कत जाऊं दिले. ह्या युक्तीनें महाराज शहराबाहेर पडून आपल्या लोकांस जाऊन मिळाले.

इकडे महाराजांचा नोकर हिरोजी फर्जंद महाराजांचा पेहराव घालून व बोटांत महाराजांची आंगठी चढवून त्यांच्या बिच्छान्यावर निजून राहिला. त्यांने आपलें सगळें अंग पांघरुणाने झाकून घेऊन आंगठी घातलेला हात तेवढा उघडा ठेविला, व जवळ एका मुलास पाय चेपावयास बसविले. अशी त्यानें सगळी रात्र काढली, व दिवस बराच वर आला तरी तो उठला नाहीं. महाराजांच्या खोलीचा दरवाजा अजून उघडत नाहीं असें पाहून पाहरेवाले खिडकी उघडी होती तीपाशी येऊन महाराज अजून कां उठत नाहींत असे विचारूं लागले. त्या मुलास शिकवून ठेवल्याप्रमाणें त्यानें उत्तर दिले कीं महाराजांची तब्यत रात्रीपासून अंमळ अधिक बिघडली आहे. हें ऐकून पाहरेकरी तेथून निमूटपणे निघून गेले. मग कांही वेळानें हिरोजी उठून आपला पोषाख करून त्या मुलासह बाहेर पडला, आणि औषध आणावयास जाण्याच्या मिषाने तो लगबगीने पार निघून गेला. जातांना तो रामसिंगास भेटून महाराज अटकेतून सुखरूप पार पडल्याचे सांगून स्वदेशी चालता झाला.

इकडे महाराज शहराबाहेर पडल्यावर दूर एके ठिकाणीं त्यांच्यासाठी घोडा तयार ठेविला होता त्यावर संभाजीसह बसून ते आपले कारकून वगैरे ज्या गांवीं वाट पाहत होते त्यांस जाऊन मिळाले. मग त्यांतले थोडेसे लोक त्यांनीं आपल्याजवळ ठेवून बाकीच्यांना वेश पालटून स्वदेशी निरनिराळ्या वाटानी जावयास सांगितले. महाराज व बरोबरचे लोक गोसाव्याचा वेश धारण करून तीर्थाटन करीत करीत स्वदेशी गेले. ते सरळ वाटेनें गेले नाहींत. जातांना मधुरेस मोरोपंत पिंगळ्याचे तिघे मेहुणे भेटले. त्यांची नावे कृष्णाजीपंत, काशीपंत व विसाजीपंत अशी होतीं. त्यांना महाराजांनी आपलें सगळें वृत्त सांगून संभाजीला त्यांच्या घरीं ठेवून दिलें आणि त्यांना सांगितलें कीं आम्ही स्वदेशास गेल्यावर तुम्हांस पत्र पाठवू तेव्हां तुम्ही संभाजीस घेऊन आपल्या सगळ्या कुटुंबासह आमच्याकडे यावें.

इकडे महाराज पळून गेल्याची वार्ता कळताच औरंगजेबाने त्यांच्या शोधार्थ चारी दिशांस घोडेस्वार रवाना केले; आणि सर्व तालुकदारांस व सुभेदारास पत्रे पाठवून महाराजांच्या पाळतीवर राहाण्यास सांगितले, आणि ते सांपडतांच त्यांना आमच्या दरबारी घेऊन यावें असें त्यांस फर्माविले. त्यांच्या शोधास पाठविलेले स्वार निराश होऊन परत आले तेव्हां बादशहास मोठे दुःख वाटलें; आणि त्याला असा वहीम आला कीं महाराज शहरांतच कोठें तरी दडून राहिले असून आपला घात करण्याची संधि पाहत असावे. ह्या संशयामुळे त्याला रात्रंदिवस अस्वस्थता व धाक वाटू लागला. त्याला रात्रीची झोप येईना. महाराजांनी ही जी कपटयुक्ति, योजिली ती रामसिंगाच्या मदतीने व मसलतीनें योजिली असावी असा त्याला पक्का वहीम येऊन त्यानें त्याची मनसब काढून घेतली व त्याला दरबार बंद केला. हें वर्तमान जयसिंगाला कळले तेव्हां त्यांने पत्र लिहून बादशहाची ह्या बाबतींत बरीच कानउघाडणी केली व आपल्यावर किंवा आपल्या पुत्रावर वहीम घेण्यांत मुळीं अर्थ नाहीं, हा सगळा प्रकार आपल्या कपटबुद्धीमुळे झाला आहे असें त्याला निक्षून सांगितलें.

वर सांगिल्याप्रमाणें महाराज गोसाव्याच्या वेशानें तीर्थाटन करीत करीत विजापुरावरून उत्तरेकडे वळून रायगडावर त्याच वेषाने दाखल झाले. स्वराज्य सोडल्यापासून नऊ महिन्यांनीं ते परत येऊन मातेच्या दर्शनास एकदम गेले, आणि त्यांनीं तिच्या चरणावर मस्तक ठेविले. ते गोसाव्याच्या वेशांत असल्यामुळें प्रथम त्यांना तिनें ओळखले नाहीं. परंतु लागलीच ओळख पटून तिनें त्यांना प्रेमालिंगन दिलें व प्रेमाश्रूंनी त्यांस न्हाणिलें. माताच ती! तिच्या आनंदास पारावार नाहीसा झाला. महाराजांचा तो केवळ नवाच जन्म झाला. असे तिला वाटले.

ह्याप्रमाणे प्रथम आपल्या प्रिय मातेचें दर्शन घेऊन मग त्यांनीं आपले सगळे सरदार, कारभारी व मातबर लोक यांच्या भेटी घेतल्या. जोतो त्यांच्या दर्शनास येऊ लागला. जिकडेतिकडे आनंद झाला. महाराजांनी मोठा उत्सव करुन ब्राह्मणांस पुष्कळ दानधर्म केला; गोरगरिबांस अन्नवस्त्र मुबलक दिलें; श्रीभवानीचा उत्सव करून तिला मुक्ताफळांचा अभिषेक केला; हत्तीवरून साखर वाटली. सर्व सरदारांस व किल्लेदारांस साखर पाठविली; राज्यांतील मोठमोठी देवस्थानें, विद्वान् ब्राह्मण, तपस्वी व साधुसंत यांना दक्षिणा व शर्करा पाठविली. गडोगडी तोफांची सरबत्ती करविली. महाराज परत सुखरूप स्वराज्यांत आल्याची वार्ता सर्वत्र पसरून त्यांच्या सगळ्या प्रजाजनांत आनंद

वाटला. शत्रूंच्या चित्तांत पुनरपि दहशत उत्पन्न झाली, व शिवाजी महाराज केवळ अजिंक्य आहेत, त्यांच्यापुढे कोणाचे कांहीं चालणार नाही; तें आता यवनांच्या सर्व पातशाहती बुडवितात असे सर्वांना वाटू लागले. त्यांच्या अलैकिक युक्तिमत्तेची व अप्रतिम धैर्याची कीर्ति सर्वत्र अधिकच पसरली.

ह्या आनंदभरांत महाराज आपल्याबरोबर गेलेल्या लोकांस विसरले नाहीत, ज्यांनी ज्या मानानें श्रमसाहस केले होते त्यांना त्या मानानें इनामे व बढत्या देऊन त्यांनी गौरविले. ह्या संकटमय प्रवासांत हिरोजी फर्जंद याचे साहाय्य अतिशयित झालें म्हणून महाराजांनी त्याला पागेवर सरदारी देऊन पालखी व अबदागिरी दिली. मथुरेस काशीपंताला पत्र पाठवून संभाजीला आणविलें, आणि तो व त्याचे दुसरे दोघे बंधु यांस विश्वासराव हा किताब दिला; व आपल्या पदरी चांगल्या असाम्या देऊन ठेविले .

ह्याप्रमाणे महाराज अटकेतून सुटून सुखरूपपणे स्वदेशी जाऊन पोचल्याचे ऐकून औरंगजेबास पराकाष्टेचे दुःख वाटले. ते त्याच्या तावडीतून सुटून गेल्याबद्दल त्याला आमरण खेद वाटत होता असें त्याच्या शेवटच्या मृत्युपत्रांतील उल्लेखावरून लक्षात येतें. त्यांत त्यानें येणेप्रमाणे लिहून ठेविले आहे: ''त्या हरामखोर शिवाजीला माझ्या गाफीलपणामुळे माझ्या हातून सुटून जातां आलें; आणि त्यामुळें माझ्या सगळ्या मोहिमांत मला आमरण अपयश आले.''

मुसलमानी बखरींत या वेळची आणखी एक गोष्ट आढळते, ती अशी: औरंगजेबाची एक मोठी शिकलेली व बहुश्रुत मुलगी होती. तिचें नांव निसाबेगम असें होते. महाराजांच्या एकंदर पराक्रमांच्या व शौर्यविर्यादि गुणांच्या गोष्टी तिच्या कांनीं वेळोवेळा गेल्या होत्या; आणि आपल्या बापासारख्या बलाढ्य बादशहाशीहि टक्कर देऊन विजय संपादणारा हा वीर मोठ्या योग्यतेचा आहे असें तिच्या मनाने घेतले होतें. महाराज औरंगजेबाच्या दरबारास गेले तेव्हा त्यांना पाहण्यासाठी जनानखान्यातल्या बायका पडद्याआड बसल्या होत्या, त्यांमध्यें ही निसाबेगम होती; आणि त्यांचें तें तेज, स्वाभिमान वगैरे पाहून ती मोहित झाली, आणि विवाह करावयाचा तर ह्याच प्रौढप्रतापवीराशी करावयाचा, नाही तर आमरण अविवाहित राहावयाचे असा तिने निर्धार केला. हें असें तिचें प्रेम आपल्यावर जडल्याचे महाराजांस कळले होतें; कोणी तिच्या वतीने त्यांच्याशीं असें बोलणे केले कीं, तुम्ही मुसलमानी धर्माचा स्वीकार कराल तर शहाजादी निसाबेगम तुमच्याशीं विवाह करण्यास तयार आहे. ही गोष्ट

अर्थात महाराजांस बिलकूल पसंत वाटली नाहीं. अशा मोठ्या बादशहाचा जावई होऊन रहाण्यापेक्षा स्वधर्म व स्वजाति ही त्यांस विशेष प्रिय वाटली. नुसत्या राज्यतृष्णेनेच ते प्रोत्साहित झाले असते तर हा संबंध जुळवून ते कदाचित् नर्मदा नदीच्या अलीकडे एकंदर दक्षिणेचे पातशाह होऊन राहिले असते. परंतु राज्यतृष्णा व विषयवासना यांपेक्षा स्वातंत्र्यप्रीति, स्वधर्माभिमान व स्वकुलाभिमान ह्या वृत्ति त्यांच्या ठायीं प्रबल होत्या. असें सांगतात कीं ही बेगम स्वनिर्धाराप्रमाणें अमरण अविवाहित राहिली. पुढे ती आपल्या पित्याबरोबर महाराष्ट्रात आली आणि येथेंच तिचा १७०२ सालीं ब्रह्मपुरी येथें स्वपित्याच्या छावणीत अंत झाला. तिचा देह जेथे दफन केला तेथें औरंगजेबानें एक सुंदर कबर बांधून त्या गांवास बेगमपूर असें नांव दिलें. ह्या बेगमेच्या हृदयात महाराजांविषयी शेवटपर्यंत केवढी आदरबुद्धि वसत होती याचा एक ऐतिहासिक दाखला आहे, तो असा: औरंगजेबाने पुढें संभाजीस ठार मारून त्याच्या बायकोमुलांस रायगडावरून कैद करून आणिले तेव्हां ह्या बेगमेने संभाजीच्या लहान मुलास आपल्याकडे मागून घेतले आणि त्याचे मोठ्या प्रेमाने लालनपालन केलें. हाच मुलगा पुढे शाहूराजा झाला.

***

भाग अठरा

# गेलेले किल्ले व प्रांत परत घेतले
# (सन १६६७–७२)

महाराज आग्र्यास अटकेत पडल्याचे वर्तमान दक्षिणेत येताच त्यांच्या सरदारांनी मोगलांच्या प्रांतांत पुनरपि धामधूम सुरू केली; आणि पुढें ते अटकेतून सुटून स्वदेशी येत आहेत असें त्यांना समजले तेव्हां त्यांना अधिकच हुरूप येऊन त्यांनीं मोगलांच्या ताब्यांत गेलेले किंल्ले व प्रांत परंत घेण्याचा सपाटा चालविला. त्या वेळच्या इंग्रज व्यापाऱ्यांचा असा लेख आहे कीं, शिवाजीराजे औरंगजेबाच्या अटकेतून सुटून पळाले हे खरे असेल तर आता ते त्या बादशहाला त्राहि त्राहि करून सोडतील. आपण हे काय केले असें त्याला होऊन जाईल.

ह्या प्रकरणी जयसिंगाचा औरंगजेबास पुरा वहीम आला होता. त्याच्या मदतीस आणखी फौज न पाठविता त्याला त्याने माघारीं बोलविले आणि त्याच्या जागी आपला मुलगा मोअझीम व यशवंतसिंग यांची नेमणूक केली. याचे कारण असें कीं जयसिंग शिवाजीमहाराजांशी एक होऊन आपली दक्षिणेतील सत्ता नाहीशी करील अशी त्याला भीति होती. शहाजाद्याबरोबरहि त्याने मोठी फौज दिली नव्हती. कारण ह्या आपल्या मुलाचाहि त्याला भरंवसा वाटत नव्हता. तो आपलें अनुकरण करून दक्षिणेकडे स्वतंत्र होऊन बसेल अशी त्याला भीति होती. त्यानें त्याला असें फर्माविले की शिवाजी महाराजांशी स्नेहभावाने वागून त्यांना विजापूरकरांवर स्वारी करण्यास उत्तेजन द्यावे.

ह्या अशा मोगलसरदारांच्या अदलाबदलीच्या काळांत मोरोपंत पिंगळे वगैरे सरदारांनीं मोगलांकडे गेलेले बरेच किल्ले व प्रांत परत घेतले. यशवंतसिंगाकडची बरीच फौज खलास झाली असून द्रव्याचाहि निकाल लागला असल्यामुळे त्याने पांचसहा मुख्य किल्ल्यांवर विशेष बंदोबस्त ठेवून बाकीचे बहुतेक सोडून दिले होते. ते अर्थात् महाराजांच्या लोकांनी हस्तगत करून त्यांवर पूर्ववत् चांगला बंदोबस्त ठेविला.

बादशहाच्या सांगण्याप्रमाणे मोअझीम याने महाराजांशी तहाचे बोलणे लाविलें. यशवंतसिंगास अवदानें चारून आपणांस साधेल तेवढा अनुकूल तह महाराजांनीं करून घेतला. त्याची कलमे अशी: (१) परस्परांनी परस्परांशीं इतःतर स्नेहभावानें वागावे; (२) पूर्वी झालेला तह कायम करावा; (३) उभय पक्षांचें परस्परांविषयी दील साफ झाल्याखेरीज महाराजांनी आपली फौज मोगलांच्या कुमकेस पाठवू नये. व परस्परांच्या भेटी मुलाखती होऊं नयेत; (४) फौजेच्या खर्चास कांहीं मुलूख लावून दिल्यास तूर्त पांचहजार फौज त्यांच्या कुमकेस महाराजांनी पाठवावी; (५) पूर्वीच्या तहांत ठरल्याप्रमाणे संभाजीस पांचहजार स्वारांची मनसब द्यावयाची तिच्या सरंजामासाठी बऱ्हाणपूर प्रांतातील आवडे व बाळापूर हे परगणे लावून द्यावे; (६) पूर्वीच्या तहाप्रमाणें चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करण्याची महाराजांना पूर्ण मुभा असावी; (७) आणि निजामशाहीतील व अदिलशाहीतील जे किल्ले व प्रांत महाराजांपाशी सध्यां आहेत ते त्यांच्याकडे राहूं द्यावे. अशा तहनाम्यावर शाहजाद्याने सही करून तो बादशहाकडे मंजुरीसाठी पाठविला. तो पसंत करणें त्याला त्या वेळी सोईचे वाटून त्यानें महाराजांस राजा हा किताब दिला व संभाजीस बऱ्हाणपूर प्रांतांतली जी जहागीर द्यावी असें सुचविले होते तिची सनद पाठवून दिली. त्याप्रमाणे महाराजांनी प्रतापराव गुजराबरोबर पांचहजार स्वार देऊन संभाजीसह औरंगाबादेस मोगलांच्या छावणीत रवाना केले: पण संभाजीचे वय अगदीं लहान असल्यामुळें त्याला शहाजाद्याने परत पाठवून दिलें.

ह्या सलोख्यामुळे पुणे, सुपे वगैरे प्रांत महाराजांच्या कबजांत पुनः आले; पुरंदर व सिंहगड हे किल्ले मात्र त्याना परत मिळाले नाहींत. ही अशी लालूच महाराजांना दाखविण्यात त्या कपटी बादशहाचा हेतु अर्थात् असा होता कीं महाराजांना पुनरपि आपल्या काबूत आणून त्यांचा पुरा घात करावा. असें सांगतात कीं शहाजाद्यानें ह्या वेळी आपल्या बापाविरुद्ध बंड करण्याचें योजून महाराजांना सैन्यासह वर्तमान आपल्या मदतीस बोलाविलें. परंतु ते ह्या त्याच्या मसलतींत शिरले नाहींत. ही अशी बतावणी त्यानें आपल्या बापाच्या सांगण्यावरून केली होती, ती आशा हेतूने कीं महाराज परत उत्तरेस गेले म्हणजे त्यांना पुनः पकडून ठार करावे.

नंतर औरंगजेबाच्या सांगण्यावरून शहाजाद्यानें शिवाजीमहाराजांस आपल्या फौजेची मदत देऊन अदिलशहाच्या व कुतुबशहाच्या मुलखावर स्वाऱ्या करावयास उत्तेजन दिलें.

त्याप्रमाणें त्यांनीं विजापूरकरांच्या मुलखांत धुमाकुळ उडविला. तेव्हां विजापूरकर मोगलांस शरण जाऊन त्यांच्याशी तह करून त्यांच्या वैरांतून मुक्त झाले. परंतु अदिलशहाच्या व कुतुबशहाच्या मुलखात मोहिमा करण्यास महाराजांनी शहाजाद्याकडून मोकळीक मिळविली. मग ते अदिलशहाच्या मुलखांत धामधूम चालू ठेवून चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करूं लागले. हा त्यांचा त्रास चुकवावा म्हणून अदिलशहाच्या वजिरानें त्याच्याशी पुन: तह करून त्यांस पूर्वींप्रमाणे प्रतिवर्षी तीन लाख होन खंडणी देण्याचे कबूल केलें.

ह्याप्रमाणें आदिलशहाशीं तह केल्यावर महाराजांनी कुतुबशहाच्या मुलखांत मोहिमा सुरू केल्या. तिकडचा मुलूख लुटून उद्ध्वस्त करण्याचा सपाटा त्यांनीं एकसारखा चालू ठेविला. कुतुबशहाला त्यांचें पारिपत्य करण्याचें सामर्थ्य नव्हते. त्यांत आणखी मोगलांचे त्यांना पाठबळ आहे. असें कळल्या वरून तर त्यांच्याशी सामना करण्याचें धैर्य त्याला मुळींच होईना. म्हणून आपले दिवाण मादण्णा व आकण्णा यांच्या द्वारे त्यानें त्यांच्याशी तह करून प्रतिवर्षी पांच लाख रुपये खंडणी त्यांना देण्याचा करार केला; आणि परस्परांनी परस्परांशी इतःपर स्नेहभावाने वागावें व परस्परांचे वकील परस्परांच्या दरबारी राहावे असें ठरविलें. ह्या तहानंतर महाराजांनी निराजी रावजी याला कुतुबशहाच्या दरबारीं वकील म्हणून पाठविलें.

अशा प्रकारे अदीलशाही व कुतुबशाही यांस दीन करून व त्यांच्यावर वार्षिक खंड बसवून त्यांच्याशी विरोध करण्याचे महाराजांनी सोडून दिले; त्याप्रमाणेंच मोगलांशीहि तूर्त तह करून त्यांच्याहि विरोधास अमळ आळा घातल्यावर महाराजास दोन वर्षे चांगली स्वस्थता मिळाली. तरी ह्या वेळीं त्यांनीं पुनः कोकणात शिद्दीशी व फिरंग्यांशीं लढाया करून त्यास जेरीस आणण्याचा क्रम सुरू ठेविलाच होता. फिरंगी महाराज सांगत तसा तह करून त्यांच्या उपसर्गापासून सुटण्यास नेहमी पाहत असत; आणि शिद्दी जरी बराच कमजोर झाला होता तरी त्याचा जंजिरा काबीज करून त्याचें समूळ उत्पाटन करण्याचें काम महाराजांस अजून अमळ जड वाटे. तरी त्यांच्या आरमाराने त्याच्यावर पुरा शह बसविला असून त्याचा कोंकणपट्टीला वारंवार होणारा त्रास साफ बंद केला होता. त्याला मोगल आरमाराचा पाठिंबा असल्याकारणाने तो अजून सावरून राहिला होता.

महाराजांना ही जी थोडीशी स्वस्थता मिळाली तिचा उपयोग त्यांना स्वराज्याची व्यवस्था लावण्याकडे केला. नंतर लौकरच मोगलांनीं केलेला तह मोडून त्यांच्याशी पुनरपि विरोध मांडला तेव्हां त्यांना त्यांच्याशी झुंजावे लागले, त्याचें वृत्त पुढील भागांत निवेदन करूं.

***

भाग एकुणिसावा

# मोगलांच्या मुलखांत पुनः स्वाऱ्या
# (सन १६७०-७२)

महाराजांनी कुतुबशाही व अदिलशाही दीन करुन त्यांच्यावर वार्षिक खंड बसविल्याचें ऐकून औरंगजेबास आतां अशी भीति वाटूं लागली कीं शिवाजी महाराज ह्या दोन्ही शाह्या बुडवून व त्यांचे प्रांत हाताशी घालून अतिप्रबळ होतील, आणि मग दक्षिणदेश काबीज करण्याचा पुष्कळ दिवसांचा आपला मनोदय असिद्ध राहिल; एवढेच नव्हे तर मराठे प्रबळ होऊन आपणास भारी होतील व आपला दक्षिणेतून साफ उठावा करितील; आणि मग त्यांना ह्या देशातील यवनपातशात सहज निर्मूळ करितां येईल. म्हणून त्यांच्याशी ह्या समयी सलोखा करून स्वस्थ बसणे उचित नव्हे असा निश्चय करून त्यानें मोअझीम व यशवंतसिंग यांना असें फर्मान पाठविलें कीं शिवाजीमहाराजांशी केलेला तह मोडून त्यांस दिलेले किल्ले व प्रांत माघारी घ्यावे, त्यांची फौज आपल्या मदतीस आणून ठेविली आहे ती माघारीं पाठवावी, किंवा साधल्यास तिचा नाश करावा; आणि प्रतापराव गुजर वगैरे जे सरदार सापडतील त्यांस कैद करावें. ह्या फर्मानाचा खलिता आग्ऱ्याहून निघाल्याचे वर्तमान मोअझिमास आगाऊ कळल्यावरून त्यानें प्रतापराव गुजरास फौज घेऊन लगबगीने निघून जाण्यास सांगितले. ह्यावरून प्रतापराव मोगलाच्या छावणीतून निघून बराच दूर गेल्यावर त्याच्या पाठलागास आपली फौज पाठवून आपल्या वहीमखोर बापाच्या दोषांतून शहाजादा मुक्त झाला. मोगलांच्या त्या फौजेला अर्थात् प्रतापराव गुजरानें मुळी दाद दिली नाही.

मोगलबादशाहानें आपण होऊन झालेला सलोखा मोडल्यावर महाराजांनी त्याच्याशी पुनः विरोध सुरू केला. त्यांनीं प्रथम मोगलांच्या ताब्यांतला सिंहगड काबीज करण्याचा निश्चय केला. ही कामगिरी तानाजी मालसुरे व त्याचा भाऊ सूर्याजी यांनी पतकरिली. त्यांनीं हजार दीडहजार मावळे घेऊन किल्यावर अकस्मात् छापा घातला. कारण

त्याला वेढा देऊन लढल्यानें लौकर यश येण्याचा संभव नव्हता; आणि उदयभानु नांवाच्या शूर, इमानी व बलाढ्य रजपूत सरदाराच्या हवाली तो किल्ला असल्या कारणानें त्याला लांच वगैरे देऊन वश करितां येण्यासारखें नव्हतें. म्हणून तानाजीनें काळोख्या रात्रीं किल्ल्याखालीं जाऊन ज्या बाजूकडून शत्रूला किल्ल्यावर मुळीं चढून येणार नाही असें वाटण्यासारखे होते, तेथें एका मावळ्याला घोरपड लावून वर पाठविलें. आणि दोरीची शिडी खडकाला अडकविली. ह्या शिडीनें सुमारें तीनशे मावळे वर चढून गेले; बाकीच्यानी वरून इशारा होतांच चढून यावें असे ठरविलें. वरती चढलेल्या लोकांची चाहूल रखवालदारांस लागताच त्यांनीं शत्रू वर चढून आल्याचा पुकारा केला. तेव्हां किल्ल्यावरच्या लोकांची एकच धांदल उडून गेली; आणि मावळ्यांनी त्यांचा संहार करण्याचा सपाटा सुरू केला. उभय पक्षांकडचे लोक मोठ्या आवेशाने लढले. ह्या युद्धाच्या गर्दीत तानाजी व उदयभानु ह्यांची गांठ पडून दोघांचें द्वंदयुद्ध झालें. दोघेहि युद्धकुशल व बलवान असल्यामुळे त्यांची बराच वेळ झटापट झाली, आणि शेवटीं परस्परांचें वार परस्परांच्या वर्मी लागून दोघेहि एकेच वेळी समरभूमीवर चीत होऊन गतप्राण झाले. आपला मोहरप्या पडला हें पाहून मावळे माघार घेऊन पळत सुटले. सुर्याजी खालीं राहिलेल्या बाकीच्या मावळ्यांसह वरती चढून येऊन पाहतों तो आपला वडील बंधु पडला आहे आणि उरलेले मावळे पळत सुटले आहेत असे त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्यानें त्यांस पुनः हुरूप आणून शत्रूशी लढण्यास प्रवृत्त केलें; आणि वर आलेल्या ताज्या दमाच्या मावळ्यानिशी त्यांनीं पुनः शत्रूच्या लोकांवर मोठ्या आवेशाचा हल्ला करून बहुतेकांची कत्तल उडविली आणि किल्ला सर केला. सुर्याजीच्या ह्या शौर्याबद्दल महाराजांनी त्याची तारीफ करून त्याला त्या गडावर हवालदार नेमिलें. तानाजीसारखा अतिशूर, इमानी बालमित्र आपणांस मुकल्याबद्दल महाराजांस पराकाष्ठेचें दुःख झालें. ह्या वेळीं त्यांनी असे उद्गार काढले म्हणतात कीं, ''गड आला पण सिंह गेला.''

सिंहगड हातीं आल्यावर पुरंदर किल्ला सुर्याजीनें छापा घालून घेतला. माहुलीचा किल्ला मोरोपंत पिंगळ्याने दोन महिने वेढा घालून हस्तगत केला. नंतर त्यानें करनाळा किल्ला सर करून सगळा कल्याणप्रांत काबीज केला. लोहगड शिवनेर, त्रिंबक, रोहिडा, अहिवंत, रावळाजावळा, मकरंद वगैरे मोगलांच्या ताब्यातले किल्ले छापे घालून सर केले; आणि अहमदनगरापर्यंतचे सगळे गांव लुटून फस्त केले.

नंतर महाराजांनी शिद्दीचा जंजिरा काबीज करण्याचा निर्णय करून तिकडे आपले लोक पाठविले. त्यानी जंजिऱ्यावर तोफांचा एकसारखा भडीमार चालू केला. त्यामुळें शिद्दी अगदी हैराण झाला. पण त्यानें सुरत येथील मोगल सुभेदाराकडून आरमाराचे साहाय्य मिळवून शेवटपर्यंत लढत राहण्याचा नेट धरिला. हा मोगलांचा आधार त्याला मिळालेला पाहून महाराजांनी असे ठरविले की त्याच्याशी लढत राहून आपल्या लोकांची खराबी करणे तूर्त बरोबर नाहीं, पुढे विशेष अनुकूल प्रसंग आला म्हणजे त्याचा नायनाट करितां येईल. असा विचार करून जंजिऱ्यासमोरील आपली फौज त्यांनीं काढून नेली.

सुरतेच्या मोगल सुभेदारानें शिद्दीला ह्या वेळीं मदत केल्यावरून त्या शहरावर पुनः स्वारी करून त्या सरदाराची रग जिरवावी व ते शहर पुनः लुटावें असे महाराजांनी मनांत आणिलें; आणि त्यांनीं पंधरा हजार स्वारांनिशी त्या शहरावर अकस्मात हल्ला केला. पण ह्या सुमारास तो सुभेदार मरण पावला असून मोगलांचे बहुतेक सैन्य त्या शहरांतून काढून नेले होतें. औरंगजेबाच्या हुकमावरून त्या शहरास तटबंदी केलेली होती. शहरात अवघे तीनशे शिपाई होते ते पळून किल्ल्यावर दडून बसले. युरोपिअन व्यापाऱ्यांनीं आपली चीजवस्तू दहाबारा मैलांवर स्वाली नांवाच्या बेटांत नेऊन भरली आणि त्या ठिकाणाला फळ्यांचा तट करून त्यावर तोफा रचून ठेविल्या. इंग्रज व्यापाऱ्यांनी महाराजांना नजरनजराणा देऊन आपल्या वखारीवरचा हल्ला फिरविला. असाच प्रकार डच व फ्रेंच व्यापाऱ्यांनी केला. शहरास चोहोंकडून चौक्या लावून जो कांहीं ऐवज सापडला तो महाराजांच्या लोकांनी लुटला. त्या वेळी कास्कारचा तारतार जातीचा राजा पुत्राने पदच्युत केल्यामुळें मक्केची यात्रा करून येऊन ह्या शहरात औरंगजेबाच्या आश्रयाने वाडा बांधून राहिला होता. त्याचा वाडा त्यांनी लुटला, त्यांत त्यांना पुष्कळ जवाहीर वगैरे मिळाले.

इतक्यांत बऱ्हाणपुराहून मोगलांचें मोठें सैन्य सुरत शहराच्या रक्षणास येत आहे असे वर्तमान आले. त्यावरून महाराजांनी तेथला तळ लगबगीनें उठवून स्वदेशाकडे कूच केलें. निघते वेळीं त्यांनीं त्या शहराच्या लोकांस पत्र लिहून कळविले की प्रतिवर्षी बारा लक्ष रुपये खंडणी बिनबोभाट पावती केल्यास तुमच्या शहरास पुनः लुटीची भीति उरणार नाहीं. महाराजांना ह्या वेळीं अवघी ६६ लक्षांची लूट मिळाली असें म्हणतात.

महाराज साल्हेरच्या मोठ्या रस्त्याने माघारीं यावयास निघून कंचनमंचनावरून गेले न गेले तो मोगलांच्या आठ हजार फौजेने त्यांना वणीदिंडोरीजवळ गाठले. ह्या सैन्यावर मोहबतखान व दाऊदखान असे दोन मोगल सरदार प्रमुख होते. नाशकाजवळच्या खिंडींतून कोंकणांत उतरावें असा महाराजांचा बेत होता. परंतु इतक्यांत मोगल फौजेने त्यांना गांठले. तेव्हां त्यांनीं मागें उलटून त्या सैन्याशी मोठ्या निकराचे युद्ध केलें. समरांगणावर ते स्वत: दोन हातांत दोन पट्टे चढवून आपल्या सैन्याच्या आघाडीस लढत होते. ते असे लढतांना पाहून त्यांच्या सैन्यास अतिशयित आवेश आला. शेवटीं मोगलाचा पराभव होऊन ते रानोमाळ पळत सुटले. इकडे महाराजांनी शत्रूसैन्याला लढाईत गुंतवून आपल्या एका तुकडीबरोबर लूट खिंडींतून उतरवून सुरक्षित पार नेववली. शत्रूचा पराभव करून त्यांचे हत्ती, घोडे वगैरे जें कांहीं युद्धोपयोगी सामान सापडले तें घेऊन ते त्या खिंडींतून खालीं उतरूं लागले. तिकडून जातांना त्यांना रायबागीण नांवाच्या एका शूर बाईने आपल्या  फौजेनिशी अडविलें. ही रायबागीण माहूरच्या देशमुखाची स्त्री एका लढाईत हिचा नवरा पडला असतां हिने आपल्या लोकांना हुरूप देऊन लढाई पुढें चालविल्यावरून औरंगजेबाने हिला रायबागीण असा किताब देऊन कांहीं जहागीर करून दिली होती महाराजांना ह्या बाईच्या लोकांचा मोड करण्यास फारसा विलंब लागला नाहीं. तेव्हां ती दाती तृण धरून त्यांस शरण आली, त्यांनी तिचा मोठा आदरमान करून व तीला वस्त्रालंकार देऊन परत पाठविलें.

स्वदेशी आल्यावर महाराजांनीं प्रतापराव गुजर व मोरोपंत पिंगळे यांना मोगल्यांच्या उत्तरेकडील मुलखात लुटालूट करावयास पाठविले. प्रतापरावाने आपल्या स्वारांनिशीं खानेदेशाकडे मोहीम करून तिकडील श्रीमंत लोकांस लुटले. व शहरांवर व गांवांवर वार्षिक खंड बसविला. मोगलांचे कारंजे शहर त्या वेळीं अतिधनाढ्य होतें, तें महाराजांनी स्वतः जाऊन लुटले. तेथें त्यांनी तीन दिवस मुक्काम केला. तिकडचे धनिक लोक आपलें द्रव्य जमिनींत पुरून ठेवीत हें त्यांस माहीत असल्यावरून त्यांनीं मोठमोठ्या श्रीमंत लोकांच्या घरास खणती लावून पुष्कळ द्रव्य काढलें. ह्या शहरांत त्यांना अगणित लूट सापडली. ती त्यांनीं चार हजार बैलावर व उंटांवर लादून नेली. ह्या लुटीत उंची कपडा,सोनें, रुपे व इतर जडजवाहीर मिळून एकंदर एक कोटीचा ऐवज त्यांना मिळाला, मोरोपंताने आपल्या पायदळानिशीं मोगलांच्या दुसऱ्या प्रांतांत शिरून औध, पट्टा, साल्हेरी, मुल्हेरी, त्रिंबकगड, रामगड वगैरे ठिकाणें काबीज करून जागोजाग नवे गड बांधिले.

ही अशी चोहोंकडून त्यांनीं मोगलांच्या मुलखांत धामधूम चालविली असून मोगल सैन्याने त्यांस प्रतिकार केला नाहीं. याचे एक कारण असें कीं मोअझिम व यशवंतसिंग हे दोघेहि ह्या वेळीं शिवाजीमहाराजांस अनुकूल होते. शिवाजीमहाराज प्रबळ होऊन त्याचे सैन्यबळ वाढत गेल्याने त्यांच्याकडून आपणास आपल्या बापाच्या पश्चात् दिल्लीचे तक्त मिळविण्याच्या कामी मदत होईल असें त्याला वाटे; आणि यशवंतसिंगाला तर वेळोवेळा अवदानें चारून महाराज गार करून ठेवीत. दुसरे असें कीं त्या दोघांकडे मिळून फारसें सैन्य नव्हतें; आणि त्यांना आणखी सैन्याची कुमक पाठविण्यास तो वहीमखोर बादशहा तयार नव्हता. यास्तव महाराजांच्या सैन्याशी सामना न केल्याची ही सबब त्यांना पुढे करिता येत असे.

शेवटी औरंगजेबाने यशवंतसिंगास परत बोलावून त्याच्या जागी मोहबत खानास चाळीस हजार फौज देऊन पाठविलें आणि शहाजाद्याकडची आणखी फौज घेऊन शिवाजी महाराजांबरोबर लढाई करावयास सांगितले. त्यानें दक्षिणेत येतांच पहिल्यानें औंध व पट्टा ही ठाणी हस्तगत केली. मग आपल्या सैन्याचे दोन भाग करून एका भागावर दिलेरखानास प्रमुख केले व चाकणचा किल्ला सर करण्यास पाठविलें. तो किल्ला त्यानें घेऊन त्यांतल्या नऊ वर्षींहून अधिक वयाच्या सगळ्या माणसांची कत्तल उडविली. मग त्यानें रावळाजावळा नांवाच्या किल्ल्यावर हल्ला केला. परंतु मोरोपंताने त्या किल्याच्या रक्षणासाठी फौज पाठविल्यावरून त्याचे तेथे कांहीएक चालले नाही. तेथून निघून जाऊन त्यानें कणेर गडावर हल्ला करून तो घेतला. इकडे मोहबतखान व दाऊदखान यांनी अहिवंत किल्ला एकं महिना वेढा घालून सर केला.

ही एवढी पहिल्यापहिल्यानें धामधूम करून मोहबतखान स्वस्थ बसला असे पाहून औरंगजेबाला त्याचाहि वहीम आला. शिवाजी महाराजांनी त्याला अवदाने चारली असावी असें त्याला वाटलें. मग त्यानें बहादूरशहा व दिलेरखान यांस शिवाजीच्या ताब्यातील मुलूख काबीज करावयास सांगितलें. ह्या सरदारांनी मोठ्या सैन्यानिशी साल्हेरीस भक्कम वेढा दिला. हें वेढ्याचे काम त्यांनी इखलासखान वगैरे सरदारांस सांगून बहादूरखानानें स्वत: सुपे परगणा हस्तगत केला. दिलेरखानानें पुणें शहर काबीज करून त्यांतल्या नऊ वर्षाहून अधिक वयांच्या सगळ्या माणसांना कापून काढलें. साल्हेरीचें रक्षण हर उपायानें करावयाचें असें ठरवून महाराजांनी प्रतापराव गुजर व मोरोपंत पिंगळे यांना तिकडे रवाना केलें. त्यांची वीस हजार फौज मोगल सैन्याशी

झुंजण्यास गेली. उभय सैन्यांचे तुमुल युद्ध जुंपलें. दोन्ही पक्षांकडील योद्ध्यानी आपल्या शौर्याची व युद्धकौशल्याची शिकस्त केली. शेवटीं मोगलांचा पुरा पराभव होऊन त्यांचे पुष्कळ लोक रणांत पडले; व साल्हेरीचा वेढा उठवून तें औरंगाबादेकडे पळत सुटले. मराठ्यांनीं त्यांचा पिच्छा शेवटपर्यंत पुरविला.

ह्या लढाईत १२५ हत्ती, ७०० उंट, ६००० घोडे, हजारो बैल आणि इतर युद्धोपंयोगी मुबलक सामान महाराजांस मिळाले, तसेच जडजवाहिर पुष्कळ हाती लागले. ह्या मोठ्या लढाईत ज्यांनीं ज्यांनीं बहुत शर्त करून शत्रूंशी शौर्यानें सामना केला होता त्यांस महाराजांनीं चांगली इनामे देऊन राजी केले; जे मोगल सरदार व बडेबडे अमलदार पाडाव केले होते, त्यांच्या जखमा बऱ्या झाल्यावर त्यांचा बहुमान करून व त्यांस नजरनजराणा देऊन सोडून दिलें; व ज्या बंदिवानांची आपल्या पदरी नोकरी करण्याची इच्छा दिसली त्यांस ठेवून घेतलें व बाकीच्यांस वाटखर्ची देऊन आपआपल्या गांवीं पाठवून दिलें. ही साल्हेरची लढाई १६७२ सालीं झाली. महाराजांना मोगलांशी लढून हा काळपर्यंत जे विजय प्राप्त झाले होते त्यांत ह्या विजयाची गणना पहिली होती. ह्यानंतर त्यांचा दरारा चोहोंकडे विशेष बसला. मराठ्यांच्या ठायींच्या शौर्यवीर्यादि उज्ज्वल गुणांचे हे असे अप्रतिम प्रदर्शन पाहून मोगल सरदार अगदी थक्क होऊन गेले; व त्यांना महाराजांच्या लोकांची विशेषच दहशत वाटूं लागली.

ह्या लढाईनंतर महाराजांनी मोरोपंतास सुरतेकडे पाठवून मोगलांनी तेथे तयार केलेले आरमार जाळून टाकावयास सांगितलें. परंतु तो तेथें जाऊन पोचण्यापूर्वी तें त्या बंदरांतून निघून गेलें होतें. मग त्यानें सुंरत शहरास वेढा देऊन तेथल्या सुभेदाराकडून वार्षिक खंडा दाखल मोठी रक्कम वसूल केली. पुढे महाराजांनी सुरत शहराला कायमचा शह देण्याच्या इराद्याने घोडबंदराजवळील जव्हार व रामनगर ह्या प्रांतांवरील कोळी राजांवर स्वारी करून तीं ठिकाणे हस्तगत केली. रामनगराच्या राजाला फिरंगी प्रतिवर्षी खंड देत असत तो आपणास द्यावा अशी कबुलायत त्यांनीं दमणच्या फिरंग्यांकडून करून घेतली. ह्या नंतर मोरोपंतानें नाशिक प्रातांत शिरून नाशिक, त्रिंबक, वणी, दिंडोरी, वगैरे ठाणी हस्तगत केली, महाराजांच्या दुसऱ्या लोकांनी वऱ्हाड व तेलंगण ह्या प्रातांवर स्वाऱ्या करून जागोजाग खंड वसूल केला. बहादूरखान व दिलेरखान यांनी त्यांचा पाठलाग केला, पण त्यांना त्यांनीं दाद दिली नाही.

ह्या वेळीं भागानगरचा कुतुबशहा फ्रेंच लोकांशी युद्ध करण्याकरिता मोठे सैन्य घेऊन गेल्याचे वर्तमान महाराजांस कळताच तिकडे मोठ्या वेगानें मोहीम करून भागानगरापाशी ते अकस्मात येऊन थडकले आणि आतील अंमलदारांस त्यांनीं असे सांगून पाठविले कीं वीस लाख होन खंड बिनतक्रार पावता करा नाहीं तर तुमचे शहर उद्ध्वस्त करितो. ती अट त्यांना कबूल होऊन त्यांनी तेवढी रक्कम जमा करून त्यांच्याकडे नेली. ती हाती पडल्यावर तेथला तळ उठवून पुनः माघारी कूच करून ते थेट रायगडावर आले.

महाराज ह्या मोहिमेवर गेले असतां याकूबखान शिद्दीने मोगल्यांच्या आरमाराच्या मदतीने कोंकणपट्टीतील महाराजांच्या ताब्यातल्या बंदरकिनारच्या मुलखावर हल्ले केले. त्याने दंडाराजपुरी काबीज केली व तिकडे महाराजांनी बांधलेल्या सहा किल्ल्यांवर हल्ला करून ते हस्तगत केले व त्यांत हातीं लागलेल्या एकंदर पुरुषांची कत्तल केली. सुंदर बायका व मुली सांपडल्या त्यांस त्यानें मुसलमान करून गुलाम म्हणून विकले, मुंबईच्या इंग्रजांकडे शिद्दीने मदत मागितली पण ती त्यानी महाराजांच्या भीतीस्तव दिली नाही; तरी त्याने पेण व नागोठणा ह्या खाड्यांत आपली तारवें पाठवून महाराजांचा तिकडील मुलूख लुटून सांपडतील तेवढ्या लोकांस मुसलमानी धर्माची दीक्षा देऊन गुलाम केलें. ह्या त्यांच्या क्रूरपणाच्या व अधमपणाच्या कृत्याबद्दल त्याला शिक्षा देण्यासाठी महाराजांनी त्याच्या मुलखात सैन्य पाठवून त्यास त्राहित्राहि करून सोडले. त्याच्या व मोगलांच्या आरमाराशीं झुंजण्याकरितां त्यांनी इंग्रजांपाशी कुमक मागितली; पण त्यांनी मोगलांच्या धाकाने ती त्यांस दिली नाहीं. ह्या वेळी फ्रेंच व्यापाऱ्यांनी मात्र त्यांना दारूगोळा गुपचुप विकण्याचा क्रम चालूं ठेविला होता. ह्या सुमारास युरोपात डच लोकांचे इंग्रज लोकांशी युद्ध सुरू झाले आणि डच लोकांचे मोठे आरमार कोकणच्या किनाऱ्यापाशी येऊन इंग्रजांवर हल्ला करण्याच्या बेतांत होते. त्यावरील डच सरदाराने महाराजांकडे मदत मागितली, ती त्यांनीं त्यास दिली नाहीं. कारण त्यांना इंग्रजांशी उघड वैर करणे ह्या वेळीं बरें वाटले नाही.

***

भाग विसावा

# विजापूरकरांशी पुनरपि युद्धप्रसंग (सन १६७३–७४)

ह्या वेळी अदिलशाहीत अधिकारांतर झाले. सन १६७३ तं अदिलंशहाच्या तक्तावर एक पाच वर्षाचा मुलगा आला आणि मुख्य कारभारी खवासखान हा झाला. याच्या कारकीर्दीत शिवाजीमहाराजांशी केलेला तह बिघडला. खवासखानाचे इतर सरदारांशीं न जमून त्यांचा आपसात कलह माजला. ही संधि पाहून महाराज विजापूरकरांच्या राज्यांत पुनः धामधूम करण्यास प्रवृत्त झाले. इकडे विजापूकरांशी मोगलांचा तह होऊन त्यांचा सेनापति बहिलोलखान हा महाराजांशी युद्ध करण्यास सिद्ध झाला.

महाराजांनी विशाळगड येथें आपल्या फौजेची तयारी करून पन्हाळा किल्ला सर करण्यास पंधरा हजार लोक पाठविले. त्यांनीं पन्हाळ्यास वेढा दिला. बहिलोलखानाने ह्या लोकांवर मोठ्या फौजेनिशीं हल्ला केला. उभय पक्षांचे घोर युद्ध झालें. त्यांत महाराजांच्या सैन्याचा विजय होऊन पन्हाळा हस्तगत झाला. इकडे महाराजांनी सातारा किल्ला त्यावरील रखवालदारास लाचाने वश करून घेऊन हाताखाली घातला. हे वर्तमान १६७३ सालच्या सप्टेंबर महिन्यांत घडले. तेथून पुढे विजापूरकरांचे गांव व शहरे लुटीत जाऊन त्यांनीं हुबळी शहरावर हल्ला करून तें यथेच्छ लुटले. हे शहर त्यांच्या लोकांनी पूर्वी एक वेळ लुटलेच होतें. ह्या शहरांत ह्या वेळीं महाराजांस जितकी लूट मिळाली तितकी पूर्वी कोणत्याहि शहरांत मिळाली नव्हती. तेथल्या इंग्रज व्यापाऱ्यांनाहि त्यांनीं ह्या वेळीं लुटून सात आठ हजार होनांचा ऐवज मिळविला. हे वर्तमान मुंबईचा गव्हर्नर अंगियार यास कळले तेव्हां त्याने महाराजांपाशीं ह्या नुकसानीची भरपाई करून देण्याविषयी मोठ्या अदबीने मागणी केली. महाराजांनी त्याला असें सांगून पाठविले की: ''तुमचे जें कांहीं खरोखर नुकसान झाले असेल तें देऊन

तुमच्याशी सलोख्याचा तह करण्यास आम्ही राजी आहो. तरी शिद्दीस आपला शत्रु समजून त्याचा जंजिरा काबीज करावयास तुम्ही आम्हांस मदत करावी; व आम्हांस दारूगोळा पुरवींत जावें.'' ही शेवटली अट अंगियार याला मोगलांच्या धाकामुळे मान्य करवली नाहीं.

महाराजाचा पन्हाळा येथे विजय झाल्याची वार्ता ऐकल्यावर अंगियार यानें ता. १६ सप्टेंबर १६७३ रोजी पुढीलप्रमाणे लेख लिहिला होता: ''शिवाजी आतां आपल्या सगळ्या शत्रूंशी टक्कर देण्यास समर्थ झाला आहे. आतां तो त्यांस मुळीं जुमानीत नाही. मोगलांचे सैन्य त्याच्या मुलखात उतरण्याचा संभव आहे, आणि दुसरीकडून विजापूरकरांचा सरदार बहिलोलखान त्याच्यावर चाल करून येईल असेहि वाटते. परंतु दाणावैरण मिळण्याची पंचाईत पडून त्यांना फार दिवस नेट धरून त्याच्याशी लढता यावयाचे नाहीं. विजापूरच्या सरदारांचा असा कांहीं कावा दिसतो की शिवाजीशी नेटाने युद्धू करून त्याचा सफाई नाश करण्यास ते तयार नाहीत.''

महाराजांनी पश्चिम किनारा निर्वेधपणे आपल्या ताब्यांत आणण्याच्या इराद्याने कारवार, अंकोला वगैरे बंदरांवर हल्ला करावयास आपले आरमार पाठविले, आणि आंतल्या प्रदेशांतील देशमुखांस विजापूरसरकाराविरूद्ध बंडे उभारण्याची फूस दिली. ह्या देशमुखांनी आपल्या प्रांतातल्या मुसलमान ठाणेदारांस आपआपली ठाणी सोईन पळून जावयास लाविले. कारवारचा फौजदार मिया याने आपल्या सरकाराविरुद्ध बंड उभारून कांही देशमुख आपल्या पक्षास सामील करून घेतल्याचे महाराजांस कळतांच ते तिकडे फौज घेऊन गेले आणि त्या फौजदारास जेर करून त्याच्या ताब्यातली कारवार, अंकोला व शिवेश्वर ही ठाणी हस्तगत केली.

नंतर त्यांनीं सातारा, परळी, चंदनवंदन, पांडवगड, नंदगिरी, तातोरा वगैरे विजापूरकरांचे किल्ले काबीज केले. त्याप्रमाणेच वाई, कऱ्हाड, शिरोळे व कोल्हापूर हे परगणे हस्तगत करून हुकेरी रायबागपर्यंत आपली सत्ता त्यांनी बसविली. नंतर त्यांनी फोडे किल्ल्यास स्वतः वेढा दिला.

ही अशी महाराजांनी चोंहोंकडून धांदल उडविल्यामुळे खवासखानानें बहिलोलखानास पन्हाळ्यावर हल्ला करण्यास पाठविले. त्यानें त्या किल्ल्यास वेढा दिला तेव्हां प्रतापराव गुजर त्याच्यावर चालून गेला. परंतु त्याच्याशी सामना न करितां तो विजापुरापर्यंत प्रांत लुटीत जाऊन थेट त्या शहराच्या वेशीशी जाऊन थडकला. हा असा त्याचा गहजब पाहून खवासखानानें बहिलोलखानास विजापूर शहराच्या

रक्षणासाठी पन्हाळ्याचा वेढा उठवून माघारीं बोलविलें. प्रतापरावाने मागें फिरून त्याला उमराणी येथें गांठले, आणि त्याच्याशीं लढाई करून त्याला अगदीं जेरीस आणिलें. म्हणून त्यानें दीन होऊन तहाचे बोलणे केलें आणि जेमतेम प्रतापरावाच्या तावडीतून सुटून तो विजापुरास गेला. प्रतापरावानें त्याला सोडून दिल्याबद्दल महाराजास राग येऊन त्यांनी त्याला पत्र लिहून त्याबद्दल दोष दिला; हे त्या मानी पुरुषास सहन झाले नाही, आणि तो भागानगराकडे मोहिमेस जाऊन तिकडील चांदे, देवगड, रामगिरी, बांजेदेश वगैरे लुटींत राहिला.

प्रतापराव गुजर असा हा महाराजांवर रुसून दूरच्या प्रांतात मोहिमेवर गेला असें पाहून बहिलोलखानानें पुनः फौजेची जमवाजमव करून पन्हाळ्याकडे चाल केली. ही बातमी गुजरास कळताच त्याने उलट खाऊन अतिवेगाने पन्हाळ्याकडे धाव घेतली. ह्या वेळीं महाराजांना फोंड्याचा वेढा उठवून जाणें बरोबर न वाटल्यावरून त्यांना हें मोठे संकट वाटलें होतें. गुजर तिकडे शत्रूला अडविण्यास आला असें कळले तेव्हां त्यांनीं त्याला पुनः पत्र लिहून बेशिस्त वर्तन केल्याबद्दल टपका दिला व विजापूरकरांची फौज सफाई बुडविल्याखेरीज आमच्यासमोर कदापि येऊ नको असें सांगितलें. ह्या गोष्टीने त्यास पराकाष्ठेचा त्वेष येऊन त्यानें बहिलोलखान्याच्या मोठ्या फौजेवर आपल्या थोड्याशा लोकांनीशी एकदम मोठ्या आवेशाचा हल्ला केला. ह्या लढाईत प्रतापराव धारातीर्थी पतन पावला, आणि त्याचे बरेच लोक रणांत पडले व बाकीचे पळून गेले. हा विजय मिळवून बहिलोलखान पन्हाळ्याकडे जात होता; इतक्यांत महाराजांचा दुसरा शूर सरदार हंसाजी मोहिते याने त्याला नेसरी येथें गांठले आणि त्याच्याशीं सामना देऊन त्याचा अगदीं मोड केला. त्याची फौज तेथें बरीच खलास झाली आणि उरलेली सैरावैरा पळत सुटली. बहिलोलखान ह्या पराभवामुळे अगदीं खिन्न होऊन जेमतेम विजापुरास जाऊन पडला. ही लढाई स. १६७४ च्या मार्च महिन्यांत झाली. हंसाजीच्या ह्या पराक्रमाबद्दल महाराजांनी त्याची पुष्कळ तारीफ करून त्याला सरनोबत केलें व हंबीरराव हा किताब दिला. सदरील लढाईत संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे मोठे शूरशिपाई असल्याचें प्रथम महाराजांच्या निदर्शनास येऊन त्यांचा त्यांनीं बहुमान केला व त्यांस मोठ्या योग्यतेस चढविले. प्रतापराव गुजरासारखा शूर सेनापति आपणांस अंतरला म्हणून त्यांना फार खेद वाटला. त्यांनीं त्याच्या नातलगांस चांगल्या नेमणुका करून दिल्या व त्याच्या एका मुलीशी आपला पुत्र राजाराम याचा विवाह केला.

हंबीररावानें विजापूरकरांच्या मुलखात पुनः मोहीम करून बहिलोलखानास गांठण्याचा प्रयत्न केला. हें वर्तमान दिलेरखानास कळतांच तो बहिलोलखानाच्या मदतीस गेला. हे असे दोघे सरदार एकवटले हें पाहून हंबीररावाने त्यांना झुकांडा देऊन कानडा प्रांताकडे भरारी मारिली. तो इतक्या वेगानें दौड करीत गेला कीं त्या यवन सरदारांनीं त्याचा पाठलाग करण्याचा यत्न सोडून दिला आणि दिलेरखान आपल्या ठाण्यास परत गेला व बहिलोलखान कोल्हापुराकडे गेला. इकडे हंबीररावानें बहिलोलखानाच्या जहागिरीतला पेंच नावाचा गाव लुटून पुष्कळ द्रव्य मिळविलें. तें घेऊन तो माघारी फिरला असतां त्याला बहिलोलखानानें खिजरखाननामक सरदाराच्या मदतीने बंकापुरापाशी गांठलें. त्या ठिकाणीं त्यांची निकराची लढाई होऊन हंबीरराव विजयी झाला; व शत्रूला पळता भुई थोडी झाली. ह्या लढाईत त्याला बरेच घोडे, उंटे व इतर युद्धोपयोगी सामान मिळाले.

ही सगळी लूट हंबीररावाने स्वदेशी पोंचती करून बागलाणाकडे भरारी मारली आणि बागलाण खानदेश,वऱ्हाड, बऱ्हाणपूर व गुजराथ हे मोगलांचे प्रांत लुटून मोठी लुट घेऊन तो परत आला. मोगल सैन्य त्याच्या पाठीस लागे, पण त्याची दौड इतकी विलक्षण वेगाची असे कीं तो शत्रूच्या लोकांस तीसचाळीस मैल मागें टाकी, म्हणून ते निराश होऊन माघारी जात.

मागें सांगितले आहे की महाराजांनी स्वतः फोंड्यास वेढा घातला होता. तो वेढा बरेच दिवस पडाला होता तरी किल्ला कांहीं हातीं येईना. म्हणून फार दिवस एकेच ठिकाणीं फौज गुंतवून ठेवणे बरें नाही असे मनात आणून वेढा उठवून ते रायगडास परत गेले. ह्या वेळीं त्यांना राजापुरापासून बारेदशापर्यंत सगळी कोकणपट्टी ताब्यांत घेऊन तिची चांगली व्यवस्था लाविलीं. महाराज फोंड्यास वेढा देऊन तिकडे गुंतले असतां शिद्दी मोगल आरमाराच्या मदतीने मुंबईच्या बंदरांत जुलमाने घुसला व महाराजांच्या ताब्यतले कुर्ला वगैरे प्रांत लुटून त्यानें लोकांची पुष्कळ कत्तल उडविलीं, आणि पुरुष, बायका व मुलें पकडून गुलाम म्हणून विकिली. हे वर्तमान कळताच महाराजांनी रायगडावरून त्याच्यावर फौज रवाना केली. तिनें त्याचा पुरा मोड केला. दिलेरखानानेहि अशीच गडबड कोंकणांत करावयास पाहिले; परंतु त्याच्यांशी मराठ्यांनी लढून त्याची चांगली रग जिरविली. ह्याच सुमारास सातवलीच्या खाडीत शिद्दीच्या व महाराजांच्या आरमारांची मोठी लढाई झाली, तींत शिद्दीच्या आरमाराचा पुरा पराभव होऊन त्यांच्या पुष्कळ तारवांचा नाश झाला. ह्या वेळी महाराजांनी निश्चय केला कीं आणखी आरमार वाढवून शिद्दीचा नायनाट केल्यावांचून राहावयाचे नाहीं.

***

भाग एकविसावा

# राज्याभिषेक (सन १६७४)

मागल्या भागांत सांगितल्याप्रमाणें मोगलांचा व विजापूरकरांचा अनेक लढायांत पुरा पराभव करून त्यांची बरीच फौज महाराजांनीं खलास केली औरंगजेबाला आतां त्यांचा फारच धाक वाटूं लागला. त्यानें त्यांच्याशी लढण्यासाठी पाठविलेल्या प्रत्येक सरदाराची पुरी फजिती उडविली. स्वतः मोठी फौज घेऊन दक्षिणेंत त्यांच्याशी लढण्यास जावे तर ते आपला कसा व केव्हा घात करतील याचा नेम नाही अशी त्याला भीति वाटू लागली, म्हणून तीहि गोष्ट मनांत आणण्याचें त्याला धैर्य झाले नाही. शिवाय उत्तरेकडे अनेक गडबडी उपस्थित झाल्यामुळे त्याला दिलेरखान वगैरे सरदारांस तिकडे फौज घेऊन बोलावावें लागलें. म्हणून त्यानें आपल्या दक्षिणेंतील सुभेदाराला महाराजाशी युद्धप्रसंग करण्याचे तूर्त टाळावे असें सांगून पाठविले. त्यामुळें तो सुभेदार जागच्या जागी स्वस्थ राहिला. ह्याप्रमाणे मोगलशाहीला पुरा धाक व शह बसला; आणि विजापूरकरांचा सरदार बहिलोलखान याशी वेळावेळा लढून त्याच्या बहुतेक सेनेचा फडशा हंबिरराव वगैरे सरदारांनी उडीवल्यामुळें त्याला त्यांच्याशी पुनः लढण्याचे मुळी त्राण नव्हते. यास्तव विजापूरकरांनी तूर्त शिवाजीमहाराजांशी युद्धप्रसंग करण्याचें टाळावे असें ठरविले. आता कुतुबशाहाची तर मुळीच भीति उरली नव्हती. त्याच्याकडून ठरलेली खंडणी नेमाने येत असे; आणि त्याचा मुख्य प्रधान मादण्णा हा महाराजांस सर्व प्रकारीं अनुकूळ असे.

ह्याप्रमाणे तिन्ही यवन पातशहास शह देवून जागच्या जागी तटस्थ केल्यावर महाराजांनी स्वतांस राज्याभिषेक करून घेण्याचा विचार मनांत आणिला. त्यांना ह्या वेळीं असें वाटूं लागलें कीं शास्त्रविधीप्रमाणें स्वतांस राज्यभिषेक करवून छत्रसिंहासनादि राजचिन्हे धारण केल्यावांचून आपल्याविषयी लोकांच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न व्हावयाचा नाहीं; शत्रु आपणांस नेहमी पुंडपाळेगारांतच लेखतील; इतर पातशहा व राजे आपणांस

द्यावा तसा मान देणार नाहीत व आपल्याशी केलेले करारमदार व तह नीटपणे पाळणार नाहींत; ह्या देशांत येऊन राहिलेले परस्थ लोक आपणांस केवळ लुटारू समजून आपला तिरस्कार करितील; जे मराठे व रजपूत सरदार अजून यवन पातशहतींत नोकरीला आहेत किंवा स्वतंत्र होऊन बसले आहेत, त्यांच्या मनांत आपणाविषयी इष्ट आदरबुद्धि उत्पन्न होणार नाही; आणि खुद्द आपले प्रजाजन आपल्या सत्तेला योग्य मान देऊन आपल्याशी खऱ्या राजनिष्ठेने वागणार नाहींत व त्यांस लाविलेली शिस्त व दिलेले कौल योग्यरीतीने मानून चालणार नाहींत. आपण इतःपर यवन पातशहांचे प्रजाजन नसून हिंदूपदपातशहाचे अंकित आहो ही भावना त्यांच्या ठायीं उत्पन्न होणार नाहीं; आणि हिंदूंस स्वातंत्र्य मिळवून देऊन त्यांचें राज्य स्थापण्याच्या उद्देशानें आपण गेली तीस वर्षे केलेला परिश्रम व्यर्थ होणार; हे विचार त्यांच्या मनांत नेहमी घोळत असत.

ह्याप्रमाणें स्वतःस राज्याभिषेक करवून हिंदुपदपातशाही सशास्त्र स्थापण्याचा निर्धार करून त्यांनीं ह्या बाबतींत पहिल्याने आपल्या मातुश्रीची संमति घेतली; आणि रामदासस्वामी, चिंचवडचे देव वगैरे जे साधुसंत महाराष्ट्रांत होते त्यांची अनुमति मिळविली. मग त्यांनीं आपल्या पदरच्या सरदारांस व कारभाऱ्यांस जमा केलें व ठिकठिकाणच्या शास्त्र्यांस व पंडितांस पालख्या पाठवून आणविलें. ह्या सगळ्यांची एक सभा भरवून त्यांच्यापुढे हें आपले मनोगत त्यांनीं बोलून दाखविले. त्यांचा हा बेत सर्वांस पसंत वाटला, व त्यांनीं असे ठरविले की महाराजांनी राजोचित छत्रसिंहासनादि राज चिन्हे यथासांग शास्त्रविधिपूर्वक धारण करावी.

मग हा राज्याभिषेकविधि सशास्त्र करावयाचा असल्यास कोणकोणत्या गोष्टींची अनुकूलता हवी यासंबंधाने शिष्टजनांचें मत घेता, त्यांचा अभिप्राय असा पडला कीं व्रतबंध ज्याचा झाला आहे त्यालाच राज्याभिषेकविधि यथाशास्त्र करितां येतो. महाराजांचा व्रतबंध झाला नसल्यामुळें पंडितजनमते त्यांची शुद्रांत गणना होत असे, म्हणून त्यांचा हा हेतु शास्त्ररीत्या सिद्धीस जाणें शक्य नाही असें महाराष्ट्रांतील पंडितांचे मत पडलें. ह्याप्रमाणे हा नवीनच प्रत्यवाय उपस्थित झाला. त्यांतून कसें पार पडावे हा पेंच महाराजांस पडला. त्यांतून सुटण्याची युक्ति बाळाजी आवजी चिटणीस यांनी अशी सांगितली कीं काशीचा प्रसिद्ध शास्त्री गागाभट्ट हा हल्ली पैठणास आला आहे. त्याला ह्या प्रकरणी शास्त्रार्थ विचारा. ही त्याची सूचना पसंत वाटून महाराजांनी

चिटणीसाला पैठणास पाठवून गागाभट्टास मोठ्या इतमामाने रायगडावर आणिले. त्याच्याबरोबर पैठणचे इतर कांहीं पंडितहि आले हे पंडित आल्यावर महाराजांनी पुनः आपल्या राज्यांतील ब्राह्मण पंडितांची व आपल्या पदरच्या सरदार, कारभारी वगैरे शिष्ट जनांची सभा भरविली. गागाभट्टानें दक्षिणेतल्या पंडितजनांशी महाराजांच्या राज्याभिषेकविधीसंबंधाची भवतिनभवति करून निर्णय दिला तो असा: शिवाजीमहाराज शिसोदे राजवंशांत निर्माण झाले असून मूळचे क्षत्रिय आहेत. दक्षिणेत आल्यावर त्यांच्या पूर्वजांनी व्रतबंधादि संस्कारांस फाटा दिला असला तरी त्यांच्या क्षत्रियत्वाचा काहीं लोप होत नाहीं. शिवाजीमहाराज ज्या वंशांतले आहेत, त्या वंशातले राजे सांप्रत उदेपुरास असून त्यांना जर सशास्त्र राज्याभिषेक होत असतो, तर तो यांसच कां होऊ नये हे समजत नाहीं. आतां यांचें वय मोठे झाले आहे व अनेक विवाह होऊन यांस संततिहि झाली आहे, तेव्हां यांचा व्रतबंध व्हावा कसा? हा जो प्रश्न आहे त्याचें समाधान एवढेच आहे कीं ह्यी प्रसंगीं आपद्धर्माचा अवलंब करून व्रतबंध हा राज्याभिषेकविधीचें अगं आहे म्हणून समजावें व तो मुख्य विधीच्या अनुषंगानें बेलाशक करावा.'' हा गागाभट्टाचा निर्णय सर्वास मान्य होऊन महाराजांना राज्याभिषेक करावा असें सर्वानुमते ठरलें.

महाराजांस आपल्या इच्छेप्रमाणे शास्त्रनिर्णय मिळाल्यानें बहुत संतोष झाला, आणि गागाभट्टादि पंडितांनी सांगितल्याप्रमाणें राज्याभिषेकविधीस लागणाऱ्या सर्व साहित्याची जमवाजमव विलंब न लावितां केली; आणि राज्याभिषेकाची तिथि शके १५९६ (आनंदनाम संवत्सर) ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी मुक्रर केली. ह्या दिवशीं इंग्रजी तारीख ६ जून, सन १६७४ ही येते. हा विधि रायगड किल्ल्यावर करविला. ह्या समारंभास स्वराज्यातील एकंदर शिष्टजन, ब्राह्मण, सरदार व कामदार यांना आमंत्रणे दिली. सगळ्यांची उतरण्याची व भोजनाची सोय त्यांनीं उत्कृष्ट केली. हजारो ब्राह्मणांस दर दिवशीं भोजन घालून मुबलक दक्षिणा दिली. गागाभट्टांस व पैठणच्या ब्राह्मणांस तर त्यांनीं फारच मोठे पारितोषिक दिले. ह्या वेळी महाराजांनी आपल्यासाठी एक सुवर्णमय सिंहासन बनविले होते. ''महाराजांनी श्रीक्षत्रियकुलावतंस राजा शिवछत्रपती'' असा किताब धारण करून कागदोपत्री आपल्या राज्याभिषेकापासून नवा शक चालू केला; व स्वराज्यातील एकंदर लोकांस हा शक चालू करण्याची ताकीद दिली. हा नवा शक पुढें १०४ वर्षे चालू राहिला. सन १७७७ त पेशव्यांच्या हाती सगळी सत्ता

जाऊन दुसरा शाहू ह्या सालीं गादीवर बसला तेव्हां नाना फडनवीस व सखाराम बापू यांनी हा शक बंद केला!

ह्याप्रमाणे इतकी वर्षे अव्याहत परिश्रम करून संपादिलेलें स्वराज्य चिरायु करण्याचा व हिंदू पदपातशाहीचा खंबीर पाया घालण्याचा हा राजपदारोहणरूप उपाय योजन्यांत महाराजांनी मोठीच दीर्घदृष्टि दर्शविली यांत कांहीं शंका नाहीं. ह्यानंतर यवन बादशहांना वाटूं लागलें कीं हे आतां आपल्या बरोबरीचे राजे झाले; आणि रजपूत राजे, इंग्रज, फ्रेंच वगैरे परदेशस्थ लोक महाराजांस आतां विशेष मान देऊं लागले. राजपदारोहणाच्या दिवशी तर कुतुबशहा, फ्रेंच, डच व इंग्रज यांच्याकडून महाराजांना नजराणे आले होते.

राजपदारोहणानिमित्त राज्यांत सर्वत्र आनंदोत्सव चालला असता जिजाबाई मातुश्रीचे देहावसान झालें. ज्या परमपूज्य व अत्यंत प्रेमळ मातेच्या शिक्षणाने उपदेशानें व सतत प्रोत्साहनाने हा एवढा प्रचंड उद्योग महाराजांनी हातीं घेऊन असा यशोलाभास आणिला, व स्वपुत्र विजयी होऊन व राजपदारूढ होऊन नूतन शककर्ता झाल्यानें जिच्या आनंदास पारावार नाहीसा झाला होता, ती हा सुखसोहाळा पाहावयास फार दिवस जीवंत राहिली नाही. राज्याभिषेकसमारंभ आटोपल्यावर दहाबारा दिवस झाले नाहित तोच एकाएकीं कांहीं विकार होऊन तिचा त्यांत अंत झाला. ह्या ऐन आनंदभरात असा अकस्मात मातृवियोग झाल्यामुळे महाराजांस अतोनात दुःख झाले. त्यांस सर्व ऐश्वर्य शून्यवत् वाटूं लागलें. महाराजांच्या ठायीं मातृभक्ती किती निःसीम होती हें ह्या समयी नजरेस आलें. मातेची उत्तरक्रिया त्यांनीं लक्षावधि रुपये खर्चून यथासांग केली; व पर्जन्याचे चार महिने रायगडावर राहून त्यांनी मातृशोकांत घालविले.एवढ्या दिवसात त्यांनीं सिंहासनारोहण बिलकूल केले नाही.

मग आश्विन शुद्ध पंचमीच्या सुमुहूर्तावर त्यांनीं पुनरपि सिंहासनारोहणसभा केली. ह्यानंतर अष्टप्रधान व फौजफाटा बरोबर घेऊन ते रायगडावरून निघून प्रतापगडावर देवीच्या दर्शनास गेले, व तेथून ते रामदास स्वामींच्या दर्शनास गेले; आणि मग शिखरचा महादेव व जेजुरीचा खंडोबा यांचें दर्शन घेऊन ते परत रायगडावर आले. जिजाबाई ता. १९ जून सन १६७४ त दिवंगत झाली. तिची पांच लाख होन किंमतीची खासगी मत्ता होती, ती सगळी तिनें देहांतसमयी महाराजांच्या स्वाधीन केली.

***

भाग बाविसावा

# राज्यव्यवस्था

आपण स्थापिलेलें स्वराज्य सुघटित व चिरायु व्हावें म्हणून महाराजांनी जे उत्कृष्ट नियम व निर्बंध प्रसंगोपात्त करून ठेविले होते त्यांचें येथें थोडक्यांत दिग्दर्शन करून मग त्यांच्या शेष चरित्राचे कथन करणें इष्ट वाटतें.

आपल्या राज्यांतील निरनिराळ्या खात्यांची सुव्यवस्था लागावी म्हणून प्रत्येक खात्यास एक एक अधिकारी जबाबदार नेमून त्यास प्रधान ही संज्ञा त्यांनी दिली. असे एकंदर आठ प्रधान त्यांनीं नेमिले, त्यांची यादी येणेप्रमाणे:- (१) मुख्य प्रधान म्हणजे पेशवा. ह्याची पदवी राजाच्या खालोखाल असे. त्याची देखरेख मुलखी व लष्करी खात्यावर असे. राजाच्या गैरहजेरीत त्यांच्या जागी त्यानें व्यवस्था पाहावी असे असे. एकंदर खलित्यांवर व आज्ञापत्रांवर राजाच्या शिक्क्यामोर्तबाखालीं याचा मोर्तब असे.

(२) सेनापति म्हणजे सरनोबत. ह्याचा अमल अर्थात् सगळ्या लष्करावर असे. हे असे दोन सेनापति असंत. एक घोडदळावरचा व एक पायदळावरचा. परंतु पायदळावरच्या सेनापतीस प्रधानमंडळांत जागा नसे.

(३) पंत अमात्य म्हणजे मुजुमदार. याची देखरेख राज्याच्या एकंदर जमाखर्चावर असे.

(४) पंत व सचिव म्हणजे सुरनीस. याची देखरेख सरकारी दफ्तरावर असे. निरनिराळ्या खात्यातील दफ्तरें नीट ठेवतात कीं नाहींत हें तपासण्याचें काम याचे असे. याच्या शिक्क्यावांचून कोणताहि सरकारी कागद किंवा खलिता जात नसे.

(५) मंत्री म्हणजे वाकनीस. याच्याकडे खासगीकडील व्यवस्था असे, अठरा कारखाने, बारा महाल, हुजूरपागा व जिलबीचे पायदळ यांच्या बंदोबस्तावर याची देखरेख असे.

(६) सुमंत म्हणजे डबीर. याच्याकडे परमुलखाशी व अन्य राजाशी होणाऱ्या एकंदर व्यवहाराची देखरेख असे.

(७) न्यायाधिश किंवा पंडितराव. राजास प्रसंगोपात शास्त्रार्थ सांगावे जातीजातीचे बखेडे निवडावे, देवस्थाने व सत्पुरुष यांस दिलेल्या नेमणुकांची व्यवस्था पाहावी, सरकारांतून होणारे धर्मादाय व धर्मविधि यांवर देखरेख ठेवावी; कोणी धर्मबाह्य आचरण केलें किंवा कांहीं अत्याचार केला तर त्यास शासन करावे वगैरे कामे ह्या प्रधानाकडे होती.

(८) न्यायाधिश; हरएक फौजदारी व दिवाणी खटल्यासंबंधानें लोकांस योग्य न्याय मिळतो कीं कसे हे पाहण्याचे काम याच्यांकडे असें.

ह्या प्रधानांच्या कोणत्याहि खात्यासंबंधाचे एकादे बिकट प्रकरण उपस्थित झाले असता त्या खात्याच्या प्रधानाने त्याची सुनावणी महाराजांपाशी पहिल्याने करावी. व ज्या कामदाराचा त्याशी बिकट संबंध असे त्याला जरूर वाटल्यास हुजूर बोलवावे. ह्याप्रमाणे एकांती खलबत इष्ट वाटल्यास त्याचा ऊहापोह पुनः प्रधानमंडळात व्हावा. ज्या बाबींचा संबंध सगळ्या राज्याशी असे त्यांची वाटाघाट प्रधानमंडळात होऊन सर्वानुमते शहानिशा होत असे. ह्या प्रधानमंडळापैकी सेनापतीखेरीज करून इतर सारे ब्राह्मण असत; आणि पंडितराव व न्यायाधीश या दोघां प्रधानाखेरीज बाकीच्यांना लष्करी नोंकरीत निष्णांत असावें लागे. प्रसंग येई त्यांप्रमाणें त्यांना तलवार बांधून युद्धास जावे लागे. राजाकडून जाणाऱ्या कित्येक खलित्यावर, आज्ञापत्रांवर व तहनाम्यावर महाराज व मुख्य प्रधान यांचे शिक्के मोर्तब होऊन आणखी चार प्रधानांच्या सह्या व्हाव्या असें. असे हा मान सेनापति, पंडितराव व न्यायाधीश यांखेरीज बाकीच्यांना असे.

ह्या सर्व प्रधानांस एकएक मुतालीक असे. प्रधान स्वारीवर गेले म्हणजे त्यांच्या सगळ्या कामाची व्यवस्था ह्या मुतालिकांनीं प्रमुखपणें पाहावी असें असे. ह्या अशा प्रत्येक मुतालिकाच्या हाताखाली दुसरे सात कामदार असत. ते असे. (१) मुजूमदार, ह्याच्यापाशी जमाखर्चाचे काम असे; (२) फडणीस, हा मुजूमदाराचा दुय्यम असे; (३) सबनीस किंवा दफ्तरदार ह्याच्या ताब्यांत दफ्तर असे; (४) चिटणीस ह्याच्यापाशी सगळ्या पत्रव्यवहाराचें काम असे; (५) कारखानवीस, ह्याच्यापाशी कोठीची व्यवस्थ्या असे; (६) जामदार, ह्याच्याकडे नगदीखेरीजकरून एकंदर चीजवस्तीचा

संग्रह एकत्र करण्याचें काम असे; (७) पोतनीस. याच्या ताब्यात सर्व रोकड असे. खुद्द खाशांच्या तैनातीस एक चिटणीस, एक फडणीस, एक पारसनीस व एक पोतनीस एवढे कामदार असत.

आपल्या खासगत दौलतीची व्यवस्था नीट लागावी म्हणून महाराजांनी द्वादश कोश (बारा महाल) व अष्टादश शाला (अठरा कारखाने) स्थापिल्या व त्यांवर दरोगे, कारकून, हवालदार इत्यादिकांची नेमणूक केलेली असे.

आतां लष्कराची व्यवस्था कशी केली होती ते पाहूं. लष्कराचे पायदळ, घोडदळ व आरमार असे तीन प्रकार असत. पायदळांत घाटमाथ्यावरील मावळे व कोंकणातील हेटकरी असत. मावळे तरवारबहादर असत व हेटकरी बारगीर असत. यांत दहा माणसांचा एक दाहिजा असे, त्यांत नऊ पाईक व एक नाईक असे. पांच दाहिज्यांवर एक हवालदार असे; दोन हवालदारांवर एक जुमलेदार असे; दहा जुमलेदारांवर एक हजारी असे. याशिवाय कांहीं पांच हजारी सरदार असत. हे सगळे हजारी व पांच हजारी व सरदार सरनोबताच्या हुकमांत असत.

घोडदळांत दोन प्रकारचे लोक असत: एक बारगीर व दुसरे शिलेदार. बारगिरांच्या घोडदळास पागा अशी संज्ञा असे. पागेतील सगळी घोडी सरकारी असत. शिलेदारांच्या घोडदळातील घोडी प्रत्येक शिलेदाराने आपआपली आणावी असे असे. ह्याबद्दल त्यांस सरकारांतून जादा तैनात मिळत असे. पंचविस बारगीर किंवा शिलेदार यांजवर एक हवालदार असे. पाच हवालदारावर एक जुमलेंदार असे. पांच जुमलेदारांवर एक सुभेदार असे. दहा सुभेदारावर एक पांच हजारी असे. हे सगळे सरनोबतांच्या हुकमांत असत. घोडदळाचा सरनोबत अर्थात् निराळा असे.

प्रत्येक सुभेदाराच्या व हजारी सरदाराच्या हाताखाली एक ब्राह्मण सबनीस व एक प्रभु कारखाननीस किंवा ब्राह्मण मुजुमदार व प्रभु जाबनीस असे हुद्देदार असत. पांचहजारी सरदारांस आणखी एक दिवाण दिलेला असे.

आतां स्वराज्यांतील किल्ल्यांचा बंदोबस्त कसा ठेविला होता तो पाहू. प्रत्येक किल्ल्यावर एक मराठा हवालदार असे. त्याच्या हाताखाली एक सरनोबत व एक किंवा अनेक तटसरनोबत असत. हेहि मराठेच असत. ह्यांशिवाय आणखी एक सुभेदार, एक सबनीस, एक फडनीस व एक कारखाननीस असे हुद्देदार असत. ह्यापैकी पहिले तीन अंमलदार ब्राह्मण असत व शेवटला कायस्थप्रभु असे. किल्ल्यांवर लष्कर

ठेवावयाचे तें त्यांचें महत्त्व पाहून कमीजास्त ठेवीत. किल्ल्याच्या तटांखालीं माचीमाचीला मेठे असत, तीं राखण्यासाठीं मेठकरी असत. ते चौक्यांवर रात्रंदिवस राहून आसपास कोठें कांही शत्रूची हालचाल दिसल्यास तिची किल्ल्यावर वर्दी देत. किल्ल्यांच्या पायथ्याशी वाटांवर नाक्यानाक्यानी रामोशी, पटवारी, महार, मांग,बेरड वगैरे लोकांच्या चौक्या असत. किल्ल्याच्या व्यवस्थेचे नियम अगदी बारकाबाईने ठरविले होते. प्रत्येक किल्ला आसपासच्या तालुक्याच्या निसबतीला लावून दिला असून त्यांवर सामानासुमानाची भरती करण्याचे काम तालुकदाराने किंवा मामलेदारानें सुभेदाराच्या सल्ल्याने करावे असे असे. किल्ल्यांवरील लोकांपैकी कोणाची तगिरी, बहाली किंवा गयाळी करणे ती हुजूरच्या आज्ञापत्रानें करीत. एकएक किल्ला म्हणजे एकएक लहानसा स्वतंत्र राज्यविभाग मानीत. हे किल्ले आपल्या राज्याचे जीवप्राण असून त्यांच्या योगाने स्वराज्यसंरक्षण होणार आहे असें महाराजांना वाटे. महाराजांच्या तांब्यातील किल्ल्यांच्या याद्या निरनिराळ्या बखरकारांनी दिल्या आहेत, त्यांवरून पाहतां ते एकंदर २८० होते असे दिसते.

महाराजांच्या आरमाराच्या व्यवस्थेसंबंधाची कोठेंहि माहिती नाहीं. त्यांनी शेकडो लहान मोठी जहाजे बांधून त्यांवर लढाऊ सामानाची चांगली व्यवस्था केली होती. बारदेशापासून आलिबागेपर्यंतच्या पश्चिम किनाऱ्यावरील बहुतेक किल्ले व जंजिरे त्यांनीं हस्तगत केले असून कांहीं नवेहि बांधिले; व त्यांच्या आसपासचा सगळा मुलूख आपल्या सत्तेत आणिला. ह्या मुलखाच्या रक्षणासाठी त्यांना आरमार ठेवावें लागलें असून शिद्दी, फिरंगी, मोगल इंग्रज, डच वगैरे लोकाची आरमारें व जहाजे पश्चिम किनाऱ्यावर घिरठ्या घालीत त्यांना त्यांस शह द्यावा लागत असें. ह्या आरमाराला लागणारे खलाशी, तांडेल व लढवय्ये महाराजांना मुख्यत: भंडारी व कोळी ह्या लोकांतून मिळाले. प्रसिद्धं मायनाक भंडारी व दर्यासारंग याशिवाय आणखी किती तरी भंडारी सरदार ह्या आरमारावर होते. पण त्यांची नांवे व हुद्दे कोठेहि दिलेले आढळत नाहीत.

स्वराज्यांतील मुलखाचे महाल व प्रांत असे विभाग केले असत. लाख रुपये उत्पन्नाचे गांव एका महालांत मोडत. असे दोन किंवा तीन महाल मिळून एक प्रांत किंवा सुभा केलेला असे. प्रत्येक महालावर एक महालंकरी असे. यासच तरफदार किंवा तालूकदार म्हणत. हा अधिकारी जातीचा ब्राह्मण किंवा प्रभु असे. याशिवाय

आणखी प्रत्येक महालावर एक हवालदार असे. प्रत्येक प्रांतावर एक सुभेदार किंवा मामलतदार असे. दोनदोन, तीनतीन खेड्यांवर एकएक कमावीसदार असे. ह्या कमावीसदारानें सरकारी वसूल महालकऱ्याच्या संमतीने जमा करून त्यांचा हिशोब सुभेदाराच्या कचेरीस गुजरावा असें असे. सुभेदाराच्या हाताखाली एक मुजुमदार, एक चिटणीस, एक फडनीस व एक दफ्तरदार असे हुद्देदार असत. महालकऱ्यांनी कमावीसदारांच्या कामावर देखरेख ठेवावी, व सुभेदाराने महालकऱ्यांवर हुकमत चालवावी असें असे. कोणाच्या कांहीं तक्रारी असल्यास त्यांचा निकाल सुभेदाराने लावावा व फौजदारी खटले त्यानें निवडावे असे असे. दिवाणी खटले उपस्थित झाले असता सुभेदाराने त्यांचा निकाल गावपंचाकडून करवावा, व त्यांच्या निकालाबरहुकूम लोकांकडून वागणूक करावी असे असे.

स्वराज्यांतील एकंदर जमिनीची मोजणी करून ती लागवड करणाऱ्यांच्या नावे लावून तिची नोंद महालकऱ्यांच्या दफ्तरीं असे. प्रत्येक बिग्यास किती पीक व्हावे याचा अंदाज उभ्या पिकाची पाहणी करून ठरवित. ह्या उत्पन्नाच्या पांच तक्षिमा करून तीन तक्षिमा जमिनीची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यानें भोगाव्या व दोन तक्षिमा सरकारात द्यावा असा करार असे. ह्या सरकार देण्याबद्दल रयतेकडून प्रतिवर्षी कबुलायती घेत. अवर्षणादि संकटसमयी शेतकऱ्यास सढळ हाताने तगाई देत. ही तगाईची रक्कम त्यांनीं चार पांच वर्षांच्या हप्त्यांनीं फेडावी असे असे. लागवडीस न आलेल्या जमिनी नव्या शेतकऱ्यांस द्यावयाच्या झाल्या म्हणजे त्यांच्यापाशी गुरेढोरे नसल्यास तीं त्यांना सरकारांतून पुरवावी, बिजासाठी दाणा द्यावा, व पीक होईपर्यंत त्यांच्या निर्वाहासाठी दाणा व पैका द्यावा; आणि दोनचार वर्षानी हा ऐवज उगवून घ्यावा अशी व्यवस्था केली होती. उत्पन्नाचा अजमास बरोबर पाहून रयतेवर कर बसवावा, जुलूम असा कोणावरहि करू नये अशी अधिकाऱ्यांस सक्त ताकीद असे.

ह्या जमीनमहसुलाच्या बंदोबस्तांत महाराजांनी रयतेच्या हिताची अशी एक मोठी सुधारणा केली, ती अशी: यवनी अमलांत महालोमहाली व गांवगन्ना देशमुख, देशपांडे, देसाई, पाटील, कुळकर्णी, खोत, मिरासदार, जमीदार वगैरे असत. त्यांच्या ताब्यांत महाल व गांव असून त्यांनीं रयतकेडून जमिनींचा धारा वसूल करावा असें असे. त्यामुळें असें होई की सर्व रयत ह्या मिरासदारांच्या ताब्यांत सर्वस्वी असे. त्यांना वाटे तसा ते रयतेकडून वसूल चोपून घेत. आपला तळिराम गार करण्यासाठीं ते रयतेस

नाहक त्रास देत व सरकारासहि बेसुमार फसवीत. ही अव्यवस्था महाराजांनी अजीबात मोडून टाकली. रयतेकडून वसुलाची कामाविशी करण्यासाठी आपले वेतनी कामगार त्यांनी सर्वत्र नेमिले. ह्या पुरातन मिरासदारांचे नुकसान होऊं नये म्हणून त्यांस सरकारी कामगारांकडून प्रतिवर्षी कांहीं ठरीव टक्के मिळावे, त्यांनी या बाबतींत रयतेस बिलकूल त्रास देऊं नये असें ठरविले; शिवाय अशा देशमुखांना वगैरे आपल्या पदरी लष्करी वगैरे नोकऱ्या देऊन राजी ठेविले.

महाराजांना तीन यवन पातशाहतींशी सर्वदा संग्राम करावा लागत असल्यामुळे आपली फौज एकसारखी वाढवीत राहणें भाग पडले. ह्या वाढत्या फौजेचा खर्च नुसत्या जमीन महसुलावर भागविणे दुरापास्त होते. म्हणून यवनांच्या अमलात चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करावयासाठी तिकडचीं सधन शहरे लुटण्यासाठी आपलें घोडदळ वर्षाचे आठ महिने त्यांना मुलूखगिरीवर पाठवावे लागत असे ह्या अशा मुलूखगिरीसबंधाचेहि त्यांनीं नियम ठरविले होते ते असेः स्वारीत जातांना प्रत्येक शिपायाच्या बिशादीची तपशीलवार यादी करून तिची किंमत तीत नमूद करीत. ती आशाकरिता कीं स्वारीहून परत आल्यावर त्याच्यापाशी असलेल्या सामानाचा झाडा घेऊन तें ह्या यादीशी ताडून पाहत. त्याच्याजवळ कांहीं अधिक माल आढळल्यास तो त्यानें कोठून आणिला तें त्यास विचारीत. तो लुटीचा आहे असें ठरल्यास जप्त करीत, किंवा तेवढ्या मालाची किंमत ठरवून ती त्याच्या पगारांतून वसूल करून घेत. परंतु त्याच्या बिशादीपैकीं एकादादुसरा जिन्नस गहाळ झाला असल्यास त्याची भरपाई सरकारांतून होत असे. सरकारी कामगिरीत अपरिहार्य कारणामुळें एकाद्या शिलेदाराचा घोडा मेला किंवा निरुपयोगी झाला असतां त्याची जेवढी किमत यादींत नमूद केली असे तेवढी त्याला तत्काळ देत. स्वारीस जाणाऱ्या कोणीहि इसमानें आपली बायको, बटीक किंवा कलावंतीण बरोबर नेऊं नये असा निर्बंध असे. त्याप्रमाणेंच स्वारीबरोबर कलाल नसावे अशी सक्त ताकीद असे. मुलूखगिरीत ब्राह्मणवस्तीस व देवस्थानांस उपद्रव देऊं नये; गाई लुटीत पकडू नयेत. ओझी वाहण्यासाठी बैल हवे असतील तर पकडावे; शेतकऱ्यास व स्त्रियांस कदापि लुटू नये; श्रीमंत मुसलमानांस व त्याच्या पदरच्या श्रीमंत हिंदूंस खंड देण्याचें सामर्थ्य आहे असें पाहून त्यांसच फक्त पकडावे, व ठरलेला खंड त्यांच्याकडून मिळताच त्यांस सोडून द्यावें; इतर प्रजेस सहसा त्रास देऊ नये; अशा पकडापकडींत मुले व बायका यांस कदापि हात लावू नये; असे त्यांनी निर्बंध केले होते. हे निर्बंध कोणीं मोडल्यास त्याला मोठे शासन होत असे.

सरकारी लुटीची यादी तयार झाल्यावर सरनोबत ती सगळी लूट घेऊन राजदर्शनास जाई व सगळा हिशोब समजून सांगून लूट सरकारपोत्यास जमा करी. कोणा शिपायास किंवा अमलदारास ह्या लुटीतील एकादा जिन्नस हवा असल्यास त्याची किंमत त्याच्या वेतनात बाद करून तो त्यास देत. ज्यांनीं मोहिमेत चांगल्या कामगिऱ्या केल्या असतील त्यांची हुजुरास शिफारस करून त्यांस इनामें किंवा बढत्या हा सरनोबत देववी. लढाईत पडलेल्या शिपायांच्या बायकामुलांस सरकारांतून नेमणूका मिळत. जे कोणी जबर जखमा लागून नोकरीस नालायक ठरत त्यांना सरकारांतून तहहयात वेतन मिळत असे. जे कोणी स्वारीच्या कामांत जखमा लागून किंवा दुसऱ्या कारणाने आजारी होत त्यांच्या औषधपाण्यास वगैरे पैसा सरकारांतून मिळे. कोणास कशा जखमा झाल्या त्याची पाहणी होऊन त्या मानानें त्यांच्या नुकसानीच्या भरपाईदाखल त्यांना बढत्या किंवा मानाच्या पदव्या देत. ह्याप्रमाणें लष्करांतल्या प्रत्येक नोकरास राजी राखण्याची खबरदारी महाराज घेत असत. त्यामुळे त्यांच्या सैन्यांत फितुरी किंवा नाराजी अशी बिलकूल होत नसे. जो तो बहादुरी करून महाराजांकडून शाबासकी व बढती मिळविण्यास मोठ्या उत्साहानें झटे. ह्या बाबतींत लष्करातील लोकांची जशी काय परस्परांशी स्पर्धा लागून राहिलेली असे.

लहानमोठ्या हुद्याच्या सगळ्या माणसांचे पगार रोख वेळेच्या वेळी देण्याची व्यवस्था असे. लष्करी किंवा मुलखी खात्यांतील कोणाही कामदारास त्याची तैनाती दाखल एकाद्यादुसऱ्या गावाचे उत्पन्न लावून देत नसत. अशा देण्याला मोकासा म्हणत. असे मोकासे लावून देण्याची चाल यवनी अमलांत चोहोकडे होती. ती महाराजांनी साफ बंद केली. त्याप्रमाणेच जहागिरी देण्याची पद्धत त्यांनीं अगदीं मोडून टाकली. अशा जहागिरी यवनीअमलात देण्याची वहिवाट असे. कोणी मोठी कामगिरी किंवा पराक्रम केल्याबद्दल मिळालेल्या जहागिरी वंशपरंपरा चालत. त्यामुळे अनेक प्रकारी नुकसान व त्रास होत असे, तो त्यांनीं नाहीसा केला. खालसा केलेल्या मुलखांत जे कोणी जहागीरदार आढळत त्यांच्या जहागिरी त्यांजकडे पूर्वीप्रमाणे मालकी हक्कानें ठेवीत नसत. त्यांस त्यांच्या जहागिरीतल्या गांवांच्या उत्पन्नाचा अमुक इतका अंश मिळावा असें ठरवीत. अशा जहागीरदारांपैकी जे कोणी हुशार व कर्तबगार असत त्यांस महाराज आपल्या पदरीं नोकऱ्या देत. ह्याप्रमाणें महाराजांनी पाटील, कुळकर्णी, खोत, देशमुख, देशपांडे, देसाई, जमीदार, मोकासदार, मिरासदार, जहागीरदार वगैरे लोकांच्या तावडीतून रयतेस सोडविले.

आणखी एका महत्वाच्या गोष्टीसंबंधानें महाराजांनीं उत्तम शिस्त घालून ठेविली होती, ती अशीः कोणताहि सरकारी हुद्दा कोणाच्याहि कुळांत वंशपरंपरा चालू ठेवू नये असा त्यांचा नियम असे. बाप कितीहि हुशार व कर्तबगार असला तरी त्याच्या कामगिरीबद्दल त्याच्या पश्चात त्याच्या मुलास मोबदला द्यावयाचा झाल्यास त्याची वास्तविक योग्यता किती आहे तें पाहून द्यावा; केवळ बडे बापका बेटा असे समजून त्याच्या बापाचा हुद्दा त्यास अंगी कर्तबगारी नसल्यास सांगू नये, अथवा दुसरा कोणताहि मोठा हुद्दा त्याच्या अंगी तो वहिवाटावयास लागणारी अक्कल व हुशारी नसल्यास त्याला देऊं नये असा त्यांचा नियम असे. यामुळे ज्याच्या त्याच्या अंगच्या वास्तविक गुणांची बूज होऊन सरकारी कामे हुशारीने व योग्य प्रकारें बजावण्यांत येत असत.

आतां आधिकारी आपआपली कामें लावून दिलेल्या शिस्तीप्रमाणे इमानाने करितात किंवा कसें याची देखरेख प्रधानमंडळ व खुद्द महाराज फुरसतीप्रमाणे ठेवीत असत. परंतु हें काम प्रमुख अधिकाऱ्यांना नेहमी साधण्यासारखें नसल्याकारणांने त्यांनीं राज्यांत चोहींकडे हेर ठेविले असत. मुलूखगिरीवर पाठविलेले अमलदार केलेल्या लुटीचा व मिळविलेल्या खंडाचा हिशोब बरोबर देतात किंवा कांहीं अफरातफर करितात कीं काय, प्रत्येक किल्ल्यावरील अमलदार आपली कामे शिस्तवार करितात किंवा नाहीं; महालकरी, सुभेदार वगैरे मुलखी खात्यांतील अधिकारी रयतेस त्रास देतात किंवा काय, वसूल केलेल्या उत्पन्नाचा ऐवज सरकारपोत्यांत इमानाने जमा करितात किंवा नाहीं; परमुलखांतील शत्रूंची हालचाल कशी काय आहे, यवनी दरबारांत कोणकोणत्या मसलती चालल्या आहेत. इत्यादि गोष्टी पाहून त्यासंबंधाची माहिती हे हेर महाराजांस जेव्हाची तेव्हा कळवीत असत. ही हेरांची पत्रे महाराज एकांती वाचून पाहत. स्वराज्यातील एकाद्या अमलतदारानें कांही बेकैद वर्तन केल्याचे ह्या बातमीदारांकडून कळल्यास त्याची बारीक चौकशी करून तो खरोखरीच गुन्हेगार ठरल्यास त्याला लागलीच शिक्षा होत असे. यामुळे सर्वांवर सारखी जरब राहून जो तो आपआपल्या कामांत सर्वदा दक्ष राही.

महाराजांनीं स्वतंत्र न्यायखातें नेमिले नव्हतें. जमिनीसंबंधाचे किंवा इतर देवघेवीसंबंधाचे खटले उपस्थित झाले असतां त्यांचा निकाल गांवपंचांनी काहीएक मोबदला न घेता करावा असें असे. ह्या अशा ग्रामपंचायतीची पद्धत त्यांच्या राज्यात

चोहोकडे होती. यामुळे रयतेला आपल्या खटल्याच्या निकालासाठी लांब कोठे जावें लागत नसे, व वस्तुस्थिती प्रत्यक्ष डोळ्यांनीं,पाहणाऱ्या पंचांकडून ते होत असल्यामुळें अन्याय असा फारसा होत नसे. पंचांचे निकाल महालकरी व सुभेदार कायम करून त्यांबरहुकूम अमलबजावणी करीत असत. पंचांचा एकादा निकाल पक्षकारास पसंत न वाटल्यास त्यासंबंधाचा अर्ज त्यांनी हुजुरास करावा व त्या खटल्याची चौकशी न्यायाधिशाने करावी असे असे. फौजदारी खटल्यांची चौकशी महालकरी व सुभेदार करीत. ह्या अधिकाऱ्यांचा एकादा निकाल बरोबर न वाटला तर हुजुरास अर्ज करावा, व पंडितरावाने त्याची फेरतपासणी करावी असा नियम असे. लष्करांतील लोकांच्या फौजदारी खटल्यांची चौकशी लष्करी अंमलदारांनी करावी व त्यांचे निकाल नापसंत वाटल्यास त्यासंबंधाचे अर्ज सरनोबताकडे करावे असे असे.

स्वराज्यांत चोरभय फार असे. तें महाराजांनी अगदीं नाहीसं केले. चोर व बेरड पकडून आणून कित्येकांचा शिरच्छेद करीत, व कित्येकांना शेते लागवडीस देत किंवा किल्ल्यावर व किल्ल्याखालीं कामगिऱ्या सांगत. ज्या गावांत चोरवडा फार असे, तेथें एकादा बेरड रखवालीस ठेवून देत. स्वतः त्यानेंच चोरी केल्यास त्याचा शिरच्छेद करीत; आणि दुसऱ्या कोणी चोरी केल्यास तिचा पत्ता त्याने लावून द्यावा किंवा तिची भरपाई करून द्यावी असें असे.

स्वराज्यांतील देवस्थानांस योग्य नेमणुका वगैरे करून देऊन त्यांवर महाराजांना पारिपत्यगार नेमून दिले; व देवस्थानांच्या खर्चावर चांगली देखरेख होईसे केलें. मोठमोठ्या क्षेत्रांतील सत्पात्र ब्राह्मणांचा व साधुसंताचा योगक्षेम चालावा अशी त्यांनी तरतूद केली. महाराज केवळ आपल्या धर्माच्या देवस्थानासच नेमणुका करून देत असत असें नाहीं, तर स्वराज्यांतील मुसलमानांच्या कबरी, मशिदी, पीर वगैरे असत त्यांस यवनी अमलाच्या वेळीं लावून दिलेल्या नेमणुका ते पुढें चालवीत, त्या कदापि खालसा करीत नसत. इतकेंच नव्हे तर कित्येकास पुरेशा नेमणुका नसल्यास त्या भरपूर करून देत असत. ह्यावरून यवनांच्या धर्मस्थानासंबंधानें महाराजांच्या मनांत तिरस्कार किंवा द्वेष बिलकूल वसत नसे हें सिद्ध होते. त्यांनीं किंवा त्यांच्या सरदारांनीं इतक्या स्वाऱ्या व लढाया केल्या पण कोणत्याहि प्रसंगीं यवनांच्या किंवा दुसऱ्या कोणाच्या पवित्र स्थानांस त्यांनीं यत्किंचिंतहि उपद्रव दिला नाही.

वेदशास्त्रांच्या अध्ययनास उत्तेजन यावें म्हणून महाराजांनी अशी व्यवस्था केली होती की पढलेल्या ब्राह्मणांनीं प्रतिवर्षी श्रावणमासांत हुजुरास यावें; व त्यांची परीक्षा पंडितरावानें घ्यावी. ज्यानें जितक्या ग्रंथांचे अध्ययन केलें असेल त्याला तितकें मण धान्य देत. कोणी मोठे पंडित, वैदिक, ज्योतिषी वगैरे आले असतां त्यांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें पन्नास पन्नास, शंभर शंभर रुपये दक्षिणा देत. ब्राह्मण परमुलखातला असल्यास त्याची संभावना द्रव्य देऊन करीत, आणि स्वराज्यांतला असल्यास त्याला धान्य देण्याविषयी, ज्या गावचा तो असे त्या गावच्या अधिकाऱ्यावर वरात देत.

स्वराज्यांत जागोजाग अन्नसत्रे घालून गोरगरिबांच्या निर्वाहाची सोय त्यांनीं केली, आणि मोठमोठ्या देवस्थानांत वेळोवेळा ब्राह्मण भोजने घालण्याची व्यवस्था केली.

महाराजांनीं मानदेश, भीमथडी वगैरे ठिकाणीं गाईची खिल्लारे ठेविली होती. लष्करास वगैरे बैल ह्या खिल्लारांत पैदा होत असत. त्याप्रमाणेंच कोणा शेतकऱ्यास सरकारांतून बैल देण्याचे ठरल्यास ते ह्या खिल्लाऱ्यातून देत असत. गाईंच्या खिल्लारांप्रमाणे महिषींची खिल्लारे व शेळ्यामेंढरांचे कळप त्यांनी जागोजाग ठेविले होते. ह्या सगळ्यांची मोजदाद प्रतिवर्षी होत असे. अमक्याकडून अमूक इतकें लोणी किंवा तूप यावें, ब्राह्मण भोजनास वगैरे लागणारें दुध अमुक इतकें यावें, अमक्यांनीं अमूक इतकी मेंढरें दसऱ्याच्या वगैरे सणांसाठी सरकारांत पाठवावी असें ठरविलेले असे.

***

भाग तेविसावा

# मोगल व विजापूरकर यांजशीं पुनः कलह (सन १६७४–१६७६)

महाराजांनी आपणांस मोठ्या थाटाने राज्याभिषेक करून घेऊन दक्षिणेत हिंदूपदपादशाहीची पुनः स्थापना केल्याचें वर्तमान ऐकून औरंगजेबास फार वाईट वाटले. आणि आपला दक्षिणेतील सुभेदार खानजहान त्यांना वश असल्याचा त्याला वहीम आला. एवढे दिवस स्वस्थ बसून राहिल्याबद्दल त्याने खानास टपका दिला. हा खान पेडगाव येथें आपली छावणी करून मजा मारित पडला होता. राज्याभिषेक आटोपल्यावर महाराजांनीं त्याची छावणी लुटण्याचा घाट घालून दोन हजार घोडदळ मोगलांचे प्रांत लुटण्यास रवाना केले. त्यास हाकून देण्याकरिता खान घोडदळ घेऊन त्याच्या पाठीस लागला. तो असा पेडगांवातून बाहेर पडतांच महाराजांनी त्यांच्या छावणीवर अकस्मात हल्ला करून तेथल्या मोगल सैन्यास उधळून लावले व छावणी यथेष्ट लुटली. ह्या लुटीत त्यांना एक कोटि रुपये व इतर बरीच चीजवस्तू सापडली. बादशहास नजर करण्याकरितां खानाने दोनशे उत्तम घोडे घेऊन ठेविले होते ते त्यांच्या हातीं लागले. इकडे दिलेरखान गुजराथेंत होता, त्यानें महाराजांच्या मुलखावर स्वारी केली. तेव्हा हंबीरराव सेनापतीने भडोच, सुरत वगैरे प्रांतांत शिरून लुटालूट मांडली. हे ऐकून दिलेरखान सैन्य घेऊन तिकडे गेला. दिलेरखानास अटकाव करण्याकरितां महाराजांनी मोरोपंतास पाठविलें. त्याने मोगलांच्या ताब्यांतली ठाणी सर करण्याचा सपाटा चालविला. दिलेरखान परत गेल्यावर मोरोपंताने कल्याणास आपल्या पायदळाचा तळ देऊन वसईच्या फिरंग्यांवर चौथाई बसविली. ह्या वेळीं फिरंग्यांनी पुष्कळ हिंदू कुटुंबांवर ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याविषयी जुलूम केल्याबद्दल महाराजांस राग येऊन त्यांच्यावर हा चौथाईचा हक्क त्यांनीं लादला.

इकडे जुन्नर येथे मोगलांची चाळीस हजार फौज जमली असून तो महाराजांच्या मुलखांत शिरण्याच्या तयारीत आहे असे कळल्यावरून त्यांनी आपल्या पंचवीस हजार फौजेनिशी त्या फौजेवर अकस्मात हल्ला केला. उभय पक्षांकडचे लोक मोठ्या आवेशाने लढले. शेवटी मोगलांचा पराभव होऊन ते सैरावैरा पळत सुटले. महाराजांच्या लोकांनी त्यांचा शेवटपर्यंत पिच्छा पुरवून त्यांची पुरी खराबी केली. ह्या लढाईत मोगलांच्या पुष्कळ सैन्याचा नाश झाला. मग जुन्नरचा किल्ला घेण्याचा प्रयत्न महाराजांनी केला, पण तो या वेळीं यशस्वी झाला नाहीं.

महाराज जुन्नराहून रायगडावर परत आले तो त्यांना असे कळले कीं फोंड्याचा किल्लेदार महमदखान हा केलेला तह मोडून महाराजांच्या तिकडील मुलखास उपद्रव करू लागला आहे. म्हणून त्याच्यावर मोठ्या फौजेनिशी महाराजांनी स्वत: स्वारी करून त्या किल्ल्यास वेढा दिला. हा किल्ला फार मजबूत असल्यामुळे त्याला बरेच महिने वेढा देऊन राहावें लागलें. शेवटीं तो सर करून त्यावरील एकूणएक शिपाई कापून काढला आणि महमदखानास कैद केले. मग तिकडील बराच अदिलशाही मुलूख काबीज करून अंकोला, शिवेश्वर व काद्रा ही शहरे घेतली. ह्या वेळीं दक्षिणेस गंगावती नदीपर्यंतच्या सगळ्या मुलखावर त्यांचा ताबा बसला. तिकडे त्यांनीं भीमगड व पारगड असे आणखी नवे किल्ले बांधून आपल्या ताब्यांत आलेल्या मुलखास बळकटी आणिलीं.

फोंड्याचा किल्ला सर करण्याच्या बिकट कामगिरीत इब्राहीम नांवाच्या एका शूर मुसलमान सरदाराने चांगली बहादुरी केल्यावरून महाराजांनी त्याला त्या किल्ल्याचा हवालदार केले. मुसलमानाच्या हवाली किल्ला असा हाच एक होता. प्रत्येक किल्ल्यावर मराठा हवालदार नेमावा असा महाराजांचा परिपाठ असे तो ह्या खेपेस त्यांनीं मोंडला.

नंतर सुंदा प्रांतात शिरून तिकडील पुष्कळ किल्ले त्यांनीं काबीज केले. कारवारचा किल्लाहि त्यांनीं या वेळीं हस्तगत केला. ह्याप्रमाणें महाराजांनी सगळे दक्षिण कोकण व कानाडाप्रांताचा उत्तर भाग यांवर आपला अमल बसविला. ह्या वेळीं बेदनूर प्रांतावर एक स्त्री आपल्या लहान मुलाच्या वतीने स्वतंत्र राज्य करीत होती. म्हणून त्या प्रांताला महाराजांनी मुळी उपद्रव दिला नाहीं. ह्या राणीने महाराजांस पुष्कळ नजरनजराणा पाठवून अशी विनंति केली कीं, ''माझे कांहीं कारभारी व नातलग मजवर उठले आहेत. त्यांचे पारिपत्य करण्यासाठीं मला आपण मदत करावी.'' ह्या तिच्या विनंतीस

महाराजांनी मोठ्या संतोषानें मान देऊन तिच्या मदतीस आपले कांहीं लोक पाठविले व तिचे संकट निवारण केले. ह्या राणीनें त्यांना कांहीं खंडणी देण्याचे कबूल करून त्यांचा एक वकील आपल्या दरबारीं ठेवून घेतला.

महाराज फोंडे किल्ल्यास वेढा घालून तिकडे गुंतल्याचे ऐकून फलटणचे निंबाळकर व मलवडीचे घाटगे जे अजून विजापूरकरांचे जहागीरदार होते त्यांनी एकवट होऊन महाराजांच्या ताब्यातला पन्हाळा व तातोरा ह्या किल्ल्याच्या दरम्यानचा सगळा प्रांत काबीज करून विजापूरसरकारास दिला. परंतु सदरील मोहिमेवरून यशस्वी होऊन परत आल्यावर महाराजांनीं तो सगळा प्रांत पुनः काबीज केला; आणि तो असा सहज शत्रूच्या हातीं जाऊं नये म्हणून तातोरा व पन्हाळा यांच्या दरम्यान नवीन लहान लहान किल्ल्यांची रांग उभारून दिली. ह्या किल्ल्यांची नांवे वर्धनगड, भूषणगड व सदाशिंवगड अशी ठेविली.

फोंड्यावर स्वारीस जातांना आपल्या पश्चात मोगलानी आपल्या मुलखावर चढाई करूं नये म्हणून त्यांनीं बहादूरखानाशी तह केला होता. परंतु तिकडील मोहिमेत फत्ते मिळवून ते परत आले तेव्हां त्या तहाप्रमाणें वागण्यास ते कबूल झाले नाहीत; आणि त्यांचा सेनापति हंबीरराव याने मोगलांच्या गुजराथ प्रांतांत स्वाऱ्या करून लुटालूट करण्याचा धुमधडाका चालविला. दिलेरखानाने त्याला अटकाव करण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्या हातून सुटून जाऊन त्या महाप्रतापि सेनापतीने सगळी लूट रायगडावर पावती केली; आणि दिलेरखान चुरमुरे खात माघारी गेला. बहादूरखानाला महाराजांनी केलेला तह मोडल्याचा राग आला, आणि त्यानें विजापूरकरांचा वजीर खवासखान याशी संगनमत करून महाराजांवर स्वारी करण्याचा बेत केला. परंतु यां वेळी विजापूरदरबारांत उलटापालटी होऊन खवासखानाच्या हातचा कारभार गेला. म्हणून मोगलसरदाराचा हा बेत रहित झाला. कारण त्याला एकट्याला महाराजांवर स्वारी करण्याचे सामर्थ्य नव्हतें.

पुढें मोगलांचे व विजापूरकराचें कांहीं कारणामुळे युद्ध जुंपले. तेव्हां महाराजांनी मोगलास सामील होऊं नये व आपल्या मुलखावरहि स्वारी करूं नये म्हणून विजापूरदरबाराने त्यांच्याशी पुनः तह केला. त्याची कलमें अशी (१) विजापूरसरकारानें महाराजांस तीन लाख रुपये पेशखुष म्हणून द्यावे, व त्या सरकाराचा मोगलांच्या उपसर्गापासून बचाव करण्यासाठीं त्यांना प्रतिवर्षी एक लाख होन द्यावे; (२) कृष्णा

नदीपासून पश्चिमेकडील सगळा मुलूख महाराजांच्या ताब्यांत गेला आहे तो त्यांच्याकडे कायम राहावा; तसेंच कोल्हापूर प्रांतहि त्यांच्याच ताब्यांत राहावा. हा तह फार दिवस टिकला नाही.

ह्या सुमारास मोगलांचा सरदार खानजहान याने शिद्दीशी संगनमत करून महाराजांच्या ताब्यांतला कोंकणप्रांत काबीज करण्याचा घाट घातला, व तो मोठे सैन्य घेऊन घाटाखालीं यावयास निघाला.पण महाराजांनी दहा हजार होन देऊन त्याची मूठ दाबली. एवढे आमिष मिळाल्यावर त्यानें आपला बेत सोडून दिला. शिद्दी मात्र आपलें आरमार सज्ज करून महाराजांच्या मुलखास एकसारखा उपद्रव देत राहिला. त्यानें वेंगुर्ल्यास उतरून तेथल्या लोकांना लुटले. महाराजांनी आपलें आरमार त्याच्या पाठीवर सोडले. पण त्यानें त्याला दाद दिली नाहीं. महाराजांच्या आरमाराने जंजिऱ्यास वेढा दिला. तेव्हा शिद्दी त्याच्या रक्षणासाठी आपले आरमार घेऊन आला. उभय आरमारांची मोठी लढाई झाली. तीत महाराजांच्या आरमाराला हार खावी लागली. मोगलांच्या व फिरंग्यांच्या सरहद्दीवरील प्रांतांतून आपल्या कल्याण, कुर्ला वगैरे प्रांतांना उपसर्ग होऊं नये म्हणून महाराजांनीं साष्टींतील फिरंग्यांच्या सिबोन नांवाच्या एका किल्ल्यासमोर एक नवा किल्ला बांधून त्यावर आपले लोक ठेवून दिले. ह्या वेळीं मोरोपंताने दहा हजार लोकांनिशीं कल्याणाकडे जाऊन रामनगरच्या कोळी राजाला हाकून देऊन तेथें आपला अमल बसविला; आणि सुरतेपासून तीन दिवसांच्या वाटेवरील कांहीं गांव काबीज करून तेथें आपली ठाणी बसविली. त्याचप्रमाणें त्यानें पारनेरचा किल्ला त्या वेळीं अगदीं मोडकळीस आला होता तो काबीज करून त्याची चांगली दुरुस्ती केली आणि त्यावर आपले लोक ठेविले. ह्या किल्ल्यावर ठाणे केल्यामुळें दमनच्या फिरंग्यांस चांगला वचक बसला व सुरतेकडील मोगलांच्या हालचालीवर नजर ठेवता आली.

ह्यानंतर महाराजांची प्रकृति बेआराम होऊन ते सातआठ महिने साताऱ्यास अडकून पडले. महाराजांच्या तीसबत्तीस वर्षांच्या एकंदर आयुष्यक्रमांत त्यांची ही पहिल्यानेच प्रकृति बिघडली. ते असे आजारी पडले असतां जिकडेतिकडे अशी अफवा उठली कीं शिवाजीमहाराज आजारी पडले असतां त्यांचा पुत्र संभाजी याने त्यांना विषप्रयोग केल्यामुळें ते मृत्यु पावले. परंतु ही वदंता कोणांत फारशी खरी वाटली नाहीं. इतके महिने ते साताऱ्यास पडून राहिल्याचा सर्वास मोठा चमत्कार

वाटला. खरें पाहत इतकीं वर्षे सतत परिश्रम करून अनेक जिवावरचे प्रसंग टाळून स्वराज्यसिद्धि केल्यावर त्याना विश्रांती अवश्य हवी होती. परंतु त्यांच्यावर प्रबळ शत्रूंचा एकसारखा रोख असल्यामुळें त्यांच्याशी टक्कर द्यावयास सर्वदा उद्युक्त राहिल्यावाचून छातीच नव्हती. प्रकृति अतिश्रमामुळे फारच नादुरूस्त झाली म्हणूनच केवळ ते एवढे पडून राहिले. तरी ह्या आजारीपणांतहि त्यांनीं कर्नाटकावर मोहीम करण्याची योजना करून प्रकृति नीट होतांच ते तिकडे मोठ्या सैन्यानिशी गेले. ह्या मोठ्या व दूरच्या मोहिमेचे वर्णन पुढल्या भागांत करूं.

***

भाग चोविसावा

# कर्नाटकांतील मोहीम (सन १६७६–१६७८)

कर्नाटकातील शहाजीराजांची सगळी जहागीर व्यंकोजीराजे यांच्या स्वाधीन होती. हे व्यंकोजी आपल्या जहागिरीची व्यवस्था नीट ठेवत नाहीत, व हलक्या लोकांच्या नादाला लागून ती ते घालवितील अशी भीती आहे अशा कागाळीचे पत्र त्यांचे कारभारी रघुनाथ नारायण हणमंते यांनी शिवाजीमहाराज साताऱ्यास आजारी पडून असतां त्यांना पाठविले. ते वाचून महाराजांनी व्यंकोजीराजांस लागलीच एक बोधपर पत्र लिहिले त्यांतील आशय असा: ''तुम्ही क्षुद्र लोकांच्या मसलतीप्रमाणे वागता असे ऐकतो. रिकाम्या, खुशालचंद लोकांस वाटेल तितके द्रव्य चारून त्यांची मिजास वाढविता; वडिलांनीं जीं थोर, विश्वासू व योग्य माणसें जोडिली त्यांचा अनादर करून मनास वाटेल तसें वागतां हे कांहीं ठीक नव्हे. तरी इतःपर आपलें वर्तन सुधारून रघुनाथपंतासारख्या थोर, अनुभवी व विश्वासू कारभाऱ्यांच्या मसलतीने वागून स्वहित साधाल व स्वसत्तावृद्धि कराल अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे.'' ह्या पत्राने व्यंकोजीराजे शुद्धीवर आले नाहींत, व त्यांनी आपला पूर्वक्रम सोडला नाहीं. त्यांच्या जवळ असणाऱ्या नीच मनुष्यांनीं त्यांच्या बुद्धीस पक्का भ्रंश केला असल्यामुळें त्यांना आपले वास्तविक हित कशात आहे ते समजेना. रघुनाथपंताने त्यांच्या वडील बंधूकडे त्यांच्याविरूद्ध ही अशी कागाळी केल्यामुळें ते त्याचा पूर्वीहून अधिकच उपमर्द करूं लागले. तो त्या इमानी सेवकास असह्य होऊन तेथून बरेपणी निघून शिवाजीमहाराजांकडे येण्याचा निर्धार त्यानें केला. आणि आपल्या कुटुंबास तिकडेच ठेवून तो महाराष्ट्रांत यावयास निघाला. वाटेत त्याने तिकडील कित्येक संस्थानिकांशीं राजकारण करून व इतरांची माहिती मिळवून भागानगरच्या कुतुबशहाचे वजीर मादण्णा व आकण्णा यांची भेट घेतली, व ते शिवाजीमहाराजांना अनुकूल होऊन त्यांच्या कार्यास मनापासून मदत करितील असें त्यानें केले. तो साताऱ्यास येऊन महाराजांस भेटला. त्यांनी त्याचा मोठा आदरमान केला आणि त्याला आपल्याजवळ मोठ्या इतमामाने ठेवून घेतलें.

रघुनाथपंतानें व्यंकोजी राजासंबंधाने जें कांहीं सांगावयाचें ते महाराजांस सांगितले, आणि कर्नाटकांत मोहीम करून आपल्या वडिलांच्या तिकडील दौलतीचा योग्य बंदोबस्त करण्याचा विचार त्यांच्या मनांत पुरा भरून दिला. ही मोहीम फत्ते व्हावी यासाठीं आपण तिकडील संस्थानिकांशीं व कुतुबशहाशीं केलेले राजकारण त्यानें निवेदन केले. ह्या त्याच्या सांगण्यावरून महाराजांनी कर्नाटकांत मोहीम करण्याचा बेत नक्की केला.

मग आपल्या पश्चात् आपल्या मुलखावर मोगलानी हल्ला करूं नये म्हणून खानजहानबहादूर यांची चांगली मूठ दाबून त्याच्याशी सलोखा केला, आणि मोगलबादशहाचे आपण मांडलिक आहों असे कबूल करून त्याला चार लाख होन खंडणीदाखल पाठविले व जरूर पडेल तेव्हां पांच हजार स्वारांनिशी मदत करण्याचें वचन दिलें. औरंगजेबाला हा तह मान्य होऊन त्यानें शहाजाद्याला असा हुकूम पाठविला कीं शिवाजीमहाराजांशी तूर्त युद्धप्रसंग करूं नयेत. ह्या वेळीं अदिलशाही दरबारांत दुफळी माजली असून महाराजाशीं युद्ध करण्याचें त्राण त्याला उरले नव्हतें; आणि महाराजांनीं आपल्या दक्षिण सरहद्दीवर किल्ले व कोट बांधून तिकडून शत्रूचा हल्ला न होईसा बंदोबस्त करून ठेवला होता. भागानगरच्या कुतुबशहाशी पूर्वी झालेला तह अद्यापपावेतों कायम असून त्या सरकाराचा महाराजांशी मोठा सलोखा जुळला होता. अशा रीतीनें आपली सत्ता कांहीं काळ तरी निर्वेध राहील अशी खात्री महाराजांना ह्या वेळीं वाटल्यावरून ते अशा दूरच्या मोहिमेस निघाले. आपल्या पश्चात मोरोपंताने सगळा कारभार पाहावा व इतर प्रधानांनीं व सरदारांनीं त्याच्या आज्ञेत वागावें असें त्यांनीं ठरविलें.

महाराज कर्नाटकात जातांना भागानगरच्या कुतुबशहाला भेटून गेले. ह्या शहाने त्यांचा बहुमानपुरःसर मोठ्या थाटाचा पाहूणचार करून त्यांना स्वारीखर्चासाठी दररोज तीनहजार होन म्हणजे दर महिन्यास साडेचारलाख रुपये देऊ केले. कोणी म्हणतात कीं ह्या खेरीज आणखी त्यांने त्याना दहा लाख होन रोख दिले आणि आपला तोफखाना त्यांस दिला. ह्याच्या मोबदला म्हणून शहाजीराजांच्या जहागिरीबाहेर जो प्रांत महाराज जिंकतील त्यांतला अर्धा त्यांनीं कुतुबशहास द्यावा असें ठरलें; ह्या शिवाय आणखी त्या शहानें महाराजांच्या मदतीला पांच हजार लोक दिले.

ह्याप्रमाणें मुबलक द्रव्य व भक्कम तोफखाना मिळवून महाराज कर्नाटकाकडे जावयास निघाले. वाटेंत तुंगभद्रातीरी करनाळें कडपें म्हणून एक संस्थान लागलें. त्याच्या मालकानें महाराजांस पांच लाख होन खंडणी प्रतिवर्षी देऊं केल्यावरून त्यांनीं त्याच्या प्रांतास काहीएक उपद्रव न करितां पुढें कूच केलें.

महाराज कृष्णा नदीच्या तीरानें मार्गस्थ झाले असतां वाटेत त्यांना श्रीशैलमल्लिकार्जुनाचें देवालय लागलें. त्याच्या दर्शनास ते गेले असतां ते रमणीय व पूज्य स्थान पाहून अगदी तल्लीन झाले. हा दुसरा कैलासच आहे असा त्यांस भास झाला. ते देवदर्शनास गेले असतां तेथें त्यांच्या ठायीं असा कांहीं भक्तिभाव प्रज्ज्वलित झाला कीं ह्या देवस्थानास आपल्या देहाचे अर्पण करून जीवितसार्थक्य करावे असें त्यांच्या मनाने घेतलें; आणि ह्या आवेशाच्या झटक्यासरशी तरवार उपसून आपलें शिरकमल देवास अर्पण करावयास ते सिद्ध झाले! अशा स्थितींत त्यांच्या अंगात देवी संचरून येणेप्रमाणे बोलली; ''तुला असें केल्याने मोक्ष प्राप्त होणें नाहीं. तुझ्या हाताने अजून उदंड कर्तव्य होणें आहे. स्वधर्मरक्षणासाठी तूं निर्माण झाला आहेस. यास्तव असे साहस करूं नको.'' महाराज शुद्धीवर आल्यावर ही भवानीची आज्ञा जवळच्या लोकांनी त्यांना निवेदन केली. ती ऐकून त्यांनीं अशा प्रकारें आत्मयज्ञ करण्याचा विचार रहित केला. परंतु अशा पूज्य व रम्य देवस्थानांत राहून तपस्व्याची वृत्ति धारण करावी व तपश्चरण करून शेष जीवित घालवावें अशी प्रबल इच्छा त्यांस झाली, आणि आपल्याजवळच्या लोकांस मोहीम बंद करून स्वदेशी परत जावयास सांगितलें. हे ऐकून जवळच्या लोकांस मोठे संकट पडले. त्यांनी त्यांना भवानीच्या आज्ञेची आठवण देऊन तदनुसार वर्तन करण्यांतच जीवित सार्थक्य आहे असे म्हटले परंतु त्यांच्या ह्या बुद्धिवादाची परवा न करितां ते तपस्विवेष धारण करून ध्यानधारणा करण्यांत निमग्न झाले. रघुनाथपंत अनेक शास्त्रवचनांच्या आधाराने त्यांस एकसारखा बोध करीत राहिला. ही त्यांची विरक्तावस्था नऊ दिवस होती. मग त्यांना असें वाटूं लागले कीं हा असा स्वजीवितक्षय करणे उचित नव्हे. म्हणून ते ती वृत्ति सोडून पुढील अंगीकृत कार्यक्रमास उद्युक्त झाले. ह्या देवस्थानांत त्यांनी पुष्कळ दानधर्म केला.

मद्रासच्या इंग्रेज व्यापाऱ्यांचा ह्या वेळचा असा लेख आहे कीं शिवाजीमहाराज आपल्या फौजेनिशी सन १६७७ सालीं मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत मद्रासेपासून सात मैलांवर एका गांवी तळ देऊन होते. त्या व्यापाऱ्याकडून महाराजांनी काहीं

औषधी जिनसा द्रव्य देऊन खरेदी केल्या असे ते म्हणतात. वाटेत लहानमोठ्या सरदारांचे प्रांत काबीज करीत करीत ते चंदीच्या (जिंजीच्या) मोठ्या भक्कम किल्ल्यापाशी आले, आणि त्याला त्यांनीं वेढा दिला, रघुनाथपंतानें ह्या किल्ल्याच्या हवालदाराशीं पूर्वीच संधान बांधून ठेवल्यामुळे तो सर करण्यासाठी युद्ध करावे लागले नाहीं. ह्या किल्ल्याची चांगली दागदुजी करून महाराजांनी त्यावर आपले लोक ठेवून दिले.

महाराज कुतुबशहाशी केलेला प्रांतविभागणीचा करार न पाळतां जिकडे–तिकडे आपलीच सत्ता बसवीत चालले हे पाहून कुतुलबशहानें त्यांना स्वारीखर्च देण्याचे बंद केले. त्यामुळे महाराजांना खर्चाची पंचाईत पडूं लागली. म्हणून त्यांनीं तिकडील प्रांत लुटण्याचा सपाटा सुरू केला. ह्या त्यांच्या क्रमामुळें तिकडील लोकांची कशी अगदीं गडबड उडून गेली होती ते मद्रासच्या इंग्रज व्यापाऱ्यांनी पुढीलप्रमाणे लिहून ठेविले आहे: ''शिवाजीमहाराज द्रविडदेशांत शिरले हे वर्तमान चोहोंकडे पसरलें तेव्हां सर्व लोक पराकाष्ठेचे घाबरून गेले. तो मोठा भयंकर पुरुष असून त्यानें पश्चिम किनाऱ्यावरील प्रांतचेप्रांत लुटून जाळून उद्‌ध्वस्त केले, व यवन पादशहांस त्राहित्राहि करून सोडले, अशी त्यांची ख्याति चोहोंकडे पसरली होती. यास्तव त्या लोकांस त्यांची फारच दहशत वाटू लागली. आपली आता कशी धडगत लागते याचा ज्याला त्याला विचार पडला. द्रव्य कोठे आहे वा कोणावर हल्ला केला असतां खचीत द्रव्यलाभ व्हावयाचा हें त्यांना कांहीं दैवीशक्तीच्या योगाने कळत असून ते जातील तिकडे त्यांस हटकून यश प्राप्त व्हावयाचे असा त्या लोकांचा समज होऊन गेला होता.''

महाराजांनी त्रिनोमल्ली नावाचा प्रांत काबीज करून त्यांतले वेलूर, त्रिवादी आर्नी वगैरे किल्ले सर केले, आणि पावसाळा लागल्यामुळे त्रिवादी येथे आपल्या घोडदळाचा तळ दिला. येथें ठाणें दिल्यावर त्यांनीं मदुराप्रांताच्या राजाकडे स्वारीखर्चासाठी एक कोटी रुपयांची मागणी केली. त्यामुळे त्याने घाबरून जाऊन आपला वकील महाराजांकडे पाठवून तहाचे बोलणे लाविलें; आणि त्याने सात लाख होन खंडणी देण्याचे कबूल करून दीड लाख होन रोख दिले. तेव्हां अर्थात् त्यांनीं त्याच्या प्रांतास मुळी उपद्रव दिला नाही.

सदरील ठिकाणीं छावणीस असतां महाराजांनी व्यंकोजीराजे यांस पुढील प्रमाणें पत्र पाठविले:''थोरल्या महाराजांनी कैलासवास केला त्यास आज तेरा वर्षे झाली. महाराजांची सर्व दौलत रघुनाथपंतांनीं तुमच्या स्वाधीन केली. परंतु ते पितृधन आहे आमचा त्यांत अर्धा वाटा आहे. ह्या वाट्याचा उपभोग तुम्हीच आजपर्यंत घेतला.

आमचा वाटा आम्ही तुमच्याकडे यापूर्वीच मागितला पाहिजे होता. परंतु आम्ही दूर असल्यामुळें आम्हास तसे करण्यास आजदिनपावेतों सवड मिळाली नाहीं. तुम्ही महाराजांचे पुत्र आहा; दौलताचे मालकच आहां. तुम्ही खाल तोंपावतों तो खावा. आम्हांस फावेल त्या वेळी आपला भाग मागून घेऊ असा विचार करून आम्ही आज तेरा वर्षे सबुरी केली. तर आतां आमचा अर्धा हिस्सा आम्हांस बिनतक्रार द्यावा असा तुमचा मनसोबा आहे किंवा कसे ते लवकर कळवावें. आमचा तुमचा कलह लोकांनी पहावा; मग चौघांनी तुम्हांस सांगावे; व तुम्ही रीतीवर येऊन हिस्सा द्यावा; आणि तुमच्या आमच्यात विनाकारण वितुष्ट यावें हे नीट नाही. तीर्थरूप कैलासवासी झाल्यामागे तुम्ही आम्ही एका रक्ताचे भाऊ एकोप्याने वागू. एकमेकांच्या सुखदुःखाचे विभागी होऊं. व्यर्थ कलह माजविल्याने कोणाचे कधीहि बरे होणे नाही.''

ह्या निरोपाची परवा न करितां व्यंकोजीराजांनी आपल्या मसलतगारांच्या सल्ल्यावरून महाराजांशी लढण्याचा घाट घातला. म्हैसूरच्या व मदुरेच्या राजानी त्यांना साहाय्य करण्याचें अभिवचन दिल्यावरून त्यांना ही बुद्धि सुचली. पण रघुनाथपंतानें कारस्थान केल्यामुळें मदुरेच्या राजाने व्यंकोजी राजांना ऐन प्रसंगीं मदत देण्याचे नाकारले, व म्हैसूरच्या राजानेहि त्यांना असेंच फसविले. व्यंकोजीराजांना एकट्यांना महाराजांशी समरप्रसंग करण्याचें सामर्थ्य मुळीं नव्हतें. तेव्हां निरुपाय होऊन ते महाराजांच्या दर्शनाला आले. त्यांनी त्यांची मोठ्या प्रेमानें भेट घेऊन त्यांची बरदास्त उत्तम प्रकारें ठेविली. महाराजांच्या छावणीत व्यंकोजीराजे पंधारा दिवस होते. परंतु तेवढ्या अवधींत त्यांनीं आपण होऊन जहागिरीच्या हिश्शासंबंधाची गोष्ट काढिली नाहीं. शेवटीं महाराजांनी त्यांना आपल्यासमक्ष बोलावून आणून म्हटलें: ''वडिलोपार्जित दौलतीचे आम्ही दोघे विभागी. आम्ही विभाग मागतो आहो तो तुम्हीं स्वपराक्रमाने मिळविलेल्या दौलतीचा नव्हे. वडिलांच्या जोडीची व्यवस्था आमच्या विचाराशिवाय करणें तुम्हांस विहित नाही. दौलतीचे कागदपत्र वगैरे असतील ते आम्हांस दाखवा. तुम्ही आम्ही समजून चालू. तुम्हांस जड पडेल तेथें आम्ही तुम्हांस अवश्य मदत करूं. मनांत कोणत्याहि प्रकारचा किंतु ठेवू नका.'' व्यंकोजी राजांनी हे त्यांचें सगळें बोलणे मुकाट्यानें ऐकून घेतलें, त्यांना काहीएक उत्तर केलें नाहीं, महाराजांच्या पदरच्या दुसऱ्या लोकांनी त्यांच्या मनांत काय आहे ते ताडण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु ते अगदी मौन धरून राहिले. तेव्हां ते काहीएक करारास येत नाहीत असें पाहून महाराजांनी त्यांना परत जाण्याचा निरोप दिला व त्यांस तंजावरास पोचते केले.

यानंतर महाराजांनी पुनः व्यंकोजीराजास आपले कारकून पाठवून पुढील प्रमाणें निरोप दिला: ''तंजावर प्रांताचा अर्धा भाग व दुसरे काहीं किल्ले आम्हांस आमचा अर्धा भाग म्हणून द्यावे, एवढ्यानेंच आमचे समाधान होईल. गृहकलह वाढविण्यांत उभयतांचे नुकसान आहे. आमच्या वाट्याचा इतःपर अभिलाष धरूं नका. वाटा कांहीं सुटणार नाहीं. तुम्हांस तो द्यावा लागेल.'' यावर व्यंकोजीराजांनी आपल्या जवळच्या मुसलमान मसलतगारांच्या सल्ल्याने पुढील आशयाचा जबाब पाठविला:''तुम्ही अदिलशाहीविरुद्ध बंड केलें आहे. पण आम्ही त्या शाहीचे अंकित आहो. म्हणून अदिलशहाने वडिलांची जहागीर आम्हांकडे राहू दिली आहे. ही केवळ चाकरी बद्दल मिळालेली दौलत आहे. तिचा वांटा तुम्ही बंडखोर असल्यामुळें अदिलशहा तुम्हांला देऊं देणार नाहीं, व त्यावर तुमचा कायदेशीर हक्कही नाही. वडिलांच्या वेळचे हत्ती, घोडे, जवाहीर वगैरे जें कांही असेल त्याचा वाटा मागणे असेल तर तो आम्ही देण्यास तयार आहो.''

असा त्यांचा जबाब ऐकून महाराजांना मोठा संताप आला व त्यांच्यावर स्वारी करण्याचा बेत मनांत आणिला. परंतु त्यांनी पुनः असा विचार केला कीं त्यांच्यावर स्वारी करून त्यांस जेर करण्यांत पुरुषार्थ तो कोणता? ते कसे झाले तरी आपले बंधु आहेत. वडिलांच्या दौलतीत धुमाकुळ उडवून देण्यापेक्षा दुसरे प्रांत काबीज करण्यास काय कमी आहेत? ते सर करून त्यांवर आपली सत्ता बसविल्याने तेवढा यवनी अमल तरी कमी केलासें होईल. असा पोक्त विचार करून त्यांनी व्यंकोजीराजांवर स्वारी करण्याचा बेत रहित केला. मग त्यांनीं आपली मोहीम पुढे चालवून वेलूरास आपलें ठाणें बसवून तिकडील महाराजगड, जगदेवगड, कर्नाटकगड वगैरे किल्ले काबीज केले. नंतर तिकडील घाट चढून ते शहाजीराजांस पूर्वी मिळालेल्या जहागिरीच्या प्रांतांत आले. आणि तिकडील कोल्हार, बाळापूर, बेंगरूळ, शिरटें, वासकोट वगैरे तालुके त्यांनी हस्तगत केले; आणि कांहीं नवे कोट व किल्ले बांधून त्या प्रांताला मजबुती आणिली; आणि जागोजाग ठाणी बसविली. व तिकडचे पाळेगार नेहमी पुंडावा करीत, त्यांचा त्यांनी नायनाट केला. आरणीचा कोट शहाजीराजांनी वेदो भास्कर नांवाच्या एका ब्राह्मणांच्या हवाली केला होता. तो मरण पावल्यावर त्याच्या तिघां मुलांच्या ताब्यांत तो होता. त्यांनी महाराजांस शरण येऊन कोट स्वाधीन करून दिला. आपल्या वडिलांच्या ह्या हस्तकांचा महाराजांनी बहुमान करून त्याच्याच

हवाली तो कोट केला, आणि त्यांच्या खर्चासाठी तीन लाख रुपये उत्पन्नाचा मुलूख लावून दिला. जे जे संस्थानिक, जहागीरदार किंवा सरदार महाराजांस शरण येऊन खंडणी देण्यास राजी होत त्यांस तें मुळीं उपद्रव करीत नसत. ह्याप्रमाणे ते श्रीरंगपट्टण वगैर प्रांतांतून खंडण्या घेत घेत गदगलक्ष्मेश्वर येथे आले.

त्या प्रांताचा सुभेदार भिऊन पळून गेल्यामुळें तो त्यांच्या हातीं सहज आला. येथें मुक्कामास असतां त्यांनी मद्रास येथील इंग्रज व्यापाऱ्यांकडे इमारतीचे काम करणाऱ्या कांहीं कारागिरांची मागणी केली. परंतु त्यांनीं त्यांना असा जबाब दिला की आम्हांस कोणत्याहि पक्षाला मिळून राहता येत नाही; म्हणून आपली मागणी मान्य करितां येत नाहीं. येथून पुढें कूच करून महराजांनी पोर्तोनोवो शहर लुटले व आर्काटच्या दक्षिणेकडील सगळा प्रांत काबीज केला.

ह्याप्रमाणें महाराज कर्नाटकातील विजापूरकरांच्या अमलांत सारखा धुमाकुळ उडवून देत व खंडण्या वसूल करीत चालले असतां दिल्लींतील त्यांच्या वकिलाकडून बातमी आली कीं औरंगजेब दक्षिणेत पाठविण्यासाठी मोठी फौज तयार करीत आहे. हें कळताच ते स्वदेशी यावयास निघाले. ह्या मोहित रामेश्वरापर्यंत आपला अमल बसवीत जाण्याचा त्यांनीं बेत केला होता, तो ह्या बाबतीमुळे सिद्धीस गेला नाहीं. कर्नाटकांत काबीज केलेल्या प्रांतांचा व किल्ल्यांचा बंदोबस्त त्यांनीं आपले लोक ठेवून केला आणि हंबीरराव व रघुनाथपंत यांच्या बरोबर कांहीं फौज ठेवून ते महाराष्ट्रांत लगबगीने आले. ह्या मोहिमेत त्यांनी वीसबावीस लक्ष होन उत्पन्नाचा मुलूख व शंभर किल्ले हस्तगत केले असे म्हणतात.

महाराष्ट्रांत परत येतांना त्यांनीं म्हैसूर प्रांताचा पूर्व भाग व मध्यभाग काबीज केला. तेथून पुढे कूच करून त्यांनी कोपल, गदग, मालगुंड वगैरे ठाणी हस्तगत केली. त्या वेळीं विजापुरकरांच्या तीन सरदारांनी त्यांना वाटेत गांठले. त्यांशी लढून त्यांचा त्यांनीं पुरा मोड केला. कोल्हापूर प्रांतांत अदिलशहाचा एक सरदार धामधूम करीत होता त्याच्यावर निळोजी काटकर यास पाठविले. त्यानें त्याला तुरंबा नजीक गांठून त्याच्याशीं सामना केला, आणि त्याचा अगदी मोड करून त्याचे लोक उधळून लाविले. संपगावांकडून महाराज कूच करीत असता त्यांच्या सैन्याला बेलवाडीच्या किल्ल्याची मालकीण सावित्रीबाई हिने बराच उपसर्ग केला, म्हणून त्यांच्या लोकांनी तिच्या किल्ल्यास वेढा दिला. त्या बाईने सत्तावीस दिवस तो लढविला. त्या

झटापटींत महाजांचे फार लोक पडलें. शेवटीं ही बाई निरुपाय होऊन महाराजांस शरण आली. तिने त्यांचें इतकें नुकसान केलें व अशी फजिती उडविली तरी त्यांनीं तिला शिक्षा न करिता उलट वस्त्रेभूषणे देऊन गौरविले आणि दोन गांव इनाम करून देऊन सोडून दिले.

महाराजांचा मुक्काम तोरगलास असता रघुनाथपंताकडून एक पत्र आले. त्यांत व्यंकोजीराजे यांनी कांही मुसलमान संस्थानिकांच्या व जहागिरदाराच्या साहाय्याने रघुनाथपंत व हंबीरराव यांच्या सैन्यावर हल्ला केल्याची हकीगत होती. उभय पक्षांचे घोर युद्धप्रसंग होऊन व्यंकोजीराजांचा पुरा पराभव झाला. त्यांचे पुष्कळ सरदार रघुनाथपंतानें पकडून कैद केले. खुद्द व्यंकोजीराजेहि त्यांच्या हातीं सहज लागले असते, परंतु आपल्या धन्याचा असा उपमर्द करू नये म्हणून रघुनाथपंतानें त्यांना जाऊं दिलें. हें वर्तमान ऐकून महाराजांनी रघुनाथपंतास येणेप्रमाणे लिहिले: ''ते आमचे धाकटे बंधू आहेत. त्यांनी पोरबुद्धि केली तरी त्यांचें रक्षण केलें पाहिजे. त्यांचें राज्य बुडवू नये.'' त्याप्रमाणेंच व्यंकोजीराजांनाहि एक मोठे पत्र पाठवून त्यांस पुनः पुष्कळ समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. व्यंकोजीराजांची स्त्री दिपाबाई ही मोठी शहाणी बाई होती, तिनें त्यांच्याशी बुद्धिवाद करून महाराजांस शरण जाऊन ते मागतात तो दौलतीचा वाटा त्यांस द्यावा असा सल्ला दिला. तो त्यांना पसंत वाटून त्यांनी रधुनाथपंतास आपल्याकडे बोलावून आणून समेटाची कलमें ठरविली ती अशीं: व्यंकोजीराजे यांनी आपल्या दौलतींचे अर्धे उत्पन्न शिवाजीमहाराजांस प्रतिवर्षी पावते करावे; वडिलार्जित जडजवाहिराचा अर्धा हिस्सा शिवाजीमहाराजांस द्यावा आणि त्यांच्या स्वारीखर्चासाठी काही रक्कम द्यावी. अशीं तहाची कलमे व्यंकोजीराजांनी कबूल केल्याचे कळल्यावर त्यांनी तंजावर प्रांत त्यांच्याकडे राहू देऊन आणखी जहागिरी जे दुसरे परगणे त्यांनीं खालसा केले होते तेहि त्यांना परत दिले. ह्या संबंधीचे महाराजांनी रघुनाथपंतास पत्र पाठविले त्यांतील आशय असा: ''चिरंजीव राजश्री व्यंकोजीराजे यांस सौभाग्यवती दिपाबाईनी ध्यानावर आणले ठीक झाले त्यांची धुंदी जाऊन नजर खुली झाली हे पाहून मला समाधान झाले त्यांच्या संस्थानाच्या बंदोबस्तासाठी तुम्ही तिकडे राहा.'' महाराजांनी तिकडील बंदोबस्ताची एकुणीस कलमांची एक यादी रघुनाथपंतास पाठविली.

ह्या प्रमाणे कर्नाटकातील सगळी व्यवस्था सुयंत्र लावल्यावर हंबीरराव सरनोबतांना सेनेसह परत बोलविले आणि स्वतः तोरगलाहून पुढे कूच केले. असतां त्यांना कळले

कीं निंबाळकर व घाटगे पन्हाळा व कऱ्हाड हे प्रांत लुटून उद्ध्वस्त करीत आहेत. तेव्हां त्यांनीं त्यांच्यावर निळाजी काटकर यांस पाठविले, त्याने त्यांस कुर्ली येथें गाठून त्यांचा अगदीं धुव्वा उडविला आणि त्यांच्याकडची सारी लूट हस्तगत केली. ही लूट आपल्या प्रजाजनांची आहे हें ध्यानांत आणून महाराजांनी बारीक शोध करून ती ज्यांची त्यांना पावती केली. त्या ऐवजातील एका तनसडीलाहि ते शिवले नाहींत. ही मोहीम आटपून स. १६७८ च्या मार्च महिन्यांत महाराज रायगडावर येऊन पोचले. म्हणजे अर्थात् कर्नाटकाच्या मोहिमेवर निघाल्यापासून अठरा महिन्यांनी ते स्वदेशीं आले. हंबीरराव हाहि त्यांच्या मागोमाग स्वदेशी आला. त्यानेंहि वाटेंत विजापूरकरांचे जेजे परगणे लागले ते हस्तगत करून व त्यांच्या फौजांशी वारंवार झुंजून प्रत्येक खेपेस त्यांना अष्टदिशांस उधळून लाविलें. ह्या त्याच्या उत्कृष्ठ कामगिरीबद्दल महाराजांनी त्यांस अतिशयित वाखाणून मोठे पारितोषक दिलें; आणि त्याच्या बरोबर धनाजी जाधव आणि बयाजी घोरपडे असे दोन शूर सरदार होते, त्यांनींहि चांगली मर्दुमकी दाखविल्यावरून त्यांस महाराजांनी चांगल्या बढत्या दिल्या.

पुढें कांहीं दिवसांनीं रघुनाथंपताने महाराजांस पत्र लिहून असें कळविले की, व्यंकोजीराजे अगदीं उदास व विरक्त झाले आहेत. ते दरबारच्या कारभारांत मुळी लक्ष घालीत नाहींत. सदोदित एकांतांत बसून असतात. ही अशी त्यांची स्थिति कळल्यावर महाराजांनी त्यांना एक उपदेशपर पत्र लिहिले, त्यांतील आशय येणेप्रमाणें: ''रघुनाथपंतांनी तुम्हांकडील मजकूर लिहून कळविला तो वाचून मनास फार वाईट वाटलें. कारण थोरल्या महाराजांच्या पोटी तुम्ही आम्ही उभयता बंधु एकमेकांस आधार असून तुम्ही उदास होऊन बसला आहां हे ऐकून मनास खेद होतो. उदास होऊन बसण्यासारखे संकट तरी तुमच्यावर काय आलें आहे तें कळवाल तर त्याचें निवारण करितां येईल. आम्हांस कोणतीहि गोष्ट कळविण्यास तुम्ही शंका धरू नये. तुमचा जो कांहीं मनोरथ असेल तो तत्काळ पूर्ण होईल. आमच्याकडून तुम्हांस संतोष होईल असे करण्यास मुळीच आळस व्हावयाचा नाहीं ही खात्री ठेवा. तुमच्या मनास अशी विकृति का झाली तें अवश्य कळवा. तिचे परिमार्जन करितां येईल. इतःपर उदासीनपणानें वागू नका; वागला असतां जवळ आणून ठेवावे लागेल. मग इकडून तुमचे जाणे घडणार नाही. हें मनांत वागवून सरळ रीतीनें वर्ता. रघुनाथपंतांची सल्ला नेहमी ऐकत जा. यांतच तुमचें हित आहे. पुढें तुमची मर्जी.'' हें पत्र पोचताच ते शुद्धीवर येऊन नीट वागू लागले.

***

भाग पंचविसावा

# मोगलांशीं शेवटले युद्धप्रसंग

महाराजांनी कर्नाटकांतल्या बऱ्याच मुलखावर कायमची सत्ता बसवून विजापूरकरांचा तिकडील अमल पुष्कळ कमी केला व तिकडूनहि त्या शाहीवर पक्का शह बसविला हें पाहून औरंगजेबास असें वाटू लागले कीं आतां शिवाजी महाराज अदिलशहाच्या उरलेल्या मुलखावर चोहोकडून गर्दी करून ती शाही बुडवून टाकितील व आपला अंमल थेट रामेश्वरापर्यंत बसवितील; आणि आपला बेत जो दक्षिणेंतील दोन्ही मुसलमानी शाह्या बुडवून दक्षिण समुद्रापर्यत एकछत्री सत्ता करण्याचा तो आतां निष्फळ होईल. तो व्यर्थ न व्हावा म्हणून त्यानें शिवाजी महाराज कर्नाटकांतून येण्यापूर्वी अदिलशाही बुडविण्याचा निश्चय करून बहादूरखानास ती कामगिरी सांगितली. पण त्याच्या हातून कांही न झाल्यामुळें त्याला दक्षिणेच्या सुभेदारीवरून दूर करून मोअझिम यास पुनः त्या सुभ्यावर पाठविलें; आणि दिलेरखानाने मोठ्या सैन्यानिशी विजापूर शहरावर चालून जाण्याचा बेत केला. मसाऊदखानाने महाराजाकडे मदत मागितली ती देण्याचे ठरवून त्यांनी आपलें घोडदल विजापुरास पाठविलें. परंतु महाराजांच्या ह्या लोकांस मसाऊदखानानें विजापुरात प्रवेश करूं दिला नाही व किल्ल्यावरहि ठाणे देऊं दिले नाहीं. तेव्हां त्यांनी आत शिरण्याचा प्रयत्न केला. पण किल्ल्यावरून तोफांचा भडीमार होऊं लागल्यामुळे तो किल्ला सर करण्याच्या खटपटीस ते लागले. इतक्यांत दिलेरखान जवळ येऊन ठेपला असे पाहून ते तेथून निसटले. इकडे दिलेरखानाने विजापुरास वेढा दिला असे कळताच महाराजांनी त्याच्या पाठीवर जाण्याचे सोडून भीमानदीच्या अलीकडील मोगलांच्या मुलखात शिरून तो लुटण्याचा सपाटा चालविला. त्यांनीं मोगलांची धरमगांव, चोप्रा, जालना वगैरे व्यापाराची शहरे लुटली. ही लूट घेऊन ते माघारीं स्वराज्यांत यावयास निघाले तेव्हां मोगलांच्या रणमस्तखानानें त्यांस संगमनेरापाशी गांठले. येथें त्यांची मोठ्या निकराची लढाई झाली. महाराजांचे एकदोन सगळे सरदार

ह्या लढाईत पडले; तरीपण न डगमगतां ते शत्रूशी मोठ्या आवेशाने लढले. महाराज जिवाची परवा न करिता हातांत शस्त्र घेऊन सगळ्यांच्या पुढें सरसावून लढले, आपला धनी असा जिवावर उदार होऊन लढत आहे हें पाहून सगळ्या लोकांस मोठे स्फुरण चढले, आणि त्यांनी मोगलांचा पुरा मोड केला. हें वर्तमान कळताच शहाजाद्यानें त्या सरदाराच्या कुमकेस केशरसिंगाला मोठी फौज देऊन पाठविले; आणि त्यामुळें मोगलांच्या रानोमाळ पांगलेल्या लोकांस नवा दम येऊन ते सगळे एकवट झाले. आणि महाराज ज्या खिंडीतून खालीं उतरणार होते तिकडे धावत जाऊन तेथें त्यांची वाट पाहत बसले. तेव्हां महाराजांचा हेर हिरजी नाईक यानें त्यांचें थकलेले सगळे सैन्य दुसऱ्याच एका खिंडींतून खालीं नेले; आणि मोगलांच्या सैन्यास त्याचा पत्ता न लागून निराश होऊन माघारीं जावे लागलें. महाराज तेथून निसटून पट्टा येथें सुखरूप गेले. तेथें काही दिवस विश्रांति घेऊन ते मिळालेली लूट घेऊन रायगडावर गेले. ह्या पट्टा येथें त्यांना विश्रांती मिळाली म्हणून त्यांनी त्याचे नांव विश्रामगड असें ठेविलें; आणि बहीरजी नायकाने ऐन संकटाच्या प्रसंगीं आपला बचाव केला म्हणून त्याला मोठे इनाम महाराजांनी दिलें. ह्या विश्रामगडाच्या आसपासचे किल्ले व प्रांत काबीज करण्यासाठीं त्यांनीं मोरोपंतास पाठविलें. त्यानें ही कामगिरी उत्तम प्रकारे शेवटास नेली.

ही आशी धामधूम त्यांनीं मोगलांच्या अमलांत चालविली असूनहि दिलेरखानाने विजापूरशहरास घातलेला वेढा यत्किंचित्हि ढिला केला नाही. तेव्हां मसाउदखानाने महाराजाकडे पुनः मदत मागितली. ती देण्यासाठी ते विजापुराकडे वळले असतां त्यांना संभाजीराजे पळून जाऊन दिलेरखानास मिळाल्याची बातमी कळली. ती ऐकतांच ते पन्हाळ्याकडे परत आले, आणि हंबीरराव विजापुरकरांच्या मदतीस गेला.

आता संभाजीराजे पळून जाण्यांचे कारण सांगितले पाहिजे. ह्या युवराजांना सुशिक्षण प्राप्त व्हावे म्हणून महाराजांनी करवेल तेवढी चांगली तरतूद केली होती. तरी त्यांचें आचरण नेहमी उन्मतपणाचे व अनर्गल असे. हे पाहून महाराज नेहमी खिन्न असत. एके समयी शितळागौरीप्रीत्यर्थ राजवाड्यात हळदकुंकवाचा समारंभ झाला. ह्या वेळीं तेथें आलेल्या एका लावण्यसंपन्न ब्राम्हण स्त्रीवर संभाजीराजांनी बलात्कार केल्यावरून महाराजांनी त्यांना पन्हाळ्यावर अटकेंत ठेवले होतें. महाराज मोगलांच्या मुलखात दूरच्या स्वारीवर गेले असे पाहून संभाजीराजे किल्यावरून पळून दिलेरखानास जाऊन मिळाले. ही घरफूट पाहून त्या खानास अर्थात आनंद वाटला.

दिलेरखानानें संभाजीराजांना पुढें करून महाराजांच्या भूपाळगडावर हल्ला केला. त्यावरील लोक युवराजांना पाहून दचकले, व शत्रूवर तोफा सोडावयास त्यांचा हात वाहिना. त्यांत आणखी खुद्द युवराजांनी किल्ल्याचा हवालदार फिरंगोजी नरसाळा याला असा धमकीचा निरोप पाठविला की दरवाजा उघडून किल्ला ताब्यात दिला नाहीस तर तुझा शिरच्छेद करूं. हा निरोप ऐकल्यावर तर किल्ल्यावरच्या लोकांना मोठी दहशत पडून ते वाट फुटेल तिकडे पळत सुटले. तेव्हां फिरंगोजी नरसाला निरुपाय होऊन किल्ला सोडून गेला. किल्ल्यावर सापडले तितके लोक मोगलांच्या लोकांनीं कैद केले. दिलेरखानाने येथें येऊन सातशे योद्ध्यांचे डावे हात तोडून त्यांस गुलाम केले. हें क्रूर कर्म संभाजीराजांना मुळीं पसंत वाटलें नाहीं. भूपाळगडावर मोगलांनी हल्ला केल्याचे ऐकून महाराजांनी त्याच्या रक्षणार्थ सैन्य पाठविलें. पण ते तेथें जाऊन पोचण्यापूर्वी शत्रूने तो किल्ला सर करून त्याची पुरी नासधूस केली होती. संभाजीराजांच्या पायी हा किल्ला जसा हातचा गेला, तसेच दुसरे किल्ले जाऊ नयेत म्हणून महाराजांनी सगळ्या किल्लेदारांस असा हुकूम पाठविला कीं, ''संभाजीराजे बेदील होऊन शत्रूस मिळाले आहेत, तरी ते कोणत्याहि किल्ल्यापाशी गेले तरीं त्यांस कोणींहि जुमानू नये, त्यांच्याशी बेलाशक लढावे.'' महाराजांनी संभाजीराजांकडे कारकून पाठवून त्यांस अनेक प्रकारीं बोध केला. परंतु त्यामुळे त्यांचे डोळे कांहीं उघडले नाहीत.

हंबीररावास विजापूरकरांच्या मदतीस पाठविलें होतें. तो तिकडे चालला असतां त्याला वाटेत रणमस्तखानानें मोठ्या सैन्यानिशी गाठले. त्याचा हंबीररावानें पुरा मोड करून त्याच्या लोकांस उधळून लाविले. मग तो विजापुरास गेला. तेथें दिलेरखानाचा विस्तीर्ण तळ पडला होता. म्हणून त्याच्याशी समोरासमोर लढून आपल्या लोकांची खराबी करणे बरें नाहीं असा विचार करून त्यानें त्याच्यावर वेळोवेळां छापे घालून त्याच्या सापडतील तेवढ्या लोकांस कापून काढण्याचा धडाका चालविला. खानाच्या लष्करास दाणावैरण कोठूनहि मिळू नये असें त्यानें केलें. त्यामुळें खानाच्या लोकांचा उपासमार होऊं लागला. हत्ती, घोडे व माणसें अन्नावांचून पटापट मरू लागली. तेव्हां अर्थात उपाय खुंटून खानास आपला तळ हालवावा लागला; व मराठ्यांच्या तावडीतून जेमतेम सुटून कसाबसा तो औरंगाबादेस जाऊन पडला. हंबीररावाने त्याचा शेवटपर्यंत चांगला पाठपुरावा केला.

दिलेरखानानें कांहीं दिवसांनीं पुनः विजापूरकरांच्या मुलखात शिरून सारखा धुमाकुळ चालविला. गांवोगांवचे पुरुष, बायका व मुले यांस पकडून तो गुलाम करीत सुटला. गावचेगाव त्यानें जाळून पोळून बेचिराख केले. मुसलमानाच्या व हिंदूंच्या बायकांनी त्याच्या हातीं लागून विटंबना व्हावयाची ती टाळण्यासाठी विहिरींत व तलावांत उड्या टाकून प्राणत्याग केला. संभाजीराजे त्याच्याबरोबर होते, त्यांना त्याच्या ह्या क्रूर कर्माबद्दल अतिशयित वाईट वाटलें, व त्याचा त्यांना पुरा वीट आला. मग संधि साधून ते विजापुराकडे पळून गेले. ह्या वेळीं त्यांची बायको येसूबाई ही त्यांच्याबरोबर होती. तिला त्यांनी पुरुषवेष दिला होता. विजापुरास मसाऊदखानानें त्यांचा आदरमान करून त्यांस आपल्याजवळ ठेवून घेतलें. दिलेरखानास हें वर्तमान कळले तेव्हां त्यानें मसाऊदखानास लाच देऊन संभाजीराजांस कैद करून आपल्या स्वाधीन करावयास सांगितले. ह्या गोष्टीचा सुगावा लागतांच संभाजीराजे विजापुराहून रातोरात पळ काढून पन्हाळ्यास महाराज होते त्यांच्याकडे गेले. महाराजांनी त्यांना आपल्या हाडवैऱ्यांच्या गोटांत पळून गेल्याबद्दल पुष्कळ दोष दिला, आणि पुनरपि त्यांनीं असें करूं नये म्हणून त्याना पन्हाळ्यास सक्त कैदेंत ठेविले, व त्यांच्या खर्चास तीन लाख रुपये उत्पन्नाचा तालुका लावून दिला. हंबिररावानें दिलेरखानाच्या पाठीस लागून त्याच्या लोकांस कापून काढलें आणि त्याला औरंगाबादेकडे पिटाळून लाविलें. ह्याप्रमाणे मोगल सैन्यांची पुरी खराबी होऊन दिलेरखानास परत जावें लागलें, आणि त्याच्या कचाटींतून विजापूरकर सुटले. हें संकट महाराजांच्या मदतीने टळलें म्हणून त्या सरकाराकडून त्यांना एक कृतज्ञतादर्शक पत्र आलें. त्याचा योग्य जबाब पाठवून महाराजांनी त्याच्याशी पुढीलप्रमाणे तह ठरवून घेतलाः (१) कोपल व बेलवाडी यांसभोवतालचा मुलूख महाराजांच्या स्वाधीन करावा. (२) द्रवीड देशांतील जो मुलूख त्यांनी काबीज केला आहे त्यावर विजापूरसरकाराने हक्क सांगू नये, (३) तंजावर वगैरे प्रांत शहाजीराजांच्या जहागिरीत मोडतात, त्यांवर अदिलशहाने कोणात्याहि प्रकारचा ताबा चालवूं नये, तर त्यावर महाराजांचा पूर्ण अमल चालावा; आणि (४) प्रसंगोपात एकमेकांनी एकमेकांस मदत करावी.

ह्याप्रमाणे कर्नाटकांतील व द्रवीड देशांतील प्रांतांवर शिवाजीमहाराजांचें प्रभुत्व अदिलशहानें कबूल केल्याचें वर्तमान व्यंकोजीराजास कळले तेव्हा त्यांस अतिशयित

विषाद वाटला, व आपलें स्वातंत्र्य आतां अगदींच नष्ट झालें. असें त्यांना वाटूं लागलें. आधींच महाराजांनी त्यांच्यावर रघुनाथपंतांचा शह पुरा बसवून त्यांच्या जहागिरीची बहुतेक व्यवस्था आपल्या हाती घेतली होती. त्यांत आणखी विजापूरसरकारनें ह्या जहागिरीवर आपला कांहींएक ताबा चालू नये असे सदरील तहात कबूल केल्यामुळें त्या सरकाराकडून मागेपुढे मदत मिळून आपण आपल्या बंधूच्या शहांतून मुक्त होऊं अशी आशा त्यांना होती. ती समूळ खुंटली हें लक्षांत येऊन ते विरक्तासारखे वागू लागले. त्यांच्या वृत्तींत जो हा पालट झाला त्याविषयी रघुनाथपंताने महाराजांस कळविल्यावरून त्यांनीं त्यांस बोधपर पत्र पाठवून त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

***

भाग सव्विसावा

# सज्जनसेवा

एथपर्यंत आमच्या महाप्रतापी चरित्रानायकाचें जीवनवृत्त कथन केलें आहे त्यांत त्यांच्या अंगच्या शौर्य, वीर्य, औदार्य, राजकार्यनिपुणत्व, प्रजापालनपटुत्व, युक्तिमत्ता, बुद्धिमत्ता, मातृपितृभक्ति इत्यादि उज्ज्वल गुणांचे दिग्दर्शन अनेक प्रसंगीं झालें आहे. तशीच त्यांच्या ठायीची धर्मशीलताहि अनेक वेळां व्यक्त झाली आहे. ही वृत्ति महाराजांच्या ठायी केवढी निःसीम वसत होती हे साधुसमागम व साधुसेवा यांविषयी ते सर्वदा किती सोत्कंठ असत तें सांगितल्याने प्रत्ययास येणार आहे. सदाचारसंपन्न व धर्मशील मातेच्या चिरसहवासानें महाराजांच्या ठायीं धर्मबुद्धि अल्पवयापासून जागृत होऊन तिची वृद्धि कथापुराणादिकांच्या श्रवणाने उत्तरोत्तर होत गेली. हे जें वळण त्यांस लहान वयांत लागलें ते आमरण कायम राहिलें. ह्या उज्वल वृत्तीस्तव त्यांना नेहमी असे वाटे कीं केवळ ऐहिक ऐश्वर्यप्राप्तीने जीवितसाफल्य व्हावयाचें नाहीं, तर खरें जीवितसार्थक्य परलोकसाधनांतच आहे.

त्यांनीं ज्या प्रांतांत प्रथम स्वराज्यसाधनास आरंभ केला त्यांत तुकाराम बावांचा देहू गांव आहे. ह्या महाभगवद्भक्ताची उत्कृष्ठ कीर्तने त्यांस लहान वयापासून ऐकावयास मिळाली असून त्यांच्याविषयी त्यांच्या मनांत अत्यंत आदरबुद्धि व पूज्यभाव वसत असे. तुकारामबावा त्या काळच्या कीर्तनकारांत अग्रगण्य असून पराकाष्ठेचे भाविक व प्रेमळ भगवद्भक्त असल्याकारणानें त्यांची बोधवाणी अत्यंत प्रासादिक व मनोवेधक असे. यास्तव त्यांची कीर्तने ऐकण्याचा महाराजांना अतिशयित उल्हास असे. तुकाराम बावा पुण्यास वारंवार येऊन कीर्तने करीत, तीं महाराज ऐकावयास जात. पुढें त्यांच्या मुक्कामाच्या आसपासच्या एकाद्या गावात त्यांचें कीर्तन व्हावयाचें आहे असें कळल्यास ते ते कधीहि चुकवीत नसत. बावांच्या कीर्तनाचा हव्यास महाराजांस किती उत्कट असे याचे एक उदाहरण येथें सांगतो. एके समयी महाराजांचा मुक्काम सिंहगडावर

असतां बावांची कीर्तने पुण्यास घरोघर होऊं लागली. ही बातमी महाराजांस कळून ते तीं ऐकावयास रोज रात्रीचे पुण्यास जाऊं लागले. ह्या त्यांच्या परिपाठाची बातमी चाकणच्या किल्लेदारास लागून त्याने त्यांच्या पाळतीवर काहीं पठाण ठेविले. महारास नित्यक्रमाप्रमाणे गडावरून उतरून पुण्यास एका वाण्याच्या घरीं बावांचे कीर्तन ऐकण्यास बसले असतां ह्या पठाणांनी त्या घरास गराडा घातला. परंतु त्यांपैकीं कोणींहि महाराजांना पूर्वी कधीं पाहिले नसल्यामुळें त्यांनी एकंदर श्रोत्यास पकडून नेण्याचा विचार ठरविला. हे अरिष्ट पाहून श्रोतृजन घाबरून जाऊन त्यांची धांदल उडाली. ती पाहून तुकारामबावाणी गडबड कशाची आहे म्हणून विचारले. तेव्हां श्रोत्यांनी बावांस तें संकट सांगून शिवाजीमहाराजांना येथून पळून जाण्याची आज्ञा करावी असें सुचविले. बावा म्हणाले; ''कीर्तन चालले असता मध्येच उठून जाऊं नये असें आहे. आज एकादशी आहे. अशा सुदिनीं आपणा सर्वास हरिकथा श्रवण करीत असतां मृत्यु प्राप्त झाला असतां कैवल्यप्राप्ति होऊन जन्ममरणाची एरझारा चुकेल. ह्यासाठी कोणीहि निघून जाऊ नये.'' असें म्हणून बावांनीं विठ्ठलनामाचा गजर करून देवाचा परम सद्गदित अंतकरणाने धावा केला. महाराजहि अशा समयी कीर्तनांतून उठून जावयाचें नाही असा निर्धार करून जागच्या जागी मोठ्या धैर्याने बसून राहिले. तेव्हा त्यांच्या बरोबर असलेल्या एका विश्वासू सेवकाने आपल्या धन्यावर आलेले हे संकट निवारण्याची युक्ती काढली, ती अशी: तो महाराजांचा शिरपेच चढवून एका घोड्यावर बसून त्या पठाणांच्यादेखत तेथून निसटून गेला. त्याला पाहताच पठाणांला तो शिवाजीच आहे असें वाटून त्यांनीं त्याच्या मागें आपलें घोडे भरधाव फेकले. परंतु तो त्यांना मुळीं गाठला नाहीं. चंद्रास्त होईपर्यत ते त्याचा पाठलाग करीत होते. काळोख होतांच तो कोठच्या कोठे निसटून गेला आणि पठाण निराश होऊन माघारी गेले. इकडे कीर्तन आटोपल्यावर महाराज बावांचा निरोप घेऊन गडावर गेले.

तुकाराम बावांच्या प्रासादिक व सद्बोधप्रचुर वाणीचा एके समयी त्यांच्या मनावर असा काही विलक्षण परिणाम झाला कीं त्यांनीं सर्वसंगपरित्याग करून शेषजीवित ईश्वरभक्तींत घालविण्याचा निर्धार केला, आणि ते रानांत जाऊन बसले. त्यांच्या वृत्तींत हा पालट झालेला पाहून जिजाबाईने तुकारामबावांच्या दर्शनास जाऊन महाराजांना ही वृत्ति सोडण्याचा बोध करावयास सांगितले. त्यावरून महाराज त्यांच्या किर्तनास नित्याप्रमाणे आले तेव्हा त्यांनीं भगवद्गीतेत श्रीकृष्णाने अर्जुनास स्वकर्तव्यापासून

निवृत्त न होण्याचा जो बोध केला आहे त्यास अनुसरून तोच कथाप्रसंग आणून बोध केला. त्यावरून निवृत्ति मार्ग सोडून ते पुनरपि स्वीकृत कार्यसिद्धीस लागले.

ह्याप्रमाणे तुकारामबावावर महाराजांची श्रद्धा अतिशयित बसली, आणि ह्या अशा महासाधूचें सान्निध्य आपणांस नेहमी घडावे व त्याच्या बोधामृत्ताचें सेवन आपण सदोदित करावे अशी उत्कट इच्छा त्यांच्या हृदयांत उत्पन्न झाली; आणि त्यांनीं बावांना ह्या आशयाचें एक पत्र लिहून आपल्या एका कारकुणाच्या हाती पाठविलें; आणि त्यांना आणण्यासाठी घोडा, छत्री वगैरे सरंजाम दिला. ते पत्र वाचून बावांनी महाराजांना त्याच्या उत्तरादाखल कांहीं अभंग लिहून पाठविले. त्यांतील कांही चरणांचा येथे अनुवाद करितोः

*हेत लागला आमुचिये भेटी । पत्रामाजी गोष्टी हेचि थोर ।।*
*याचे हें उत्तर ऐकेगा भूपति । लिहितो विनंति हेताची हे ।।*
*अरण्यवासी आम्ही फिरों उदासीन । दर्शन हें अमंगळ ।।*
*तुम्हांपाशी आम्ही येऊंनियां काय । वृथा आहे शीण चालण्याचा ।।*
*राजगृहा यावें मानाचिये आसे । तेथें काय वसे समाधान ।।*
*ऐकोनियां मनीं उदास व्हाल जरी । तरी आम्हां हरि उपेक्षीना ।।*
*तुका म्हणे आम्ही श्रीमंत मनाचे । पूर्वील दैवाचे हरिभक्त ।।*

हें असें अत्यंत निस्पृहतेचें पत्रोत्तर आल्यामुळे महाराजांची इच्छी अर्थात् अतृप्त राहली. परंतु त्याबद्दल त्यांस काहीएक विषाद वाटला नाहीं, तर उलट त्या महासाधुविषयी त्यांची आदरबुद्धि विशेषच वृद्धिंगत झाली. त्यांच्या कीर्तनास सवडीप्रमाणें जात असत. बावांचे अकिंचनत्व पाहून त्यांस कांहीतरी नेमणूक करून देऊन त्यांचा योगक्षेम नीट चालेसें करावे असें त्यांच्या मनांत आलें. परंतु तसें करण्याचा योग प्राप्त होण्यापूर्वीच बावांचे देहावसान झालें. तथापि त्यांच्या बोधामृताचे अनेकदा प्राशन केल्याचें थोडे तरी उतराई व्हावें व त्यांनीं जनांस आमरण ईश्वरभक्तीचा व सदाचाराचा बोध केला त्याचा मोबदला प्रत्यक्ष त्यांस नाहीं तरी त्यांच्या वंशजांस द्यावा असें मनांत आणून महाराजांनी त्यांच्या मुलांस तीन गांवांची सनद करून दिली. ती अद्यापी त्यांच्या वंशजांत चालत आहे.

आपल्या हातून सदोदित साधूंची परिचर्या व्हावी व त्यांच्या सद्बोधाचे सर्वदा श्रवण घडावे म्हणून त्यांनीं तुकारामबावांस आपल्या सन्निध येऊन राहण्याची विनींत

केली होती. ती त्यांनीं अमान्य केल्यावरून त्यांच्या ध्यानांत असे आलें की ज्यांच्या ठायीं निःसीम वैराग्यवृत्ति बाणली असते त्यांना कोणाच्याच आश्रयाची दरकार नसते. तरी पण खऱ्या साधूचा आपणांस समागम व्हावा व त्याच्या अनुग्रहाने कैवल्यसाधन घडावें असें त्यांच्या मनात अहर्निश वागे. जेथेंजेथें कोणी साधुसंत असत तेथें सवडीप्रमाणें जाऊन त्यांचें दर्शन घेण्याचा त्यांचा परिपाठ असे. अशा साधूंचा परामर्श घेऊन त्यांच्या योगक्षेमाची ते योग्य तजवीज करीत.

पुढें १६७२-७३ सालांत वाई, सातारा वगैरे प्रांतांवर महाराजांचा अमल बसून तिकडे त्यांचें जाणेयेणे होऊं लागलें, तेव्हां त्यांना असें कळले. कीं रामदासस्वामी ह्या नांवाचा कोणी महासाधु चाफळखोऱ्यांत मठ व रघुपतीचे देवालय बांधून राहत आहे. तेव्हां त्याच्या दर्शनासाठी महाराज तिकडे गेले. त्यांनी देवालयांत जाऊन देवाचें दर्शन घेतले आणि संभामंडपात येऊन रामदासस्वामी कोठे आहेत म्हणून तेथल्या आपल्या महालकऱ्यास विचारले. त्याने उत्तर केले: स्वामी नेहमी मठांत नसतात, बहुतकरून रानांत असतात. हल्ली ते बहिरवगड येथें आहेत. त्यावरून महाराज तिकडे गेले. परंतु तेथेहि त्यांचे दर्शन घडले नाही. तेव्हां निराश होऊन ते मुक्कामास परत गेले. पुढें रामदासस्वामींनी महाराजांना एक ओवीबद्ध पत्र लिहिले, तें असें:-

निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारू।श्रीमंत योगी ।।१।। परोपकाराचिया राशी। उदंड घडती जयासी । तयाचे गुणमहत्त्वासी । तुलना कैची ।।२।। नरपति हयपति गजपति । भूपति जलपति । पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठभागो ।।३।। यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत । पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।।४।। आचारविचारशील । दानशील धर्मशील । सर्वज्ञपणें सुशील । सकलां ठायीं ।।५।। धीर उदार गंभीर। शूर वीर्यासी तत्पर । सावधपणे नृपवर । तुच्छ केले ।।६।। तीर्थक्षेत्रे मोडली । ब्राह्मणस्थाने भ्रष्ट झाली । सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।। ७।। देव धर्म तो ब्राह्मण । करावया संरक्षण । हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ।।८।। उदंड पंडीत पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक । धूर्त तार्किक सभानायक । तुमच्या ठायीं ।।९।। धर्म रक्षी ऐसा नाहीं । महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुम्हांकरिता ।।१०।।आणीकहि धर्मकृत्ये चालती । आश्रित होऊनि कित्येक राहती । धन्यधन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारला ।।११।। कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकास धाक सुटले । कित्येकांस आश्रय झाले । शिव कल्याण राजा ।।१२।। तुमचे देशी

वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें । ऋणानुबंधें विस्मरण झाले । काय नेणूं ।।१३।। सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति । सांगणे काय तुम्हांप्रती । धर्मस्थापनेची कीर्ति । संभाळिली पाहिजे ।।१४।। उदंड राजकारण तटले । तेणें चित्त विभागलें । प्रसंग नसता लिहिले । क्षमा केली पाहिजे ।।१५।।

हें असें रामदासस्वामींचे पत्र हातीं पडताच महाराज त्यांच्या दर्शनास गेले. त्यांची ही पहिली भेट १६७२ सालच्या एप्रिल महिन्यांत शिंगण वाडींत झाली. तेथें महाराजांनी सुमुहूर्त पाहून स्वामींचा अनुग्रह घेतला आणि त्याच्यासन्निध कांहीं दिवस राहून त्यांचा धर्मोपदेश ते ऐकत राहिले. त्या बोधाचा परिणाम महाराजाच्या चित्तावर असा विलक्षण झाला कीं सर्वसंगपरित्याग करून स्वामींच्या शिष्टमंडळांत प्रविष्ट होऊन त्यांच्या सेवेस सदैव राहावें असा त्यांनी विचार केला. परंतु स्वामीनी त्यांना ह्या बेतापासून निवृत्त केलें आणि स्वस्थानी जाऊन आपल्या कार्यास तत्पर राहावयास सांगितले यानंतर महाराज स्वामीच्या दर्शनास वेळोवेळा जाऊन त्यांच्या आध्यात्मिक बोधाचें श्रवण करीत असत. पुढें त्यांनीं स्वामींना परळीचा किल्ला नुकताच काबीज केला होता त्यावर आणून ठेवून त्या किल्ल्यास सज्जनगड असें नाव दिले. आणि त्यांच्या योगक्षेमासाठी कांहीं जमीन लावून दिली. सज्जनगडावर स्वामी येऊन राहिल्यावर त्यांचा शिष्यपरिवार फारच वाढल्यामुळे त्यांना लावून दिलेल्या जमिनीचे उत्पन्न पुरे पडेना. म्हणून महाराजांनी कर्नाटकांत जातांना त्यांना आणखी जमीन लावून दिली.

***

भाग सत्ताविसावा

# अंतकाळ (सन १६८०)

महाराजांनी आपल्या वयाच्या शेवटल्या वर्षी मुंबईच्या इंग्रजांस व जंजिऱ्याच्या शिद्दीस पुरा शह देण्याकरितां मुंबईच्या बेटापासून दहाबारा मैलांच्या अंतरावर समुद्रांत खानेरी व हुनेरी अशीं दोन लहान बेटे आहेत त्यांवर आपलीं ठाणी बसविली. याला इंग्रजांनीं व शिद्दीनें बरीच हरकत घेतली. परंतु महाराजांच्या आरमारापुढे त्यांच्या आरमाराचे कांहीं एक चालले नाहीं. त्या बेटांवर त्यांनी चोहोंबाजूंस बांधकाम करून त्यावर तोफा लावून ठेवल्या. ह्यामुळें इंग्रजांस मोठी दहशत पोचून ते महाराजांना हवा तसा तह करून देण्यास तयार झाले. ह्यापूर्वी राज्याभिषेकाच्या वर्षी महाराजांशी तह करून ते त्यांच्या भीतींतून मुक्त झाले होते. यांच्याकडून दारूगोळा व बंदुकातोफा मिळण्यासारख्या असल्यामुळें व यांच्या सलोख्यानें आपल्या देशाचा परदेशांशी व्यापार वाढण्याचा संभव असल्यामुळें यांना त्यांनीं आपल्या राज्याच्या सन्निध राहू दिलें होते. परंतु त्या इंग्रज व्यापाऱ्यांना मोगलांची भीति असल्यामुळें जंजिऱ्याचा शिद्दी जो महाराजांचा पक्का दुस्मान त्याच्याशी तुटून वागता येत नसे, कारण त्या शिद्दीला मोगलांचा आश्रय होता.

महाराजांना स. १६८० च्या आरंभी अशी बातमी लागली कीं औरंगाबाद येथील लष्कराच्या खर्चासाठी पुष्कळ मोठी रक्कम दिल्लीहून येत आहे. त्यासरशी त्यांनीं निवडक घोडेस्वारांनिशीं निघून ती रक्कम घेऊन येणाऱ्या लोकांवर अचानक हल्ला केला. व तें सगळे द्रव्य हस्तगत करून शत्रूकडून हरकत होण्यापूर्वी ते रायगडावर अतिवेगाने येऊन पोचले. ह्या दौडीमुळे त्यांना अतिशयित थकवा आला. त्यांच्या छातीत दुखू लागलें, थूंकीतून रक्त पडूं लागले व अंगात मनस्वी ज्वर भरला. हे दुखणे दिवसेंदिवस अधिकाधिक जड होत गेलें. पदरच्या लोकांनी मोठमोठे वैद्य आणून नाना प्रकारचे औषधोपचार केले, देवतास नवस केले, सर्व प्रकारची अनुष्ठानें केली,

मांत्रिकांकरवीं जादूटोणे करविले. सारांश त्यांनीं सर्व प्रकारच्या उपायांची पराकाष्ठा केली, पण कांहीं एक उतार पडेना.

आपला अंतसमय समीप आला असे पाहून महाराजांनीं आपले प्रधान वगैरे कारभारी व आप्तजन जवळ बोलाविले, आणि त्यांस ते म्हणाले: ''आमच्या आयुष्याची मर्यादा संपली. अतःपर आमचा देह राहत नाहीं. आमच्या वडिलांची चाळीस हजार होनांची जहागीर होती, ती वाढवून एक कोटि होनांचे राज्य आम्ही मिळविले व ऐशी हजार पागा केली. संपूर्ण भरतखंड जिंकावे, दिल्लीचे तक्त घ्यावे, श्री भागीरथी करमुक्त करावी; अटक नदीच्या पलीकडे राज्य आक्रमण करून शासन चालवावें, असा आमचा उत्कट हेतु होता, तो असिद्ध राहिला. आमचे आयुष्य खुंटले. आम्ही मिळविलेले राज्य आमच्यामागे मर्दुमकीने, हिंमतीने व हुशारीने रक्षण करणारा असा पुत्र नाही. राजाराम अल्पवयी आहे. तो वाचला तर हें राज्य संभाळून वाढवील. संभाजी वडील मुलगा असून जाणता आहे; परंतु त्याची बुद्धि कांहीं चांगली नाही.''

हें असे निदानीचे व निरुत्साहाचे भाषण ऐकून सर्वांचे कंठ दाटून आले. त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. त्यांस पराकाष्ठचें दुःख झालेले पाहून महाराज पुनः बोलले: ''तुम्ही अणुमात्र श्रमी होऊं नका. ह्या मानवी देहास ईश्वराने मृत्यू नेमिला आहे जितके उत्पन्न झाले तितके जावयाचें. चिरंजीव असा कोणीच नाही. धन, सुत, जाया वीरश्री, पराक्रम, अहंता ही सर्व मिथ्या असून येथल्या येथेच राहावयाची. त्यांस लुब्ध होऊन मोहवश झाल्याने चित्तास नसती तळमळ लागते ज्या काळी जें घडावयाचें ते प्रमाण मानून निरपेक्ष चित्तानें वर्तावे यांतच कल्याण आहे, तुम्ही सर्व पराक्रमी आहा. कळले तसा प्रयत्न करून स्वराज्याचे रक्षण करा. तुम्ही सगळे एका विचाराने वागा आमच्या प्रकृतीस आराम पडावा म्हणून तुम्ही करावयाचे तेवढे प्रयत्न केले. सर्व मांनवी प्रयत्न कुंठित झाले आतां प्रयत्न करूं नका. आमची आयुष्यमर्यादा पूर्ण झाली. तुम्ही ह्या गोष्टीचा शोक करूं नये. विवेकाने चित्ताचें समाधान करावें.''

ह्याप्रमाणें आपल्या लोकांचे सांत्वन करून महाराजांनी सगळ्यांस बाहेर जावयास सांगितले. मग त्यांनीं भागीरथीचे उदक आणवून प्रायश्चित्त विधिपूर्वक स्नान केले, सगळ्या अंगास अग्निहोत्राच्या भस्माचें लेपन करून रुद्राक्ष व तुलशीमाला धारण केल्या दर्भासनी बसून मोठमोठ्या पंडितांस आणि सन्याशांस जवळ बोलाविले व त्यांशी आत्मानात्म विचार चालविला. अशी विरक्तता धारण करून ते सगळा वेळ

भगवद्भजन करूं लागले. शतगोप्रदानें आपल्या समक्ष करून त्यांनीं सहस्त्र गोप्रदानांचा द्रव्यद्वारा संकल्प केला, आणि भगवद्गीता व सहस्त्रनाम यांचे पाठ चालविले. असा आसमंतात ब्रह्मवृंदाच्या वाणीचा घोष चालला असतां 'श्रीराम' हा शब्द उच्चारीत महाराजांनी अत्यंत शांत व समहित चित्तानें देहत्याग केला. ह्याप्रमाणे आमरण अविश्रांत परिश्रम व पराक्रम करून संपादिलेले ऐश्वर्य व दौलत सोडून जातांना त्यांस अत्यल्पहि खेद झाला नाहीं. हें कांहीं लहानसान धैर्य नव्हे. धर्मपरायणतेने प्राप्त होणारें मनोजय करण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठायीं किती वसत होतें हें ह्यावरून चांगले व्यक्त होते. पुराणांतरीं वर्णिलेल्या राजर्षिच्या क्रमास अनुसरून सगळें राज्य पुत्राच्या स्वाधीन करून व सर्वसंगपरित्याग करून ईश्वरप्राप्तीच्या मार्गाचे अखंड अवलंबन करावे असा विचार त्यांच्या मनांत वारंवार येई. परंतु यवन पादशाहतीचें भरतभूमींतून समूळ उत्पाटन करून सर्वत्र हिंदुपदपादशाहीची संस्थापना करण्याचा जो आपला हेतु तो अपूर्ण राहिला आहे, म्हणून अशा स्थितींत राज्यत्याग करून वानप्रस्थाश्रमाचा अंगीकार केल्यास स्वप्रजेचें अहित होऊन स्वराज्यनाश होईल, व तेणेंकरून आपली सर्वत्र अपकीर्ति होईल, हे विचार त्यांच्या मनांत येऊन संसारत्यागाचा विचार त्यांना अकालिक वाटे. शेवटीं त्यांनीं असा निर्धार केला होता कीं संसारांत राहून धर्माचरण करावे, सत्समागम करावा, विषयसुखांत आसक्त होऊं नये, व स्वकर्तव्य यथासांग करून मोक्ष साधावा यातच खरा पुरुषार्थ आहे. संसारत्याग करून गिरिकुहरांत वास केल्यानें स्वकर्तव्यपराङ्मुख झाल्याचा दोष माथी येऊन आपला भ्याडपणा व्यक्त होईल असें त्यांस वाटे.

महाराजांचे देहावसान झालें तेव्हां सर्वांस पराकाष्ठेचें दुःख झालें. प्रधानमंडळाने किल्ल्याचे दरवाजे बंद करून ही निधनवार्ता बाहेर न पसरे अशी खबरदारी घेतली. सर्व राजचिन्हांनी युक्त अशी प्रेतयात्रा काढून महाराजांच्या कलेवरास विधिपूर्वक मंत्राग्नि दिला. महाराजांची तृतिय पत्नी पुतळाबाई हिने सहगमन केलें, उत्तरक्रिया संभाजी भोसले शिंगणापूरकर यांच्या कडून राजारामास समीप बसवून सांगोपांग करविली. दानधर्म बहुत केला.

***

वाय ६५२-११०० (पु.) अे५*-४.२०१९

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.